म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
ग्रं. क्र. १०९८४



# थॉमस पेनचे
# तेक निबंध

REFBK-0009277

ARL PUBLICA

# थॉमस पेनचे राजनैतिक निबंध

२२९३८ निबंध
१०८३ ३१/८/५८

अनुवादक

मंगेश पाडगांवकर

द्रा. क्र. ८२८७

REFBK-0009277

A PEARL PUBLICATION

'पर्ल पब्लिकेशन' प्रकाशन

किंमत ५० नये पैसे

लिबरल आर्ट प्रेस न्यू यॉर्क (यू. एस्. ए.)
यांच्या सहकार्यानें प्रकाशित केलें

मूळ पुस्तकाचा मराठींतील भारतांत केलेला
प्रथम अनुवाद

पुनर्मुद्रणाचे सर्व हक्क प्रकाशकांकडे

पहिली आवृत्ति : १९५७

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई
प्रकाशक : जी. एल्. मिरचंदानी, पर्ल पब्लिकेशन (प्रायव्हेट) लि
२९, वीर नरिमन रोड, मुंबई १

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| थॉमस पेनचा परिचय | १ |
| समाज व राज्यसंस्था यांविषयीं सारासार विचार | ३९ |
| अमेरिकेंतील आणीबाणीचा काळ | ९३ |
| मानवी हक्क–भाग पहिला | १०९ |
| मानवी हक्क–भाग दुसरा | १४९ |
| शासनशास्त्राच्या मूलतत्त्वांचें विवेचन | १९१ |

२२१३८ निबंध
१०८४ नों: दि: ३१।८।

# थॉमस पेनचा परिचय

१

आपल्या व्यक्तित्वानें युग उजळणाऱ्या थोर मानवतावादी महात्म्यांत थॉमस पेन याची गणना करावी लागेल. माणसाच्या राजकीय आणि सामाजिक विचाराचा अभ्यास करीत असतांना एक मानवताप्रेमी व्यक्ति म्हणून आपण थॉमस पेनचें नांव घेतलें पाहिजे. माणसाचें दुःख पाहून थॉमस पेनचें मन अपरिहार्यपणें बंड करून उठलें; आणि या व्यवहारवादी विचारवंतानें माणसावर होणाऱ्या अन्यायाच्या मागील कारणांचा शोध घेण्याचा कसून प्रयत्न केला. आयुष्यांत आलेल्या अत्यंत खडतर प्रसंगीं सुद्धां पेनचें मानवतेवरील प्रेम यत्किंचितहि ढळलें नाहीं; मानवजातीच्या भविष्याविषयीं तो कधींहि निराश झाला नाहीं. समाजाला जर चांगल्या शासनसंस्थेच्या स्वरूपाविषयींचें ज्ञान करून दिलें तर समाजाची बरीचशीं दुःखें कमी होतील अशी पेनची श्रद्धा होती. स्वतःला सुधारलेल्या म्हणवणाऱ्या देशांत बहुसंख्य समाज दैन्यदारिद्र्यानें पोखरला आहे या वस्तुस्थिचची पेनला स्पष्ट जाणीव होती. मानवी समाजाची अशी दुर्दशा होण्यास जुलमी शासनसंस्था सर्वस्वीं कारण आहेत असें त्याचें स्वच्छ मत होतें. राजसत्ताकामुळें मानवतेचा आत्मा खची होतो. कारण राजसत्ता ही विशिष्ट माणसांच्या स्वार्थ साधण्याचाच प्रयत्न करीत असते असें पेननें बजावून सांगितलें आहे. राष्ट्राचा मोठेपणा हा मानवतेच्याच पायावर उभा असतो अशी श्रद्धा शासनसंस्था आणि समाजहित यांच्या संबंधाच्या संदर्भात पेननें व्यक्त केली आहे. पेनचें जीवन आणि कार्य यांच्या द्वारें त्याच्या या तत्त्वप्रणालीचें स्वरूप समजावून घेणें हा या प्रस्तावनेचा एक हेतु आहे.

पेनसारखे मानवतावादी महात्मे घडवतां येत नाहींत, ते जन्मावेच लागतात. हें जरी खरें असलें तरी ज्या असंख्य घटना मानवतेवरील त्याचें हें प्रेम दृढमूल करण्यास कारणीभूत झाल्या त्यांचा विचार करण्यास आपण चुकतां कामा नये. अठराव्या शतकांत जन्मास येण्याचें महान् भाग्य त्याला लाभलें होतें ही गोष्ट आपण

नेहमींच लक्षांत ठेवली पाहिजे. त्या काळांतील ध्येय-विचारांचा अभ्यास करीत असतांना एक गोष्ट आपल्या लक्षांत येते आणि ती म्हणजे पेनचें वाचन प्रचंड नव्हतें ही. त्याचा मित्र थॉमस जेफरसन याच्या सारखी विद्वत्ता आणि व्यासंग पेनजवळ नव्हता. परंतु ज्या महान् तत्त्वांनीं अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात क्रान्तीचा वणवा पेटवला त्या तत्त्वांच्या माहितीसाठीं आधाशीपणें वाचन-व्यासंग करण्याची पेनला आवश्यकता मुळींच नव्हती. प्रो. गिल्बर्ट चिनार्ड यानें एका ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, "कधीं कधीं आपल्याला कबूल करावें लागेल कीं एकाद्या काळांत विशिष्ट कल्पना जणुं काय वातावरणांत भरून राहिलेल्या असतात. त्या कल्पना सर्वांच्याच असतात. कोणत्याहि विशिष्ट व्यक्तीनें त्या कल्पनांना जन्म दिला असें सांगणें जवळ जवळ अशक्यप्राय असतें. अठरावें शतक हा काळ असा होता."

पेनच्या लेखनाचा अभ्यास करीत असतांना सतराव्या आणि अठराव्या शतकांतील मोठमोठ्या विचारवंतांचे उल्लेख त्याच्यांत आपल्याला इतके क्वचित आढळतात याचें आश्चर्य वाटतें. अधून मधून वेरनौ आणि टरगॉट या फिजीऑक्रॅटवाद्यांचे व मॉन्टेस्क्यु या तत्त्वज्ञाचे उल्लेख आढळतात. परंतु पेनच्या विचारसरणीवर त्यांचा फारसा परिणाम झालेला नाहीं. रुसो आणि ॲबे रेनॉल यांच्या लेखनांविषयीं, "स्वातंत्र्याच्या उत्कट भावनेचें उदात्त दर्शन यांच्या लेखनांत होतें. हें लेखन वाचीत असतांना वाचकाच्या भावना हेलावतात आणि त्याच्या मानसिक शक्तींना चालना मिळते. परंतु असें असलें तरी आपलें ध्येय साध्य करण्यासाठीं सर्वसामान्य माणसांनीं कोणत्या मार्गांनीं आणि कसें गेले पाहिजे याचें दर्शन मात्र त्यांत आढळत नाहीं." असें मत थॉमस पेननें दिलें आहे. रूसोच्या लेखनांत आढळणारा भावनोत्कट ध्येयवाद किंवा निसर्गाकडे वळण्याचें रुसोनें केलेलें आवाहन या गोष्टी पेनच्या लेखनांत फारशा आढळत नाहींत. थॉमस पेन हा स्वभावतःच बुद्धिवादी होता; त्या दृष्टीनें सतराव्या शतकावर विलक्षण प्रभाव पाडणाऱ्या न्यूटन आणि लॉके या विचारवन्तांनाच पेन अधिक जवळचा आहे.

आश्चर्याची गोष्ट अशी कीं न्यूटन आणि लॉके यांचाहि उल्लेख पेनच्या वाङ्मयांत फारसा आढळत नाहीं. यावरून या विचारवंतांचें साहित्य पेननें स्वतः वाचलें असेल किंवा काय असा प्रश्न मनांत निर्माण होतो. वयाच्या विसाव्या वर्षी पेननें बेंजामिन् मार्टिन आणि जेम्स फर्ग्युसन यांनीं न्यूटनचें खगोलशास्त्र या विषयावर दिलेलीं दोन व्याख्यानें ऐकलीं होतीं एवढी माहिती आपणाला मिळते. मार्टिन

आणि फर्ग्यूसन या न्यूटनचें तत्त्वज्ञान लोकप्रिय करणाऱ्या दोघां विचारवंतांचें पेनशीं कांहीं ठिकाणीं असलेलें विचारसाम्य प्रो. क्लार्कनें दाखविलें आहे. परंतु न्यूटनचा पेनवर झालेला परिणाम बहुतांशीं धार्मिक दृष्टिकोणाचा आहे. न्यूटनच्या राजकीय विचारसरणीचा पेनच्या लेखनावर झालेला संस्कार दाखविणें कठिण आहे. "अमेरिकेंतील आणीबाणीचा प्रसंग" या विषयावरील आठव्या निबंधांत पेननें आपलें मत व्यक्त केलें आहे तें असें, "पदार्थविज्ञान, गणितशास्त्र, खगोलशास्त्र हीं शास्त्रें माणसाचें मन सृष्टीच्या रहस्याच्या अगदीं जवळ घेऊन जातात. न्यूटन हा इंग्रज होता हें त्याचें भूषण नसून तो एक थोर तत्त्वज्ञ होता हें त्याचें भूषण होतें. खगोलशास्त्राच्या अध्ययनानें त्याचें मन राष्ट्रीयत्वाच्या संकुचित पूर्वग्रहांतून मुक्त केलें. आणि विज्ञानाच्या अध्ययनानें त्याचा आत्मा त्याच्या व्यासंगाइतकाच विशाल बनला होता." पेननें केलेल्या न्यूटनच्या उल्लेखांत, त्यांतल्या त्यांत राजकीय विषयाच्या विषयाशीं संलग्न असा हाच उल्लेख आहे. असें जरी असलें तरी न्यूटनच्या पदार्थविज्ञानविषयक विचारांची शासनसंस्थेच्या विचाराशीं घातलेली सांगड (न्यूटनचा नामोल्लेख नसला तरी) पेनच्या वाङ्मयांत अनेक ठिकाणीं आढळते. मानवी हक्क या आपल्या प्रबंधाच्या दुसऱ्या भागांत पेन म्हणतो, "राजसत्ताकाचा मूर्खपणा जर दिसावयास नको असेल तर आपण आपल्या विवेकाचे डोळे बंद केले पाहिजेत. आपल्यांतील विचारशक्ति नष्टच केली पाहिजे. निसर्गाच्या सर्व व्यवस्थेंत एक सुसंगति आढळून येते. परंतु राजसत्ताक शासनसंस्था हा एकच प्रकार असा आहे कीं जो निसर्गाशीं द्रोह करतो." या परिच्छेदांत निसर्गाच्या सर्व व्यवस्थेंत एक सुसंगति आढळून येते असें जेव्हां पेन लिहितो तेव्हां तो न्यूटनच्या या विश्वासासंबंधीच्या कल्पनेचा निर्देश करीत असतो. परंतु राजसत्ताकामुळें न्यूटनच्या विश्वरचनेविषयींच्या कल्पनेला कसा काय धक्का बसतो हें मात्र समजण्याला मार्ग नाहीं. अशाच तऱ्हेचें एक चमत्कारिक विधान पेननें दुसरीकडे केलेलें आहे. तो म्हणतो, "पुलीच्या (वजन उचलण्यासाठीं वापरलें जाणारें चाक) तत्त्वावर जर समाजाची रचना केली, तर बहुतेक सामाजिक दुःखें नष्ट होतील." न्यूटनच्या विश्वरचनाविषयक कल्पनेचा पेनच्या विचारावर झालेला परिणाम आपल्याला दिसतो. परंतु राजकीय सिद्धांताच्या विवरणासाठीं त्यानें या कल्पनांचा केलेला उपयोग मात्र बुद्धीला पटत नाहीं. आपल्या राजकीय सिद्धांताचें स्पष्टीकरण करतांना न्यूटनच्या या सिद्धांतांचा दृष्टांत देण्यापुरताच पेनला उपयोग

झालेला आहे. त्याच्या राजकीय सिद्धांतावर त्याचा कांहीं परिणाम झालेला नाहीं. याच राजकीय सिद्धांताकडे पेन वेगळ्याच मार्गानें पोहोंचला आहे.

जेम्स् चीदॅम् यानें थॉमस पेनवर असा आरोप केला होता कीं त्यानें आपले बहुतेक विचार लॉकेच्या पुस्तकांतूनच उचलले आहेत. या आरोपाला उत्तर देण्याच्या निमित्तानें पेननें लॉकेच्या नांवाचा उल्लेख केला आहे. तो म्हणतो, "मी लॉकेचें वाङ्मय वाचलेलें नाहीं; त्याचें पुस्तक माझ्या कधीं हातीं आलें नाहीं." पेननें पुढें असें सांगितलें आहे कीं लॉकेच्या विचाराचा परिचय पेनला हॉर्न टूके या इंग्रज मुत्सद्याच्या मार्फत झाला. एवढ्या आधारावर लॉकेचे राजकीय सिद्धांत अत्यंत अव्यवहार्य आहेत अशी पेननें टीका केली आहे. यानंतर पेननें आपल्या नेहमींच्याच तऱ्हेवाईकपणानें त्याच्या राजकीय सिद्धांताचा उगम कशांत आहे हें सांगण्याचा प्रयत्न केला. पेन लिहितो, "लॉकेची किंवा दुसऱ्या कोणत्याहि विचारवंताची कोणतीहि कल्पना मी घेतलेली नाहीं. इ. स. १७७३ मध्यें एका इंग्रजानें केलेल्या आपल्या भाषणांतील एका अचरट विधानामुळें शासनसंस्थेच्या स्वरूपाविषयीं माझ्या मनांत विचार सुरू झाले. प्रशियाचा राजा फ्रेडरिक धि ग्रेट याच्याविषयीं बोलतांना जॉन बूल म्हणाला, 'राजा होण्यास फ्रेड्रिक् हा अत्यंत लायक मनुष्य आहे. कारण त्याच्यांत सैतानाचा फार मोटा अंश आहे!' जॉन बूलच्या या बेफाट वक्तव्यामुळें सैतानाचा अंश असलेला राजा असल्याशिवाय शासनसंस्था असूंच शकत नाहीं काय? असा प्रश्न तीव्रतेनें माझ्या मनांत निर्माण झाला. आणि मी कोणाच्याहि मदतीशिवाय माझ्या राजकीय सिद्धांतापर्यंत येऊन पोंचलों."

पेननें लॉकेचें एक अक्षरहि वाचलें नसेल ही गोष्ट असंभाव्य वाटते. परंतु इंग्रज विचारवंतांच्या वाङ्मयाचा जर त्याला सखोल परिचय असता तर त्या वाङ्मयाविषयीं कांहींच माहित नाहीं असें पेन म्हणाला नसता. कांहीं विद्वान पेनच्या वाङ्मयांत या इंग्रज विचारवंताच्या वाङ्मयांतील विचार आणि शब्द यांचें साम्य काढून दाखवितात. परंतु असें असलें तरी 'मानवी हक्क' आणि 'सामाजिक करार' या सिद्धांताविषयींची माहिती पेनला वेगवेगळ्या ग्रंथांतून अप्रत्यक्षपणें मिळाली होती असेंच म्हणणें अधिक सयुक्तिक ठरतें. पेनच्या शासनसंस्थेच्या स्वरुपाविषयींच्या विचारावर जेम्स बर्कच्या पुस्तकांचा बराच परिणाम झालेला दिसतो. जेम्स बर्कचीं हीं पुस्तकें बरीचशीं लॉकेच्या सिद्धांतावरच आधारलेलीं होतीं.

खरें म्हणजे या क्रांतिकारक तत्वांचा लॉके हा जनक होता असें म्हणतां येणार नाहीं. अनेक शतकांच्या राजकीय अनुभवांचें सार असलेले स्वातंत्र्यप्रेमी इंग्रजांचे आणि अमेरिकनांचे विचार लॉकेनें अत्यंत अनुरूप शब्दांत व्यक्त केले हेंच त्याचें वैशिष्ट होय. या विचारसरणीच्या संपूर्ण विरुद्ध अशी विचारसरणी सतराव्या शतकांत रूढ झाली होती. ही विचारसरणी देखील अनेक शतकांतून वाढत वाढत आली होती. हॉब्सनें १६५१ सालीं लिहिलेल्या आपल्या 'लेव्हीयाथन' या पुस्तकांत या विचारसरणीचा अत्यंत प्रभावी पुरस्कार केला आणि जनमनाची पकड घेतली. हॉब्स हा राजसत्ताक शासनसंस्थेचा कट्टर पुरस्कर्ता होता. हॉब्सचें म्हणणें असें होतें कीं, मनुष्य हा निसर्गतःच वाईट असतो; म्हणून जर त्याला धाकांत ठेवणारी अशी सार्वभौम सत्ता नसेल तर समाजांत युद्ध आणि अनास्था यांखेरीज दुसरें कांहींहि दिसणार नाहीं. याचाच अर्थ असा कीं आपला हा दुबळेपणा ओळखून आपल्या सुरक्षिततेसाठीं माणसें राज्यसंस्था हा कृत्रिम उपाय योजतात आणि कायदा आणि सुव्यवस्था नांदावी यासाठीं एखाद्या समर्थ व्यक्तीला शरण जातात व त्याच्या हातीं सर्वाधिकार सुपूर्द करतात.

लॉकेनें शासनसंस्थेच्या स्वरुपावर १६९० सालीं लिहिलेल्या प्रबंधांत हॉब्सच्या नेमका उलट विचार मांडलेला आहे. हॉब्सच्या वाचकांना सर्वथैव अज्ञात असलेल्या लोकशाहीच्या आणि उदारमतवादाच्या कल्पना त्यानें या निबंधांत मांडल्या आहेत. हॉब्स आणि लॉके यांचे मानवी स्वभावाकडे पहाण्याचे दृष्टिकोन संपूर्णपणें परस्पर विरोधी होते. त्यांच्या राजकीय विचारांतील विरोधाचें मूळ नेमकें याच गोष्टींत आहे. माणूस हा निसर्गतःच दुष्ट आणि युद्धपिपासु आहे असें हॉब्सचें मत होतें. याच्या उलट, माणूस हा मूलतः सौजन्यशील आणि शांतताप्रेमी आहे अशी लॉकेची श्रद्धा होती. राष्ट्राराष्ट्रांचा इतिहास पाहिला असतां माणसें अनेक वेळां शांततेचा मार्ग सोडून युद्धांनाच प्रवृत्त झालेलीं आपण पाहतों. परंतु यामुळें माणूस स्वभावतःच दुष्ट आहे असें विधान करणें कितपत इष्ट आहे? निसर्गाच्या नियमांचें पालन करण्यांत अयशस्वी झाल्यामुळें त्याच्या जीवनांत युद्धासारख्या अनेक विसंगति घुसतात असेंच म्हणणें बरोबर नाहीं काय? या गोष्टीच्या सत्यतेविषयीं लॉकेच्या मनांत यत्किंचितहि संशय नव्हता. मनुष्य हा बुद्धिसंपन्न प्राणी आहे. आणि म्हणूनच निसर्गनियम त्याचे मार्गदर्शक झाले पाहिजेत. प्रो. प्रियरडननें एके ठिकाणीं म्हटलें आहे,

"शासनसंस्था अस्तित्वांत येण्यापूर्वी माणसें स्वतंत्र होतीं, त्यांना समान हक्क होते—या समान हक्कांपैकीं स्वातंत्र्य, मालमत्ता आणि जीवन हे प्रमुख होत—हा धडा लॉके निसर्गनियमांपासून मुख्यतः शिकला !" परंतु हॉब्स किंवा लॉके हे दोघेहि 'निसर्गाकडे वळा' या तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते नव्हते. लॉकेचें असें म्हणणें होतें कीं आपले नैसर्गिक हक्क जर माणसाला अबाधित राखावयाचे असतील तर त्यानें आपल्या शेजाऱ्याला बरोबरीच्या नात्यानें वागविलें पाहिजे. म्हणजेच नैसर्गिक हक्क एका सामाजिक करारान्वयेंच रूढ केले पाहिजेत. माणसाचें नैसर्गिक स्वातंत्र्य अबाधित राखणें हाच या राजकीय कराराचा हेतु आणि म्हणूनच या स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठीं अपरिहार्य तेवढेच हक्क माणसांनीं शासनसंस्थेच्या हातीं सुपूर्द केले पाहिजेत. लॉकेच्या या सामाजिक कराराच्या सिद्धांताला फक्त स्वतंत्र नागरिकच अभिप्रेत होते, राज्यकर्ते अभिप्रेत नव्हते. राजसत्ता ही सार्वभौम आहे असें हॉब्सचें मत होतें. परंतु राज्यकर्ते हे लोकांनीं दिलेल्या सत्तेचे केवळ विश्वस्त असतात असें लॉके मानीत असे. या सत्तेचा उपयोग समाजहितासाठींच केला पाहिजे अशी त्याची श्रद्धा होती. लॉकेचें नैसर्गिक हक्कांचें तत्त्वज्ञान आणि तदनुषंगानें त्यानें मांडलेला सामाजिक कराराचा सिद्धांत हा असा आहे. आणि आपण पूर्वी लॉके वाचलेलाच नव्हता असें जरी पेन म्हणत असला तरी त्याच्या लेखनांतून हेच राजकीय सिद्धांत मांडलेले दिसतात.

पेनच्या राजकीय विचारसरणीवर विशेष परिणाम करणाऱ्या आणखी एका तत्त्वप्रणालीचा येथें उल्लेख केला पाहिजे. पेनचे वडील क्वेकरपंथीय होते. हा पंथ आपल्याला मान्य असल्याचें पेननें कांहीं वेळां म्हटलें आहे. मॉक्युअर कॉन्वे यानें पेनच्या लोकशाही विचारावर क्वेकरपंथीयांचा झालेला परिणाम अत्यंत महत्त्वाचा म्हणून नमूद केला आहे. अमेरिकेचें स्वातंत्र्ययुद्ध चालू असतांना पेनसिल्वानिया येथील क्वेकरपंथीयांच्या विरुद्ध पेन उभा राहिला. "अमेरिकेंतील आणीबाणीचा प्रसंग" या आपल्या निबंधाच्या तिसऱ्या भागांत पेन्सिल्वानियांतील क्वेकरपंथीयांच्या शांततेच्या धोरणावर आणि टोरी पक्षाबद्दलच्या अशा रीतीनें प्रकट झालेल्या त्यांच्या सहानुभूतीवर पेननें टीकेची झोड उठवली आहे. परंतु युद्ध संपल्यानंतर १८०२ मध्यें पेन जेव्हां अमेरिकेंत आला तेव्हां मात्र त्यानें क्वेकर पंथाला उचलून धरलें. 'क्वेकरपंथीयांसारखे नीतिमान् आणि चारित्र्यसंपन्न लोक इतर पंथांत आढळणें कठीण'...'समाजांतील रंजल्या गांज-

त्यांना आपलें म्हणणें, त्यांच्या मुलांना शिक्षण देणें ही क्वेकरपंथीयांनीं चालविलेली समाजसेवा प्रशंसनीय आहे"—या पेननें लिहीलेल्या कांहीं वाक्यांतून क्वेकर पंथीयांविषयींच्या त्याच्या या काळांतील सहानुभूतीची कल्पना येते. एके ठिकाणीं तर त्यानें क्वेकर पंथ मानणाऱ्या एका कुटुंबांत जन्माला येण्याचें भाग्य मला लाभलें" असा अभिमानानें उल्लेख केला आहे. थॉमस पेननें शेवटीं तर आपल्या मृत्युपत्रांत असें लिहून ठेवलें कीं, "मी क्वेकर पंथाचा सभासद नाहीं परंतु क्वेकरपंथीयांची हरकत नसेल तर त्यांच्या स्मशानभूमींतच माझें दफन व्हावें अशी माझी इच्छा आहे." लोकशाहीच्या स्वरूपाचा शोध घेणाऱ्या थॉमस पेनच्या लोकशाहीकडे कललेल्या कल्पनाप्रवण मनाला क्वेकर पंथाच्या समतेच्या आणि मानवतेच्या तत्वज्ञानांत उत्तर सापडलें. त्याच्या विचारसरणीवर सखोल परिणाम करणारा एक अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून क्वेकर पंथाचा उल्लेख करणें आवश्यक आहे. परंतु हा परिणाम एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच असला पाहिजे. कारण क्वेकर पंथातील तत्त्वज्ञानांत असलेला गूढवादाचा भाग पेनच्या बुद्धिवादी मनाला स्वीकारतां आला नाहीं. ज्या मानवतावादाचा पुरस्कार अठराव्या शतकानें केला त्या तत्त्वाचा संस्कार पेनवर क्वेकर पंथाच्या द्वारें झाला.

पेनच्या राजकीय विचारसरणीचें व तिच्या पार्श्वभूमीचें असें विहंगमावलोकन करीत असतांना पेनच्या इंग्लंडमधील वास्तव्यांत त्याच्या जीवनांत घडलेल्या कांहीं घटना आपण अवश्य विचारांत घेतल्या पाहिजेत. पेनला उदारमतवादाच्या दिशेनें प्रवृत्त करण्यांत या घटनांचें अंग आहे. पेनचा जन्म एका गरीब कुटुंबांत झाला. पेनला शाळेंत पाठविणेंच त्याच्या वडिलांना आर्थिक दृष्ट्या जड होतें. तरी त्यांनीं कसाबसा त्याला शाळेंत घातला. तेराव्या वर्षी आपल्या बापाला तो शिंपी कामांत मदत करूं लागला. यानंतरच्या काळांत आपली सांपत्तिक स्थिति सुधारण्यासाठीं पेननें आतोनात धडपड केली परंतु हालअपेष्टा आणि दारिद्र्य हेंच त्याच्या वांट्याला येत गेलें. वयाच्या पंचविसाव्या वर्षी पेन अबकारी खात्यांत नोकरीला राहिला. परंतु तीन वर्षांनीं त्या खात्यांतून त्याला काढून टाकण्यांत आलें. यानंतर केंग्सिस्टन येथील एका शाळेंत तो शिक्षकाचें काम करूं लागला. १७६८ मध्यें अबकारी खात्यांतील अधिकारी म्हणून पुनः त्याची नेमणूक झाली. अबकारी खात्यांतील लोकांना पुरेसें वेतन मिळत नाहीं असें पेनला सारखें वाटत होतें. आपल्या सहकाऱ्यांशीं वातचीत करून त्यानें त्यांच्या मताचा अंदाज घेतला. या

सहकाऱ्यांकडून उत्तेजन लाभल्यामुळें १७७२ मध्यें पेननें पार्लमेंटला उद्देशून 'अबकारी खात्यांतील अधिकाऱ्यांचें गाऱ्हाणें' या नांवाची एक पुस्तिका लिहून प्रसिद्ध केली. पेनच्या लिखाणांत पुढें आढळून येणाऱ्या मानवतावादी दृष्टिकोनाची झलक या त्याच्या सुरवातीच्या लिखाणांत बीजरूपानें आढळतें. अबकारी अधिकाऱ्यांच्या वतीनें पार्लमेंटच्या सभासदांना व्यक्तिशः भेटून पेननें आपलें गाऱ्हाणें त्यांच्यासमोर मांडण्याचाहि प्रयत्न केला. याचा परिणाम असा झाला कीं एक चळवळ्या मनुष्य म्हणून सरकारदरबारीं त्याचा दुर्लौकिक पसरला आणि १७७४ मध्यें पुनः त्याला नोकरीवरून काढून टाकण्यांत आलें. नोकरी सुटल्यानंतर एका वर्षानें पेनला साफच दिवाळें काढावें लागलें. या हलाखीच्या परिस्थितींत त्यावेळीं लंडनमध्यें असलेल्या फ्रँकलिननें पेनला मदतीचा हात दिला. या वर्षाच्या शेवटीं म्हणजे आपल्या वयाच्या सदतीसाव्या वर्षी पेन अमेरिकेंत आला आणि त्यानें आपल्या नव्या जीवनाला सुरुवात केली.

## २.

जुलमी राज्यकर्त्यांनीं दडपून टाकलेल्या विचारवंतांना अमेरिका नेहमींच आसरा देत आली आहे. थॉमस पेनला अमेरिकेनें आपलें म्हटलें. आणि पुढें लवकरच अमेरिकेच्या संकटकाळीं पेन तिच्या मदतीला धांवला. मानव समाजावर होणाऱ्या अनेक अन्यायांची पेनला यापूर्वीच जाणीव झाली होती. त्याच्या मानवतावादी आणि लोकशाही विचारसरणीला अमेरिकेंतील वास्तव्यांत विशेष धार आली. अमेरिकेंतील वास्तव्यांत पेननें केलेल्या राजकीय लिखाणाचें परिशीलन केलें असतां त्याच्या सर्व विचारसरणीला चालना देणारी मूलभूत प्रेरणा कोणती हें आपल्याला कळून येईल. त्यांची ही प्रेरणा त्याच्या मानवतावादी दृष्टिकोनाला अत्यंत जवळची आहे. या प्रेरणेचा सर्वोत्तम आविष्कार पेनच्या 'मानवाचे हक्क' या निबंधांत झालेला दिसेल. या प्रेरणेचा थोडासा विचार येथें आपण करूं. व्यक्ति आणि राष्ट्र यांच्या मनांत खोल कुठें तरी एक जडमूढता असते. यामुळेंच त्यांना लाभलेलें नैसर्गिक स्वातंत्र्य आणि सुख धोक्यांत येतें. आणि म्हणूनच माणसानें आपले नैसर्गिक हक्क अबाधित ठेवण्यासाठीं सदैव धडपड करीत राहिलें पाहिजे. पेन म्हणतो, "माणसांत अनेक गुण सुप्तावस्थेंत असतात. सुप्तावस्थेंतील या गुणांना जर अनुरूप परिस्थि-

त्तीनें चेतना दिली नाहीं तर माणसाबरोबरच त्याच्या गुणांचेंही अखेर थडगें बनतें." अशा या जडतेच्या अवस्थेंत माणसाला आपण गुलाम झालों आहोंत याचेंहि भान उरत नाहीं. बर्कनें फ्रान्सच्या राज्यक्रांतीवर केलेल्या भाष्यांत पेनला एक गुण आढळला. पेन म्हणतो, "बर्कच्या या वक्तव्यामुळें एखाद्या व्यक्तीच्या हातीं जर अनियंत्रित सत्ता दिली तर मानवी स्वातंत्र्य कसें धोक्यांत येतें व त्याची कशी रखवाली केली पाहिजे हें समजतें."

क्वेकर पंथाच्या या वैचारिक पार्श्वभूमीमुळेंच पेनचें लक्ष तो अमेरिकेंत आल्या-नंतर तात्काळ नीग्रोंच्या गुलामगिरीकडे वळलें. १७७५ मध्यें त्यानें 'अमेरिकेंतील आफ्रिकनांची गुलामगिरी' असें शीर्षक असलेला निबंध लिहिला. हा निबंध वाचीत असतांना गुलाम नीग्रोंच्या हालअपेष्टा पेननें स्वतः पाहिल्या असतील असें वाटत नाहीं. परंतु हा निबंध अमेरिकनांना उद्देशून लिहिलेला होता ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. आपल्या या निबंधाच्या द्वारें पेनला एकच तत्त्व मांडावयाचें होतें आणि तें म्हणजे प्रत्येक व्यक्तीनें आपल्या नैसर्गिक हक्कांविषयीं जागरूक असलें पाहिजे हें. आपल्या या निबंधाचा शेवट, "न्यायाच्या आणि मानवतेच्या या भावना आहेत." या वाक्यानें पेननें केला आहे. या प्रश्नाकडे पहावयाचा त्याचा मानवतावादी दृष्टिकोन येथें स्पष्ट दिसतो. अमेरिका स्वतः जरी गुलामगिरींतून मुक्त होण्याची धडपड करीत असली तरी खुद्द अमेरिकेंतच गुलामगिरीची प्रथा आहे याची योग्य जाणीव पेनला होती. आणि म्हणूनच अत्यंत निःस्पृहपणें अमेरिकनांना उद्देशून तो म्हणतो, "दर वर्षी शेंकडों, हजारों लोकांना तुम्ही गुलाम म्हणून विकतां आणि विकत घेतां. त्यांना गुलाम करण्याचा अधिकार तुम्हांला कोणी दिला? आणि जोंपर्यंत तुम्ही दुसऱ्यांना गुलाम करतां तोंपर्यंत दुसऱ्यानें तुम्हांला गुलाम केलें असतां त्यांच्या विरुद्ध ओरडण्याचा तुम्हांला काय अधिकार पोहोंचतो?"

पेन अमेरिकेंत आला तेव्हां अमेरिकन वसाहती राजकीय दृष्ट्या गंभीर अशा संकटांत सांपडल्या होत्या. हा नाट्यपूर्ण संघर्षबिंदु पेननें तात्काळ हेरला. १७६५ च्या स्टॅम्प ॲक्टपासून अमेरिकेला गुलाम करण्याचा इंग्लंडचा प्रयत्न टोरीपक्षाचे लोक सोडून सर्व अमेरिकन जनतेला उघड उघड दिसूं लागला होता. १७७० सालीं इंग्रज सरकारनें बोस्टन येथें अमेरिकनांची कत्तल केली तिच्यामुळें अमेरिका आणि इंग्लंड यांच्यांतील या संघर्षानें अत्यंत उग्र स्वरूप धारण केलें

होतें. यानंतर लौकरच बोस्टन टी पार्टी हें प्रकरण घडलें. या प्रकरणामुळें चिडून इंग्रज सरकारनें अमेरिकनांवर अनेक अन्याय्य कायदे लादले. बोस्टन बंदर बंद करण्यांत आलें. मॅसेच्युसेट्स् सनदेनुसार दिलेल्या सर्व सवलती मागें घेण्यांत आल्या. पेन अमेरिकेंत येण्यापूर्वी हे सर्व कायदे लादण्यांत आलेले होते. अमेरिकेच्या सर्व वातावरणांत प्रतिकाराची, संतापाची भावना धुमसत होती. कोपऱ्याकोपऱ्यांतून बंडाची उठावणी होईल असा रंग दिसूं लागला होता. १७७५ च्या ऑक्टोबरमध्यें इंग्लंडच्या राजानें आपल्या सैन्याधिकाऱ्यांना उद्देशून एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. ह्या जाहीरनाम्यांत सर्व अधिकाऱ्यांनीं अमेरिकनांचें हें बंड मोडून काढण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करावी असें आवाहन करण्यांत आलें होतें. राजाच्या या जाहीरनाम्यामुळें अमेरिकन वसाहतींतील बंडाची भावना अधिकच तीव्र झाली.

अशा या सर्वत्र पसरलेल्या बंडाच्या वातावरणाचा थॉमस पेनच्या मनावर अत्यंत तीव्र परिणाम झाला. याच भावनेनें पेटून त्यानें "सारासार विचार" ही आपली पहिली पुस्तिका लिहिली. हीं पुस्तिका प्रथम १७८६ च्या जानेवारीच्या महिन्यांत प्रसिद्ध झाली. एका महिन्यांतच तिची दुसरी आवृत्ति निघाली. या दुसऱ्या आवृत्तींत पेननें अधिक मजकुराची भर घातली होती. सतरा वर्षांनंतर आपल्या या पुस्तिकेविषयीं लिहितांना पेन म्हणतो "दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची मी संधि शोधीत होतों. या निमित्तानें ती मला मिळाली. अंतःकरणप्रवृत्ति प्रमाण मानून मी पुढें चालूं लागलों. मीं पुस्तकें वाचलीं नाहींत किंवा कोणा इतर विचारवंत मताचें अध्ययनहि केलें नाहीं. मीं स्वतंत्रपणें विचार केला. ती हकीकत अशी. अमेरिकेंत स्वातंत्र्ययुद्ध सुरू झालें. जुनें सरकार बाद ठरविण्यांत आलें होतें. तरीही या संघर्षमय परिस्थितींत सर्व व्यवहार शासनसंस्था नसतांनाहि अत्यंत सुव्यवस्थितपणें आणि सभ्यपणें चालले होते. हें मीं पाहिलें तेव्हां मला कळून चुकलें कीं समाज स्वभावतःच जें करीत असतो त्यांत शासनसंस्था फारच थोडी भर टाकते. त्याचप्रमाणें हेंहि कळून चुकलें कीं सुल्तानशाही आणि सरदार-शाही हे मानवजातीवर लादलेले घोर अन्याय आहेत. हीं तत्त्वें मांडण्यासाठींच मी 'सारासार विचार' ही माझी पुस्तिका लिहिली.

पेननें वर उल्लेखिलेलीं तत्त्वें त्याच्या अगोदर लॉके आणि इतर विचारवंत यांनीं अत्यंत प्रभावीपणें मांडलीं होतीं. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळीं शासन

संस्था नसतांना सामाजिक व्यवहारांतील सभ्यता आणि सुव्यवस्था कायम होती हें पेनचें विधान मान्य केलें असतां "समाज स्वभावतःच जे व्यवहार करतो त्यांत शासनसंस्था फारच थोडी भर टाकीत असते." या पेनच्या विचारांतील खरेपणा आपल्याला समजूं शकतो. 'सारासार विचार' या आपल्या निबंधांत पेननें गुंतागुंतीच्या शासनसंस्थेपेक्षां निसर्गनियमांचें पालन करणारा समाजच माणसाच्या सुखशांतीचें निधान आहे असें विधान केलें आहे. पेन आपल्या वाचकांना सांगतो, "इतर जगाच्या संबंधापासून तुटलेला आणि कोणत्याहि प्रदेशांत प्रथमच वसाहत करून राहणारा एखादा मानवसमूह डोळ्यासमोर आणा. या निसर्गसिद्ध स्वातंत्र्याच्या काळांत समाजाची स्थापना हा एकच विचार माणसें मनांत वागवीत असणार." यानंतरच्या परिच्छेदांत पेन प्रातिनिधिक शासनसंस्था निसर्गतत्त्वाला कशी धरून आहे याचें प्रतिपादन करतो. पेन लिहितो, "शासनसंस्थेचें स्वरूप कसें असावें हें मी निसर्गनियमांच्या परिशीलनानेंच ठरवितो. हा निसर्गनियम बदलणें मानवी प्रयत्नाच्या बाहेरचें आहे. हा नियम असा: एखादी गोष्ट जितकी कमी गुंतागुंतीची तितका तिच्यांत बिघाड होण्याचा संभव कमी; आणि समजा जर कांहीं बिघाड झालाच तर तो दुरुस्त करणें अगदीं सोपें असतें." वाचकाच्या डोळ्यासमोर हें ध्येय ठेवून पेन इंग्लंडच्या राज्यघटनेंतील दोषांवर बोट ठेवतो. तो लिहितो, "इंग्लंडची राज्यघटना इतकी गुंतागुतीची आणि गोंधळाची आहे कीं तिच्यांत कांहीं बिघाड झाला असतां त्रास भोगणाऱ्या जनतेला हा बिघाड नेमका कोठें उत्पन्न झाला आहे हें कळणेंच शक्य नसतें." आणि यानंतर पेन मानवाच्या मूलभूत हक्कांचें ध्येय डोळ्यांसमोर ठेवून निसर्गाचे नियम धाब्यावर बसविणाऱ्या, मानवाचे हक्क पायदळीं तुडविणाऱ्या या गुंतागुतीच्या शासनसंस्था कसा अन्याय करीत असतात याचें चित्र रेखाटतो.

नैसर्गिक हक्कांचा सिद्धान्त मांडल्यानंतर, अमेरिकेनें इंग्लंडशीं तह करण्याची भाषा करणें किती मूर्खपणाचें आहे हें पेन दाखवून देतो. अमेरिकेनें इंग्लंडपासून ताबडतोब वेगळें झालें पाहिजे हें सांगतांना पेन लिहितो, "इंग्लंडशीं तह करणें म्हणजे विवेकाशीं द्रोह करणें होय. कोणत्याहि बाह्य सत्तेच्या वर्चस्वाखालीं फार काळ अमेरिका राहूं शकेल असें मानणें हें मानवजातीच्या आजवरच्या इतिहासाला, सृष्टिरचनेच्या नियमांना सोडून आहे." आज ना उद्यां अमेरिका स्वतंत्र होणारच. अमेरिकेपासून इंग्लंड इतक्या दूरच्या अंतरावर

आहे एवढीच गोष्ट इंग्लंड अमेरिकेवर फार काळ राज्य करूं शकणार नाहीं हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. इंग्लंडशीं संबंध ठेवल्यास अमेरिकेला निष्कारण इतर राष्ट्रांचें शत्रुत्व ओढवून घ्यावें लागेल. त्यामुळें अमेरिकेचा व्यापार बरबाद होईल. इंग्लंडशीं तह हें आतां एक मूर्खपणाचें स्वप्न होईल. कांहीं जण अजूनहि असें म्हणतात कीं इंग्लंड हा अमेरिकेचा पितृदेश आहे. परंतु इंग्लंडनें सदैव आपल्या प्रजेचा छळच केलेला आहे. आणि आतां या पितृदेशानें अमेरिकन कॉलनीविरुद्ध हत्यार उपसलें आहे. केवळ अमेरिकेविरुद्ध नव्हे तर साऱ्या मानवजातीच्या मूलभूत हक्काविरुद्ध इंग्लंडनें हें शस्त्र उगारलें आहे. आपल्या मुलांची कत्तल उघड्या डोळ्यांनीं पाहून इंग्लंडचा राजा स्वस्थ झोपूं शकतो." "आपण अमेरिकन जनतेला पित्याच्या ठिकाणीं आहोंत हें म्हणणें म्हणजे इंग्लंडच्या राजाचें शुद्ध ढोंग आहे." पेननें इंग्लंडवर केलेल्या हल्ल्याचा एकूण सूर हा असा आहे. कोणतीहि शासनसंस्था जर जनतेशीं द्रोह करीत असेल तर ती शासनसंस्था बरखास्त केली पाहिजे असा विचार लॉकेनें मांडला होता याची येथें आठवण होते.

पेननें इंग्लंडवर चढवलेल्या चौफेर हल्ल्यांत ठिकठिकाणीं प्रचारकाचा वक्तृत्व-पूर्ण अभिनिवेश दिसून येतो यांत शंका नाहीं. परंतु इंग्लंडच्या या जुलमाचा प्रतिकार करण्यासाठीं सर्व अमेरिकन वसाहतींनीं एकत्र आलें पाहिजे हें सांगत असतांना पेन अनेक ठिकाणीं उत्तमोत्तम विचार मांडीत असतो. पेनच्या विचारांना निश्चितपणाची धार आहे. सर्वसामान्य, स्थूल सिद्धांताच्या भोंवऱ्यांत तो वाचकाला सोडून देत नाहीं. अमेरिकन कॉंग्रेसचें स्वरूप कसें असावें, अमेरिकेची राज्यघटना कोणत्या तत्त्वांवर करावी इत्यादि सर्व विषयांवर पेन अत्यंत स्पष्ट अशा योजना जनतेसमोर मांडतो.

"सारासार विचार" या पुस्तिकेच्या नव्या आवृत्तीला पेननें एक परिशिष्ट जोडलें होतें. या परिशिष्टांत अमेरिकेनें तात्काळ स्वातंत्र्याची घोषणा करण्याची किती निकड आहे हें पेननें दाखवून दिलें आहे. १७७४ सालीं केलेल्या अन्याय्य क्यूबेक ॲक्टचें पेननें उघड करून दाखविलेलें कुटिल स्वरूप पाहून त्याच्या बुद्धिमत्तेचें कौतुक वाटतें. या कायद्यान्वयें इंग्रज सरकारनें कॅनडाची हद्द वाढविल्याचें जाहीर केलें. त्यामुळें स्वाभाविकच अमेरिकन वसाहतींची मालकी असलेल्या सरहद्दीवरील अनेक जमिनी इंग्लंडनें बळकावल्या. अमेरिकेच्या आर्थिक

विकासाच्या दृष्टीनें या जमिनींचें महत्त्व विशेष होतें. नवें राष्ट्र उभारण्याच्या दृष्टीनें पश्चिम अमेरिकेचा विभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. याची अंधुक जाणीव १७७६ सालींच पेनला झाली होती—कांहीं वर्षांनंतर हीच गोष्ट अधिक स्पष्टपणें जाणवली. आपल्या या परिशिष्टाच्या शेवटीं स्वातंत्र्यसंपादनासाठीं सर्व अमेरिकन वसाहतींना एक होण्यासाठीं पेन आवाहन करतो. "पेन लिहितो, व्हिग-टोरी हे सर्व भेद आतां नष्ट होवोत. स्वतंत्र अमेरिकेचे सज्जन नागरिक, मानवजातीच्या मूलभूत हक्कांचे पुरस्कर्ते म्हणूनच आपण ओळखले जाऊं या !"

'सारासार विचार' या पुस्तिकेला इतकें प्रचंड यश मिळेल याची खुद्द पेनलाहि कल्पना नव्हती. अमेरिकेंत पेटलेल्या स्वातंत्र्याच्या आकांक्षेचा स्पर्श पेनच्या मनाला झाला होता. जनतेची ही महान् आकांक्षा थॉमस पेननें त्यांच्या हृदयाला भिडेल अशा शब्दांत व्यक्त केली. पुढें पुष्कळ वर्षांनंतर एकदां पेननें आढ्यतेनें असे उद्‌गार काढले कीं छापण्याची कला निघाल्यापासून आतांपर्यंत या पुस्तिकेइतकें दुसरें कोणतेंहि पुस्तक लोकप्रिय झालेलें नाहीं. थॉमस पेननें या पुस्तकाचा हक्क आपल्याकडे न ठेवतां अमेरिकन संघराज्यांत येणाऱ्या प्रत्येक राज्याला ते देऊन टाकले होते. परंतु या पुस्तिकेच्या एक लक्ष प्रति खपल्या हें पेनचें विधान मात्र शंभर नंबरी सत्य वाटत नाहीं. पेनच्या या पुस्तिकेचें महत्त्व कमी करण्यासाठीं म्हणून हें विधान केलेलें नाहीं. अमेरिकन क्रान्तीमध्यें या पुस्तकाचें स्थान अढळ आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीमुळें या पुस्तिकेला गति मिळाली. पेननें नागरिकांच्या हक्कांचा मसुदा तयार करण्यासाठीं केलेल्या वक्तृत्वपूर्ण आवाहनाचा परिणाम अमेरिकन काँग्रेसवर निश्चित झाला. 'सारासार विचार' या पुस्तकाच्या लोकप्रियतेवर पेनने दिलेला भर अत्यंत महत्त्वाचा आहे यांत शंका नाहीं. अमेरिकन क्रांतीला साकार करण्याचे, ती जनमनापर्यंत नेण्याचे जे जे प्रयत्न झाले, त्यांत थॉमस पेनच्या या पुस्तिकेला फार मोठें स्थान आहे. थॉमस पेनच्या समकालीन टीकाकारांनीं या पुस्तिकेला उत्तर देण्याचें अनेक प्रयत्न केले. यावरूनहि या निबंधाचें महत्त्व ध्यानांत येते. पेनसिल्वानियाच्या गॅझेटमध्यें कॅटो या टोपण नांवानें प्रसिद्ध झालेलीं पत्रें हा अशा प्रयत्नांपैकीं एक प्रमुख होय. अँग्लिकन पंथाचा एक पाद्री डॉ. विल्यम स्मिथ यानें हीं पत्रें लिहिलीं होतीं. या पत्रांत स्वातंत्र्याच्या चळवळीवर आणि अमेरिकेंत पसरणाऱ्या लोकसत्तावादावर टीकेची झोड उठविलेली होती. पेननें पेनसिल्वानिया

जर्नलमध्यें या टीकेला चार पत्रें लिहून चांगलें खरमरीत उत्तर दिलें होतें. आपल्या या पत्रांत पेनने स्वातंत्र्याच्या आकांक्षांच्या पुनरुच्चार केला होता. सारासार विचार या निबंधानंतर पेननें अमेरिकेंतील आणीबाणीची परिस्थिति ही आपली निबंध-माला लिहिली. अमेरिकेची स्वातंत्र्याची चळवळ पूर्ण होईपर्यंत ही निबंधमाला चालू ठेवावयाची अशी त्याची कल्पना होती. या मालेंत त्यानें तेरा पुस्तकें लिहिलीं. या सर्व लिखाणांत पेनच्या लेखनशैलीचें वैशिष्ट्य असलेला सडतोडपणा प्रकर्षानें दिसून येतो. इतिहास घडत असतांना आपण त्यांतीलच एकजण आहोंत अशी नाट्यपूर्ण भूमिका घेऊन पेननें हे निबंध लिहिले होते. यावेळीं अमेरिकेंत नैराश्याचें वातावरण पसरलें होतें. याच क्षणीं पेननें या निबंधमालेंतील पहिला निबंध लिहावयाला घेतला. या निबंधाच्या सुरवातीला 'राष्ट्राच्या पुरुषार्थाची कसोटी पहाण्याची ही वेळ आहे' हें पेननें लिहिलेलें वाक्य विलक्षण गाजलें. स्वतः पेनला हें वाक्य विलक्षण आवडलें होतें. अनेक वर्षें त्याच्या आठवणींत तें घोळत राहिलें. न्यूयॉर्कच्या आसपास अमेरिकन सैन्याला बरेच पराभव पत्करावे लागले होते. त्याला न्यूजर्सीहून माघार घ्यावी लागली होती. स्वातंत्र्याची चळवळ पराभवांच्या या आघातानंतर पुन्हा डोकें वर काढीत नाहीं अशी नैराश्याची भावना निर्माण झाली होती. याच वेळीं राष्ट्राच्या श्रद्धेला आवाहन करण्यासाठीं पेननें लिहिलें, "सैतानाप्रमाणेंच जुलमावरही विजय मिळविणें कठीण आहे. परंतु जनतेनें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं संघर्ष जेवढा बिकट तेवढेंच यश अधिक उज्ज्वल" असें म्हणून पेननें नंतर जनरल ग्रीनच्या नेतृत्वाखालीं त्यानें स्वतः भाग घेतलेल्या युद्धाचे अनुभव रंगविले. आपले अनुभव सांगत असतांना त्यानें टोरी पक्षावर कडाडून हल्ला चढविला. पेन लिहितो "टोरी कोणाला म्हणावें? अरे देवा, काय सांगणार! माझ्याबरोबर जर शंभर व्हिग्पक्षाचे लोक असतील तर मी एक हजार टोरी लोकावर सहज चाल करून जाईन. प्रत्येक टोरी हा भ्याड असतो, कारण स्वार्थांतून निर्माण झालेली गुलामगिरीची भेकड वृत्ति हाच टोरी पक्षाचा पाया आहे. असा मनुष्य क्रूर असूं शकेल पण शूर असणें शक्य नाहीं."

या पहिल्या निबंधाच्या शेवटीं अमेरिकेने जर भ्याडपणें माघार घेतली तर तिच्या वांट्याला कोणती गोष्ट येणार आहे याचें विदारक चित्र पेननें रेखाटलें आहे. पेन लिहितो, "भयानक विनाशाचें हें चित्र पहा आणि त्यावर चार अश्रु

ढाळा. यावर जर विश्वास न ठेवणारा कोणी कमनशिबी असेल तर त्याच्या वांट्याला हें दुःख आल्याशिवाय राहाणार नाही.".

या नंतरच्या निबंधांत पेननें इंग्लंडच्या माफीच्या आमिषाला न फसण्याविषयीं अमेरिकेला सावधगिरीची सूचना दिली आहे. १७७६ मधें जनरल होवे यानें, जे अमेरिकन शस्त्रें खालीं ठेवून शरण येतील त्यांना माफी दिली जाईल असें जाहीर केलें होतें. जनरल होवेचा हा कुटिल डाव पेननें तेव्हांच ओळखला. या निबंधमालेंतील दुसरा निबंध पेनने लॉर्ड होवे आणि न्यूयॉर्कमधील टोरी पक्षाचे लोक यांना उद्देशून लिहिला. या मालेंतील चवथा निबंध ब्रॅंडीवाइन येथील लढाई संपल्यानंतर १७७७ च्या जूनमधें लिहिला गेला. या युद्धांत झालेल्या पराभवामुळें फिलाडेल्फियामध्यें घबराट पसरली. हें शहर आतां आपल्या हातचें जाणार असेंच बहुतेकांना वाटलें. या पराभवाची वस्तुस्थिति पेनला ठाऊक नव्हती किंवा ती तो नजरेआड करीत होता असें म्हणणें चूक ठरेल. अनुभवावरून पेन निश्चितपणें एवढें शिकला होता कीं संकट सुद्धां भावी यशासाठींच आलेलें आहे असें जनतेचा तेजोभंग होऊं न देण्याच्या दृष्टीनें म्हणणें आवश्यक असतें. आणि म्हणूनच या पराभवाचें वर्णन सुद्धां पेननें अशा पद्धतीनें लिहिलें कीं तें वाचून जनतेंत चेव निर्माण व्हावा. आपल्या आशावादी शब्दांनीं पेन म्हणाला, "संकटाच्या पोटींच सुटकेचा मार्ग असतो."

अमेरिकन स्वातंत्र्याच्या युद्धाला सुरवात झाली तेव्हां इंग्लंडमधील कांहीं लोकांना या युद्धापायीं इंग्लंडला होणाऱ्या प्रचंड कर्जाची जाणीव होऊं लागली. या युद्धांत विजय होईल किंवा नाहीं हेंही अनिश्चित आहे एवढें त्यांनी कळलें होतें. इंग्लंडच्या जनतेंत हळुहळू निर्माण होणाऱ्या या असंतोषाची पेनला चाहूल लागली आणि त्यानें अमेरिकेंतील आणीबाणी या निबंधमालेंतील आठवा निबंध इंग्लंड-मधील जनतेस उद्देशून लिहिला. या निबंधांत ब्रिटिश सरकारच्या युद्धखोरीपायीं इंग्रज जनतेवर करांचा बोजा कसा वाढणार आहे याची त्यानें जाणीव करून दिली. मानवी हक्क या आपल्या निबंधांत पेननें चढविलेल्या राजसत्तेवरील हल्ल्याचें येथें बीजरूपानें दर्शन होतें. पेन इंग्रजांना उद्देशून लिहितो "तुमची सध्यांची दुरवस्था कोणत्या व्यक्तीमुळें किंवा कोणत्या राज्यव्यवस्थेमुळें निर्माण झाली आहे याच्याशीं अमेरिकेला कांहींच कर्तव्य नाहीं."

१७८३ मध्यें अमेरिकेचें स्वातंत्र्ययुद्ध संपत आलें. या सुमारास त्यानें आपल्या निबंधमालेंतील शेवटचा म्हणजे तेरावा निबंध लिहिला. हा निबंध

वाचतांना पेन वाजवीपेक्षां अधिकच हुरळून गेल्याचें दिसतें. त्याच्या पुस्तिकांना मिळलेल्या यशाची त्याला किंचित् धुंदी चढली होती. 'राष्ट्राच्या पुरुषार्थांची कसोटी पाहाणारा काल आतां संपला आहे' असें त्यानें शेवटचें वाक्य लिहिलें. खरें म्हणजे ही कसोटीची वेळ अजून संपलेली नाहीं हें एकाद्या क्षणीं पेनलाहि जाणवलेलें असेल. अमेरिकन क्रांति ही जगांतील सर्वांत महान आणि परिपूर्ण अशी क्रांति आहे या पेनच्या विधानांत मात्र थोडेसें तथ्य होतें. अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धानें मला लेखक बनविलें हें पेनचें म्हणणेंही थोडेंफार खरें होतें. आपल्या या निबंधांत पेननें निःसंकोचपणें आपणच जनतेच्या केलेल्या सेवेचा उल्लेख केला आहे आणि या निबंधांनीं आपण वाङ्मयांत बहुमोल भर घातली आहे असाहि आपला विश्वास व्यक्त केला आहे. पेनच्या पुढील जीवनाच्या संदर्भांत त्यानें या निबंधाच्या शेवटीं लिहिलेला परिच्छेद वाचला असतां तो अंतःकरणाला हलवून सोडतो. या निबंधाच्या अखेरीस पेन लिहितो, "आतां युद्ध संपलें आहे. प्रत्येक मनुष्य आपल्या घरीं सुखस्वास्थ्याचें जीवन जगण्यासाठीं परतला तेव्हां मी सुद्धां या विषयाची रजा घेतों. अमेरिकन स्वातंत्र्याची चळवळ आरंभापासून अखेरपर्यंत पाहाण्याचें भाग्य मला लाभलें. यापुढें मीं कोणत्याहि देशांत गेलों तरी अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धांत मीं जो भाग घेतला त्याबद्दल मला सतत अभिमानच वाटेल. या निमित्तानें मानवतेची थोडीफार सेवा करण्याची संधि व शक्ति मला लाभली याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानतों."

ही निबंधमाला वाचीत असतांना पेनच्या मनांत निर्माण झालेल्या दुसऱ्या एका महत्त्वाच्या कल्पनेची आपणाला जाणीव होते. ही कल्पना संघराज्याच्या ऐक्याची होय. संघराज्याच्या घटनेचा मसुदा १७७७ मधें अमेरिकन वसाहतीं-समोर संमतीसाठीं ठेवण्यांत आला होता. १७८१ पर्यंत या मसुद्याला संमति मिळालेली नव्हती. ही घटना संमत झाल्यानंतर प्रत्येक राज्यसरकारनें केंद्रवर्ती सत्तेच्या हातीं राष्ट्रकारभार चालविण्यासाठीं कांहीं किमान हक्क दिले. बाकीचे सर्व अधिकार पूर्वीप्रमाणें राज्यसरकारांच्या हातीं होते. राज्यघटनेची ही योजना पेननें 'सारासार विचार' या निबंधांत सुचविलेल्या योजनेशीं बरीचशी मिळतीजुळती आहे. याच पुस्तिकेंत अमेरिकेची खरी शक्ति सर्व राज्यांनीं फुटीरपणें न वागतां एकत्र येण्यांत आहे असें वाक्य असलें तरी राज्यघटनेवर लिहिलेल्या या लेखांचा उद्देश केंद्रवर्ती सत्ता बळकट करण्यापेक्षांहि माणसाच्या

नैसर्गिक हक्कांचें संरक्षण करणें हा आहे. आपल्याला ठाऊकच आहे कीं, संघराज्याच्या घटनेनें केंद्रसरकारच्या हातीं आवश्यक होते त्याहून कमी अधिकार दिल्यामुळें पुढें अनेक राजकीय पेचप्रसंग निर्माण झाले व अमेरिकेचें ऐक्य धोक्यांत येण्याची शक्यता निर्माण झाली. स्वाभाविकच, १८८० च्या सुरवातीला केंद्रसत्ता अधिक बळकट केली पाहिजे असा विचार अधिकाधिक प्रबल होऊं लागला. आतां राज्यघटनेची पुनर्रचना केली पाहिजे असें म्हणणाऱ्यांत वॉशिंग्टन, हॅमिल्टन, मॅडिसन हीं मातबर माणसें प्रमुख होतीं. थॉमस पेननें हा विचार उचलून धरला—अर्थातच तो या विचाराला पाठिंबा देईल हें अपेक्षित नव्हतें. केंद्रसरकाराला आवश्यकतेहून कमी आणि राज्यसरकारांना आवश्यकतेहून अधिक अशी सत्तेची चुकीची विभागणी झाली आहे अशी टीका पेननें पुढें कांहीं वर्षांनीं "मानवी हक्क" या आपल्या निबंधांत केली.

पेन कोणत्याहि राजकीय पक्षाचा प्रत्यक्ष सभासद नव्हता. परंतु केंद्रसत्ता आणि घटकराज्यें यांच्यांत अधिकारविभागणीच्या बाबतींत संघर्ष सुरू झाला तेव्हां पेननें संघराज्यवाद्यांची बाजू घेतली. पश्चिमेकडच्या कांहीं भागांत अजून वसाहत व्हावयाची होती. 'व्हर्जिनिया' हें राज्य या भूमीवर आपला हक्क सांगूं लागलें. केंद्रसरकारच्या ताब्यांत ही भूमि द्यावयास तें तयार होईना. मेरिलँड राज्याच्या सीमा सनदेनें निश्चित झालेल्या असल्यामुळें पश्चिमेकडच्या या भूमीवर हक्क सांगणें या राज्याला शक्य नव्हतें. परंतु मेरिलँड राज्यानें असें जाहीर केलें कीं 'व्हर्जिनिया' ही भूमि केंद्रसरकारच्या ताब्यांत देईपर्यंत आपण संघराज्याच्या घटनेला मान्यता देण्यास तयार नाहीं. या प्रकरणीं व्हर्जिनिया राज्याला आवाहन करण्यासाठीं पेननें "सार्वजनिक हित" ही पुस्तिका लिहिली. 'अमेरिकेचें स्वातंत्र्य सर्व घटकराज्यांनीं एकत्र येऊन मिळविलें. पश्चिमेकडच्या वसाहत न स्थापन झालेल्या भूमीवर केंद्रसरकारचाच आधीं हक्क आहे' असें पेननें या पुस्तिकेंत प्रतिपादन केलें. अमेरिकेच्या नव्यानें स्थापन होणाऱ्या राज्याच्या विकासांत या भूमीचें स्थान अत्यंत महत्त्वाचें आहे याची पेनला झालेली जाणीव "सारासार विचार" या पुस्तिकेपेक्षां "सार्वजनिक हित" या पुस्तिकेंत अधिक तीव्र आणि सुस्पष्ट आहे असें दिसतें. पेन लिहितो, "संघराज्यांत केंद्रसत्ता ही सार्वभौम असल्यामुळें जेथें वसाहत स्थापन झालेली नाहीं अशा कोठल्याहि भूमीचा ताबा ओघानें केंद्रसत्तेकडे जातो. या भूमीवर नंतर जे वसाहत करून राहातील त्यांना आमच्या बरोबरीनेंच हक्क प्राप्त होतील."

अमेरिकेच्या भविष्यकालीन विकासाच्या दृष्टीनें केंद्रसत्तेकडे राज्यघटनेंत आहे त्याहून अधिक सत्तेची तरतूद हवी असें पेनला तीव्रतेनें वाटूं लागलें होतें. आणि म्हणूनच "सार्वजनिक हित" या निबंधाच्या शेवटीं त्यानें, 'सर्व राज्यांच्या प्रतिनिधींची अमेरिकन कॉंग्रेसचें अधिकारक्षेत्र निश्चित करण्यासाठीं एक सभा भरवावी' अशी सूचना केली. अखेर 'व्हर्जिनिया' राज्यानें पश्चिमेकडच्या भूमीचा बहुतेक भाग संघराज्याच्या हवालीं केला, आणि त्यामुळें मेरिलँड राज्यालाहि घटनेला मान्यता देणें भाग पडलें.

१७८० च्या प्रारंभीं पेनचें सर्व लक्ष केंद्रसत्ता बळकट करण्याच्या प्रयत्नांकडे लागलें होतें. 'व्यक्ति समाजासाठीं जसा त्याग करते तसा घटकराज्यांनीं संघराज्या-साठीं केला पाहिजे...व्यापारवृद्धि आणि सुरक्षितता यांच्या दृष्टीनें वसाहतींनीं संघराज्याचें ऐक्य अभंग राखलें पाहिजे...' असें पेननें जनतेला सतत आवाहन केलें. पेनच्या या दृष्टिकोनाचा प्रभावी आविष्कार त्यानें 'ऱ्होड आयलँड' येथील जनतेला उद्देशून प्रसिद्ध केलेल्या सहा पत्रांत दिसून येतो. प्रत्येक राज्यानें मालाच्या आयातीवर पांच टक्के कर द्यावा असें कॉंग्रेसचें म्हणणें होतें. ऱ्होड आयलंड हें राज्य या कायद्यास मान्यता देण्यास तयार होईना. ऱ्होड आयलंडनें या कायद्यास मान्यता द्यावी म्हणून तेथल्या जनतेस आवाहन करण्यासाठीं पेननें हीं सहा पत्रें प्रसिद्ध केलीं. पेन लिहितो, "कॉंग्रेस ही कांहीं विशिष्ट व्यक्तींची समिति नसून सर्व घटक राज्याची ती केंद्रवर्ती संघटना आहे. आयातीच्या मालावर पांच टक्के कर आकारणी अत्यंत न्याय्य आणि सोयीस्कर असल्यामुळेंच कॉंग्रेसनें ती संमत केली. बारा राज्यांनीं या आकारणीला मान्यता दिली असतांनाहि एकट्या ऱ्होड आयलंडनें वेगळें फुटूं पाहाणें अयोग्य आहे." अमेरिकेच्या हितासाठीं तेराहि घटकराज्यांनीं एकत्र आलें पाहिजे अशी पेनची ठाम श्रद्धा होती. केंद्रसत्ता बळकट करणें हें पेनच्या 'नैसर्गिक हक्कांच्या' सिद्धान्ताशीं कितपत सुसंगत होतें हें आज सांगणें कठिण आहे. परंतु त्या वेळीं वसाहतींचें ऐक्य हेंच सर्वांत अधिक महत्त्वाचें आहे असें पेनला तीव्रतेनें वाटत होतें. या सहा पत्रांत पेननें ऱ्होड आयलंडनें राष्ट्रासमोर किती विचित्र पेचप्रसंग निर्माण केला आहे हें सविस्तर दाखवून दिलें आहे. हें करीत असतांना पेननें नागरिकाचे घटकराज्य आणि संघराज्य यांच्याशीं कोणत्या प्रकारचे संबंध असले पाहिजेत याचें विवेचन केलें आहे. पेन लिहितो: "प्रत्येक अमेरिकन व्यक्तीचें नागरिकत्व दोन प्रकारचें आहे : ज्या घटक राज्यांत ही व्यक्ति

राहाते त्या घटकराज्याप्रमाणेंच ती संघराज्याचीहि नागरिक असते; संघराज्याच्या नागरिकत्वावरच अखेरीस घटकराज्याचें नागरिकत्व अवलंबून असतें. घटक-राज्याच्या नागरिकत्वामुळें तिला अंतर्गत सुरक्षितता लाभते; आणि संघराज्याच्या नागरिकत्वामुळें तिला जागतिक सुरक्षितता प्राप्त होतें."

१७७५ ते १७८७ या काळांतील—म्हणजे पेन यूरोपमध्यें जाईपर्यंतच्या काळांतील—त्याच्या अमेरिकेंतील राजकीय जीवनांतील कांहीं टप्प्यांचा येथवर आपण परामर्श घेतला. आतां आणखी कांहीं टप्प्यांचा थोडक्यांत उल्लेख करूं. या काळांत पेननें क्वेकर पंथाच्या शांततावादी धोरणावर तें स्वातंत्र्ययुद्धाच्या आड येतें म्हणून कडक टीका केली. परंतु १७७६ मधें पेन्सिल्व्हानियाच्या राज्य-घटनेचें पेननें केलेलें जोरदार समर्थन ऐतिहासिक दृष्ट्या अधिक महत्त्वाचें आहे. वसाहतींच्या राजकारणांत पेननें प्रत्यक्ष भाग घेतला होता. १७७७ मधें कॉंग्रेसनें परराष्ट्रीय कारभार समितीचा चिटणीस म्हणून त्याची निवड केली. मुत्सद्देगिरी ही पेनच्या स्वभावांतच नव्हती. अमेरिकेचा फ्रान्समधील कमिशनर सायलस डीन यांच्याशीं पेनची खडाजंगी जुंपली. फ्रेंच सरकारशीं केलेल्या एका व्यवहारांत डीननें पैसे खाल्ले असा पेनचा आरोप होता. हा अरोप करण्यांत पेनचा कसलाहि वैयक्तिक मतलब नव्हता ही गोष्ट खरी आहे. १७७८ व १७८९ मधें पेननें 'पेन्सिल्व्हा-निया पॅकेट' या वृत्तपत्रांतून पत्रें लिहून सायूलस् डीनवर टीकेची झोड उठवली. परंतु हें करीत असतांना अति उत्साहाच्या भरांत, परराष्ट्रीय कारभार समितीचा चिटणीस या नात्यानें जी अत्यंत गुप्त ठेवावयास हवी होती अशीं कांहीं सरकारी माहिती, डीनच्या विरुद्ध पुरावा म्हणून पेननें प्रसिद्ध केली. ही गोष्ट पेनच्या अंगाशीं आली. कॉंग्रसनें चिटणीस पदावरून पेनला काढून टाकलें. ही गोष्ट पेनच्या मनाला फार लागली. मरेपर्यंत हें शल्य त्याच्या मनाला बोंचत होतें. १८०८ सालपर्यंत पेन कॉंग्रेसला पत्रें लिहून आपल्या या कृत्याचें समर्थन करीत होता आणि त्यावेळच्या पगाराची मागणी करीत होता. तो पगार आपल्याला मिळणें हेंच रास्त आहे अशी पेनची श्रद्धा होती.

पेनच्या राजकारणाचा अमेरिकेच्या आर्थिक समस्यांशीं दाट संबंध होता. आणि म्हणूनच अमेरिकेच्या पुनर्रचनेला पेननें जो हातभार लावला त्याचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. १७७९ च्या अखेरीस पेन्सिल्व्हानियाच्या राज्यसभेचा फडणीस म्हणून पेनची नेमणूक झाली. आपल्या कामका-

जाचा एक भाग म्हणून पेननें १७८० मधें जनरल वॉशिंग्टनचें एक पत्र सभेपुढें वाचून दाखविलें. या पत्रांत वॉशिंग्टननें अमेरिकन सैन्याची पुरती दमछाक झाली असून सैन्यांत अंतर्गत बंडाचीं चिन्हें दिसत आहेत असें लिहिलें होतें. 'अमेरिकेंतील पेचप्रसंग' या आपल्या निबंध–मालेच्या नवव्या हप्त्यांत अमेरिकन सैन्याच्या हलाखीचें त्यानें हृदयस्पर्शी निवेदन केलें. या निवेदनाबरोबर त्यानें असें जाहीर केलें कीं फिलाडेल्फिया येथील प्रमुख नागरिक व व्यापारी यांनीं अमेरिकन राज्याच्या नव्या चलनाला मूल्य प्राप्त होण्याच्या दृष्टीनें आवश्यक असें सोन्याचें पाठबळ देण्याचें निश्चित केलें आहे. यानंतर पेननें दीर्घ कालपर्यंत आपला राजकीय विरोधक असलेल्या रॉबर्ट मॉरिसच्या सहकार्यानें स्वतः पांचशे डालर्स गुंतवून क्रांतीला आर्थिक सहाय्य करण्यासाठीं 'बँक ऑफ नॉर्थ अमेरिका' स्थापन केली. युद्धसमाप्तीनंतर १७८६ मधें कांहीं लोकांनीं सोन्याचांदीच्या चलनाऐवजी कागदी चलन रूढ करण्यासाठीं बँकेचे कायदे बदलून घेण्याचा घाट घातला. याला विरोध करण्यासाठीं पेननें 'बँकेचा व्यवहार आणि कागदी चलन' यांचें विवेचन करणारी पुस्तिका लिहिली. बँकेच्या स्थापने-पासून कागदी चलनाबाबतचें पेनचें ठाम मत होतें. पेन लिहितो, 'कागदी चलन हें बुडबुड्यासारखें आहे. मालमत्तेच्या दृष्टीनें विचार करतां कागदी चलनाला सोन्याचें मोल प्राप्त करून देणें एका वर्षापुरतीच मुदत असलेल्या राज्यसभेला कसें काय शक्य आहे?' पेननें उघड उघड धनिकांना हाताशीं धरलें होतें. यामुळें लोकमत पेनच्या विरुद्ध बरेंच क्षुब्ध झालें. सामान्य माणसाच्या हितावरची पेनची दृष्टि आतां ढळली आहे असेंहि आरोप आतां त्याच्यावर होऊं लागले. केंद्रसत्ता बळकट केली पाहिजे या आपल्या मताप्रमाणेंच चलनाला सुवर्णाचाच आधार असला पाहिजे हें आपलें मत त्यानें ठासून मांडलें. याला जर सार्वजनिक हिताच्या ध्येयापासून ढळणें असें समजायाचें असेल, तरच पेनच्या विरोधकांच्या आरोपांत तथ्य आहे असें म्हणतां येईल!

## .३.

क्रांति सफल झाल्यानंतर अमेरिकेंतील आपलें कार्य आतां संपलें असें पेनला वाटूं लागलें. या जाणिवेमुळेंच 'अमेरिकेंतील पेचप्रसंग' या आपल्या निबंधाच्या शेवटीं "यानंतर मी जरी कोठल्याहि देशांत गेलों तरी" हें वाक्य पेननें लिहिलें.

रानांत एकांतांत राहून निसर्गाचा अभ्यास करणाऱ्या थोरोला ज्याप्रमाणें आपल्या या जीवनप्रयोगांत जगण्याची कृतार्थता वाटत होती त्याप्रमाणेंच पेनलाहि मानवाच्या स्वातंत्र्यासाठीं लढण्यांत वाटूं लागली. इतर राष्ट्रांतल्या परतंत्र जनतेकडे त्याचें लक्ष वळूं लागलें. पेनच्या अमेरिकेंतील पहिल्या वास्तव्यावरून माणसापुढें मानवतेच्या सेवेचें केवढें विशाल क्षितिज दिवसेंदिवस उलगडत आहे याची कल्पना येते. क्रांति संपण्याच्या एक वर्ष आधीं पेननें ॲबे रेनॉलला उद्देशून एक पत्ररूपी पुस्तिका प्रसिद्ध केली होती. या पुस्तिकेंत बंधुत्वाच्या, सहकार्याच्या पायावर उभ्या असलेल्या एका नव्या जगाचा पेनला घडलेला साक्षात्कार जाणवतो. अमेरिकन क्रांतीविषयीं लिहितांना ॲबेनें केलेल्या अनेक चुका पेननें या पुस्तिकेंत दाखवून दिल्या आहेत. ही पुस्तिका लिहीत असतांना जेथें विज्ञान आणि व्यापार हातांत हात घालून समृद्धीसाठीं झटत आहेत असें एक सुखी जग पेनच्या दृष्टीसमोर तरळत होतें. पेन लिहितो : "व्यक्तींच्या ज्या गरजांतून 'समाज' ही कल्पना निर्माण झाली, त्या गरजांत आतां राष्ट्राविषयींच्या गरजांची भर पडली आहे; आणि पूर्वी शेजाऱ्याकडून माणूस जी सहकार्याची अपेक्षा करीत होता ती आतां तो दुसऱ्या राष्ट्रापासून करूं लागला आहे...विज्ञान कुठल्याहि विशिष्ट राष्ट्रालाच चिकटून राहाणारें नसून, सर्व देशांवर उदार कृपेचा वर्षाव करीत आहे. जेथें सर्व माणसें एकत्र येऊं शकतील असें एक नवें मंदिरच जणूं विज्ञानानें उभारलें आहे."

क्रांतीची समाप्ति झाल्यानंतर पेनला बरीच फुरसद मिळूं लागली. त्यानें आपलें लक्ष शास्त्रीय शोधांकडे वळवलें. लोखंडी पुलाची एक प्रतिकृति त्यानें तयार केली होती. ही प्रतिकृति घेऊन १७८७ च्या एप्रिल महिन्यांत पेन फ्रान्समधें गेला. या नव्या धर्तीच्या प्रतिकृतीनें फ्रान्समधें कांहीं लोक आकर्षितहि झाले. परंतु सध्यां आपल्या अभ्यासाच्या दृष्टीनें ही गोष्ट विशेष महत्त्वाची नाहीं. फ्रान्समधें जातांच पेन इंग्लंड-फ्रान्सच्या राजकारणांत तात्काळ गुंगून गेला या गोष्टीचें आपल्या अध्ययनाच्या दृष्टीनें महत्त्व आहे. फ्रेंच राज्यक्रांतीला सुरवात झाल्यानंतर, १९७० मध्यें, एडमंड् बर्कनें आपले 'फ्रेंच राज्यक्रांतीवरील विचार' पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले. पूर्वी पेन आणि बर्क यांचे स्नेहसंबंध होते; परंतु बर्कनें फ्रेंच राज्यक्रांतीवर झोड उठवून इंग्लंडच्या राजसत्तेचें तात्त्विक समर्थन केलेलें पाहून पेन संतापला, आणि १७९१–१७९२ मधें त्यानें "मानवी हक्क" हा निबंध लिहून दोन भागांत प्रसिद्ध केला. या निबंधांत पेननें बर्कच्या

मतांचें अत्यंत तेजस्वी खंडन केलें. पेनचे राजकीय व सामाजिक विचार त्याच्या या निबंधांत जेवढे साकल्यानें प्रकट झालें आहेत तेवढे त्याच्या दुसऱ्या कोणत्याहि पुस्तकांत आढळणार नाहींत. फ्रान्स आणि इंग्लंडमधील राजकारण हा खरें म्हणजे 'मानवाचे हक्क' या निबंधाचा मुख्यतः विषय आहे. परंतु अमेरिकेच्या क्रांतिकालांतील बारा वर्षांचा अनुभव नसता तर पेन हा निबंध लिहूं शकता ना याची जाणीव हा निबंध वाचीत असतांना पदोपदीं होते. अमेरिकेंतील लोकशाहीचा इतिहास प्रत्यक्ष घडत असतांना पेन तेथें हजर होता. यामुळें अमेरिकन जनतेपैकीं एक या नात्यानें राजसत्तेच्या जोखडाखालीं असलेल्या इंग्लंडला चार शब्द सुनावण्याचा स्वतःला हक्क आहे असें त्याला मनःपूर्वक वाटत होतें. जागतिक सुधारणेचा पाया जेथें घालतां येईल असें अमेरिका हें एकमेव राष्ट्र आहे असा पेनचा विश्वास होत'. वॉशिंग्टनसारख्या लोकोत्तर पुरुषाला जन्म देणाऱ्या लोकशाहीचा उगम अमेरिकेंतच होता. 'मानवाचे हक्क' या निबंधाचा पहिला भाग पेननें "लोकशाहीच्या प्रस्थापनेला आपल्या आदर्श गुणांनीं हातभार लावणारा" अमेरिकेचा अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यालाच अर्पण केला आहे. अमेरिकन क्रांतीनें जुनाट परंपरा आणि संकेत निपटून टाकून जागतिक सुधारणेचा पाया घातला आहे अशी पेनची श्रद्धा होती.

कंटाळवाणी पुनरुक्ति, व्याकरणाच्या कांहीं चुका इत्यादि दोष असले तरी 'मानवाचे हक्क' या निबंधांत बर्कच्या युक्तिवादाचें अत्यंत समर्थपणें पेननें खंडन केलेलें आहे यांत शंका नाहीं. सूक्ष्म विनोद आणि मार्मिक कोपरखळ्या यांमुळें पेनच्या धारदार युक्तिवादाला विलक्षण रंगत आलेली आहे. बर्कच्या युक्तिवादाला स्वप्नाळू मूर्खपणा याहून पेन अधिक किंमत द्यावयास तयार नाहीं. फ्रेंच राज्यक्रांतीला प्रेरणा देणारीं तत्त्वें बर्कला मुळीं समजलींच नाहींत असें पेनचें स्वच्छ मत होतें. वास्तववादी मानवतेचा दृष्टिकोन असलेल्या पेनला फेसाळ वक्तृत्वाची चीड आली. युक्तिवादांत तर आहेच, पण या वक्तृत्वाच्या युक्त्यांतहि पेन बर्कपेक्षां वरचढ ठरतो.

इंग्लंडच्या राजसत्तेचें बर्कनें जें समर्थन केलें आहे, त्याचें मूळ तो वकिलीचें शिक्षण घेत असतांना त्याच्या मनावर झालेल्या संस्कारांत आहे. १६८८ च्या राज्यक्रांतीनंतर इंग्लंडच्या पार्लमेंटनें एक ठराव पास केला. या ठरावान्वयें त्यांनीं "विल्यम आणि मेरी यांनीं वंशपरंपरेनें आमच्यावर आणि आमच्या सर्व भावी

पिढ्यांवर राज्य करावें" असें लिहून दिलें. या ठरावाचा आधार घेऊन बर्कनें इंग्लंडची जनता राजसत्ता निमूटपणें मान्य करण्यास बांधली गेली आहे असें प्रतिपादन केलें. बर्कच्या मतें इंग्लंडची कुठलीहि पिढी या कराराचा भंग करूं शकत नव्हती. पुढें कांहीं वर्षांनीं 'मानवाचे हक्क' या निबंधांत पेननें लिहिलें, "आनुवंशिक राजसत्तेवर मींच प्रथम हल्ला करून तिचा बेकायदेशीरपणा उघड केला. एका पिढीला भावी पिढ्यांवर शासनसंस्थेचा विशिष्ट प्रकार लादण्याचा मुळींच अधिकार पोचत नाहीं; त्यामुळें आनुवंशिक राजसत्ता योग्य कीं अयोग्य हा प्रश्नच मुळांत संपतो." आनुवंशिक राजसत्तेच्या कल्पनेंतील बेकायदेशीर पणाच नव्हे, तर मूर्खपणाहि पेननें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. पेन लिहितो, "प्रत्येक पिढीला आपल्याला योग्य वाटेल तशी शासनसंस्था निर्माण करण्याचा हक्क आहे; परंतु आपण मेल्यानंतरहि पुढल्या पिढ्यांवर अधिराज्य गाजवण्याची आकांक्षा बाळगणें हा निव्वळ जुलूम आहे. एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याची किंवा एक पिढी दुसऱ्या पिढीची मालमत्ता होऊं शकत नाहीं."

आनुवंशिक राज्यसत्ताक आणि सरदारशाही या गोष्टी निसर्गनियमांच्या विरुद्ध आहेत असें पेनचें मत होतें. प्रत्येक मनुष्याला कांहीं हक्क निसर्गतः प्राप्त झालेले असतात. येथें पेनच्या या विचारांवर लॉकेच्या विचारांची छाप आहे, असें विधान करतांना विशेष सावधगिरी बाळगली पाहिजे. शासनसंस्थेच्या स्वरूपावर लॉकेनें लिहिलेल्या निबंधांत १६८८ च्या राज्यक्रांतीचें समर्थन आहे. "विल्यम राजाला सिंहासनावर बसविणें" हें उद्दिष्ट लोकेला मान्य होतें. याच्या उलट मानवाचे हक्क या आपल्या निबंधांत पेननें १६८८ ची राज्य क्रांति आणि आनुवंशिक राज्यसत्ताकाला मान्यता देण्याचें त्याचें उद्दिष्ट या गोष्टी बेकायदेशीर आहेत असें ठाम प्रतिपादन केलें आहे.

पेन आणि लॉके यांच्या विचारांतील हा फरक ध्यानांत घेतला म्हणजे, लॉकेचें कोणतेंहि पुस्तक मीं वाचलेलें नाहीं असें पेन कां म्हणाला असेल याची आपल्याला कल्पना येते. सार्वभौम राजसत्तेला लॉकेची मान्यता आहे. पेन रूसो-प्रमाणेंच लोकसत्ता हीच राज्यसत्ता आहे असें मानतो. परंतु पेनच्या वाङ्मयावरून त्यानें रूसोच्या लिखाणाचाहि नीटसा अभ्यास केला असेल असें वाटत नाहीं.

रूसो, लॉके किंवा पेन या तिघांच्याहि राजकीय विचारांचा पाया नैसर्गिक हक्कांचें तत्त्वज्ञान हाच होता. पेनच्या बहुतेक वाङ्मयांत नैसर्गिक हक्कांच्या सिद्धांतांचा

उल्लेख आढळतो. परंतु या सिद्धांतांची व्याख्या मात्र त्यानें कोठेंही केलेली दिसत नाहीं. मानवाचे हक्क या निबंधांत मात्र राजसत्तेच्या अस्तित्वाचें खंडन करतांना वैचारिक पार्श्वभूमि निर्माण करण्यासाठीं पेननें नैसर्गिक हक्कांच्या सिद्धांताचें तपशीलवार विवेचन केलें आहे. हें विवेचन वाचीत असतांना पेननें या विषयावर बराचसा विचार आणि थोडेंबहुत वाचन केलेलें असावें असें वाटतें. पेनच्या मतें जगाच्या आरंभकाळीं माणसें जन्माला आलीं तेव्हां सर्वांना समान हक्क होते. निसर्गानें दिलेले हे हक्क कोणत्याहि माणसाला नष्ट करतां येत नाहींत असा त्याचा विश्वास होता आणि म्हणूनच निसर्गानें निर्माण केलेल्या थोर माणसांपुढें सरदार दरकदार असे हुद्दे धारण करून खोटा मोठेपणा मिरवणारीं माणसें खुजीं वाटतात असें पेननें लिहिलें.

निसर्गानें माणसाला दिलेले हे हक्क सामाजिक करारांतून कसे साकार होतात हें मानवाचे हक्क या आपल्या निबंधांत पेननें दाखविलें आहे. हें लेखन करीत असतांना आपल्या अमेरिकेच्या वास्तववादी राजकीय अनुभवाचा पेनला फार मोठा उपयोग झाला. पेन लिहितो, "अमेरिकन क्रांतीनें जगाला नवीन मूल्यें दिलीं आणि जुनाट शासनसंस्थांच्या जनतेवरील अन्यायाला वाचा फोडली. यापूर्वी झालेल्या क्रांत्या राजदरबाराच्या भिंती ओलांडून लोकजीवनापर्यंत येऊन पोहोंचल्या नव्हत्या. अमेरिकन क्रान्ति राष्ट्रीय पातळीवरून झाली. पूर्वीच्या क्रान्त्यांचीं सूत्रें हलविणारें राजदरबारातलेच असत. त्यांना सुधारणा करण्याची कितीहि इच्छा असली तरी जनतेला फसवून आपली पोतडी भरण्याचा राजदरबारांतील धंदा त्यांनीं तसाच चालू ठेवला. शासनसंस्था हें सर्वसामान्य माणसाच्या बुद्धिपलीकडील गूढ आहे असा समज या कावेबाज दरबारी लोकांनीं जनतेंत पसरविला. शासनसंस्था म्हणजे ज्या तत्त्वांवर समाज चालत असतो त्याच तत्त्वांवर चालणारी एक राष्ट्रीय संघटना आहे ही साधीसरळ गोष्ट त्यांनीं धूर्तपणें जनतेच्या नजरेआड ठेविली."

राष्ट्रीय संघटना असें म्हणत असतांना पेनला नेमकें काय अभिप्रेत आहे हें समजण्यासाठीं आधीं तो नैसर्गिक हक्क आणि नागरिक हक्क यांत करीत असलेला फरक ध्यानांत घेणें आवश्यक आहे. पेनच्या मतें मनुष्याला नैसर्गिक हक्क जन्मतःच प्राप्त होत असतात. बौद्धिक क्षेत्रांतील हक्क आणि दुसऱ्याच्या नैसर्गिक हक्कांच्या आड न येतां आपलें सुख निर्माण करण्याचा हक्क हे नैसर्गिक हक्कांत येतात. पेनच्या मतें नागरिक हक्क हे व्यक्तीला समाजाचा एक घटक

म्हणून प्राप्त होत असतात. माणसाला जरी कांहीं नैसर्गिक हक्क प्राप्त होत असले तरी हे सगळेच हक्क बजावण्याची शक्ति त्याच्या ठिकाणीं नसते आणि म्हणूनच दैनंदिन जीवन शक्य व्हावें यासाठीं तो सामाजिक सहकार्याचा अवलंब करतो. नैसर्गिक हक्कांतूनच पुढें नागरिक हक्क निर्माण होतात. परंतु असें असलें तरी कोणत्याहि व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांच्या आड सामाजिक करार येतां कामा नये असें पेन मानीत असे. कारण सर्व सच्चे सामाजिक नियम हे निसर्ग नियमांना धरूनच आहेत अशी त्याची श्रद्धा होती.

शासनसंस्था म्हणजे एक राष्ट्रीय संघटना आहे हा पेनचा विचार वर उल्लेखिलाच आहे. ही राष्ट्रीय संघटना निर्माण करण्याच्या हक्कापासून आणि अशी संघटना निर्माण केल्यानें निर्माण होणाऱ्या सुखापासून कोणत्याहि राष्ट्राला कोणीहि वंचित करतां कामा नये असें पेनचें मत होतें. या नाममात्र शासनसंस्था ज्या क्षणीं कोसळतील त्याचक्षणीं सहकार्याच्या तत्त्वावर सर्व समाज एकत्र येऊन सुखशांतीनें नांदूं लागेल असें पेननें लिहिलें आहे. इंग्लंडनें लोकसत्ताक शासन-संस्था स्थापन करण्याचा लोकांचा हक्क साफ अमान्य केला होता. आणि बर्कनें इंग्लंडच्या राजसत्ताकाचें समर्थन करण्यासाठीं आपलें बुद्धिवैभव पणाला लावलें होतें. पेन लिहितो, "आनुवंशिक राजसत्ता हा एक मूर्खपणाचा आणि तिरस्करणीय प्रकार आहे असें मला सदैव वाटत आलें आहे." अशा राज्यावर एकादा मुलगा किंवा वार्धक्यामुळें शरीर व मन पार दुबळें झालेलें आहे असा मनुष्य येऊं शकतो. ही वस्तुस्थिति लक्षांत घेतां तर पेनला आनुवंशिक राजसत्ता अधिकच तिरस्करणीय वाटूं लागे. इंग्लंडची लोकसभा खऱ्या अर्थानें लोकांचें प्रतिनिधित्व करीत नाहीं असें पेनचें मत होतें. इंग्लंडला राज्यघटना आहे ही गोष्ट मानावयाला देखील पेन तयार नव्हता. इंग्लंडमध्यें अनेक कायदे आहेत; विशिष्ट वर्गाच्या हक्कांचें संरक्षण करणारी 'मॅग्ना चार्टा' सारखी सनद आहे. परंतु अमेरिका आणि फ्रान्स यांच्याप्रमाणें लोकनियुक्त प्रतिनिधींनीं तयार केलेली राज्यघटना तेथें नाहीं. जनतेनें तयार केलेली अशी राज्यघटना आम जनतेच्या स्वातंत्र्याची हमी देते. हें राजसत्ताक पोसण्यासाठीं येणाऱ्या भरमसाट खर्चामुळें माणुसकी आणि न्याय हीं तत्त्वें धोक्यांत येतात. पेन लिहितो, "देशांतली हजारों माणसें दारिद्र्यांत खितपत असतांना त्यांच्याजवळून कर उकळून एका व्यक्तीच्या चैनीसाठीं दरवर्षी दहा लक्ष पौंड खर्च करणें हें माणुसकीला सोडून आहे."

कांहीं विशिष्ट माणसांची चैन चालावी म्हणून इतरांनीं दुःख कां सोसावें? फ्रेंच राज्यक्रांति आणि तिच्यामुळें सर्वसामान्य जनतेचें झालेलें कल्याण यापासून धडा घ्या असें पेन आवाहन करतो. फ्रेंच राज्यक्रांतीची धडकी भरल्यामुळें बर्क तिच्या सत्यस्थितीकडे जाणूनबूजून डोळेझांक करीत आहे असें पेनचें म्हणणें आहे. स्वतःचा अनुभव आणि लाफाइटी यानें पुरवलेली माहिती यांच्या आधारें पेननें फ्रेंच राज्यक्रांतीच्या प्रारंभकालांतील वस्तुस्थितीचें चित्र रंगविलें आहे. अशा तऱ्हेनें पेन फ्रेंच राज्यक्रांतीचा आढावा घेतो. त्याच्या मतें अमेरिकन राज्यक्रांतीप्रमाणें फ्रेंच राज्यक्रांतीचा अवतार देखील निसर्ग-सिद्ध समाजरचनेच्या संस्थापनेसाठींच आहे. फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेचें कर्तृत्व आणि राज्यक्रांतीचें संचलन करण्यांत तिनें दाखविलेला संयम यांचें पेन कौतुक करतो. फ्रेंच राज्यक्रांतीच्या विरुद्ध खोट्या पुराव्यांनिशीं बर्कनें केलेल्या खोडसाळ आरोपांना उत्तर म्हणून पेन लाफाइतनें जनतेच्या हक्कांचा जाहीरनामा राष्ट्रीय सभेला सादर करतांना काढलेले उद्गार उद्धृत करतो: 'ज्या भावना निसर्गतःच प्रत्येक नागरिकाच्या अंतःकरणांत स्फुरत असतात आणि ज्यांच्या पवित्र जाणिवेमुळें एक नवी शक्ति उदयाला येते त्या भावनांचें तुम्ही स्मरण करा. कारण स्वातंत्र्यभक्ति मनांत उत्पन्न होण्यासाठीं स्वातंत्र्याची कल्पना येणें पुरेसें आहे; आणि ज्या राष्ट्राच्या मनांत स्वातंत्र्याची आकांक्षा उत्पन्न झाली त्या राष्ट्राला परतंत्र कोण ठेवूं शकेल?

पेननें 'मानवी हक्क' या आपल्या निबंधांत लाफाइतनें राष्ट्रीय सभेला सादर केलेला 'नैसर्गिक व नागरिक हक्कांचा जाहीरनामा' उद्धृत करून त्यावर विस्तृत विवेचन केलें आहे. हा जाहीरनामा म्हणजे भावी राज्यघटनेची छोटीशी प्रतिकृतिच होय. बहुजनांनीं निर्माण केलेल्या आणि बहुजनहितासाठीं असलेल्या अशा राज्यघटनेचा इंग्लंडला अजून स्पर्शहि झालेला नाहीं असें पेन वारंवार ठांसून सांगतो. या जाहीरनाम्यांत स्वातंत्र्य आणि समान हक्क व्यक्तिमात्राला जन्मतःच प्राप्त होतात; सर्व राजकीय संघटनांचें उद्दिष्ट माणसाच्या नैसर्गिक आणि स्वयंपूर्ण हक्कांचें संरक्षण करणें हेंच आहे या तत्त्वांना मान्यता दिली आहे.

'मानवाचे हक्क' या पहिल्या निबंधांत वैचारिक पार्श्वभूमि म्हणून अमेरिकन राज्यक्रांतीचा उपयोग केला असला तरी आपल्या युक्तिवादासाठीं तिचा प्रत्यक्ष आधार घेतलेला नाहीं. निबंधाच्या दुसऱ्या भागांत पेननें बर्कच्या युक्तिवादाचें

खंडन करण्यापेक्षां राजसत्ताकाच्या तात्त्विक भूमिकेचें खंडन करण्याकडे आपलें लक्ष केन्द्रित केलेलें आहे; आणि हें करतांना त्यानें लोकशाही सुबुद्धतेचा महान् आदर्श म्हणून अमेरिकेचा प्रामुख्यानें उल्लेख केलेला आहे. निसर्गानें आपल्या विशाल कृपेनें अमेरिकेला लोकशाहीच्या जोपासनेची भूमि बनण्याचें सद्भाग्य दिलें. माणसाला सुजाण होण्यासाठीं निसर्गाकडेच परत वळलें पाहिजे हें या कृत्रिम जगाला अमेरिकेनेंच शिकवलेलें आहे. पेन अशा रीतीनें अमेरिकेची प्राथमिक लोकशाहीच्या कल्पनेशीं सांगड घालतो. ही प्राथमिक लोकशाही माणसाच्या स्वाभाविक सहकार्यांतून निर्माण झालेली होती. चांगल्या शासन संस्थेला हें सहकार्य प्राणभूत असतें असें पेनचें म्हणणें होतें. परंतु अमेरिकेच्या प्रचंड लोकसंख्येमुळें प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाची जोड असल्याशिवाय ही प्राथमिक लोकशाही कार्यप्रवण ठरली नसती. पेन लिहितो, 'प्राथमिक लोकशाहीला प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाची जोड दिल्यानेंच सर्व राष्ट्रांचें हित पाहाणारी अशी शासनसंस्था निर्माण करतां येते.' येथें फ्रान्समधील मानवी हक्कांची घोषणा आणि अमेरिकेंतील स्वातंत्र्याची घोषणा एकच आहेत याची पेनला स्पष्ट जाणीव असल्याचें दिसतें. निबंधाच्या दुसऱ्या भागांत पेन पेनसिल्व्हानियाची राज्यघटना, राष्ट्रसंघाचे नियम, संघराज्याची घटना या गोष्टींच्या लोकसत्ताक शासनसंस्थेंतील महत्त्वाचें विवेचन करतो. पेन लिहितो, 'ही राज्यघटना जनता आणि शासनसंस्था यांच्या करारांतून निर्माण झालेली नाहीं. लोकांनीं शासनसंस्था स्थापण्यासाठीं परस्परांशीं केलेल्या कांहीं करारांतून ती निर्माण झालेली आहे. वॉशिंग्टनला जनतेनें अध्यक्ष म्हणून एकमतानें निवडलें. सैन्याधिपति आणि अध्यक्ष या जागांवर त्यानें विनावेतन काम केलें. सर्व राजांनीं याच्यापुढें शरमेनें मान खालीं घालावी असें या थोर पुरुषाचें चारित्र्य आहे.' अशा रीतीनें प्रातिनिधिक लोकसत्ताकाच्या स्वरूपाचें विवेचन करीत असतांना पेनला आपल्या अनुभवाचा व अवलोकनाचा चांगलाच आधार मिळाला.

"मानवाचे हक्क" या निबंधांतील विचारांची मांडणी सर्वत्रच तर्कशुद्ध आहे असें नाहीं. या निबंधांतील विचारभांडाराचें, राजसत्ताकाची कल्पना हाणून पाडणें, एवढेंच अकरणात्मक उद्दिष्ट नाहीं : समाजांत सुखशांति निर्माण करण्यासाठीं प्रातिनिधिक लोकसत्ताक निर्माण करण्याची त्यांत तळमळ आहे. पेनच्या या पुस्तकाचें परिशीलन करीत असतांना आणखी दोन मुद्यांचा उल्लेख करणें

आवश्यक आहे. या निबंधाच्या दुसऱ्या भागांत पेननें अमेरिका, फ्रान्स आणि इंग्लंड या देशांत स्नेहसंबंध निर्माण होण्याच्या शक्यतेची चर्चा केली आहे. या प्रश्नाचें सूतोवाच पेननें पूर्वी ॲबे रेनॉल याला लिहिलेल्या पत्रांत केलें होतें. या पुस्तकाचा शेवट करतांना पेननें मांडलेला मानवतावादी आणि वास्तववादी दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा आहे. या निबंधाच्या दोनहि भागांत पेननें राजसत्ता इंग्रज जनतेवर कसा अन्याय करते आहे; गरिबांचें शोषण करून धनिकवर्ग आपली पोळी कशी पिकवीत आहे याचें चित्र रेखाटलें आहे. हा अन्याय दूर कसा करावयाचा हाच खरा प्रश्न होता. राजसत्ता नष्ट करणें, आणि इंग्लंडची आर्थिक पुनर्रचना करणें हाच एकमेव मार्ग आहे असें या प्रश्नाला पेनचें उत्तर आहे. राजसत्ताक शासनसंस्था "पोसण्यासाठीं" येणारा भरमसाट खर्च त्यामुळें वांचेल आणि त्याचा उपयोग गरिबांच्या कल्याणासाठीं करतां येईल. पेन लिहितो, "जनतेच्या पैशाचा व्यय अत्यंत प्रामाणिकपणें केला पाहिजे. ही संपत्ति केवळ श्रीमंतांच्याच खिशांतून येते असें समजणें चूक आहे: श्रमिकांच्या, दलितांच्या घामाचाहि तिच्यांत वांटा आहे," या गरिबांना आर्थिक मदत करून त्यांचें जीवन सुखी करण्यासाठीं पेन कांहीं योजना सुचवतो, त्यापैकीं दोन सूचनांचा सहज उल्लेख करावासा वाटतो: "सर्व गरीब लोक, धंदा बुडालेले व्यापारी, आणि साठ वर्षांचे म्हातारे यांना दहा पौंडांचें-वर्षासन द्यावें. जन्मणाऱ्या प्रत्येक मुलामागें वीस शिलिंग याप्रमाणें पन्नास हजार मुलांना देणगीच्या रूपानें पैसे द्यावे. प्रत्येक लग्नामागें वीस शिलिंग या प्रमाणें वीस हजार दंपतींना देणग्या द्याव्या. लंडन आणि वेस्टमिन्स्टर येथील ज्या लोकांना कांहीं विशेष आपत्तीमुळें गरिबी येईल अशांना त्यांना हवी तेव्हां नोकरी देण्यांत यावी.

"मानवाचे हक्क" या निबंधाच्या दोन्ही भागांचा खूप प्रसार झाला. लोकस्वातंत्र्याचें रक्षण आणि वर्धन करण्यासाठीं इंग्लंडमध्यें स्थापन झालेल्या कांहीं क्रांतिकारक संघटनांतून तर या पुस्तकाला फार मोठी लोकप्रियता लाभली. परंतु इंग्लंडमधील क्षुब्ध जमावांनीं—बहुधा सरकारच्या चिथावणीमुळें—पेनच्या प्रतिमा जाळल्या आणि त्याच्याविरुद्ध उग्र निदर्शनें केलीं. अखेर, १७९२ च्या जून महिन्यांत पेनवर सरकारनें राजद्रोहाचा आरोप केला; आणि त्याच्यावर खटला भरण्याची तारीखहि निश्चित केली. असें म्हणतात कीं कवि विल्यम ब्लेक यानें पेनला त्याला अटक करणार असल्याची बातमी सप्टेंबरमध्यें दिली. कसेंहि

असो, पेन तावडतोब इंग्लंडमधून फ्रान्समधें पळून गेला एवढी गोष्ट खरी. उन्हाळ्यांत त्यानें ब्रिटिश राजसत्ताकावर कडाडून हल्ला करणारी पुस्तिका लिहिली. या पुस्तिकेंत पेननें बर्कच्या युक्तिवादावर आणि शब्दबंबाळ वक्तृत्वावर शेवटचा कडाडून हल्ला चढवला. वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याविषयीं पेन लिहितो, "बर्कप्रमाणेंच सरकारची खुशामत करणें आणि राजदरबारांतील खुषमस्करे राज्यघटनेविषयीं जे गौरवोद्‌गार काढतील ते उचलून धरणें एवढेंच स्वातंत्र्य वृत्तपत्रांना आहे काय? राज्यघटनेंतील दोषस्थलांचें परीक्षण करणें, इंग्लंडमधें राज्यघटना खरोखरीच आहे किंवा काय या प्रश्नाची सडेतोड चर्चा करणें हें स्वातंत्र्य नसेल, तर इंग्लंडमधें स्पेन, तुर्कस्थान किंवा रशिया यांच्याप्रमाणेंच सुलतानशाही चालू आहे असें म्हणणें भाग आहे." याच पत्रांत पेननें अशी सूचना केली होती कीं, इंग्लंडमधील वेगवेळ्या भागांतील प्रतिनिधींची एक "राष्ट्रीय सभा" भरवावी, म्हणजे लोकमताचा कौल कोणता आहे हें कळूं शकेल. इंग्रज सरकारला आतां अधिक सहन करणें शक्य नव्हतें.

जनमनावर परंपरेची इतकी जबरदस्त पकड असते कीं ती सुटतां सुटत नाहीं. पेन आणि नैसर्गिक हक्काचा पुरस्कार करणारे इतर कांहीं लेखक यांना या मर्यादेची मुळींच जाणीव नव्हती असें त्यांच्या लेखनावरून वाटतें. खऱ्या राजकीय मूल्यांची एकदां ओळख झाली कीं जनता जुलमी शासनसंस्था तात्काळ उलथून टाकील अशी या सर्वांची समजूत होती. आपल्या लेखनाचा तावडतोब परिणाम घडून येईल असें पेनला मनापासून वाटत होतें. 'मानवाचे हक्क' या निबंधाचा दुसरा भाग पेननें लाफायेतीला अर्पण केला. आपल्या अर्पण पत्रिकेंत पेन म्हणतो कीं, लाफायतीशीं त्याचा कसलाहि तात्त्विक मतभेद नसून फक्त कालमर्यादेच्या बाबतींतच आहे. जें परिवर्तन घडून येण्यास चौदा किंवा पंधरा वर्षें लागतील असें लाफायेतीला वाटतें तें परिवर्तन अगदीं नजीकच्या भविष्यांत होणार आहे अशी आपली श्रद्धा आहे, हें पेननें फ्रान्समधें "दडपशाहीचें राज्य" सुरू होण्यापूर्वी—म्हणजे नेपोलियन बोनापार्टच्या हातीं सत्ता येण्यापूर्वी लिहिलें होतें! यूरोपमधील सर्व राजसत्ता आतां लवकरच कोसळणार आहेत असें पेनला वाटत होतें. त्या काळांत राजकीय सिद्धांत मांडीत असतांना वास्तववादी जाणीव व्यक्त करणाऱ्या सर्वच विचारवंतांमध्यें ही विसंगति दिसावी याचें आश्चर्य वाटतें. पेन लिहितो: "युरोपमधील कोठल्याहि जागृत राष्ट्रांत

राजसत्ता आतां सात वर्षांहून अधिक काळ टिकत नाहीं हें निश्चित." दडपशाहीचें राज्य येण्यापूर्वी हें वाक्य लिहिलें गेलें होतें हें विशेष!!

: ४ :

१७८७ मधें पेन फ्रान्समधें आला आणि १७९३ मधें त्याला लक्सेंबर्गच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें. दरम्यानचा हा सात वर्षांचा काळ पेनच्या जीवनांत अत्यंत उत्साहाचा होता. या काळांत तो फ्रान्स आणि इंग्लंडमधें अनेक वेळां जाऊन आला. फ्रान्समधें १७८९ पर्यंत मंत्री म्हणून गेलेल्या जेफर्सनशीं बराच काळ विचारविनिमय करण्याची संधि पेनला लाभली. फ्रेंच राज्यक्रांतीच्या आरंभीं पेन फ्रान्समधें हजर होता. लाफायेतीशीं त्याचा याच काळांत स्नेहसंबंध निर्माण झाला. इतिहास प्रत्यक्ष घडत असतांना त्यांत भाग घेण्याची तीव्र इच्छा असलेल्या पेनला फ्रेंच राज्यक्रांतींत प्रत्यक्ष भाग घेणें शक्य झालें. १७९१ च्या जून महिन्यांत लुई राजानें फ्रान्समधून पळ काढला तेव्हां पेननें एक 'लोकसत्तकाचा जाहीरनामा' लिहिला. यांत त्यानें लुईच्या पळपुटेपणाला बोल लावून जनतेला क्रांतीची चिथावणी दिली होती. असें म्हणतात कीं पेन आणि डुकातेले यांनीं या पत्रकाच्या प्रती घराघरांवर चिकटवल्या; जेथें राष्ट्रीय सभा भरत असे त्या घराच्या दरवाजावरहि त्यांनीं एक पत्रक चिकटवलें.

१७९२ पासून फ्रेंच राज्यक्रांतीच्या उत्तरार्धाला सुरवात झाली. यावेळीं पेन इंग्लंडमधून पळून फ्रान्समधें आला होता. या काळांत फ्रान्समधें पेनच्या वांट्याला दुर्दैव यावयाचें होतें. याच वर्षाच्या सुरवातीला फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेनें पेनला नागरिकत्वाचे अधिकार बहाल केले होते आणि सभेच्या बैठकीला प्रतिनिधि म्हणून त्याची निवडहि झाली होती. अमेरिकन राज्यक्रांतींत आरंभापासून अखेरपर्यंत आपण भाग घेतला होता या गोष्टीचा उल्लेख करून पेननें त्याला मिळालेल्या बहुमानाबद्दल राष्ट्रीय सभेचे जाहीर आभार मानले होते. पण लवकरच पेन फ्रान्सच्या राजकारणांत गुंतून गेला. फ्रेंच भाषा त्याला नीटशी येत नव्हती; त्याचप्रमाणें फ्रेंच माणसाचें मनहि त्याला कळावें तसें कळलें नव्हतें. आणि त्यामुळें फ्रान्समधील राजकीय प्रवाहांची त्याला नीटशी समज येऊं शकली नाहीं. तो 'जिरॉंडिस्ट' पक्षांत सामील झाला. पेनला या पक्षांतील कांहीं मुत्सद्यांनीं आपलें 'साधन' म्हणून वापरलें असें पेनच्या कांहीं चरित्रकारांचें मत

आहे. राजाला जीवदान द्यावें असें आपलें मत पेननें व्यक्त केलें. रॉबेस्पीयर आणि जॅकॉबिन्स लवकरच सत्ताधीश झाले. पेन त्यांच्या मर्जीतून उतरला. राष्ट्रीय सभेच्या बैठकींना जाण्याचें पेन हळूहळू टाळूं लागला. १७९३ च्या अखेरीस त्याला तुरुंगांत टाकण्यांत आलें. गॅव्हर्निअर मॉरिस हा त्यावेळीं अमेरिकेचा फ्रान्समधील परराष्ट्रीय वकील होता. त्याचें पेनशीं शत्रुत्व होतें. या माणसानें आपण पेनच्या सुटकेसाठीं सर्वतोपरी प्रयत्न करीत असल्याचें अमेरिकेच्या सरकारला भासविलें; परंतु प्रत्यक्षांत त्यानें कसलाहि प्रयत्न केला नाहीं. पेन जवळ जवळ दहा महिने तुरुंगांत खितपत पडला. तुरुंगांत तो खूप आजारी पडला. शेवटीं जेम्स मन्रो याची फ्रान्समधील परराष्ट्रीय वकील म्हणून नेमणूक झाली, तेव्हां त्यानें पेनची सुटका मोठ्या युक्तीनें करवून घेतली.

मनरोच्या घरीं पेन आपली प्रकृति सुधारण्यासाठीं म्हणून अठरा महिने राहिला. १७९५ मधें त्यानें राष्ट्रीय सभेच्या बैठकीला हजर राहाण्याचें ठरविलें. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत मालमत्ता असणाऱ्यालाच मताधिकार असावा या सूचनेला पेनचा विरोध होता. राष्ट्रीय सभेच्या बैठकींत भाषण करण्यासाठीं त्यानें, 'शासनसंस्थेच्या मूलतत्त्वां' वरील प्रबंध लिहिला. हा निबंध पॅरिस येथें १७९५ मधें प्रसिद्ध झाला. या निबंधांत पेनच्या राजकीय विचारसरणीचें सार थोडक्यांत सांपडतें. पेन लिहितो, 'आपला प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क हा मूलभूत आहे. या हक्कामुळेंच इतर हक्कांचें संरक्षण होत असतें.' १७९५ च्या जुलै महिन्यांत पेन राष्ट्रीय सभेच्या बैठकीस हजर राहिला आणि एका सेक्रेटरीनें त्याचें भाषण फ्रेंचमधें वाचून दाखवलें. मताधिकारावर घालण्यांत आलेल्या या बंधनामुळें 'हक्कांच्या जाहीरनाम्या' चा भंग होत आहे असें मत पेननें मांडलें. परंतु सभेंतील एकाहि सदस्यानें पेनला पाठिंबा दिला नाहीं. इतकेंच नव्हे तर राज्यघटनेचा अंतिम मसुदा तयार करतांना देखील त्याच्या सूचनेचा विचार केला नाहीं. राष्ट्रीय सभेच्या बैठकीला पेन पुन्हा कधींहि हजर राहिला नाहीं.

मनरोच्या घरांत असतांना पेनचे दिवस फार उदास गेले. एकीकडे आजारामुळें तो खंगत होता आणि दुसरीकडे फ्रान्समधील लोकसत्ताकाच्या अपुरेपणाची त्याला खंत वाटत होती. आणि अमेरिकेंतहि त्याच्या मनासारखें कांहींच घडत नव्हतें. लक्झेंबर्ग येथील तुरुंगवास आठवून त्याच्या मनांत कटुता दाटून येत असे. हा कारावास खरें म्हणजे फ्रान्समधील कांहीं राजकीय माथेफिरूंमुळें



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 22936

त्याला घडला होता. परंतु जॉर्ज वॉशिंग्टनच याला जबाबदार आहे असें पेनला वाटत होतें. ज्या जॉर्ज वॉशिंग्टला आपण पाठिंबा दिला, ज्याच्या चारित्र्याची आणि कर्तृत्वाची आपण जाहीर स्तुति केली, त्याच्या क्षुद्रपणामुळें आपल्या वांट्याला हा कारावास आला या जाणिवेमुळें पेन अतिशय दुःखित झाला. १७९६ मध्यें पेननें जॉर्ज वॉशिंग्टनला उद्देशून एक जाहीर पत्र लिहिलें. कोणत्याहि अमेरिकन माणसाला हें पत्र तटस्थपणें वाचणें शक्य नाहीं. परंतु या घटनेकडे आपण निःपक्षपातीपणें पाहिलें असतां पेनच्या अटकेच्या बाबतींत जॉर्ज वॉशिंग्टननें जातीनें लक्ष घातलें नाहीं ही अमेरिकेचा अध्यक्ष या नात्यानें त्याची चूक होती या गोष्टीकडे डोळेझांक करतां येत नाहीं. कारण मॉरिस आणि पेन यांच्यांत शत्रुत्व आहे याची वॉशिंग्टनला चांगलीच कल्पना होती. ढांसळलेल्या प्रकृतीमुळें पेनचा अधिकच चित्तक्षोभ झाला हें गृहीत धरलें तरी या पत्रांत विवेक आणि धोरणीपणा यांचा संपूर्ण अभाव आहे हें उघडच दिसतें. हें पत्र पेननें लिहिलें तेव्हां अमेरिकेंत संघराज्यवादी व लोकसत्तावादी असे दोन कडवे विरोधी पक्ष निर्माण झालेले होते. पेननें लोकसत्ताकवाद्यांना पाठिंबा देण्याचें ठरवलें. परंतु यापूर्वी त्यानें सर्व घटक राज्यांनीं एकत्र येऊन संघराज्य बळकट केलें पाहिजे हा विचार मांडलेला होता आणि म्हणूनच लोकसत्ताकवाद्यांना पेनचा पाठिंबा असला तरी त्याला खऱ्या अर्थानें संघराज्यविरोधी म्हणतां आलें नसतें. याचा अर्थ असा कीं जॉर्ज वॉशिंग्टन व पेन यांचीं मतें या बाबतींत परस्पर विरोधी नव्हतीं. (या बाबतींत वॉशिंग्टनचें कांहीं मत असो.) पेन लिहितो, 'अमेरिकन राज्यक्रांतीसाठीं मीं काय काय केलें हें जगजाहीरच आहे.' अमेरिकेबाहेर राहून लेखन करीत असतांना देखील पेनच्या डोळ्यासमोर अमेरिकाच होती हें आपण येथवर पाहिलेंच आहे. पेनची अमेरिकेवरील श्रद्धा कधींहि विचलित झाली नाहीं. पेनवर झालेल्या अन्यायाला 'राजकारणी वॉशिंग्टन' जबाबदार होता. पेननें वॉशिंग्टनवर केलेल्या टीकेचें स्वरूप बरेंचसें वैयक्तिक आहे. पेन या पत्रांत वॉशिंग्टनला उद्देशून लिहितो, 'अध्यक्षपदाची खुर्ची मिळताक्षणीं सर्व श्रेय आपलेंच आहे असा दर्प तुम्हांला चढला आणि तुमच्या स्वभावांतली नैसर्गिक कृतघ्नता प्रकट झाली. फ्रान्समध्यें मला अटक झाल्याची बातमी कळतांच बाकी कांहीं नाहीं तरी निदान माझी चौकशी करणें अमेरिकन सरकारचें कर्तव्य होतें.' 'जे' तहाचा खरपूस समाचार घेऊन पत्राच्या शेवटीं पेननें आपली लेखणी अव्वातव्वा चालवली आहे.

'सारासार विचार' हा निबंध लिहिणाऱ्या पेनच्या लेखणींतून असा मजकूर उतरावा याचा कोणत्याहि अमेरिकन माणसाला विषाद्च वाटेल. पत्राच्या शेवटीं पेन लिहितो, 'अरे वाशिंग्टन' माझ्या संकटकालीं तूं मला धोका दिलास त्याअर्थी तूं एक मित्रद्रोही मनुष्य आहेस. तुझें सार्वजनिक जीवन दांभिक आहे. तूं तत्त्वभ्रष्ट आहेस कीं दडपशहा आहेस, तूं तत्त्वांचा त्याग केलास कीं मुळांतच तूं तत्त्वशून्य होतास हें ठरवणें जगाला नक्कीच जड जाईल."

१७९७ मध्यें पेननें 'किसानांच्या दारिद्र्याचा प्रश्न' ही पुस्तिका लिहिली. या पुस्तिकेंत 'पेनच्या मानवाचे हक्क' या निबंधांत दिसून येणाऱ्या मानवतावादी दृष्टिकोनाचा प्रत्यय येतो. इंग्लंडमधील गरिबांची स्थिति कशी सुधारतां येईल हा प्रश्न पेननें या पुस्तिकेंत मुख्यतः हाताळला आहे. पुस्तकाचें शीर्षक मात्र विषयाला सोडून आहे. कारण शेतकीच्या अर्थव्यवस्थेविषयीं पेननें कांहींहि लिहिलेलें नाहीं. जमिनीच्या बाबतींत पेननें एकच विचार या पुस्तिकेंत मांडला आहे. पेन म्हणतो, "आरंभीं माणूस आपल्या उदरनिर्वाहासाठीं शेतीवरच अवलंबून होता. त्यानें शेतीला सुरवात करण्यापूर्वी सर्व जमीन ही कोणा एका व्यक्तीच्या मालकीची नसून सर्व मानवजातीच्या मालकीची होती." परंतु दुर्दैवानें कांहीं विशिष्ट माणसेंच गेलीं कित्येक शतकें ही जमीन बळकावून बसलीं आहेत. या मालक शाहीमुळें इंग्लंडचें लोकहित धोक्यांत आलें आहे. पेन 'निसर्गाकडे परत चला' असें म्हणत नाहीं. तो म्हणतो, "नैसर्गिक स्थितीपासून मनुष्य सुसंस्कृत सामाजिक अवस्थेपर्यंत जाऊन पोहचतो. परंतु या स्थितीपासून पुन्हा निसर्गाकडे जाणें शक्य नसतें. सार्वजनिक मालकीची जमीन एक विशिष्ट वर्ग बळकावून बसल्यामुळें गरिबीचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा या गरिबांना न्याय कसा द्यावयाचा?" याला पेनचें उत्तर असें आहे: "प्रत्येकाच्या खाजगी मालमत्तेवर कर आकारून एक राष्ट्रीय फंड उभारावा आणि ज्याच्याजवळ कसलीहि मालमत्ता नाहीं अशा एकवीस वर्षे वयाच्या माणसास पंधरा पौंडाचें वर्षासन देण्यांत यावें. या व्यक्तीचा खाजगी मालमत्तेचा हक्क हिरावून घेतल्यामुळें व नुकसानभरपाई म्हणून या वर्षासनाकडे बघितलें जावें!"

.५.

फ्रान्स आणि इंग्लंड यांच्या राजकीय प्रगतीला आपण आतां कसलाहि हातभार

लावूं शकत नाहीं याची जाणीव पेनला अठराव्या शतकाच्या अखेरीला झाली होती. पेनचे विचार पुन्हां एकदां अमेरिकेकडे वळूं लागले. त्यावेळीं जेफरसन हा अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठीं उभा होता. पेननें जेफरसनला पत्र लिहून सार्वजनिक बोटींतून अमेरिकेला येण्याचा परवाना आपल्याला देण्यांत यावा अशी विनंती केली होती. जेफरसन अध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर जेफरसननें पेनला अत्यंत जिव्हाळ्याचें पत्र लिहिलें आणि मेरीलँड या युद्धनौकेंतून येण्याचा परवानाहि दिला. जेफरसननें आपल्या पत्रांत लिहिलें होतें कीं, "क्रांतिकाळांत ज्या उदात्त भावनांचें दर्शन तुम्हांला झालें होतें त्याच भावनांचा साक्षात्कार पुन्हा अमेरिकेंत होईल अशी मला आशा वाटते. अशा या भूमीवर शांतपणें कार्य करण्यास तुम्हांला अभिमानच वाटतो. तुम्ही येथें येऊन लोकसेवा करावी आणि राष्ट्राचे धन्यवाद घ्यावे अशी माझी नम्र प्रार्थना आहे." १८०१ मधें पेननें जेफरसनला एक पत्र लिहून अध्यक्ष म्हणून निवडून आल्याबद्दल त्याचें अभिनंदन केलें; परंतु मेरीलँड या जहाजांतून अमेरिकेला येण्याचें निमंत्रण पेन त्यावेळीं स्वीकारूं शकला नाहीं. परंतु पुढच्याच वर्षी सप्टेंबर महिन्यांत पेन बॅटिमोर येथें गेला. वॉशिंग्टनविषयीं त्यानें लिहिलेल्या शिवराळ पत्रामुळें लोकांत पेनविषयीं अप्रीति निर्माण झाली होती. कांहीं काळ जेफरसन देखील आपल्याला टाळतो आहे असें पेनला तीव्रतेनें वाटूं लागलें. परंतु वस्तुस्थिति तशी नव्हती. जेफरसनच्या मनांत पेनविषयीं स्नेह आणि आदरच होता. जेफरसनप्रमाणें रॉबर्ट फुल्टन, जॉन वेलस्ली आणि ज्याच्या घरांत पेन पांच महिने राहिला तो चित्रकार जार्विस यांनीं पेनला स्नेहानें वागविलें.

अमेरिकेंत आल्यावर कोणता तरी एक राजकीय पक्ष निवडून त्या पक्षाच्या तत्त्वासाठीं झगडणें हा एकच मार्ग पेनपुढें उरला होता. जेफरसन अध्यक्ष असतांना पेननें अमेरिकेच्या नागरिकांना उद्देशून आठ जाहीर पत्रें लिहिलीं (१८०२, १८०३, १८०५) हीं पत्रें थोडींशीं शब्दबंबाळ आणि कांहीं ठिकाणीं वैचारिक विसंगतीनें भरलेलीं आहेत. परंतु या पत्रांनीं विरोधी पक्षाशीं झगडणाऱ्या जेफरसनचे हात चांगलेच बळकट केले. पेन या पत्रांत म्हणतो, "संघराज्यवादी याचा अर्थ जर सर्व घटक राज्यांच्या कल्याणासाठीं झटणाऱ्या केंद्रसरकाराला पाठिंबा देणारा असा असेल तर मी संघराज्यवादीच आहें."

यानंतर पेननें अनेक पत्रें आणि निबंध लिहून लोकसत्ताकवाद्यांचा पक्ष उचलून धरला. आपलीं तत्त्वें संघराज्यवाद्यांनीं जाहीर करावीं असें पेननें आव्हान दिलें. या निबंधांत पेन म्हणतो, "लोकसत्ताकवाद्यांचीं तत्त्वें जगजाहीर असून तीं निर्विवाद आहेत. जनता हीच सार्वभौम सत्ता असून जनतालोकनियुक्त प्रतिनिधि हे या सार्वभौमसत्तेचे प्रतिनिधि आहेत असें लोकसत्ताकवादी म्हणतात. परंतु या संघराज्यवाद्यांचें धड एकहि तत्त्व नाहीं किंवा त्यांचीं तत्त्वें उच्चारण्याच्या योग्यतेचीं नाहींत. आणि म्हणूनच हिम्मत असेल तर या संघराज्यवाद्यांनीं आपलीं तत्त्वें जाहीर करावी." पेनच्या मृत्यूपूर्वी त्याचा आणि जेम्स चीर्टम याचा फार मोठा वाद झाला. जेम्स चीर्टम हा न्यूयॉर्कहून निघणाऱ्या 'अमेरिकन सिटिझन' या संघराज्यवादी वृत्तपत्राचा संपादक होता.

चीर्टम संघराज्यवादी असला तरी राजसत्तावादी नव्हता. पेननें 'मानवाचे हक्क' या निबंधाच्या सुरांत लिहिलेल्या दुसऱ्या एका निबंधात इंग्लंडच्या राज-सत्ताकांवर चिडून हल्ला केला होता. या विधानावर चीर्टमनें आक्षेप घेतल्यामुळें वादाला सुरवात झाली. आपल्या मृत्यूपूर्वी पेननें संघराज्यवादी हे आंतून इंग्लंडच्या राजसत्तेचे धार्जिणे आहेत असा आरोप केला होता. चीर्टमनें पेनच्या या आरोपाचा जोरदार इन्कार केला. पेननें पुनः प्रत्युत्तरादाखल अनेक शिवराळ लेख लिहिले. अखेर चीर्टमनें चिडून पेनचें एक चरित्र प्रसिद्ध केलें. या चरित्रांत पेनची बदनामी होईल असा बराच मजकूर लिहिला. ज्या वर्षी तें चरित्र प्रसिद्ध झालें त्याच वर्षी पेनचा मृत्यु झाला.

फ्रान्समधील तो दडपशाहीचा काळ पेनच्या दुर्दैवास कारणीभूत ठरला. लक्झें-बर्ग येथील कारावासानंतर पेन पूर्वीचा राहिला नाहीं. स्वातंत्र्याच्या वातावरणांत जगण्यासाठींच जो जन्मला त्या पेनचा शेवट अगदींच दुर्दैवी झाला. सारासार विचार हा निबंध लिहितांना पेननें आपण कोठल्याहि राजकीय पक्षाला बांधलेलों नाहीं असें लिहिलें होतें. त्याचप्रमाणें दुसऱ्या एका निबंधांत त्यानें आपण जगाचे नागरिक आहोंत असें म्हटलें होतें. परंतु म्हातारपणीं पेन संकुचित पक्षीय वृत्तीचा बनला आणि दुर्दैवानें आपला असें म्हणायला त्याला कोणताच देश उरला नाहीं. जनतेच्या नजरेंतून पेन उतरला होता. जेफरसनची मैत्रीदेखील त्याला यांतून वाचवूं शकली नाहीं. अशा निराश आणि मनोभंगाच्या अवस्थेंत पेन मरण पावला.

परंतु हेंच पेनच्या जीवनाचें अंतिम मूल्यमापन समजणें चुकीचें होईल. प्रतिभावंताच्या ठिकाणीं असलेले अनेक दोष पेनमधें असले तरी पेन हा आपल्या प्रज्ञेनें युग उजळून टाकणारा महात्मा होता हें मी येथवर सिद्ध केलें आहे अशी मला आशा वाटते. राजकीय स्वातंत्र्याचा संदेशदाता व अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स येथील सामान्य जनतेच्या आकांक्षांचा उद्गाता म्हणून थॉमस पेनची सदैव आठवण ठेवा.

**नेल्सन एफ ॲडकिन्स**

# समाज व राज्यसंस्था यांविषयीं सारासार विचार

समाज आणि शासनसंस्था यांच्या स्वरूपाविषयीं कांहीं लेखकांच्या मनांत बराच गोंधळ असल्याचें आढळून येतें. समाज आणि शासनसंस्था या एकात्म आहेत; आणि असलाच, तर त्यांच्यांत फारच थोडा फरक आहे असें ते मानतात. वास्तविक, समाज आणि शासनसंस्था या एकात्म तर नाहींतच, पण त्यांचे उगमहि सर्वस्वी भिन्न आहेत. माणसाच्या भौतिक-मानसिक गरजांतून समाज निर्माण होतो. परंतु शासनसंस्था हा मानवी स्वभावांतील दुष्टतेचाच आविष्कार असतो ! ! माणसामाणसांना स्नेहाच्या धाग्यानें एकत्र बांधून समाज त्यांच्या सुखाची अभिवृद्धि करतो परंतु शासनसंस्थेचें कार्य केवळ अकरणात्मकच असतें. ती माणसांच्या दुर्गुणांचें नियंत्रण करते. समाज सहकार्याची वाढ करतो; शासनसंस्था भेद निर्माण करते. समाज माणसाला आसरा देतो; शासनसंस्था दंडभयाच्या जोरावर त्याला कावूत ठेवते.

समाज हें मानवाला लाभलेलें वरदान आहे. शासनसंस्था ही इष्टापत्ति आहे. शासनसंस्था सुव्यवस्थेवर उभी असेल, तर ती मुसह्य तरी होते. परंतु तशी नसेल तर ती एक असह्य आपत्ति आहे असेंच म्हणणें भाग आहे !

जेथें शासनसंस्था अस्तित्वांतच नाहीं असा एखादा मानवसमूह डोळ्यापुढें आणा. क्षणभर आपण अशी कल्पना करूं कीं, या मानवसमूहाची आणि आपली दुःखें एकच आहेत परंतु असें असलें तरी आपल्या दुःखाचें स्वरूप अधिक तीव्र असेल. कारण जिच्यामुळें आपल्या जीवनांत हीं दुःखें निर्माण झालीं आहेत ती शासनसंस्था आपण आपल्याच हातानें निर्माण केलेली असते. माणसाचा देह झांकणारे कपडे ही त्याचें निष्पाप बाल्य हरपल्याची खूण असते. शासनसंस्थेचा उगमहि असाच हरपलेल्या निष्पापतेंत आढळावा ! राजसत्तेचे उंच प्रासाद माणसाच्या या हरपलेल्या श्रेयावरच उभे असतात.

माणसांची सदसद्विवेकबुद्धि जर थाऱ्यावर असती; तिचा आदेश जर प्रत्येकानें प्रमाण मानला असता, तर माणूस शासनसंस्थेचा ब्रडगा निर्माण करण्याच्या

फंदांत कधींच पडला नसता! परंतु दुर्दैवानें वस्तुस्थिति तशी नाहीं. आपल्या वित्ताचा कांहीं भाग खर्ची घालून शासनसंस्था उभी करणें माणसाला भाग पडतें. असुरक्षितता आणि शासनसंस्था अशा दोन आपत्ति त्याच्यापुढें उभ्या असतात. कमी धोक्याची म्हणून तो शासनसंस्थेला कवटाळतो! सुरक्षितता प्राप्त करून देणें हाच शासनसंस्थेचा उद्देश असतो; आणि सर्वसामान्य माणसाला कमींत-कमी खर्चांत मिळणारी जास्तींतजास्त सुरक्षितता—मग ती कोणत्याहि स्वरूपांत का असेना—हवी असते.

शासनसंस्थेचें खरें स्वरूप आणि कार्य ध्यानांत येण्यासाठीं आपण असा एक मानवसमूह डोळ्यापुढें आणूं कीं जेथें शासनसंस्था मुळीं अस्तित्वांतच नाहीं; जो जगाच्या संबंधापासून पार तुटलेला आहे. थोडक्यांत म्हणजे, एखाद्या प्रदेशांत अगदीं पहिल्याप्रथम स्थायिक होणाऱ्या लोकांचा प्रतिनिधि असा हा जनसमूह आहे. नैसर्गिक स्वातंत्र्याच्या या अवस्थेंत समाज हीच या समूहाची पहिली गरज असेल. त्याच्या सर्व प्रेरणा त्यांला या एकाच दिशेनें ओढीत असतील. व्यक्तीच्या शक्ती इतक्या मर्यादित असतात कीं इतर माणसांचें सहकार्य स्वीकारल्याशिवाय तिला जगणें अशक्य व्हावें. चार माणसें जरी एकाद्या जंगलांत जाऊन पडलीं तरी एकमेकांच्या सहकार्यानें तीं निवाऱ्यापुरतें खोपट बांधूं शकतील; परंतु एकट्या माणसाला मात्र अशा परिस्थितींत कांहींच करतां येणार नाहीं. अशा असहाय्य जिवाला मृत्यूचा घांस होण्यापलीकडे दुसरा मार्गच उरणार नाहीं.

अपरिहार्य परस्पर सहकार्यांतून भटक्या माणसांचा स्थायिक होऊं पहाणारा हा समूह "समाज" या अवस्थेला येऊन पोहोंचला. परम्परांविषयीं निष्ठेची आणि सहकार्याची ही भावना त्या समाजांत जोपर्यंत टिकून आहे तोपर्यंत दंडशक्तीची किंवा शासनसंस्थेची आवश्यकता त्या समाजाला भासणार नाहीं. पण पापापासून मुक्त असायला दुबळा माणूस हा देव थोडाच आहे! निष्ठा आणि सहकार्य यांच्या धाग्यानें बांधल्या गेलेल्या त्या समाजांत हळूहळू कलीचा शिरकाव होईल, माणसें कामचुकारपणा करूं लागतील, त्यांच्या निष्ठा शबल होऊं लागतील. अशातऱ्हेच्या नैतिक अधःपतनांतून स्वतःला सावरण्यासाठीं म्हणून अगतिक झालेलीं माणसें कोणत्यातरी प्रकारची शासनपद्धति निर्माण करतील. कोणत्या तरी एका छाया-बहुल वृक्षाखालीं त्यांची राज्यसभा राजकीय-सामाजिक समस्यांचा खल करण्यासाठीं जमेल. त्यांच्या पहिल्या कायद्यांचें स्वरूप कायद्यापेक्षांहि स्वेच्छया पाळावयाचे नियम

असेंच असेल. दंडशक्तीच्या धाकानें हे नियम लादले जाणार नाहींत. सामाजिक प्रतिष्ठेसाठींच त्यांचें पालन होईल. या राज्यसभेचें सदस्यत्व त्या झाडाखालीं जमणाऱ्या प्रत्येक माणसाला त्याचा नैसर्गिक हक्क म्हणून ओघानेंच प्राप्त झालेलें असेल. परंतु हळूहळू लोकसंख्या वाढूं लागेल; त्यांच्या समस्यांचें स्वरूप अधिकाधिक गुंतागुंतीचें होऊं लागेल—अर्थातच, पूर्वीप्रमाणें या प्रश्नांची चर्चा करण्यासाठीं इतक्या लोकांना वरचेवर सभा घेणें केवळ अशक्य होऊन बसेल. त्यामुळें लोकांचे वेगवेगळे विभाग पाडायचे, या विभागांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींनीं एकत्र येऊन राज्यकारभार करायचा अशी एक नव्या पद्धतीची राज्यव्यवस्था त्यांना आखावी लागेल. हे नवे राज्यकर्ते लोकांचे प्रतिनिधी या नात्यानें राज्य करणार असल्यानें लोकमताचा कौल, लोकांच्या आवडीनिवडी, अडचणी या सर्वांचा विचार करूनच त्यांना हें राज्य करावें लागेल. हे राज्यकर्ते लोकांच्या विचारांचें, भावनांचें, आकांक्षांचें प्रतिनिधित्व करतील. पण या निवडून दिलेल्या प्रतिनिधींनीं लोकमतांना धुडकावून लावून, मन मानेल तसे निर्णय घेऊन राज्यकारभार करण्यास सुरुवात केली तर? अशा परिस्थितीची शक्यता ध्यानांत घेऊन या प्रतिनिधीवर जनतेचें नियंत्रण राहावें या दृष्टीनें एका विशिष्ट कालमर्यादेनंतर पहिल्या निवडणुका रद्द समजून पुन्हां नव्यानें निवडणुका कराव्या लागतील. निवडणुकीचें हें शस्त्र जनतेच्या हातीं असल्यामुळें निवडून दिलेल्या प्रतिनिधींना लोकमत धाब्यावर बसविणें परवडणार नाहीं!! लोक आणि त्यांचे प्रतिनिधी यांचे संबंध यामुळें परस्पर सहकार्यावर अधिष्ठित रहातील. अशा तऱ्हेच्या परस्पर सहकार्यावरच शासनसंस्थेचें व जनतेचें सुखसमाधान अवलंबून राहील.

शासनसंस्थेचा उगम हा असा आहे. परस्परांच्या प्रेमावर, निष्ठेवर, माणसांचे सामाजिक व्यवहार चालूं न शकल्यामुळें निर्माण झालेली ही संस्था आहे. हें साधें सरळ सत्य कोणत्याहि परिस्थितींत डोळयाआड करणें अशक्य व्हावें.

शासनसंस्थेच्या स्वरूपाविषयींचे माझे हे विचार एका नैसर्गिक तत्त्वावर आधारलेले आहेत; आणि म्हणूनच ते खोडून टाकणें शक्य होणार नाहीं. एखादी गोष्ट जितकी कमी गुंतागुंतीची तितका तिच्यांत बिघाड होण्याचा संभव कमी आणि तिच्यांत कांहीं बिघाड झालाच तर तो सहज दुरुस्त करण्याजोगा असतो. हें नैसर्गिक तत्त्व डोळ्यांसमोर ठेवूनच मी जिच्याबद्दल विशेष अभिमान

ञाळगला जातो त्या इंग्लंडच्या राज्यघटनेविषयीं माझीं कांहीं मतें मांडणार आहें. ज्या काळांत ही राज्यघटना निर्माण झाली तो काळ राजकीय झोटिंगशाहीचा होता. या तमोयुगांत अर्थातच ही राज्यघटना मोठी उदात्त आणि आशादायक ठरली. या झोटिंगशाहीला तिनें कांहीं काळ थोपवून धरलें हें तिचें ऐतिहासिक कार्यहि मान्य केलेंच पाहिजे. परंतु हें सर्व जरी खरें असलें तरी ही राज्यघटना अपूर्ण आहे, जनतेच्या आकांक्षा पुऱ्या करण्यास ती असमर्थ आहे; आणि म्हणूनच नव्या परिस्थितीच्या संदर्भांत तिच्यांत कांहींतरी मूलभूत बदल घडवून आणला पाहिजे या गोष्टी अगदीं उघड आहेत.

अनिर्बंध शासनसंस्थेची (यांत माणसाचा अधःपात आहे.) रचना गुंतागुंतीची नसते. त्यामुळें जनतेला आपल्या दुःखाचें मूळ नेमकें कोठें आहे हें शोधून काढतां येतें; आणि त्यावर उपाययोजनाहि सहजपणें करतां येते. परंतु इंग्लंडची राज्यघटना इतकी गुंतागुंतीची आहे कीं दुःखाचा कांटा नेमका कुठें खुपतो आहे हें शोधून काढणें जनतेला कठीण होऊन बसतें. तिच्यांतील दोषस्थळांवर अचूका बोट ठेवणें विकट आहे. हीं दोषस्थळें दाखवणाऱ्यांचें कधींच एकमत होत नाहीं. अनेक राजकीय वैदू निरनिराळीं औषधें या दुःखांवर सुचवूं लागतात.

अनेक वर्षे मनांत दृढ झालेले पूर्वग्रह निपटून टाकणें कठीण आहे याची मला जाणीव आहे. पण असें असलें तरी इंग्लंडच्या राज्यघटनेचें निर्भीडपणें निरीक्षण-परीक्षण करतां हुकूमशाही आणि लोकशाही या मूल्यांच्या विचित्र भेसळींतून ही घटना निर्माण झाल्याचें आढळून येईल. या घटनेचे मुख्यतः तीन घटक मानतां येतील : (१) राजाच्या स्वरूपांत अवशिष्ट असलेली जुलमी साम्राज्यसत्ता. (२) सरदारसभेच्या स्वरूपांत अवशिष्ट असलेली जुलमी धनिकशाही (३) इंग्लिश जनतेचें स्वातंत्र्य जिच्यावर अवलंबून आहे ती लोकसभा : हा तिसरा घटक लोकशाही मूल्यांवर अधिष्ठित आहे.

पहिल्या दोन घटकांचे अधिकार वंशपरंपरेनेंच त्यांच्याकडे येत असल्यामुळें लोकांशीं त्यांचा कांहींच संबंध नाहीं. घटनात्मकदृष्ट्या विचार करतां त्यांच्याकडून लोकस्वातंत्र्याला कांहीं आधार लाभतो असें म्हणतां येणार नाहीं. हे तीन घटक एकत्र येऊन परस्परांचें नियंत्रण करतात असें म्हणणें शुद्ध हास्यास्पद आहे. अशा विधानांत एकतर शब्द तरी अर्थशून्य असले पाहिजेत किंवा हें विधान तरी विसंगतिपूर्ण असलें पाहिजे. लोकसभा राजसत्तेवर नियंत्रण ठेवते असें म्हणत

असतांना दोन गोष्टी गृहीत धरून चालाव्या लागतात : (१) राजसत्ता विश्वासार्ह नसल्यानें तिच्यावर नियंत्रण ठेवणें आवश्यक आहे किंवा राजाला अनिर्बंध सत्तेची अनिवार तृष्णा असते. (२) राजानें लोकसभेवर नियंत्रण ठेवायचें याचा अर्थ असा कीं राष्ट्राचा राजापेक्षां लोकसभेवरच अधिक विश्वास आहे.

परंतु हीच राज्यघटना लोकसभेनें संमत केलेलें बिल धुडकावून लावण्याचा अधिकार राजाला देते : म्हणजेच लोकसभेपेक्षां राजाला अधिक कळतें, राजा अधिक विश्वासार्ह आहे असें ती मानते !! हास्यास्पद विसंगतीखेरीज यांत दुसरें काय आहे? इंग्लंडच्या घटनेला संमत असलेल्या 'राजा' या घटकाच्या अस्तित्वांतील ही मूलभूत विसंगति या विवेचनावरून स्पष्ट व्हावी. सर्वसामान्यांच्या जीवनापासून, इतर जगाच्या प्रत्यक्ष संबंधापासून राजाला अलग ठेवलें जातें. परंतु असें असलें तरी लोकांच्या जीवनांतील प्रश्नांवर निर्णायक मत देण्याचा अधिकार मात्र राजाच्याच हातीं सोंपवलेला असतो! या परस्पर विरोधी गोष्टींमुळें राजा ही संस्था विसंगतीचें माहेर बनणार नाहीं तर काय?

या राज्यघटनेचें समर्थन कांहीं लेखक पुढीलप्रमाणें करतात : त्यांचें म्हणणें असें कीं, सरदारसभा ही राजसत्तेचें प्रतिनिधित्व करते व लोकसभा जनसत्तेचें. प्रथमदर्शनीं हें विधान मोठें चमकदार वाटलें तरी त्यामागील वैचारिक गोंधळ थोडा विचार केल्यावर स्पष्ट होईल. अर्थशून्य शब्द कितीहि नटवून सजवून मांडले तरी त्यांच्यापासून बोधाची अपेक्षा कशी बरें करतां येईल? या लेखकांनीं इंग्लंडच्या राज्यघटनेचें केलेलें समर्थन लक्षांत घेतां पहिला प्रश्न निर्माण होतो तो हा कीं, लोकांना जिच्यावर नियंत्रण ठेवावेंसें वाटतें, म्हणजेच, जिच्याविषयीं आवश्यक तो विश्वास वाटत नाहीं ती राजसत्ता निर्माण झाली तरी कशी? समंजस माणसें अशी सत्ता निर्माण करणें शक्य नाहीं. बरें, ही सत्ता ईश्वरनिर्मित आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं : कारण मग तिच्यावर माणसाचें नियंत्रण कशाला असा प्रश्न निर्माण होतो. पण असें असूनहि इंग्लंडची राज्यघटना मात्र, राजसत्तेचें अस्तित्व गृहीत धरून चालते. घटनेनें निर्माण केलेली ही सत्ता घटनेचें उद्दिष्ट साध्य करण्यास सर्वथैव असमर्थ आहे. एखाद्या मोठ्या यंत्राचें मुख्य चक्र संबंधित छोट्या चक्रांना गति देतें. शासनसंस्थेच्या यंत्रणेचेंहि असेंच आहे. राजा हें तिचें मुख्य चक्र आहे. इतर लहान चक्रें एका विशिष्ट मर्यादेपर्यंत या मुख्य चक्राच्या गतीवर नियंत्रण ठेऊं शकतात; परंतु जोपर्यंत हें चक्र थांबविणें

या लहान चक्रांच्या शक्तीबाहेरचें आहे तोपर्यंत अंतिम अर्थानें हें नियंत्रण परिणामशून्यच म्हणावें लागेल.

इंग्लंडच्या राज्यघटनेंत राजा हीच केन्द्रशक्ति आहे हें निर्विवाद आहे. कर्तुम-कर्तुम् अन्यथाकर्तुम् अधिकार राजाच्याच हातीं घटनेनें सोंपविलेले असतात. या राजसत्तेवर लोकसभेचें नियंत्रण असतें म्हणजे तरी काय? राजसत्तेच्या दरवाज्याला लोकसभेनें नियंत्रणाचें कुलूप लावायचें; परंतु या कुलुपाची किल्ली मात्र राजाच्याच हातीं सोंपवायची असा हा नियंत्रणाचा हास्यास्पद प्रकार आहे. इंग्लिश जनतेचा या घटनेला असलेला पाठिंबा विवेकांतून निर्माण झालेला नसून राष्ट्रीय परंपरेच्या पोकळ अभिमानांतून निर्माण झालेला आहे. झोटिंगशाहीखालीं तुडवल्या जाणाऱ्या इतर कांहीं देशांतल्या जनतेपेक्षां इंग्लंडमधील जनता अधिक सुरक्षित आहे हें खरें परंतु फ्रान्सप्रमाणेंच इंग्लंडमधेंहि राजाची इच्छा हाच कायदा आहे: फरक इतकाच कीं, राजाची ही इच्छा त्याच्या तोंडून 'हुकूम' या स्वरूपांत व्यक्त न होतां 'पार्लमेंटचा कायदा' या गोंडस नांवाखालीं जनतेवर लादली जाते. पहिल्या चार्ल्सची जुलमी सत्ता इंग्लिश जनतेनें उलथून टाकली; परंतु राजा ही संस्था मात्र त्यांनीं तशीच ठेवली. त्यामुळें नंतरचे राजे न्यायी होणें तर सोडाच, पण अधिक धूर्त मात्र बनले! इंग्लंडचा राजा तुर्कस्तानच्या राजाप्रमाणें जुलूम गाजवीत नाहीं हें खरें: पण त्याचें श्रेय इंग्लंडच्या राज्यघटनेला नसून इंग्रज माणसाच्या विशिष्ट मनोरचनेला आहे. इंग्लंडच्या राज्यघटनेंतील या दोषस्थलांतर निर्भीड टीका करणें आतां अगत्याचें झालें आहे. त्यासाठीं पूर्वग्रहांचा मनावर जमलेला धुरळा आधीं झाडून टाकणें भाग आहे. कारण स्वतः पक्षपाती असलेला मनुष्य ज्याप्रमाणें दुसऱ्याला न्याय देऊं शकत नाहीं त्याप्रमाणें मनांत पूर्वग्रहांना थारा दिल्यास या राज्यघटनेंतील दोषस्थळांवर न्याय्य टीका करणें आपल्याला अशक्य होऊन बसेल. ज्याप्रमाणें बाहेरख्याली माणूस पतिव्रतेच्या चारित्र्यावर मतप्रदर्शन करण्यास अयोग्य ठरतो, त्याप्रमाणें अनेक विसंगतींनीं भरलेल्या या राज्यघटनेला जर आपण पाठिंबा दिला तर चांगली शासनसंस्था कोणती याविषयींचा निर्णय घेण्यास आपण अपात्र ठरूं.

● ● ●

निसर्गानें मानवजात निर्माण केली तेव्हां सामाजिक पातळीवर दिसणारे भेद अस्तित्वांत नव्हते. समतेची ही निसर्गनिर्मित घडी पुढें कांहीं विशिष्ट कारणां-

मुळें विसकटली. जुलूम आणि लोभ या कडक भडक शब्दांचा उपयोग न करतांहि श्रीमंती आणि गरिबी यांच्यामध्यें उभ्या असलेल्या कारणांची मीमांसा करतां येणें शक्य आहे. श्रीमंतीचें पर्यवसान जुलुमांत होतें. जुलूम हें सहसा श्रीमंतीचें साधन नसतें. लोभामुळें एखादा मनुष्य स्वतःच्या दारिद्र्यापासून बचाव करूं शकेल परंतु लोभाच्या प्रेरणेंतून धनसंचयाची शक्ति प्राप्त होईलच असें नाहीं.

परंतु माणसामाणसांत असा एक भेद आहे कीं त्याचें स्पष्टीकरण नैसर्गिक किंवा धार्मिक कारणमीमांसेनें करतां येणार नाहीं. राजा आणि प्रजा या भेदाविषयीं मी येथें लिहीत आहें. स्त्री-पुरुष हा भेद निसर्गनिर्मित आहे. चांगले वाईट हा भेद ईश्वरनिर्मित आहे. परंतु एकजण अधिकार गाजवणारा राजा आणि दुसरा मान वांकवून या उच्च स्तरावरच्या व्यक्तीची आज्ञा पाळणारा प्रजाजन, हा भेद मात्र कसा निर्माण झाला याचा विचार करणें अत्यंत आवश्यक आहे. याचबरोबर राजा या संस्थेमुळें मानवी जीवनांत सुख निर्माण झालें कीं दुःख हाहि विचार केला पाहिजे.

धर्मशास्त्राचा दाखला घेतला असतां असें दिसून येतें कीं मानवजातीच्या आरंभीं ‘राजा’ अस्तित्वांत नव्हता. राजा नव्हता याचाच अर्थ असा कीं त्यावेळीं युद्ध नव्हतें. युद्ध या आपदेच्या तोंडीं मनुष्यजातीला देण्यास हे राजेच कारणीभूत होत असत. हॉलंडमध्यें राजा नाहीं. म्हणून तेथें युरोपमधल्या राजसत्ताधिष्ठित अशा कोणत्याहि देशापेक्षां अधिक शांतता नांदते आहे असें दिसून येतें. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीच्या अगदीं जुन्या काळांत जाऊन पाहिलें तर आपल्याला असें आढळून येतें कीं त्या समाजांत जी सुखशांति आढळते तिचा मागमूसहि ज्यू लोकांनीं राजा ही संस्था निर्माण केलेल्या समाजांत आढळत नाहीं.

राजसत्ताधिष्ठित शासनपद्धतीची कल्पना प्रथम हेदन लोकांनीं जगांपुढें मांडली. पुढें इस्रायल लोकांनीं ती त्यांच्यापासून उचलली. व्यक्तिपूजेच्या या कल्पनेच्या आधारें सैतानानें मानवी जीवनांत आपलें पाऊल घट्ट रोवलें. हेदन लोक आपल्या मृत राजांचा गौरव करीत असत. पुढें खिश्चन लोकांनीं त्याचें विकृत अनुकरण करून आपल्या जिवंत राजांचीहि पूजा करण्यास प्रारंभ केला. आपल्या ऐन वैभवाच्या आमदानींत जो अचानक कोसळून धुळीला मिळतो अशा कीटकवत् व्यक्तीला प्रभु समजून त्याची पूजा करणें हा मानवी श्रध्देचा किती भयानक अधःपात आहे !

एका माणसानें राजा होऊन इतरांवर सत्ता गाजवावी या दुष्ट घटनेला नैसर्गिक नियमांचा किंवा धर्मशास्त्राचा आधार कधींहि लाभणें शक्य नाहीं. सॅम्युएल आणि गायडीअन् या द्रष्टयांनीं तर असें स्पष्ट लिहून ठेवलें आहे कीं जे लोक राजा मानतात ते ईश्वराच्या सामर्थ्याचा अपमानच करीत असतात. राजसत्तेच्या मुळावरच घांव घालणाऱ्या या धर्मवचनांना सपशेल दडपून टाकण्याची खबरदारी सर्व सत्ताधीशांनीं घेतलेली आहे. परंतु ज्या देशांत अजूनहि राजा ही संस्था निर्माण झालेली नाहीं त्या देशांनीं या धर्मवचनांचा कसोशीनें विचार केला पाहिजे. "जें सीझरचें आहे तें सीझरला देऊन टाका" असें एक शास्त्रवचन आहे; परंतु हें धर्मशास्त्रांतलें वचन राजसत्तेचा पुरस्कार करणारें मुळींच नाहीं: कारण त्या काळचे ज्यू लोक रोमनसत्तेचे गुलाम होते.

निसर्गनिर्मित समतेच्या या मोझायिकप्रणीत इतिहासाला तीन हजार वर्षें उलटून गेल्यानंतर ज्यू लोकांनीं आपल्याला राजा हवाच—त्याशिवाय आपलें भागणार नाहीं अशी आपली भ्रामक समजूत करून घेतली. तोपर्यंत ज्यू लोकांच्या समाजांत खऱ्याखुऱ्या लोकसत्ताक मूल्यांना स्थान होतें. समाजांतील वयोवृद्ध आणि तपोवृद्ध माणसें न्यायासनावर बसून सामाजिक व्यवहाराचें नियंत्रण करीत. त्या समाजांत राजा ही सत्ताच अस्तित्वांत नव्हती. राजा मानणें म्हणजे ईश्वराचा अपमानच करणें होय असें ते मानीत असत. माणसावर जर कुणाची सत्ता असेल तर ती ईश्वराचीच होय अशी त्या समाजाची श्रद्धा होती. आणि म्हणूनच ही ईश्वरी सत्ता डावलून माणसानें जर राजसत्ता निर्माण केली तर ते ईश्वराला कधींहि रुचणार नाहीं हें उघड आहे. राजसत्ता मानण्याचें पाप ज्यू लोकांनीं केल्यामुळें त्यांना ईश्वरी कोपाला बळी पडावें लागलें असें धर्मशास्त्रांत स्वच्छ म्हटलें आहे. या इतिहासाकडे डोळसपणें पाहाणें अत्यंत महत्त्वाचें आहे. मिडियनाईट लोक इस्रायल जनतेवर जुलूम करीत होते. गिडिअननें लहानसें सैन्य जमवून मिडियनाईट् लोकांशीं मुकाबला केला आणि या युद्धांत त्यांचा पराभव केला. या यशामुळें ज्यू लोकांना मनस्वी आनंद झाला. गिडिअनच्या नेतृत्वामुळेंच हें यश आपल्याला लाभलें या कृतज्ञतेच्या भावनेनें हेलावून जाऊन ज्यू लोकांनीं गिडिअनला आपला राजा करण्याचें ठरविलें. हे लोक गिडिअनजवळ जाऊन त्याला म्हणाले, "हे गिडिअन, तूं आमच्यावर राज्य कर. तुझीं मुलेंबाळें, तुझ्या मुलांची मुलेंबाळें यांनीं वंशपरंपरेनें आमच्यावर राज्य करावें अशी आमची इच्छा आहे." या

क्षणीं गिडिअनपुढें प्रचंड मोह उभा होता. केवळ त्यालाच नव्हे तर त्याच्या पुढच्या अनेक पिढ्यांना वंशपरंपरेनें राजपद मिळणार होतें. परंतु गिडिअनचा आत्मा शुद्ध होता. त्याचें पावित्र्य या मोहानें जराहि गढूळलें नाहीं. तो शांतपणें त्या लोकांना म्हणाला, "मी तुमच्यावर राज्य करणार नाहीं. माझीं मुलेंबाळें तुमच्यावर राज्य करणार नाहींत. माणसावर फक्त एक ईश्वराचीच सत्ता चालूं शकते" गिडीअनचे शब्द काळजीपूर्वक वाचा. येथें गिडीअननें केवळ राज्यपदच झुगारलें असें नव्हे तर याहीपुढें जाऊन त्यानें एखाद्या माणसाला हें पद देण्याचा जनतेचा अधिकारच मुळीं मूलतः अमान्य केला. आणि असें करण्यांत ईश्वरी सत्तेचा अपमान आहे हें त्यानें क्रांतदर्शी द्रष्ट्याच्या अधिकारवाणीनें जनतेला स्पष्टपणें बजावलें.

यानंतर जवळजवळ एकशेंतीस वर्षांनीं ज्यू जनतेनें पुनः हीच चूक केली. हेदन लोकांकडून उचललेलें राजसत्तेचें हें दुष्ट मूल्य अजूनहि ज्यू लोकांच्या मनांत घर करून होतें. संधि मिळतांच पुन्हां ज्यू लोकांच्या या मागणीनें उचल खाल्ली. सॅम्युएलचे पुत्र चांगल्या वर्तणुकीचे निपजले नाहींत. आपल्या दुर्वर्तनामुळें त्यांनीं जनतेंत तीव्र असंतोष निर्माण केला. त्यामुळें चिडलेले लोक सॅम्युएलजवळ आले आणि म्हणाले, "हे सॅम्युएल, तूं आतां वृद्ध झाला आहेस. तुझे पुत्र तुझ्याप्रमाणें सन्मार्गानें जाणारे नाहींत म्हणून इतर देशांत लोकांवर राज्य करणारा राजा असतो तसा आम्हांलाहि एक राजा असावा अशी इच्छा आमच्या मनांत निर्माण झाली आहे. हे तपोवृद्ध पुरुषा, आमच्यावर राज्य करणारा योग्य असा राजा तूं आम्हांस निवडून दे." येथें ज्यू लोकांचा अधःपात आपल्याला स्पष्टपणें दिसतो. खरें म्हणजे हेदन लोकांचें अनुकरण न करण्यांतच ज्यू जनतेचें कल्याण होतें. परंतु दुर्दैवानें ज्यू जनता आंधळेपणानें हेदन लोकांच्या पावलांवर पाऊल टाकून चालत होती. लोकांनीं राजाची मागणी केली तेव्हां सॅम्युएलनें ईश्वराची प्रार्थना केली. ईश्वर सॅम्युएलला म्हणाला, "सॅम्युएल, या लोकांना सावध कर आणि तूंहि सावध हो. हे लोक माझी सत्ता झुगारून देऊन राज्यसत्तेचा हपाप बाळगीत आहेत. तूं त्यांना त्यांची चूक दाखवून दे. त्यांच्या कल्पनेला निकरानें विरोध कर. आणि राजाची सत्ता असण्यांत माणसाचा अधःपात कसा आहे हें त्यांना समजावून सांग." येथें सत्ता म्हणजे केवळ एका विशिष्ट राजाची सत्ता असें नसून त्या काळांतील सर्वच राजांची सत्ता असा अर्थ अभिप्रेत आहे. सॅम्युएलनें राजाची मागणी

करणाऱ्या जनतेला ईश्वरी आदेश समजावून सांगितला. राजसत्तेचा धोका कोणता आहे हें त्यानें त्यांच्या नजरेस आणून दिलें. तो म्हणाला, "लोक हो, तुम्हीं एकदां राजा निर्माण केलांत म्हणजे तो तुमच्या मुलांबाळांना आपल्या रथाला जुंपील, आपले अधिकारी तुमच्यावर नेमून तो आपल्या जमिनीवर तुम्हांला आणि तुमच्या मुलबाळांना सक्तीनें राबवून घेईल. तुमच्या बायकामुलींना तो आपल्या मुदपाकखान्यांत वेठीनें कामाला लावील. युद्धासाठीं लागणारीं शस्त्रें तो तुमच्याकडून करवून घेईल. तुमच्या जमिनी आणि शेतें तुमच्याकडून छिनून घेऊन तो आपल्या नोकरांना आणि अधिकाऱ्यांना वांटून टाकील. (पक्षपात आणि लांचलुचपत देणें या राजाच्या दुर्गुणांवर येथें बोट ठेवलें आहे.) तुमच्या सर्व संपत्तीचा दहावा भाग तो बळकावून बसेल. तुम्हीं सर्वजण त्याचे दास व्हाल. असें झाल्यावर तुम्ही पश्चात्तापानें धाय मोकलून रडूं लागाल. परंतु ईश्वर तुमचा हा आक्रोश ऐकणारहि नाहीं. कारण त्याचा आदेश धुडकावून लावून तुम्हींच राजा निर्माण केलेला आहे." यावरून राजसत्तेचें धर्मशास्त्राला अभिप्रेत असलेलें स्वरूप स्पष्ट होतें. अपवाद म्हणून चार राजे जरी चांगले निघाले तरी हें तत्त्व खोडलें जाऊं शकत नाहीं. डेव्हिड हा राजा थोर होता. परंतु तो ईश्वरी आदेशानुसार वागणारा पुरुष होता यांतच त्याच्या थोरवीचें रहस्य आहे. तो राजा होता हें त्याच्या थोरवीचें कारण नव्हे. तात्पर्य, डेव्हिडसारखा एखादा सत्प्रवृत्त राजा राजसत्ता पापमूल आहे या नियमाला बाध आणूं शकत नाहीं. सॅम्युएलनें इतकें सगळें समजावून सांगूनही ज्यू लोक त्याला म्हणाले, "आम्हांला राजा हवाच. जो आमच्यावर राज्य करील, आमच्यासाठीं युद्धांत लढेल असा राजा आम्हांला हवाच आहे." तेव्हां संतप्त होऊन सॅम्युएल म्हणाला, "लोकहो, आततायीपणानें तुम्ही परमेश्वरी कोप ओढवून घेत आहांत. मी हें सारें ईश्वरापुढें मांडतों आणि तुमच्या या गुन्ह्याची शिक्षा म्हणून वादळांचा वर्षाव कर असें मी त्याला सांगतों. संहार करणारीं वादळें घोंघावूं लागलीं कीं आपल्या राजसत्तेच्या हव्यासानें आपण ईश्वरी नियमांचें उल्लंघन केलें आहे ही गोष्ट तुम्हांला समजेल आणि तुमचे डोळे उघडतील." सॅम्युएलनें ईश्वराची प्रार्थना केली. त्या दिवशीं प्रचंड वादळ झालें. ईश्वराचा कोप भयंकर विनाश होऊन थैमान घालूं लागला. भयग्रस्त झालेले ज्यू सॅम्युएलला शरण येऊन म्हणाले, "सॅम्युएल, राजाची मागणी करण्याचें भयानक पाप आम्ही करून बसलों आहोंत.

आम्हांला क्षमा कर. ईश्वरानें आपला कोप आवरावा म्हणून तूं आमच्या वतीनें त्याला विनव."

हा सारा प्रसंग मी धर्मशास्त्रांतून आहे तसा येथें उद्धृत केला आहे. धर्मशास्त्रांतलीं वचनें म्हणजे द्व्यर्थी शब्दांचा धूर्त खेळ नव्हे. राजसत्तेला ईश्वराचा पाठिंबा नाहीं, हें तरी सत्य आहे किंवा धर्मशास्त्र तरी झूट आहे. धर्मशास्त्रांतल्या या वचनांचा अर्थ सर्वसामान्य जनतेला कळूं नये म्हणून धर्माची मक्तेदारी करणाऱ्या धर्मगुरूंनीं जनतेच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याचा सतत प्रयत्न चालविलेला असतो. धर्मशास्त्राचा राजसत्तेला विरोध आहे हें जर जनतेला कळलें तर आपलें आसनच कोसळेल या भीतीमुळें धर्मगुरुंप्रमाणेंच राजेहि या वचनांचा अर्थ जनतेला कळूं नये यासाठीं हरतऱ्हेची चलाखी आणि दडपशाही करीत असतात.

राजसत्तेच्या आपत्तींत तिला आनुवंशिकतेची जोड देऊन आपण ही आपत्ति अधिक तीव्र केली आहे. राजसत्ता निर्माण करण्यांत आपलें अधःपतन होतें परंतु तिला आनुवंशिक हक्काची जोड देण्यानें आपण पुढील अनेक पिढ्यांचा घोर अपमान केला आहे; त्यांच्यावर जुलूम केला आहे. याचें कारण उघड आहे. निसर्गतः माणसें समानतेच्या पातळीवर असतां एखाद्या व्यक्तीला किंवा कुटुंबालः इतरांहून आपण जन्मतःच उच्च आहोंत असें मानण्याचा काय अधिकार आहे? एकादी व्यक्ति आपल्या समकालीनांत विशेष गुणप्रभावामुळें उच्च स्थान मिळवूं शकेल हें मी समजूं शकतों परंतु हें उच्च स्थान आनुवंशिकतेच्या हक्कानें मिळविण्यास या व्यक्तीचे वंशज पात्र असतीलच असें कशावरून? याचाच अर्थ असा कीं राज्यपद वंशपरंपरेनें देण्यास निसर्गाचा विरोध आहे नाहींतर हिऱ्याच्या पोटीं गारगोटी निपजल्याचे अनेक दाखले मिळाले नसते.

एकादी व्यक्ति ज्याप्रमाणें लोकांनीं तिला दिलेल्या अधिकारापेक्षां अधिक अधिकार घेऊं शकत नाहीं त्याचप्रमाणें जे लोक अशा व्यक्तीला कांहीं अधिकार बहाल करतात त्यांनाहि पुढच्या पिढीच्या वतीनें कसलेहि हक्क देण्याचा अधिकार नाहीं. ते एकाद्या व्यक्तीला, "आम्ही तुला आमचा प्रमुख म्हणून निवडतों" असें म्हणूं शकतील परंतु तुझीं मुलेबाळें वंशपरंपरेनें आमच्यावर राज्य करतील असें जर त्यांनीं म्हटलें तर तो पुढच्या पिढीवर अन्याय होईल, आणि असा अन्याय करणें त्यांच्या अधिकाराबाहेरचें आहे. शिवाय वंशपरंपरेनें अधिकार

देण्यांत मुख्य धोका आहे तो असा कीं त्यांना एखाद्या दुष्ट किंवा मूर्ख राजा-कडूनहि आपल्यावर राज्य करून घ्यावें लागेल. अनेक विचारी माणसांना वंशपरंपरेनें राज्यपद देण्याची ही कल्पना अत्यंत तिरस्करणीय वाटते. परंतु हीं विचारी माणसें सहसा हें मत उघडपणें बोलून दाखविण्याचें धाडस करीत नाहींत. एकादा दुष्ट संकेत एकदां रूढ झाला कीं तो दूर करणें कठीण होऊन बसतें. मग कांहीं जण भीतीमुळें, कांहींजण अंध श्रद्धेमुळें तर कांहीं राजानें केलेल्या लुटालुटींत आपल्याला हिस्सा मिळावा या लोभापोटीं वंशपरंपरा राज्यपदाचा हा अनिष्ट संकेत कवटाळून बसतात.

हे राजे उच्च कुळांतून जन्मलेले आहेत अशी एक समजूत रूढ आहे. परंतु या राजांच्या कुळाचा उगम अगदीं जुन्या काळापर्यंत जाऊन शोधूं गेलें असतां असें आढळून येतें कीं या राजकुळाचा आदिपुरुष लुटारूंच्या टोळीचा नायक असला पाहिजे. सामर्थ्य आणि धूर्तता यांच्या बळावर त्याला लुटारूंच्या या टोळीचें प्रमुखपद प्राप्त झालें असलें पाहिजे. हळू हळू त्यांनीं आपलें सामर्थ्य वाढवून मी तुमचें रक्षण करतों याबद्दल तुम्हीं मला कर दिला पाहिजे असें सांगितलें असेल. टोळींतील माणसें सुरक्षिततेच्या इच्छेमुळें या गोष्टीला कबूलहि झालीं असतील. परंतु टोळींतील लोकांनीं आपल्या या नायकाला नेतृत्वाचा हक्क वंशपरंपरेनें दिला असेल असें मुळींच वाटत नाहीं कारण ज्यांना अनिर्बंध, वेछूट जीवन जगायची संवय झाली होती असे लोक हें पिढ्यान्‌पिढ्या जखडणारें बंधन कसें बरें आपल्यावर लादून घेतील? त्या जुन्या काळीं योगायोगानें टोळीच्या नायकाचा मुलगा त्याच्यानंतर नेतृत्वपदीं आरूढ झालाहि असेल. परंतु हा केवळ योगायोगाचा भाग होता, वंशपरंपरेनें अधिकार देण्याची कल्पना यांत मुळींच समाविष्ट नव्हती हें येथें ध्यानांत घेतलें पाहिजे. परंतु त्या काळीं इतिहास लिहिला जात नसे. लेखी पुरावे सांभाळण्याची पद्धत तेव्हां नव्हती. या गोष्टीचा फायदा घेऊन कांहीं धूर्त नायकांनीं योगायोगानें प्राप्त झालेला अधिकार हा वंशपरंपरेनें प्राप्त होणारा हक्क आहे ही भ्रामक कल्पना लोकांच्या मनांत रूढ केली असेल. कदाचित् नायकाच्या मृत्यूनंतर टोळींत गैरशिस्त आणि गोंधळ निर्माण होऊं नये म्हणून नवा नायक नेमण्याच्या वेळीं (लुटालूट करून जगणाऱ्या त्या अनिर्बंध टोळींत निवडणुकीची कल्पना कशी असणार?) त्यांनीं वंशपरंपरेच्या अधिकाराचा अवलंब केला असण्याचाहि संभव आहे. तें कसेंहि असो. जें अधिकारपद

या नायकांना आरंभीं केवळ योगायोग म्हणून किंवा सोय म्हणून देण्यांत आलें तें नंतर त्यांच्या आनुवंशिक हक्काचा एक भागच होऊन बसलें.

इंग्लंडच्या गादीवर आजवर बसलेल्या राजांचें निरीक्षण-परीक्षण केलें असता वाईट राजांचीच संख्या अधिक होती असेंच आढळून येईल. विजेता वुइल्यम हा चारित्र्यवान् उच्च कुळांतला राजा होता असें म्हणण्याचें धाडस, डोकें ठिकाणावर असलेला कोणता मनुष्य करील ? वुइल्यम हा एक अधम कुळांतला फ्रेंच माणूस, सशस्त्र लुटारूंची टोळी घेऊन इंग्लंडमधें आला आणि तेथील लोकांच्या विरोधाला न जुमानतां त्यानें सिंहासन बळकावलें. एका बदमाष माणसानें मिळविलेला हा राज्याधिकार ईश्वरदत्त आहे असें कसें बरें म्हणतां येईल ? वंशपरंपरेनें राज्यपद देण्याची किंवा राजाचा अधिकार ईश्वरदत्त आहे असें मानण्याची कल्पना किती मूर्खपणाची आहे याचें पुरेसें विवेचन मीं येथें केलें असल्यामुळें या कल्पनें तल्या विसंगती उघड करण्यांत अधिक वेळ घालविणें मला जरुरीचें वाटत नाहीं. हें सर्व विवेचन ऐकूनहि एखादा दुबळा माणूस जर हिऱ्याच्या पोटीं निपजणाऱ्या गारगोटीची मी हिरा समजूनच पूजा करणार असें दुराग्रहानें म्हणूं लागला तर त्याचा मूर्खपणा त्यालाच लखलाभ होवो असें म्हणून गप्प बसणें हेंच श्रेयस्कर.

आणि तरीहि सुरुवातीला राजांची निवड कोणत्या तत्त्वावर होत होती हा प्रश्न मला विचारावासा वाटतो. या प्रश्नाचें उत्तर तीन प्रकारें देतां येईल. राजाची निवड जर योगायोगानें, निवडणुकीनें किंवा जुलूमजबरदस्तीनें झाली असली पाहिजे. राजाची जर योगायोगानें झाली असेल तर आनुवंशिक अधिकाराची कल्पनाच कोसळून पडते. सॉल हा राजा एका विशिष्ट परिस्थितींत योगायोगानें निवडला गेला परंतु त्याच्यानंतर येणारा राजा हा कांहीं त्याचा वंशज नव्हता. इतकेंच नव्हे तर सालच्या वंशजानेंच राज्यपदावर यावें ही कल्पनाहि त्यावेळीं लोकांच्या मनांत नव्हती असेंच दिसतें. राजाची निवड जर निवडणुकीच्या द्वारें होत असेल तर त्यापुढें तसा पायंडा पडला पाहिजे. निवडणुकीची कल्पना मान्य केली तरीहि वंशपरंपरागत राजसत्तेला स्थानच उरत नाहीं. कारण एका पिढीनें केलेली राजांची निवड पुढील सर्व पिढ्यांनीं मान्य केली पाहिजे असें कसें बरें म्हणतां येईल ? पुढची पिढी कदाचित् त्या राजाला किंवा त्याच्या वंशजांनी सिंहासनावर बसविणारहि नाहीं. निवडणुका आणि वंशपरंपरागत राजसत्ता या दोन कल्पनांची सांगड घालणें हें ॲडमनें केलें पाप धर्मशास्त्रानें जसें सर्वच माणसांच्या

१२८७०

माथीं मारलें तसें हास्यास्पद आहे. एका पिढीची निवड पुढील पिढ्यांच्या माथ्या वर लादणें हास्यास्पद आहे. राजाची वंशपरंपरागत निवड आणि ॲडमचें पाप यांना एका पंक्तीला बसविणें कांहीं जणांनां धाष्टर्याचें वाटेल परंतु कोणताहि विचारी मनुष्य याहून अधिक चांगला दृष्टांत देऊं शकेल असें मला वाटत नाहीं. आतां उरला तिसरा पर्याय आणि तो म्हणजे एखाद्या व्यक्तीनें जुलमाच्या बळावर राज्यपद बळकावण्याचा. अशा तऱ्हेच्या जुलमाचें समर्थन कोणताहि शहाणा मनुष्य करील असें मला वाटत नाहीं. वुइल्यम हा अशा तऱ्हेचा जुलमी पुंड होता हेंहि नाकारतां येणार नाहीं. या सूर्यप्रकाशासारख्या स्पष्ट सत्याकडे डोळे उघडून पाहाण्याचें धाडस इंग्लिश राजपरंपरेला कधींहि होणार नाहीं.

जनतेच्या दृष्टीनें आनुवंशिक राजसत्तेच्या कल्पनेंतील विसंगतीपेक्षांहि तिची घातकताच अधिक महत्त्वाची आहे. राजपरंपरेंतले सर्व राजे जर निरपवादपणें थोर पुरुष निपजले असते तर आनुवंशिकतेच्या या कल्पनेवर अशी सत्ता ईश्वरदत्त आहे असा शिक्का मारतां आला असता. परंतु राजांच्या मालिकेंतील अनेक दुष्ट आणि निर्बुद्ध राजे पाहिले कीं वंशपरंपरागत राजसत्तेच्या या कल्पनेंत जुलमाचें बीज कसें आहे हें स्पष्ट होतें. जीं माणसें आपल्याला आणि आपल्या वंशजांना परंपरेनें जनतेवर राज्य करण्याचा हक्क आहे असें मानतात अशीं माणसें लवकरच जुलमी बनतात. आत्मप्रतिष्ठेच्या उथळ कल्पनेचें विष त्यांच्या मनांत भिनलेलें असतें. हे जुलमी राजे स्वतःच्याच संकुचित जगांत वावरत असल्यानें सर्वसामान्य जनतेचें कल्याण कशांत आहे, तिचें हित कोणतें याची कधींच दखल घेत नाहींत. अशारीतीनें राज्यपदावर येणारीं हीं माणसें अनेक वेळां नालायकांचे शिरोमणीच असतात.

परंपरागत राजसत्तेच्या कल्पनेंत आणखी एक धोका असतो. पुष्कळ वेळां असें होतें कीं एखादा राजा वार्धक्यामुळें राज्यकारभार हांकण्यास असमर्थ ठरतो किंवा एखाद्या राजाच्या मृत्यूनंतर त्याचा वयांत न आलेला अजाण मुलगा राज्यपदावर येतो. अशा वेळीं सल्लागार म्हणून राजासाठीं राज्यकारभार करणारा एखादा दुष्ट मनुष्य जनतेच्या हिताहिताची पर्वा न करतां आपली तुंबडी भरून घेतो.

कांहीं लोक वंशपरंपरागत राजसत्तेचें समर्थन करतांना असें म्हणतात कीं या पद्धतीमुळें देशांतल्या देशांत अंतर्गत यादवी होत नाहीं. परंतु इतिहासाकडे दृष्टिक्षेप केल्यास हें विधान धादांत असत्य आहे ही गोष्ट स्पष्ट होते. इंग्लंडचा सर्व

इतिहास हीच गोष्ट सांगत आहे. बुइल्यमनें इंग्लंडची गादी बळकावल्यापासून आतांपर्यंत बत्तीस राजांनीं राज्य केलें. या काळांत एकूण आठ अंतर्गत लढाया आणि एकोणिस वेळा बंड झालें. शांतता आणि सुव्यवस्था स्थापन करण्याच्या ऐवजीं ही वंशपरागत राजसत्ता प्रत्यहीं या शांततेचा द्रोहच करते आहे असें आढळून येतें. हें पहिलें म्हणजे वंशपरंपरागत राजसत्तेच्या कल्पनेचें अधिष्ठानच कोसळतें.

इंग्लंडच्या गादीसाठीं यॉर्क आणि लँकॅस्टर या घराण्यांत झालेल्या युद्धांमुळें अनेक वर्षें सतत रक्तपात झालेला आहे. हेन्री आणि एडवर्ड यांच्यांत बारा वेळां युद्ध झालें. कांहीं वेळां एडवर्ड हेन्रीच्या अटकेंत होता तर कांहीं वेळां हेन्री एडवर्डच्या तुरुंगांत होता. एकानें वाजत गाजत राजवाड्यांत प्रवेश करावा आणि त्याच वेळीं दुसऱ्यानें देशाबाहेर जीव घेऊन परकीयांच्या मदतीसाठीं पळत असावें असा सगळा हास्यास्पद प्रकार होता. पार्लमेंट प्रत्येक वेळीं ज्याची सरशी होतांना दिसेल त्याला पाठिंबा देण्याचें सोयीस्कर धोरण पाळीत होतें. हा अंतर्गत कलह सहाव्या हेन्रीपासून सुरू झाला आणि तो सातव्या हेन्रीपर्यंत तसाच चालू होता. सातव्या हेन्रीच्या काळांत या दोन घराण्यांचें ऐक्य झालें. म्हणजे चोदाशें बावीस ते चौदाशें एकूणनव्वद हा सदुसष्ट वर्षांचा काळ दुसरें तिसरें कांहीं नसून अंतर्गत यादवीचाच इतिहास आहे. तात्पर्य, परंपरागत राजसत्तेचा इतिहास रक्तपात आणि संगर यांनीं भरलेला आहे. अशा तऱ्हेच्या राजसत्तेला ईश्वराचा कौल नाहीं आणि म्हणूनच या राजांची कारकीर्द सदैव रक्तानें डागळलेलीच रहाणार.

राजाचें काम तरी काय असा प्रश्न विचारला असतां काय आढळून येतें ? कांहीं देशांत प्रजेच्या जीवावर राजानें मनमुराद विलास करणें आणि आपल्या मृत्यूनंतर चैनीचें पीठ असें हें सिंहासन त्याच मार्गानें जाण्यासाठीं आपल्या मुलाला देणें एवढेंच राजाचें काम असतें. जेथें अनिर्बंध राजसत्ता आहे तेथें सैन्य आणि नागरिक जीवन या दोहोंची धुरा राजा वाहात असतो. इस्रायल लोकांनीं राजाची मागणी करतांना, "न्यायनिवाडा करणारा, आमच्या वतीनें युद्धांत लढणारा राजा आम्हांला हवा" असें म्हटल्याचा उल्लेख मी पूर्वी केला आहे. परंतु जेथें राजा सैन्याचा मुख्याधिकारीहि नसतो किंवा न्याय देण्याचें कामहि तो करीत नाहीं अशा देशांत राजाचें कार्य काय हा प्रश्न सामान्य माणसाला गोंधळांत टाकणारा आहे.

एकादी शासनसंस्था लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या जितकी जवळ येईल तितकें राजाचें काम कमी कमी होत जाणार हें उघड आहे. इंग्लंडच्या राज्यपद्धतीला

नेमकें कोणत्या नांवानें संबोधावें हें ठरविणें खरोखरीच कठीण आहे. सर वुइल्यम मेरीडिथ या राज्यपद्धतीला लोकसत्ताक असें म्हणतो. परंतु सध्यांच्या परिस्थितींत इंग्लंडच्या राज्याला लोकसत्ताक म्हणणें हा त्या शब्दाचा घोर अपमान आहे. कारण सध्यां इंग्लंडच्या राजानें लोकसभेचे सर्व अधिकार धाब्यावर बसवून स्पेनच्या किंवा फ्रान्सच्या राजाप्रमाणेंच 'हम करे सो कायदा' असेंच वागण्यास सुरुवात केलेली आहे. पुष्कळ वेळां माणसें अर्थ न कळतांच शब्दांचा वापर करीत असतात. खरें म्हणजे इंग्लिश जनतेला लोकसत्ताक मूल्यांवर अधिष्ठित असलेल्या लोकसभेसुळेंच इंग्लंडच्या राज्यघटनेचा अभिमान वाटतो. लोकसभेची कल्पना वगळल्यास झोटिंगशाहीशिवाय या राज्यघटनेंत उरतें काय? आणि म्हणूनच असें आढळून येतें कीं लोकसत्ताक मूल्यांचें स्थान जेव्हां भ्रष्ट होतें तेव्हां जनतेच्या भाळीं गुलामगिरीच येते. आज इंग्लंडची राज्यघटना अशी प्राणशून्य, दुबळी झालेली दिसते याचें कारण हें कीं राजसत्तेनें लोकशाही मूल्यांना हरताळ फांसला आहे; लोकसभेला पुरें ग्रासून टाकलें आहे.

इंग्लंडच्या राजाला युद्ध करणें आणि आपल्या मर्जीतल्या माणसांना तनखे चारणें यांखेरीज दुसरें काय काम आहे? राष्ट्राची पिळणूक करण्याच्या या कामाबद्दल राजाला वार्षिक आठशें हजार स्टर्लींगचा तनखा मिळावा आणि शिवाय लोकांकडून राजा म्हणून त्याची पूजा व्हावी ही गोष्ट लांछनास्पदच नाहीं तर काय? सिंहासनावर बसून जनतेचें शोषण करणाऱ्या अशा शेंकडों बदमाष माणसांपेक्षां एक प्रामाणिक मनुष्य समाजकल्याणाच्या दृष्टीनें अधिक मोलाचा आहे. अशा माणसाच्या पाठीशींच ईश्वर उभा असतो.

● ● ●

या माझ्या लेखांत मी जनतेसमोर साधी सरळ वस्तुस्थिति आणि तिच्या अनुषंगानें कांहीं विचार मांडणार आहे. सर्वसामान्य विवेक हेंच या विचारांचें अधिष्ठान आहे. हे विचार वाचून वाचकांनीं आपल्या मनांतले सर्व पूर्वग्रह झाडून टाकून स्वतंत्र बुद्धीनें विचार करावा, आपलें माणूसपण शाबूत ठेवून, आजच्या प्रश्नांकडे पहाण्याचा आपला दृष्टिकोन जरा विशाल करावा एवढेंच माझें मागणें आहे.

इंग्लंड आणि अमेरिका यांच्यातील सध्यां सुरू असलेल्या संघर्षावर आजवर शेंकडों लेख रक्तानें लिहिले गेले असतील. या वादविवादांत समाजांतल्या सर्व

पातळीवरच्या लोकांनीं वेगवेगळ्या हेतूंनीं वेगवेगळ्या कारणांसाठीं भाग घेतलेला आहे. परंतु या सर्वांचेच प्रयत्न फोल ठरले असून वादविवाद आतां जवळजवळ थांबल्यागतच झाला आहे. जें युक्तिवादानें साधलें नाहीं तें आतां शस्त्रबळानें साधायचें असेंच ठरल्यासारखें झालें आहे. इंग्लंडच्या राजसत्तेचें हें आव्हान अमेरिकेनें स्वीकारलें आहे. असें म्हणतात कीं पेलहॅम या मंत्र्यावर (हा मंत्रि कर्तबगार होता, पण त्याच्यांतहि अनेक दोष होते.) लोकसभेनें शस्त्रानें प्रश्न सोडविण्याचा निर्णय घेतल्याबद्दल प्रश्नांचा भडिमार केला आणि असे प्रश्न शस्त्राच्या धाकानें कायमचे कधींहि सुटत नसतात असें आपलें मत त्याला स्पष्टपणें बजावून सांगितलें. यावर पेलहॅमनें असें उत्तर दिलें कीं, शस्त्रांनीं हा प्रश्न कायमचा सुटला नाहीं तरी माझी कारकीर्द असेपर्यंत तरी तो प्रश्न सुटल्यासारखा होईल—मग पुढचें पुढें! सद्यःपरिस्थितींत अशातऱ्हेचा घातकी विचार जर वसाहतवाल्या लोकांत रूढ झाला तर त्यांच्यासाठीं पुढील पिढ्यांत तिरस्काराशिवाय दुसरी कोणतीहि भावना उरणार नाहीं.

वसाहतींचा झगडा स्वातंत्र्यासाठीं आहे. ज्यासाठीं सर्व शक्ति पणाला लावून लढावें असा स्वातंत्र्यासारखा आदर्श जीवनांत दुसरा नाहीं. हा प्रश्न केवळ एका शहराचा, विभागाचा, प्रांताचा किंवा राज्याचा नसून जेथें या जगांतलें एक-अष्टमांश लोक राहातात अशा एका प्रचंड खंडाचा आहे. तसेंच हा प्रश्न केवळ एका दिवसाचा, वर्षाचा किंवा एका विशिष्ट कालखंडाचा नसून भविष्यकाळांतील अनेक पिढ्यांचा आहे. पुढच्या कितीतरी पिढ्यांचें भविष्य या संघर्षाशीं निगडित आहे. सर्व लोकांनीं एकत्र येऊन आपल्या स्वातंत्र्यासाठीं प्राणपणानें झगडण्याची हीच वेळ आहे. या ऐक्याला लहानसा तडा जरी गेला तरी त्याचे परिणाम फार भीषण होतील.

वाटाघाटी संपून आपण आतां शस्त्रानें हा प्रश्न सोडविण्याच्या मार्गावर येऊन ठेपलों आहोंत. हा निर्णय म्हणजे राजकारणांतील एका नव्या युगाचा आरंभ आहे—येथून एका नव्या विचारपद्धतीला सुरुवात होत आहे. आपल्या या स्वातंत्र्याच्या झगड्याला एकोणिस एप्रिलपासून खरा आरंभ झालेला आहे. त्यापूर्वींच्या सर्व वाटाघाटी जसें गेल्यावर्षीचें पंचांग या वर्षी निरुपयोगी ठरतें तशा व्यर्थ ठरल्या आहेत. अजूनपर्यंत या प्रश्नांवर विचार करणारे सर्व लोक ब्रिटिशांशीं ऐक्य कायम राखलें पाहिजे अशाच मताचे होते. अशा तऱ्हेचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
२२९३८ दि:

विचार मांडणाऱ्या लोकांत दोन पक्ष होते : शस्त्रबळानें ऐक्य साधूं पाहाणारे आणि स्नेहाच्या बळावर ऐक्य टिकविण्याची आकांक्षा बाळगणारे. परंतु ऐक्य टिकविण्यासाठीं हे दोन्ही मार्ग निरुपयोगी ठरलेले आहेत. ऐक्य टिकविण्याचें स्वप्न आतां जवळ जवळ विरून गेलेलें आहे आणि म्हणूनच मला असें वाटतें कीं आतां या प्रश्नाची दुसरी बाजू विचारांत घेणें आवश्यक आहे. ब्रिटिशांवर अवलंबून राहाण्यानें किंवा त्याच्याशीं संबंध ठेवल्यानें आपल्या वसाहतींचें किती भयंकर नुकसान झालें आहे हें आपण पाहिलें पाहिजे. ब्रिटिशांशीं असलेला आपला हा संबंध कांहीं नैसर्गिक तत्त्वांच्या निकषावर तपासून पाहून ब्रिटिशांपासून वेगळे झाल्यानें आपले कोणते फायदे आहेत आणि ब्रिटिशांवर अवलंबून राहाण्यानें कोणते तोटे आहेत याचें निर्भीड परीक्षण यावेळीं करणें उचित ठरेल.

कांहीं लोक असें म्हणतात कीं पूर्वी ब्रिटिशांशीं संबंध ठेवल्यामुळें अमेरिकेचा बराच फायदा झालेला आहे; आणि म्हणूनच पूर्वेतिहास लक्षांत घेतां हा संबंध तसाच टिकविणें अपरिहार्य आहे. या विचाराइतकें धादांत असत्य दुसरें कोणतें असेल असें मला वाटत नाहीं. हाच फोल युक्तिवाद असाच पुढें चालवून असें म्हणतां येईल कीं लहान मूल फक्त दुधावरच जगत असतें, त्यावरच त्याचें पोषण होतें; आणि म्हणूनच तें मोठें झालें तरी हा पूर्वेतिहास लक्षांत घेऊन त्याला जेवण न देतां दुधावरच ठेवलें पाहिजे. हें किती हास्यास्पद आहे तें अधिक सांगण्याची जरूरी नाहीं. मला असें निश्चित वाटतें कीं इतर युरोपियन राष्ट्रांशीं संबंध नसता तरीहि अमेरिका आजचें वैभव प्राप्त करून घेऊं शकली असती. अमेरिकेचें सगळें वैभव तिच्या व्यापारपेठांवर अवलंबून आहे; आणि जोंपर्यंत युरोपांतील इतर राष्ट्रांना जगण्यासाठीं अन्न खाण्याची आवश्यकता भासते आहे तोंपर्यंत अमेरिकेच्या व्यापाराला मरण नाहीं. कांहींचें म्हणणें असें कीं ब्रिटननें आजवर आपलें संरक्षण केलें परंतु मला तरी या संरक्षणांत ब्रिटनच्या मतलबाखेरीज दुसरें कांहींच दिसत नाहीं. आपला स्वार्थ साधण्यासाठीं ब्रिटननें आम्हांलाच काय पण तुर्कस्तानालाहि असें संरक्षण दिलें असतें. अरेरे! या अनेक वर्षे मनांत बाळगलेल्या भोंगळ समजुतींमुळें आपण आपलें केवढें नुकसान करून घेतलें आहे! ब्रिटननें आपल्याला संरक्षण दिलें असा अभिमान आपण मिरवला पण यांत स्नेह नसून ब्रिटनचा स्वार्थच होता हें मात्र आपण लक्षांत घ्यायला विसरलों. ब्रिटननें आमच्या शत्रूपासून आमचें कल्याण व्हावें म्हणून आम्हांला संरक्षण

दिलेलें नसून आपल्या शत्रूंपासून स्वतःचें रक्षण करण्यासाठीं तें दिलेलें आहे. आज ज्यांना आपण शत्रू मानतों त्यांच्याशीं आपलें हें शत्रुत्व कशामुळें निर्माण झालें आहे हें आपण पाहिलें आहे काय? खरें म्हणजे ब्रिटिशांशीं आपला स्नेहसंबंध आहे हेंच या शत्रुत्वाचें कारण होय : अन्यथा, या देशांना अमेरिकेशीं वैर करण्याचें कांहींच कारण नाहीं. ब्रिटनशीं असलेले हे आपले संबंध एकदां तुटले कीं फ्रान्स आणि स्पेन या ब्रिटनशीं शत्रुत्व असलेल्या राष्ट्रांचे आणि आपले सलोखयाचे संबंध निर्माण होतील. हॅनोवरच्या युद्धापासून आपण योग्य तो धडा घेतला पाहिजे.

ब्रिटनच्या पार्लमेंटमधें नुकतेंच असें घोषित केलें गेलें कीं अमेरिकेंतील वसाहतींचा एकमेकांशीं प्रत्यक्ष संबंध कांहींहि नाहीं. आज त्यांच्यांत जो संबंध आहे तो ब्रिटन हा त्या सर्वांचा पितृदेश असल्यामुळें निर्माण झालेला आहे. म्हणजेच पेन्सिल्व्हानिया, जर्सिज आणि इतर वसाहतींत असलेल्या बंधुत्वाच्या संबंधाला ब्रिटनच सर्वथैव जबाबदार आहे. वसाहतींतील बंधुत्वभावनेचें हें कारण दाखविणें विकृत विचाराचें लक्षण आहे. खरें म्हणजे या कारणांमुळें आमच्यांत बंधुत्व कां आहे यापेक्षां आमचें जगाशीं शत्रुत्व कां आहे तें अधिक समजतें. अमेरिकन वसाहती जर ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं नसत्या तर फ्रांस आणि स्पेन या देशांशीं आमचें कधींहि शत्रुत्व निर्माण झालें नसतें.

असें असूनहि अजूनहि जर तुम्हीं ब्रिटनला पितृदेश म्हणणार असाल तर हा पितृदेश कसा अघोर स्वार्थी आहे हें मला तुम्हांला दाखवून द्यावें लागेल. इतरांचें निर्घृण शोषण करणाऱ्या ब्रिटनला स्वतःला पितृदेश म्हणवून घेण्यास शरम वाटली पाहिजे. जंगली पशुसुद्धां आपल्या पिलांना खात नाहींत. पण ब्रिटन मात्र आमच्या सर्व हिताचें भक्षण करण्यास बसलें आहे. हें भक्षण करणें सोपें जावें म्हणून पितृदेश, बंधुत्वभाव यांसारखे आमच्या मनांत आशा निर्माण करणारे शब्द धूर्त ब्रिटन आणि आणि त्याचे साथीदार वापरीत आहेत. या साखरपेरणीमागें कोणते हेतू आहेत हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. युरोपखंड हाच अमेरिकेचा पितृदेश आहे. स्वातंत्र्याच्या आणि समान नागरिक हक्कांच्या अनेक पुरस्कर्त्यांना जेव्हां आपल्या मायदेशांतून पळून जावें लागलें तेव्हां अमेरिकेनेंच त्यांना आसरा दिला आहे. ज्या जुलमामुळें त्यांना आपल्या मायदेशांतून निर्वासित व्हावें लागलें त्या जुलमाची प्रथा इंग्लंडमध्यें अजूनहि आहे आणि त्या पूर्वींच्या

क्रांतिकारकांच्या वंशजांना ती भोवत आहे. क्षुद्र भौगोलिक बंधनाच्या भिंती माणसामाणसांत उभ्या करणें अमेरिकेला मान्य नाहीं. या युरोप खंडावरचा प्रत्येक खिश्चन आमचाच बांधव आहे असें आम्हांला मनःपूर्वक वाटतें. आमच्या या उदारतेच्या भावनेचा आम्हांला विलक्षण अभिमान वाटतो. संकुचिततेची ही मर्यादा ओलांडून आम्ही हें विश्वबंधुत्व आमच्या वृत्तींत कसें बाणवून घेतों हें पाहाण्यासारखें आहे. इंग्लंडमधल्या एखाद्या शहरांत जन्मलेला माणूस आपल्या आजूबाजूच्या लोकांना आपले शेजारी मानतो. (कारण त्यांचे हितसंबंधहि एकत्र असतात!) आपल्या घरापासून हे शेजारी जर बऱ्याच मैलांच्या अंतरावर त्याला भेटले तर आपल्या घराजवळचा शेजारी ही संकुचित मर्यादा विसरून तो त्यांना आपले शहरवासी म्हणून संबोधितो. हाच शेजारी जर त्याला परदेशीं भेटला तर शहराचीहि मर्यादा विसरून एक इंग्रज माणूस मला भेटला असें तो मानतो. हाच विचार पुढें नेऊन असें म्हणतां येईल कीं कोणताहि युरोपियन मनुष्य अमेरिकेंत आला तरी तो आमचा देशवासीच आहे. हा माझ्या घराशेजारचा ही मर्यादा ओलांडून हा इंग्रज माणूस या विशाल कल्पनेकडे ज्या मार्गानें जातां येतें त्याच मार्गानें हा इंग्रज, तो फ्रेंच, तो हॉलंडचा—या सर्व संकुचित मर्यादा उल्लंघितां आल्या पाहिजेत. म्हणूनच मी म्हणतों कीं पितृदेश मानायचा तर इंग्लंड हा न मानतां सारा युरोपखंडच आपण त्या स्थानीं मानला पाहिजे. केवळ इंग्लंडला पितृदेश मानणें संकुचित वृत्तीचें द्योतक ठरेल. शिवाय पेन्सिल्व्हानिया या वसाहतींतील जरी ते असते तरी काय होणार होतें? कांहींच नाहीं. ब्रिटन हें आमचें शत्रुराष्ट्र आहे हें आतां इतकें उघड आहे कीं स्नेहसंबंधांचें नाटक यापुढें निव्वळ हास्यास्पद ठरणार आहे. इंग्लंडचा राजा पहिला वुइल्यम हा फ्रेंच होता आणि इंग्लंडचे सध्यांचे अर्ध्याहून अधिक उमराव फ्रेंच घराण्यांतलेच आहेत. पण म्हणून इंग्लंडवर फ्रान्सनें राज्य करावें असें म्हणणें उचित ठरेल काय? मग अमेरिकेच्या बाबतींत हा युक्तिवाद कसा काय समर्थनीय ठरतो?

ब्रिटन आणि अमेरिका एक झाले असतां जगांतल्या कोणत्याहि शक्तीपेक्षां वरचढ ठरतील असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. परंतु ही निव्वळ कल्पना आहे. कारण इतर राष्ट्रांशीं जर युद्ध झालें तर आम्हांलाच विजय मिळेल असें छातीठोक पणें कधींहि सांगतां येणार नाहीं. आणि त्याबरोबर ब्रिटनसाठीं आम्हीं सगळ्या जगाचें वैर पत्करावें असें आम्हीं कां म्हणून वागावें? दुसरें असें कीं सगळ्या

जगाशीं वैर पत्करण्यांत आम्हांला फायदा काय? आम्हांला आमचा व्यापार वाढविला पाहिजे. योग्य मार्गांनीं आम्हीं आमचा व्यापार केल्यास आम्ही निश्चितच सर्व जगाशीं मैत्रीचें नातें जोडूं शकूं. आमच्या व्यापारपेठांवर इतर राष्ट्रांच्या गरजा भागणें अवलंबून असल्यामुळें आपल्याशीं त्यांना स्नेहसंबंध राखावाच लागेल. शिवाय आमच्या देशांत सोन्याच्या खाणी नसल्यामुळें आम्हांला परचक्राचा धोकाहि नाहीं. ब्रिटिशांशीं तह करावा असें सांगणाऱ्यांनीं एक तरी सबळ कारण पुढें करावें असें माझें त्यांना आव्हान आहे. मी असें निश्चितपणें सांगतों कीं अशा तहाचें समर्थन करणारें एकहि कारण देतां यावयाचें नाहीं. आम्हीं जें धान्य विकूं, जो माल परदेशीं पाठवूं त्याचा मोबदला आम्हांला केव्हांहि मिळणारच. उलट ब्रिटिशांशीं संबंध ठेवल्यामुळें आमचें अपरिमित नुकसान होत आहे असेंच म्हणणें भाग आहे. आणि म्हणूनच आपल्या स्वतःच्या आणि इतर जगाच्या कल्याणासाठीं ब्रिटनशीं असलेले आपले संबंध तोडून टाकले पाहिजेत. ब्रिटनशीं असलेल्या आपल्या संबंधामुळें आपण निष्कारण युद्धाच्या आगींत ओढले जातों; ज्यांच्याशीं आपली मैत्री प्रस्थापित होणें सहज शक्य आहे अशा राष्ट्रांशीं आपल्याला शत्रुत्व पत्करावें लागतें. आपल्या बाजारपेठा सर्व युरोपभर पसरलेल्या असल्यामुळें कोणत्याहि राष्ट्राशीं निष्कारण शत्रुत्व पत्करणें अमेरिकेला हितावह नाहीं. परंतु जोंपर्यंत ब्रिटनशीं आपले संबंध कायम आहेत तोंपर्यंत हें वैराचें वाण कांहींहि कारण नसतांना आपल्याला पत्करावें लागेल.

युरोप खंडांत इतकीं राज्यें आहेत कीं तेथें कायमची शांतता नांदणें कठिण आहे आणि जेव्हां जेव्हां इंग्लंडचें कोणत्याहि राष्ट्राशीं बिनसतें तेव्हां तेव्हां ब्रिटनशीं आपला संबंध असल्यामुळें आपला व्यापार घसरतो. पुढच्या युद्धाचा अनुभव वाईट आला कीं मग आज तहाची भाषा बोलणारे लोक ब्रिटनशीं तह केला नसता तर बरें झालें असतें असें म्हणूं लागतील. ब्रिटनशीं असलेले संबंध तोडून टाकणें हाच आज एकमेव मार्ग आहे. निरपराध माणसांचें रक्त आक्रोश करून सांगत आहे कीं ब्रिटनशीं संबंध तोडण्याची वेळ आज आलेली आहे. ब्रिटन आणि अमेरिका यांत ईश्वरानें ठेवलेलें भौगोलिक अंतर देखील आपले ब्रिटनशीं संबंध असूं नयेत असेंच सांगत आहे. इंग्लंडमधें धर्मसुधारणेची चळवळ सुरू झाल्यानंतर अमेरिकेचा शोध लागला. जणूं काय इंग्लंडमधें ज्या थोर पुरुषांवर अन्याय होतील त्यांना या जगांत कुठेंतरी आसरा मिळावा म्हणूनच ईश्वरानें ही सोय केली.

ग्रेट ब्रिटनचें अमेरिकेवर असलेलें हें वर्चस्व आज ना उद्यां नष्ट होणारच आहे. कोणत्याहि विचारी मनुष्याला आपलें ब्रिटनशीं असलेले आजचे संबंध तकलादू आहेत याची जाणीव असल्यामुळें भविष्यकाळ आशादायक वाटत नाहीं. आपण आपल्या पुढील पिढ्यांना कांहींहि ठेवूं शकणार नाहीं ही जाणीव कोणत्या आईबापांना सुखावह वाटेल? पुढील पिढीसाठीं कांहींहि भरीव न करतां आपण जर केवळ कर्जाचाच डोंगर त्यांच्या डोक्यावर करून ठेवला तर तें अधमपणाचें ठरेल. मुलाबाळांच्या भविष्याची तरतूद करून ठेवणें हें आपलें कर्तव्य आहे.

निष्कारण कोणालाहि दुखविण्याची माझी इच्छा नाहीं. तरी ब्रिटनशीं तह करावा असें म्हणणाऱ्यांचें सत्य स्वरूप काय आहे हें उघड करणें माझें कर्तव्य आहे असें मी मानतों. तहाची भाषा बोलणारे लोक तीन प्रकारचे आहेतः एक ब्रिटिशांशीं हितसंबंध असणारे—अशांवर विश्वास ठेवतां येत नाहीं; दुसरे पूर्वग्रहांनीं जखडलेले—हे लोक या समस्येकडे डोळसपणें पाहाणार नाहींत. तिसरे कांहीं दुबळे लोक—जे या समस्येकडे समंजसपणें पाहूं शकत नाहींत. आणखी एक चौथा वर्ग आहे—आणि हा म्हणजे मवाळांचा. युरोपियन राष्ट्रांच्या सौजन्यावर यांचा असावा त्याहून अधिक विश्वास आहे. खरें म्हणजे युरोपियन राष्ट्रें या विश्वासाला पात्र नाहींत. भोंगळ विचारसरणीच्या या मवाळांमुळें आपल्या राष्ट्राला जेवढा धोका आहे तेवढा दुसऱ्या कोणापासूनहि नाहीं.

कांहीं भाग्यवान् लोक जें दुःख वसाहतींतल्या लोकांना भोगावें लागत आहे त्यापासून दूर आहेत. या सुदैवी लोकांना दुःखाची प्रत्यक्ष झळ लागली नसल्यामुळें ज्यांच्यावर जुलूम अत्याचार होत आहेत त्यांच्या परिस्थितीची तीव्रता त्यांना समजूंच शकत नाहीं. आपल्या कल्पनेवर आरूढ होऊन त्यांनीं कांहीं क्षण बोस्टन शहरांत जावें असें त्यांना माझें नम्र सांगणें आहे. बोस्टनमधल्या जनतेचें भयानक दुःख जर त्यांनीं पाहिलें तर ब्रिटिश सत्तेच्या दुष्टतेविषयीं त्यांना काडीमात्र संशय राहाणार नाहीं. त्या दुर्दैवी शहरांतले रहिवाशी कांहीं महिन्यांपूर्वी वैभव उपभोगीत होते; पण ब्रिटिशांच्या अन्यायाखालीं भरडून निघालेल्या या दुर्दैवी माणसांना आज हातांत करवंटी घेऊन भीक मागण्याची पाळी आली आहे. शहरांत राहावें तरी अन्याय आणि शहर सोडून बाहेर जावें तर सैन्याच्या पायाखालीं तुडविलें जाण्याची भीति अशी इकडे आड आणि तिकडे विहीर ही त्यांची परिस्थिति आहे. ज्यांच्या मुक्तीची आशा नाहीं अशा असहाय्य कैद्यांप्रमाणें केविलवाणे दिवस त्यांना कंठावे लागत आहेत.

कांहीं थंड प्रकृतीचीं माणसें अजूनहि भोंगळ भावड्या आशेवर आपली गुजराण करीत आहेत. ब्रिटिशांचे सर्व अत्याचार विसरून ते त्यांना, 'या, आपण पुन्हां मैत्री जोडूं या' असें आवाहन करीत आहेत. पण माणसांच्या भावनाविकारांचा कांहीं विचार करा, तहाची ही भाषा सृष्टिनियमांच्या कसोटीवर जरा पारखून पहा आणि असें केल्यानंतर मला तुम्हीं सांगा कीं जी सत्ता पदोपदीं तुमच्यावर अनन्वित जुलूम करीत आहे त्या सत्तेविषयीं श्रद्धा, आदर, प्रेम तुम्ही बाळगूं शकाल काय? तें जर तुम्हांला शक्य असेल आणि तरीहि तुम्ही तहाची भाषा बोलत असाल तर तुम्ही आत्मवंचना करीत आहांत, स्वातंत्र्याची चळवळ दूर ढकलून आपल्या पुढील पिढ्यांना विनाशाच्या वाटेकडे नेत आहांत याविषयीं संशय नाहीं. मनांत यत्किंचितहि आदर नसतांना केवळ तात्कालिक सोयीसाठीं ब्रिटिशांशीं स्नेहसंबंध जोडूं पहाणें अनैसर्गिक आहे. अशा तऱ्हेचा संबंध कांहीं काळानंतर अनेक पटींनीं दुःसह होऊन तुमच्या अंगावर उलटण्याशिवाय राहाणार नाहीं. अशी परिस्थिति असूनहि या सर्व अन्यायांकडे तुम्हीं काणाडोळा करावा असें जर म्हणत असाल तर माझें तुम्हांला असें विचारणें आहे कीं तुमचीं घरें अन्यायी राज्यकर्त्यांच्या हातून कधीं जळलीं आहेत काय? डोळ्यांदेखत तुमच्या घरांदारांवरून नांगर फिरला आहे काय? तुमचीं बायकामुलें अन्नवस्त्राला मोताद झालीं आहेत काय? सगळीं कुटुंबें धुळीला मिळून हा भकास विनाश पाहाण्यासाठीं तुम्ही एकटेच मागें उरलां आहांत काय? हें दुःख, हे भोंवळ आणणारे जुलूम जर तुम्हीं कधींहि सहन केले नसतील तर ज्यांच्या भाळीं हें दुर्दैव लिहिलें गेलें आहे त्यांच्या दुःखाकडे काणाडोळा करा असें सांगण्याचा तुम्हांला काय अधिकार पोहोंचतो? परंतु हे जुलूम सहन करूनहि खुनी ब्रिटिशांशीं सहकार्य करावें असें जर तुम्ही म्हणत असाल तर पिता, पति, मित्र, प्रेमिक या कोठल्याहि नात्यानें जगांत वावरण्याची तुम्हांला शरम वाटली पाहिजे. मग समाजांत तुम्ही केवढेंहि मोठें आसन विभूषित करीत असलां तरी मी तुम्हांला निक्षून सांगतो कीं तुमचा आत्मा भेकडाचा आहे; तुम्हीं निव्वळ लाळघोटे खुशामस्करे आहांत.

मी येथें भडक, अतिशयोक्त वर्णनें करत नसून वस्तुस्थिति काय आहे तीच सांगत आहें. या वस्तुस्थितीशीं आमच्या निसर्गनिर्मित भावना व सहानुभूति निगडित आहेत. या भावनांकडे आपण जर पाठ फिरवली तर कोणतेंहि सामाजिक कर्तव्य पार पाडणें आपल्याला अशक्य होईल; सामाजिक जीवनाचा सारा

आनंद आपल्या जीवनांतून लोप पावेल. सूडाचा बदला त्याहूनहि दुष्ट अशा सूडानें घेतला पाहिजे असें मला येथें सांगावयाचें नाहीं. दुष्ट निद्रेंतून जागें होऊन आत्मविश्वासानें पावलें टाकीत आपल्या ध्येयाच्या वाटेनें गेलें पाहिजे एवढेंच मला म्हणावयाचें आहे. निष्कारण विलंब आणि भित्रेपणा यांचा पगडा जर आपण आपल्या मनावर बसूं दिला नाहीं तर ब्रिटनचीच काय पण साऱ्या युरोप खंडाचीहि अमेरिकेकडे डोळा वर करून पाहाण्याची छाती होणार नाहीं. आजचें काम उद्यांवर ढकलूं नका. या हिंवाळ्याचा योग्य उपयोग केला तर त्याचें मोल एका युगाहूनहि मोठें आहे हें मी तुम्हांला निश्चित सांगतों. परंतु निश्चेष्ट बसून राहून आपण हा काळ जर हातचा जाऊं दिला तर सगळें राष्ट्र त्यामुळें धोक्यांत येईल. जो जो मनुष्य या गोष्टीला जबाबदार होईल तो जनतेच्या दृष्टीनें घोर शिक्षेला पात्र ठरेल हें लक्षांत ठेवा.

अमेरिका परकीय सत्तेच्या वर्चस्वाखालीं फार काळ राहूं शकेल असें मानणें तर्काला, इतिहासाच्या वहिवाटीला सोडून आहे. कांहीं अति उत्साही ब्रिटिशांना अजूनहि आपण अमेरिकेला आपल्या वर्चस्वाखालीं दडपून ठेऊं असें वाटत आहे. आपलें राष्ट्र जर सुरक्षित ठेवावयाचें असेल तर ब्रिटिशांशीं असलेले संबंध तोडून टाकणें हा एकमेव मार्ग आहे. याशिवाय दुसरी कोणतीहि वाट मला दिसत नाहीं. तह हें आतां एक अर्थशून्य स्वप्न ठरलें आहे. निसर्गाचाच तहाला विरोध आहे. आणि मानवी प्रयत्न निसर्गाला अडवूं शकणार नाहींत. "जेथें द्वेषाची जखम खोलवर गेलेली आहे तेथें तह अशक्य होय" या मिल्टनच्या वचनाची मला येथें आठवण होते.

शांततेसाठीं, तडजोडीसाठीं केलेले सारे प्रयत्न व्यर्थ ठरले आहेत. आम्हीं केलेल्या साऱ्या अर्जविनंत्या मग्रूर ब्रिटिशांनीं धुडकावून लावल्या आहेत. जसजसे कर्ज करावे तसतसा राजे लोकांचा हट्ट आणि अहंकार वाढत जातो हेंच आपल्या अनुभवाला आलें आहे. या मग्रूर राजांच्या अहंकारावर जितकी फुंकर घालावी तितके ते अधिकाधिक निरर्गल होत जातात. डेन्मार्क आणि स्वीडन यांचा इतिहास हेंच सांगत आहे. स्वातंत्र्यासाठीं शस्त्र धारण करणें हा एकच मार्ग आतां उरला आहे. वेळींच जागे होऊन आपण ब्रिटिशांशीं असलेले संबंध तोडून टाकूं या. नाहींतर पितृदेश म्हणून मिरवणाऱ्या ब्रिटनशीं पुढच्या पिढीचे संबंध एकमेकांचे गळे कापण्याइतकेच उरतील.

ब्रिटिशांनीं एकदां जरी अन्याय केला तरी पुनः ते तसा करणार नाहींत असें मानणें शुद्ध भोंगळपणाचें आहे. स्टॅम्प ॲक्ट ब्रिटिशांनीं मागें घेतला तेव्हां अशीच भावडी आशा आपल्या मनांत निर्माण झाली होती; परंतु नंतर आपले डोळे उघडले. ब्रिटनसारख्या राष्ट्रानें एका विशिष्ट परिस्थितींत जरी तात्पुरता पराभव मान्य केला तरी तें पुनः कांहीं दिवस लोटल्यानंतर भांडण उकरून काढणार नाहीं असें कधींहि मानतां यावयाचें नाहीं.

आपल्या शासनव्यवस्थेच्या बाबतींत ब्रिटन आपल्याला कांहीं मदत करील किंवा न्याय देईल ही गोष्ट अशक्य आहे. आपला राज्यकारभार, शासनयंत्रणा अधिक अधिक जबाबदारीची आणि गुंतागुंतीची होत आहे. इतक्या दूर अंतरावर राहून ज्यांना आपल्या आशाआकांक्षा मुळींच कळत नाहींत असें ब्रिटनसारखें राष्ट्र आपल्यावर सुराज्य करील हें कसें शक्य आहे ? ते आपल्याला जिंकूं शकत नाहींत याचा अर्थ ते आपल्यावर राज्य करूं शकत नाहींत असाच आहे. आपल्या गाऱ्हाण्यांचा अर्ज घेऊन दाद मागण्यासाठीं तीन चार हजार मैल दूर धांव घेणें, या अर्जाचें उत्तर येण्याकरतां पांचसहा महिने ताटकळत वाट पाहाणें, आणि या अर्जाचें उत्तर आल्यानंतर त्या उत्तराचा अर्थ लावण्याकरतां आणखी पांचसहा महिने घालविणें ही गोष्ट शुद्ध मूर्खपणाची, पोरकटपणाची आहे हें कांहीं दिवसांनंतर तुम्हांलाच समजून येईल. हा मूर्खपणा आपण पूर्वी केला तेवढा पुरे; पण आतां शहाणे होण्याची वेळ आलेली आहे.

स्वतःचें संरक्षण करण्यास असमर्थ असलेलें एकादें लहानसें बेट जर मोठ्या राज्यानें आपल्या पदराखालीं घेऊन त्याचें संरक्षण करण्याचा आव आणला तर तें समजण्यासारखें आहे. परंतु एखाद्या लहानशा बेटानें अमेरिकेसारख्या प्रचंड खंडाचें संरक्षण करण्याची भाषा बोलणें शुद्ध अचरटपणाचें आहे. मुख्य ग्रहाभोंवतीं फिरणारा कुठलाहि उपग्रह त्या मुख्य ग्रहाहून कधींहि मोठा नसतो हा निसर्गाचा नियम आहे. परंतु इंग्लंड हा निसर्गनियम धाब्यावर बसवण्याचा प्रयत्न करीत आहे. यांतून निष्पन्न होतें तें इतकेंच कीं इंग्लंड हा युरोपखंडाचा एक लहानसा भाग आहे. उलट अमेरिका हें एक स्वतंत्र खंड आहे.

ही स्वातंत्र्याची भाषा गर्वाच्या आहारीं जाऊन, पक्षाच्या अभिनिवेशामुळें किंवा त्यापासून माझा कांहीं वैयक्तिक फायदा आहे म्हणून मी बोलत नाहीं. स्वातंत्र्य मिळविण्यांतच अमेरिकेचें कल्याण आहे; स्वातंत्र्याशिवाय दुसरा

मार्ग आपल्या समस्या सोडवूं शकणार नाहीं असें मला मनःपूर्वक वाटतें. या स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न न करणें म्हणजे आपण हें काम ढिलेपणानें पुढच्या पिढीवर सोंपविणें, आपल्या जबाबदारीपासून पळून जाणें असेंच होय. यावेळीं जर आपण साऱ्या शक्ति एकवटून धडपड केली तर अमेरिकेला आपण वैभवाच्या शिखरावर बसवूं. या स्वातंत्र्यासाठीं अनेकांनीं आपलें रक्त सांडलें आहे; आपल्या राष्ट्राची संपत्ति आपण त्यासाठीं खर्चीं घातली आहे. ब्रिटन स्वतः तडजोडीला तयार नसल्यामुळें आपण त्यांच्याकडे हक्काची भीक मागायला गेलों तर आपल्या आजवरच्या त्यागाच्या मानानें हातांत कांहींहि पडणार नाहीं. आपण जो खर्च करतों त्यामानानें इच्छित वस्तु मिळावी अशीच आपली स्वाभाविक इच्छा असते. नॉर्थ या मंत्र्याला पदच्युत करणें किंवा आपल्या विरुद्ध षड्यंत्र रचणाऱ्या विशिष्ट अधिकाऱ्यांना दूर करणें एवढ्यावरच आपण संतुष्ट होणार आहोंत काय? आजवरचा त्याग, खर्च केलेले लक्षावधि रुपये यांच्या मोबदल्यांत आपण हीच क्षुल्लक गोष्ट मिळवणार? जुलमी कायदे दूर करण्यासाठीं आपण कांहीं काळ व्यापार स्थगित केला. त्यापायीं जें नुकसान झालें त्याच्या बळावर जर कांहीं जुलमी कायदे रद्द झाले असते तर या नुकसानीचा योग्य मोबदला आपल्याला मिळाला असें मीं म्हटलें असतें परंतु आज आपण युद्धाची भाषा बोलत आहोंत. अन्यायाच्या प्रतिकारार्थ प्रत्येक व्यक्तीनें हातांत शस्त्र धारण केलें पाहिजे अशी अपेक्षा आपण बाळगीत आहोंत. आणि हें सारें कशासाठीं तर सध्यांचें ब्रिटनचें मंत्रिमंडळ दूर करण्यासाठीं? युद्धाच्या मोबदल्यांत युद्धाच्या मानानें ही अत्यंत क्षुद्र गोष्ट मिळवून आपण स्वस्थ बसणार? चार जुलमी कायदे रद्द करण्यासाठीं किंवा एखादें मंत्रिमंडळ पदच्युत करण्यासाठीं सशस्त्र उठाव करणें निश्चितच महाग पडेल. बंकरहिल युद्धाची येथें आठवण व्हावी. अमेरिका खंड आज ना उद्यां स्वतंत्र होणार हें सूर्यप्रकाशाइतकें स्वच्छ सत्य आहे. आपल्या राष्ट्राची त्वरेनें झालेली प्रगति लक्षांत घेतां हा काळ फारसा दूर नाहीं हेंहि उघड आहे. आणि म्हणूनच निसर्गाच्या क्रमानुसार जें सहजीं साध्य होणार आहे त्यासाठीं—युद्ध अपरिहार्य नसेल तर—सशस्त्र उठाव करून रक्तपात करणें कांहीं एवढें शहाणपणाचें नाहीं. असें युद्ध करणें म्हणजे ज्याच्या करारांची मुदत जवळ जवळ संपत आलेली आहे अशा भाडेकरूवर अतिक्रमणाबद्दल फिर्याद करण्यासारखें आहे. कांहीं दिवसांनीं कराराची मुदत संपल्यामुळें तो भाडेकरू जर सोडून जाणारच आहे

तर फिर्यादीचा खर्च आणि दगदग करावयाची कशासाठीं? याच कारणासाठीं एके काळीं अमेरिकेनें सध्यां तरी ब्रिटिशांशीं युद्ध पुकारूं नये अशा मताचा मीहि होतों; परंतु इंग्लंडच्या अरेरावी सम्राटानें एकोणिस एप्रिल सतराशें पंचाहत्तर रोजीं लेग्झिंग्टन येथल्या शेंकडों निरपराध माणसांची जी सर्रास कत्तल केली ती पाहून माझा दृष्टिकोनच बदलून गेला. लोकांचा पिता हें बिरुद मिरविणाऱ्या राजाला निष्पाप लोकांची कत्तल करून, त्यांच्या किंकाळ्या ऐकून गाढ झोंप लागूं शकते हें पाहून माझा संताप अनावर झाला. अशा परिस्थितींत पुढें काय असा प्रश्न कोणी विचारल्यास त्याला माझें उत्तर असें आहे कीं पुढें फक्त अमेरिका खंडाचा विनाश! माझ्या या विधानामागें कांहीं निश्चित कारणें आहेत. पहिलें कारण—आपल्यावर परकीय सत्तेचें वर्चस्व असल्यामुळें राजा आपल्याला हवे ते कायदे कधींच होऊं देणार नाहीं. ज्याला अनिर्बंध सत्तेची तृष्णा आहे, जो लोकस्वातंत्र्याचा कट्टर वैरी आहे तो 'हम करे सो कायदा' असेंच धोरण अमेरिकेच्या बाबतींत ठेवणार नाहीं काय? सध्यांच्या राज्यघटनेप्रमाणें राजाच्या मर्जीविरुद्ध आपण एकहि कायदा करूं शकत नाहीं हें न कळण्याइतका कोणी निर्बुद्ध माणूस अमेरिकेंत असेल असें मला वाटत नाहीं. आपल्याला जो कायदा पसंत आहे तोच आम्हीं येथें करूं असें ज्याला वाटत नाहीं असा कोण माणूस आहे? अमेरिकेंत जर कायदाच नसला तर सुव्यवस्थेच्या अभावामुळें जशी आमच्या नशिबीं गुलामगिरी येईल, त्याचप्रमाणें इंग्लंडचे कायदे जर आपण मानले तरीहि आपण गुलामच आहोंत. राजा आपली सारी शक्ति अमेरिकेला शक्य तों दडपून टाकण्यासाठींच वापरणार हें उघड नाहीं काय? अशा परिस्थितींत प्रगति होण्याऐवजीं आपली सारखी पिछेहाटच होत राहील. एकसारखे झगडे करीत किंवा लाचारपणें अर्जांची भेंडोळीं घेऊन आपण धांवत राहूं. राजाला नको असतांनाहि आतांपर्यंत आपण आपली प्रगति करून घेतली आहे. स्वाभाविकच या प्रगतीच्या मार्गांत खो घालण्यासाठीं तो आपल्या प्रयत्नांची शर्थ करीत रहाणार. इंग्लंडच्या राज्यसत्तेला अमेरिकाचा विकास झालेला कदापि नको आहे. आपला असा द्वेष करणाऱ्या राज्यकर्त्यांचें वर्चस्व तुम्ही किती काळ सहन करणार? 'आम्ही हें वर्चस्व सहन करणार नाहीं' असें यावर जो उत्तर देईल तोच खरा स्वतंत्र माणूस. अमेरिका खंडाचा सर्वांत मोठा शत्रू असलेला इंग्लंडचा राजा आपल्यासाठीं कायदे करणार नसून आपण आपले कायदे स्वतंत्र

बुद्धीनें करणार आहोंत. हें समजणें म्हणजेच 'स्वातंत्र्य' या शब्दाचा अर्थ कळणें.

आतां तुम्ही असें म्हणाल कीं, इंग्लंडमधली जनता आपल्या राजाच्या संमतिशिवाय एकहि कायदा करूं शकत नाहीं. खरें म्हणजे एकवीस वर्षांच्या एखाद्या अननुभवी पोरानें राज्यावर बसून आपल्यापेक्षां वडील आणि अनुभवी अशा लोकांना 'हा कायदा मी तुम्हांला करू देणार नाहीं' असें सांगणें हास्यास्पद आहे. ही हास्यास्पदता क्षणभर डोळ्याआड केली तर निदान इंग्लंडमधले कायदे तेथील जनतेला संमत असलेला राजाच करतो असें म्हणून एकवेळ तें क्षम्य मानतां येईल. परंतु या राजाचा अमेरिकेशीं काय संबंध? इंग्लंडचा राजा, एखाद्या कायद्यानें जर इंग्लंडची शक्ति वाढत असेल, तर त्याला विरोध करणार नाहीं. परंतु एखाद्या कायद्यामुळें जर अमेरिकेचें सामर्थ्य वाढत असेल तर तो खात्रीनेंच त्याला विरोध करील. अशा तऱ्हेच्या राजाच्या वर्चस्वाखालीं राहून आपलें काय भलें होणार हें काय सांगावयास पाहिजे? केवळ नांव बदललें म्हणून कांहीं शत्रूचा मित्र होत नाहीं. तहाची भाषा बोलणें अत्यंत धोक्याचें आहे. आज लोकांचा असंतोष पाहून त्यांना खूष करण्यासाठीं राजा तुम्हांला नको असलेले कांहीं कायदे रद्द करील. परंतु ही केवळ युक्ति आहे. जें शस्त्रानें तावडतोब साधण्यासारखें नाहीं तें कालांतरानें मुत्सद्देगिरीनें साधावयाचें असा हा डाव आहे. ब्रिटिशांशीं तह हा विनाशाचाच दुसरा पर्याय आहे.

दुसरें असें कीं ब्रिटननें आम्हांला तात्पुरतें स्वातंत्र्य द्यावयाचें परंतु त्यावर आपली संपूर्ण देखरेख मात्र ठेवावयाची अशी जरी योजना आंखली तरी ती फार काळ टिकणें शक्य नाहीं. अमेरिकेला आपल्या स्वत्वाची पूर्ण जाणीव झाली, आपल्या सामर्थ्याचा अंदाज आला कीं ती ही व्यवस्था उलथून टाकल्याशिवाय रहाणार नाहीं. अशा तऱ्हेचें तात्पुरतें सरकार आणि नंतर होणारें अपरिहार्य बंड यांच्या मधला काळ राजकीय अस्थिरतेचा राहील. अशा तऱ्हेच्या ठिसूळ पायावर उभ्या असलेल्या राज्यांत व्यापाराची वाढ होणें शक्य नाहीं. या ना त्या कारणानें जनतेचा असंतोष सारखा प्रकट होत राहील. अस्थिरतेच्या या वातावरणाला कंटाळून बरेचसे लोक आपला जमीनजुमला विकून देश सोडून चालते होतील.

अंतर्गत यादवी जर नको असेल, शांतता आणि सुव्यवस्था अमेरिकेंत नांदावी अशी इच्छा असेल तर अमेरिका स्वतंत्र होणें हाच एकमेव मार्ग आहे. तह करूं

नका असें मी सारखें म्हणतो आहें याचें कारण असें कीं अशा तात्पुरत्या तहामुळें ठिकठिकाणीं बंडाचा उद्‌भव होत राहील. आणि त्याचे परिणाम ब्रिटिशांच्या सर्व अन्यायांपेक्षां अधिक खडतर असे होतील.

हजारों लोक ब्रिटिशांच्या पशुतुल्य अत्याचारांना बळी पडलेले आहेत. आणखी किती हजार लोकांवर हेंच दुर्दैव ओढवणार आहे हें सांगणें कठिण आहे. 'ज्याचें जळे त्याला कळे' हेंच खरें. अन्यायाची प्रत्यक्ष झळ ज्यांना पोंचलेली नाहीं त्यांना स्वातंत्र्यासाठीं अनन्वित जुलूम सहन करणाऱ्या माणसांच्या भावना कशा कळाव्या? स्वातंत्र्याच्या ध्यासानें हीं माणसें भारलेलीं आहेत. स्वातंत्र्यासाठीं त्यांनीं आपलें सर्वस्व अर्पण केलें आहे आणि त्यामुळें तहाच्या कल्पनेला त्यांचा सक्त विरोध आहे. जें सरकार शांतता राखूं शकत नाहीं तें सरकार या अभिधानास पात्र नाहीं. याचाच अर्थ असा कीं आम्ही जे कर भरीत आहोंत त्यांचा आम्हांस कांहींच उपयोग नाहीं. आणि समजा तह केल्यानंतर जर देशांत चहूंकडे बंड पेटलें तर ब्रिटिशांची कागदी सत्ता त्याला कसा काय आवर घालणार? स्वातंत्र्य आलें तर त्यामुळें अंतर्गत कलह वाढतील, यादवी माजेल अशी भीति कांहीं जणांना वाटते असें माझ्या कानीं आलें आहे. येथें मी ब्रिटिशांच्या अत्याचाराला बळी पडलेल्या शेंकडों लोकांच्या बाजूनें उभा राहून त्यांच्या वतीनें निक्षून सांगतों कीं आमचें घरदार नष्ट झालें आहे, संपत्ति बेचिराग झाली आहे, आमच्या-भोंवतीं विनाशाच्या ज्वाळा पेटल्या आहेत. अशा परिस्थितींत आम्हांला तहाची भाषा असह्य वाटते; तहाचें बंधन आम्ही आमच्यावर कधींहि लादून घेणार नाहीं. अमेरिकेचें सरकार इतकें व्यवस्थित चाललेलें आहे कीं स्वातंत्र्य मिळालेंच तर आमच्या देशांत अव्यवस्था माजेल असा मुळींच संभव नाहीं. स्वातंत्र्योत्तर काळांत एक वसाहत दुसऱ्या वसाहतीवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करील असें मानणें शुद्ध पोरकटपणाचें आहे.

स्वातंत्र्यकालांत अमेरिकेंतील सर्व वसाहती समतेच्या पायावर उभ्या असतील. जेथें लहान मोठा हा भेद नाहीं तेथें द्वेषयुक्त स्पर्धेचा प्रश्नच निर्माण होत नाहीं. युरोपमध्यें जेथें जेथें लोकसत्ताक राज्य आहे तेथें तेथें शांतता आणि सुव्यवस्था नांदत आहे. हॉलंड आणि स्वित्झर्लंड येथें कधीहि अंतर्गत यादवी निर्माण झाल्याचें किंवा या देशांनीं इतर देशांशीं युद्ध केल्याचें ऐकिवांत नाहीं. परंतु जेथें राजसत्ता आहे तेथें अशी सुव्यवस्था नांदणें केवळ अशक्य होय. अनेक

गुंड लोकांना आपण शिरजोर होऊन सिंहासन बळकवावें असा सारखा मोह अशा देशांत होत असतो. राजाच्या मग्रूरीमुळें अशा देशाचे इतर राष्ट्रांशीं असलेले संबंध बिनसतात आणि युद्धाची ठिणगी पेटते. परंतु लोकसत्ताक राज्य नैसर्गिक तत्त्वांवर उभें असल्यामुळें या चुकांपासून मुक्त असतें.

स्वातंत्र्याची भीति वाटण्याचें असलेंच तर एक कारण आहे आणि तें म्हणजे स्वातंत्र्यानंतर राज्यकारभार कसा हांकावा याची निश्चित रूपरेखा आपण आपल्या डोळ्यांसमोर उभी केलेली नाहीं. माणसांना स्वातंत्र्यानंतर काय करावयाचें हें अजून पुरेसें उलगडलेलें नाहीं. म्हणूनच मी स्वातंत्र्योत्तर राज्यव्यवस्था कशी आणि कोणत्या तत्त्वांवर असावी याचा येथें एक आराखडा मांडणार आहें. हा आराखडा संपूर्णतया निर्दोष आहे असें नाहीं. परंतु अनेक लोकांनीं एकत्र येऊन जर आपापल्या कल्पना मांडल्या, त्यांवर चर्चा केली तर या सर्व मंथनांतून आपल्याला हवा असलेला मार्ग निश्चितच सांपडूं शकेल.

प्रत्येक वसाहतीला एक एक विधानसभा असावी. विधानसभेला सभापति असावा. विधानसभेच्या सदस्यांची निवडणूक त्या त्या वसाहतींपुरतीच मर्यादित असावी; तसेंच, ही निवडणूक दरवर्षी करण्यांत यावी. सर्व वसाहतींच्या विधान-सभा अखेर अमेरिकन कॉंग्रेसला जबाबदार असाव्यात.

प्रत्येक वसाहत आठ किंवा दहा—जसें सोयीचें होईल त्याप्रमाणें—जिल्ह्यांत विभागण्यांत यावी. या प्रत्येक जिल्ह्यानें आपला एक एक प्रतिनिधि अमेरिकन कांग्रेसमध्यें पाठवावा. एका वसाहतींतून एकूण तीस प्रतिनिधि अमेरिकन कॉंग्रेस-मध्यें पाठविण्यांत यावेत. आतां कॉंग्रेसनें आपला अध्यक्ष कसा निवडावा या विषयींची सूचना मांडतों : कांग्रेसचे सर्व प्रतिनिधि एकत्र जमले कीं प्रत्येक वसाहतीच्या प्रतिनिधींनीं आपल्यांतून दर वर्षासाठीं अध्यक्ष निवडावा. पुढच्या वर्षी दुसऱ्या वसाहतीच्या प्रतिनिधींनीं; याचप्रमाणें आपल्यांतील प्रतिनिधींपैकीं एकाला अध्यक्ष नेमावें. या पद्धतीमुळें तेराहि वसाहतींना आपापल्या प्रतिनिधींतून अध्यक्ष निवडतां येईल. तसेंच एकूण प्रतिनिधींपैकीं कमींतकमी तीन पंचमांश मतें पडल्याशिवाय कोणताहि कायदा पास करण्यांत येऊं नये. यामुळें एकादा अन्याय्य कायदा मांडण्यांत आला तर त्याला बराच पायबंद बसेल. अशा तऱ्हेच्या संपूर्ण-तया लोकसत्ताक मूल्यांवर उभ्या असलेल्या सरकारला जो कोणी विरोध करील तो सैतानाचाच हस्तक असला पाहिजे असें म्हणावें लागेल.

आपल्या शासनसंस्थेचें स्वरूप कसें असावें हें मीं येथें मांडलें. आतां या शासनसंस्थेच्या मुहूर्ताचा नारळ कसा फोडावयाचा तें सांगतों. राज्यकारभाराची ही सुरुवात करण्यासाठीं जनता आणि राज्यकर्ते यांच्या दरम्यान एक मध्यस्थ समिति असावी. या मध्यस्थ समितीची बैठक पुढीलप्रमाणें आणि पुढील कारणांसाठीं भरविण्यांत यावी: प्रत्येक वसाहतींतील दोन याप्रमाणें कॉंग्रेसच्या सव्वीस सभासदांची एक समिति स्थापावी. या समितीवर लोकांचे सर्व प्रदेशांतील मिळून पांच नियुक्त प्रतिनिधि असावेत. प्रांतांतल्या सर्व लोकांनीं मिळून या पांच प्रतिनिधींना निवडावें—हें जर सोयीचें नसेल तर जेथें लोकवस्ती विशेष दाट आहे अशाच भागांतून ही निवडणूक करण्यांत यावी. अशा तऱ्हेच्या या समितींत ज्ञान आणि सामर्थ्य एकवटलेलें आढळेल. कॉंग्रेसच्या प्रतिनिधींना राज्यकारभाराचा अनुभव असल्यामुळें त्यांच्याकडून बहुमोलाचा सल्ला मिळेल आणि या सर्व समितीला लोकांनींच बहुमतानें निवडली असल्यामुळें ती खऱ्याखुऱ्या अर्थानें कायदेशीर ठरेल.

या समितीच्या सदस्यांनीं एकत्र येऊन इंग्लंडच्या मॅग्नाचर्टाप्रमाणें अमेरिकन जनतेच्या हक्कांची एक सनद तयार करावी. या सनदेंत कॉंग्रेसचे सभासद किती असावेत, त्यांची निवड कशी व्हावी, त्यांचें अधिकारक्षेत्र कोणतें असावें इत्यादि सर्व प्रश्नांचा तपशीलवार विचार असावा. ही सनद तयार करतांना संकुचित प्रांतीय भावनांना यत्किंचितहि थारा न देतां राष्ट्रीय पातळीवरून सर्व विचार होणें आवश्यक आहे. या सनदेनें जनतेला स्वातंत्र्य आणि सुबत्ता बहाल करावी. त्याचबरोबर प्रत्येक नागरिकाला आपापल्या मताप्रमाणें धर्म अनुसरण्याचें स्वातंत्र्य आहे हें स्पष्टपणें नमूद करण्यांत यावें. अशा तऱ्हेची ही सनद तयार केल्यानंतर समिति बरखास्त करावी आणि ही सनद प्रत्यक्षांत आणण्यासाठीं राजकर्त्यांच्या निवडणुका व्हाव्यात. जनतेच्या या राजकर्त्या प्रतिनिधींकडे ईश्वर कृपादृष्टीनें पाहो. तथास्तु !

या किंवा अशाच तऱ्हेच्या दुसऱ्या समित्यांच्या कार्यावर प्रकाश पडावा आणि त्यांना सुजाण मार्गदर्शन व्हावें म्हणून ड्रॅगोनेटी या राज्यशास्त्रज्ञाचा एक उतारा मी येथें देतों. ड्रॅगोनेटी म्हणतो, "जनतेचें स्वातंत्र्य आणि सुख नेमकें कशांत आहे हें ठरविणें हाच राज्यशास्त्राचा उद्देश आहे. जीं माणसें व्यक्तीला जास्तींत जास्त सुख देणारीं आणि जिच्यासाठीं कमींत कमी खर्च येतो अशी शासनसंस्था निर्माण करतात त्यांना युगायुगांचे धन्यवाद प्राप्त होतात."—ड्रॅगोनेटीच्या 'व्हर्च्युज् ॲण्ड रिवॉर्ड' या निबंधांतून.

आतां कांहीं माणसें असें विचारतील कीं या सर्व राज्यव्यवस्थेच्या चित्रांत अमेरिकेचा राजा कोठेंच दिसत नाहीं हें कसें ? अशा मित्रांना मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं बाबांनो, राजा आहे पण तो पृथ्वीतलावर राहाणारा नाहीं. त्याचें वास्तव्य स्वर्गलोकांत असतें. हा राजा ब्रिटिशाच्या पाशवी राजांप्रमाणें जनतेवर कधींहि अत्याचार करीत नाहीं. परंतु जीवनांतील रूढ संकेतांचा भंग करूं नये असें जर तुम्हांला वाटत असेल तर एक मुकुट घ्या आणि तो समारंभ–पूर्वक अमेरिकन जनतेच्या हक्कांच्या सनदेवर ठेवा. जणूं काय आपण जगाला असें जाहीर करूं कीं अमेरिकेंत राजा करील तो कायदा असें नसून कायदा हाच राजा आहे. अनिर्बंध राजसत्ता असलेल्या देशांत राजा करील तो कायदा अशी परिस्थिति असते. या घातक पद्धतीला आपल्या देशांत स्थान नाहीं. सनदेवर मुकुट ठेवल्यानंतर जर कदाचित् पुढेंमागें त्या मुकुटाचा कुणी दुरुपयोग करील अशी भीति वाटलीच तर समारंभ झाल्यानंतर त्या मुकुटाचे तुकडे तुकडे करा; आणि हे तुकडे जनतेला वांटून टाका; कारण मुकुट धारण करण्याचा अधिकार कोणा एका व्यक्तीचा नसून आम जनतेचा आहे.

स्वातंत्र्य हा आमचा निसर्गसिद्ध अधिकार आहे. मानवी जीवनाचा गंभीरपणें विचार करणारा प्रत्येक मनुष्य असेंच म्हणेल कीं जोपर्यंत आपल्या हातीं आहे तोपर्यंत आपली स्वतंत्र राज्यघटना आपण आंखावी, भविष्यकाळावर हें काम सोंपवूं नये हेंच शहाणपणाचें होय. हें करावयाचें आपण जर टाळलें तर एखादा संधिसाधु जुलमी लुटारू आपल्या उरावर बसल्याशिवाय राहाणार नाहीं. जनतेंत असंतोष निर्माण झाला असतां त्याला जर योग्य वेळीं योग्य वळण मिळालें नाहीं तर एखादा सामर्थ्यवान मनुष्य या असंतुष्ट जनतेला हाताशीं धरून स्वतः राजा होऊन बसण्याचा फार मोठा धोका असतो. स्वाभाविकच लोकस्वातंत्र्याच्या कल्पनेला कायमचा नाट लागतो. अमेरिकेवर जर ब्रिटिशांचें वर्चस्व कायम राहिलें तर आज ना उद्यां एखादा धाडशी मनुष्य पुढें येऊन 'असंतुष्ट जनतेवर आपलें स्वामित्व प्रस्थापित केल्याशिवाय राहाणार नाहीं आणि मग राजसत्तेखालीं निमूटपणें अन्याय सहन करणाऱ्या इंग्लिश जनतेसारखीच आपली केविलवाणी अवस्था होईल. आज जर तुम्हीं स्वातंत्र्याच्या चळवळीला विरोध केलांत तर ही वेळ निघून जाईल आणि राजसत्तेचें जोखड तुमच्या मानेवर कायमचें बसेल. ब्रिटनच्या पशुतुल्य सत्तेची हाकलपट्टी आपल्या भूमीवरून व्हावी हीच आज लक्षावधि लोकांची

आकांक्षा आहे. ही दुष्ट राजसत्ता नीग्रो आणि रेड इंडियन यांना आपल्यावर सोडून आपला नाश करीत आहे. आपल्यावर क्रूर अन्याय आणि नीग्रो व रेड इंडियन यांची क्रूर फसवणूक असें या पाशवी अन्यायाचें द्विविध स्वरूप आहे.

ज्यांच्यावर आपली श्रद्धा नाहीं, ज्यांनीं आमच्या भावना शतधा जखमी केलेल्या आहेत अशा ब्रिटिशांबरोबर स्नेहाचीं बोलणीं करणें हा शुद्ध पागलपणा आहे. क्षणाक्षणाला आपले ब्रिटिशांशीं असलेले संबंध क्षीण होत चालले आहेत. हे संबंध पार विझून गेल्यानंतर त्यांच्या आमच्या स्नेहांत वाढ होणार आहे, किंवा आमचें अधिक पटणार आहे असें तुम्हीं मानतां काय?

आम्हांला तहाची भाषा शिकवणारे लोक आमच्या मनांतल्या अन्यायाच्या जखमा बऱ्या करूं शकतील काय? वेश्येला तिची हरपलेली निष्पापता ते पुन्हां प्राप्त करून देऊं शकतील? हें जसें अशक्य आहे तसेंच अमेरिकन जनतेला ब्रिटिशांनीं केलेल्या अन्यायांचा विसर पाडणेंहि अशक्य आहे. ब्रिटन आणि अमेरिका यांच्यांत तह होणें त्रिवार शक्य नाहीं. स्नेहाचा शेवटचा धागाहि आतां तुटला आहे. ब्रिटिश पुढारी अमेरिकन जनतेविरुद्ध भाषणें करून इंग्रज लोकांना चिथावीत आहेत. असे कांहीं अन्याय असतात कीं ज्यांचा विसर निसर्ग कधींच पडूं देत नाहीं. तसें झालें तर तो निसर्गच नव्हे. ज्याप्रमाणें प्रियकर आपल्या प्रेयसीवर अत्याचार करणाऱ्या मानसाला कधींहि क्षमा करणार नाहीं त्याप्रमाणें अमेरिकन जनताहि खुनशी ब्रिटिशांना कदापि क्षमा करणार नाहीं. ब्रिटिशांविरुद्ध ही क्रोधाची भावना ईश्वरानें आमच्या कल्याणासाठींच आमच्या मनांत निर्माण केली आहे. हीच भावना आमच्या हृदयांतील ईश्वराच्या प्रतिमेचें संरक्षण करीत आहे. याच भावनेमुळें आम्हीं पशूहून वेगळे आहोंत ही जाणीव आमच्या मनांत निर्माण झाली आहे. या भावनेचा जर आपण त्याग केला तर या पृथ्वीवरून न्याय नष्ट होईल. समाजप्रेम नांवाची वस्तूच उरणार नाहीं. आमच्यावर झालेल्या अत्याचारांनीं खवळून उठून जर आम्ही न्यायाच्या प्रतिष्ठापनेसाठीं लढलों नाहीं तर खुनशी आणि चोर लोक कसलीहि शिक्षा न होतां शीरसलामत निसटून जातील.

हे मानवतेवर प्रेम करणाऱ्या, केवळ अन्यायाविरुद्धच नव्हे तर अन्याय करणाऱ्यांविरुद्धहि झुंज घेणाऱ्या तेजस्वी लोकांनो, उठून खडे व्हा. जुनें जग आज अन्यायाच्या चक्राखालीं भरडलें जात आहे. या पृथ्वीवर ठिकठिकाणीं स्वातंत्र्याची पारध होत आहे. आशिया आणि आफ्रिका यांनीं स्वातंत्र्यदेवतेला केव्हांच

हांकललें आहे. युरोपखंड तिला परक्यासारखें वागवीत आहे आणि ब्रिटननें तर स्वातंत्र्यदेवतेला चालते होण्याची धमकीच दिलेली आहे. हे अमेरिकेच्या स्वातंत्र्यप्रिय लोकांनो, स्वातंत्र्यासाठीं लढल्यामुळें ज्या ज्या लोकांना आपल्या मायभूमींतून निर्वासित व्हावें लागलें त्यांना तुम्ही आसरा द्या; आणि तुमच्या देशाला साऱ्या मानवजातीचें आश्रयस्थान बनवा.

● ● ●

आज ना उद्यां इंग्लंड आणि अमेरिकेचे संबंध तुटणार आहेत असें न मानणारा एकहि मनुष्य मला अजून या दोन्ही देशांत भेटलेला नाहीं. स्वातंत्र्याची चळवळ आपण सुरू केली आहे यांतच आपण आपला मोठेपणा निर्विवाद सिद्ध केलेला आहे.

अमेरिकेनें स्वातंत्र्याची चळवळ करावी याबद्दल आपल्यापैकीं कोणाचेंहि दुमत नाहीं; परंतु ही चळवळ नेमकी केव्हां सुरू करावी या बाबतींतच फक्त मतभेद आहेत. त्यासाठीं सद्यःपरिस्थितीचें मार्मिक अवलोकन करून आपण हा काळ निश्चित ठरवला पाहिजे. पण यासाठीं फार वेळ खटाटोप करावा लागणार नाहीं कारण स्वातंत्र्याची चळवळ करण्याची वेळ आतां इतकी पक्व होत आली आहे कीं तुम्ही तिला शोधायला जाण्यापूर्वी ती स्वतःच तुम्हांला शोधीत आली आहे. स्वातंत्र्ययुद्धाविषयीं झालेलें सर्वांचें एकमत आणि इतर सर्व गोष्टींचा जुळत असलेला मेळ ही गोष्ट सिद्ध करीत आहे.

आपलें सामर्थ्य संख्येंत नसून आपल्या ऐक्यांत आहे हें तर खरेंच; परंतु केवळ संख्येच्या दृष्टीनेंहि विचार करावयाचा झाल्यास आपलें राष्ट्र जगांतील कोणत्याहि राष्ट्राच्या सेनेस भारी पडेल. उत्तम युद्धशिक्षण घेतलेल्या शिपायांचें आपलें सैन्य तयार आहे. या सैन्याचें सामर्थ्य एवढें जबरदस्त आहे कीं, कोणत्याहि एका वसाहतीनें आपला सवता सुभा स्थापन करावयाचा म्हटल्यास तें जमणें शक्य नाहीं. सर्व वसाहतींनीं एकत्र येण्यानेंच आपलें इच्छित ध्येय साध्य होणार आहे. आपली भूसेना चांगलीच समर्थ आहे. आपलें नवें सैन्य उभारण्याच्या दृष्टीनें आपण कसोशीनें प्रयत्न केला पाहिजे. ब्रिटिशांच्या हातांत अमेरिका असेपर्यंत ते आपल्याला आरमारी जहाजें बांधू देतील असें मानणें मूर्खपणाचें होईल. म्हणून येत्या शंभर वर्षांत आपलीं जहाजें आपण व्यापारी जहाजें म्हणून दूरवर पाठवतां कामा नयेत. हळू हळू व्यापारी जहाजें पाठविणें कमी कमी करीत आणलें पाहिजे कारण आपल्या देशांतील लांकडाचा सांठा हळू हळू कमी होत आहे आणि

जो सांठा शिल्लक उरेल तो हस्तगत करणें दिवसें दिवस कठीण होऊन बसणार आहे.

सद्यःपरिस्थितींत अमेरिका खंडाची लोकसंख्या मर्यादित आहे : तसें नसतें तर आपलीं संकटें असह्य झालीं असतीं. बंदरें जितकीं अधिक तितकी त्यांच्या संरक्षणाची तयारीहि अधिक करावी लागते आणि युद्धाच्या वेळीं आक्रमणाची भीतीहि अशा राष्ट्राला अधिक असते. परंतु अमेरिकेच्या बाबतींत राष्ट्रांतील बंदरें आणि राष्ट्राच्या गरजा यांचा इतका योग्य मेळ आहे कीं कोठल्याहि माणसाला बेकारीची भीति नाहीं. व्यापार कमी केला कीं सैन्यबळ वाढवितां येतें आणि सैन्यबळ वाढलें म्हणजे त्या सैन्याच्या गरजांमुळें नवा व्यापार सुरू होतो.

आपल्या राष्ट्राला कर्ज नाहीं. आरमार उभारण्यासाठीं जर आपण कर्ज काढलें तर तें आपल्या सद्‌गुणांचें स्मारकच ठरेल. पुढच्या पिढीला स्वातंत्र्य लाभावें, त्यांना स्वतंत्र राज्यघटना असावी यासाठीं जरी आपण कितीहि कर्ज उभारलें तरी तें योग्यच ठरेल. परंतु चार दुष्ट कायदे रद्द करण्यासाठीं किंवा सध्यां अधिकारावर असलेलें मंत्रिमंडळ दूर करण्यासाठीं जर आपण कर्जाचा डोंगर करून ठेवला तर तो पुढील पिढीवर घोर अन्याय होईल. तुम्हीं आम्हीं करून ठेवलेल्या या कर्जाचें ओझें छातीवर घेऊन पुढील पिढी काय मिळविणार? त्यापासून तिला कांहींहि फायदा नाहीं. आणि म्हणूनच युद्ध करायचेंच तर तें अमेरिकेनें परकीय सत्तेचें जोखड पार झुगारून देऊन स्वतंत्र व्हावें यासाठीं केलें पाहिजे. स्वातंत्र्य न मिळवतां कर्जाचा डोंगर मात्र पुढील पिढीवर करून ठेवणें हें क्षुद्र वृत्तीचें आणि खुरटलेल्या मुत्सद्देगिरीचें लक्षण आहे.

स्वातंत्र्य मिळविण्याचें ध्येय जर आपण साध्य केलें नाहीं, तर आपण केलेल्या कर्जाकडे आपल्याला अभिमानानें पाहातां येणार नाहीं. तसें पाहिलें तर कोणतेंहि राष्ट्र निष्कर्जी असत नाहीं. राष्ट्रीय कर्ज म्हणजे राष्ट्रीय कर्जरोखे; आणि जोपर्यंत या कर्जरोख्यांवर व्याज द्यावें लागत नाहीं तोंपर्यंत खंत बाळगण्याचें कारण नाहीं. इंग्लंडला आज एकशें चाळीस दशलक्ष पौंड कर्ज आहे. या कर्जावर इंग्लंडला चार दशलक्ष पौंडांच्यावर व्याज द्यावें लागतें. या कर्जावर इंग्लंडनें मोठें आरमार उभारलें आहे. आज अमेरिकेला कर्जहि नाहीं आणि अमेरिकेचें आरमारहि नाहीं. परंतु इंग्लंडच्या एकविसांश राष्ट्रीय कर्ज काढूनहि अमेरिका इंग्लंडपेक्षां मोठें आरमार बांधूं शकेल. या क्षणीं इंग्लंडचें आरमार साडेतीन दशलक्ष पौंडांहून अधिक किंमतीचें नाहीं.

या पुस्तिकेच्या पहिल्या आणि दुसऱ्या आवृत्तींत पुढील आंकडेवारी दिलेली नव्हती. या आवृत्तींत ती देत आहें. पुढील आंकडेवारीवरून माझा इंग्लिश आरमाराविषयींचा अंदाज बरोबर आहे हें सिद्ध होईल. एक जहाज बांधण्याचा खर्च—शिडें, डोलकाठ्या, खलाशी आणि सुतार यांची आठ महिन्यांची सामुग्री हें सर्व धरून—पुढीलप्रमाणें येतो. ही आंकडेवारी नौसैन्याचे सेक्रेटरी यांनींच तयार केलेली आहे.

| | |
|---|---|
| शंभर बंदुकांनीं सज्ज असलेलें जहाज. | ३५,५५३ पौंड |
| ९० | २९,८८६ |
| ८० | २३,६३८ |
| ७० | १७,७८५ |
| ६० | १४,१९७ |
| ५० | १०,६०६ |
| ४० | ७,५५८ |
| ३० | ५,८४६ |
| २० | ३,७१० |

या आंकडेवारीवरून सर्व ब्रिटिश आरमाराची एकूण किंमत—सतराशें सत्त्यान्न सालची—काय असेल याचा अंदाज बांधतां येतो.

| जहाजें | बंदुका | एकाची किंमत | एकूण किंमत |
|---|---|---|---|
| ६ | १०० | ३५,५५३ पौंड | २१३,३१८ पौंड |
| १२ | ९० | २९,८८६ ,, | ३५८,६३२ ,, |
| १२ | ८० | २३,६३८ ,, | २८३,६५६ ,, |
| ४३ | ७० | १७,७८५ ,, | ७६४,७५५ ,, |
| ३५ | ६० | १४,१९७ ,, | ४९६,८९५ ,, |
| ४० | ५० | १०,६०६ ,, | ४२४,२४० ,, |
| ४५ | ४० | ७,५५८ ,, | ३४०,११० ,, |
| ५८ | २० | ३,७१० ,, | २१५,१८० ,, |
| ८५ | बॉम्ब व इतर शस्त्रास्त्रें मिळून | २,००० ,, | १७०,००० ,, |

| | |
|---|---|
| किंमत | ३,२६६,७८६ पौंड |
| बंदुकांकरितां राखीव | २३३,२१४ |
| एकूण | ३,५००,००० पौंड |

उत्तम आरमार उभारण्यासाठीं अमेरिकेसारख्या नैसर्गिक अनुकुलता असलेला देश पृथ्वीतलावर दुसरा आढळणें कठीण आहे. डांबर, लांकूड, लोखंड, दोरखंड हें उत्पादन आपल्या देशांत विपुल आहे. हा कच्चा माल घेण्यासाठीं दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राच्या दारीं जाण्याची आपल्याला आवश्यकता नाहीं. पोर्तुगीज आणि स्पॅनिश यांना युद्धनौका भाड्यानें देऊन डच लोकांनीं खूप पैसा मिळविला. परंतु डच लोकांना जहाजें बांधण्यासाठीं कच्चा माल इतर देशांकडूनच विकत घ्यावा लागला. जहाज बांधणें हें आपल्या देशांतलें एक नैसर्गिक उत्पादनच आहे असें धरून या गोष्टीकडे व्यापार–धंद्याचा एक भाग म्हणून आपण पाहिलें पाहिजे. जहाजें बांधण्यासारखा पैसें गुंतविण्याचा दुसरा चांगला मार्ग नाहीं. आरमार एकदां बांधून झाल्यावर गुंतवलेल्या पैशांपेक्षां त्या आरमाराची किंमत कितीतरी पटीनें वाढते. व्यापार आणि संरक्षण यांना एकवट करणें यासारखें उत्कृष्ट राष्ट्रीय धोरण दुसरें नाहीं. आपण जहाजें बांधू या. तीं नको आहेत असें वाटलें तर आपण तीं विकूं शकतों. आणि त्यांतून कागदी चलनाचें सोन्याचांदींत परिवर्तन करूं शकतों.

युद्धनौकेवर माणसें नेमतांना बरेच वेळां चुकीचें धोरण अंगिकारलें जाण्याचा संभव असतो. जहाजावर असलेल्या एकूण माणसांपैकीं एकचतुर्थांश खलाशी असलेच पाहिजेत ही समजूत कांहीं बरोबर नाहीं. गेल्या युद्धांत कॅप्टन डेथच्या जहाजानें कौतुकास्पद मर्दुमकी गाजवली. या जहाजावर एकूण दोनशेंच्यावर माणसें होतीं; परंतु त्यांत खलाशी फक्त वीसच होते. कसलेले खलाशी जरी संख्येनें थोडे असले तरी जहाजावरचीं बरींचशीं कामें करून घेण्याच्या दृष्टीनें ते इतर माणसांना उत्कृष्ट मार्गदर्शन करूं शकतात. सध्यां आपल्याकडे लांकूड भरपूर आहे आपला मच्छीमारीचा धंदा तात्पुरता बंद आहे, आपले खलाशी आणि जहाजावर काम करणारीं बरींचशीं इतर माणसें सध्यां बेकार आहेत—आरमारी नौका बांधण्याच्या दृष्टीनें अशी योग्य परिस्थिति शोधून सांपडणें कठीण आहे. न्यूइंग्लंड मध्यें पूर्वीं सत्तर आणि ऐशीं बंदुका असलेलीं जहाजें चाळीस वर्षांपूर्वीं बांधलीं जात असत. मग तीं आतांच कां बांधलीं जाऊं नयेत. उत्तम जहाजें बांधणें ही गोष्ट अमेरिकेचें एक अभिमानस्थान आहे. याबाबतींत अमेरिका कोणत्याहि राष्ट्राला हार जाणार नाहीं. पूर्वेकडचीं राज्यें समुद्रकिनाऱ्यांपासून दूर असल्यामुळें तीं अमेरिकेशीं स्पर्धा करूं शकणार नाहींत. आफ्रिकेला चांगला किनारा आहे. परंतु तेथें सध्यां अनवस्था माजल्यामुळें आफ्रिका बलहीन बनली आहे.

युरोपांतील इतर कोणत्याहि राष्ट्राला आपल्यासारखा किनारा नाहीं किंवा तेथें जहाज बांधण्यासाठीं लागणाऱ्या कच्च्या मालाचें आपल्या देशाइतकें विपुल उत्पादनहि नाहीं. या बाबतींत जगांतील बहुतेक राष्ट्रांची अवस्था दांत आहेत पण चणे नाहींत अशीच झाली आहे. फक्त अमेरिकाच काय ती या बाबतींत भाग्यवान् आहे. रशियाचें विशाल साम्राज्य समुद्रापासून इतकें दूर आहे कीं तेथील लोखंड, दोरखंड, डांबर हा सर्व कच्चा माल त्यांना इतर देशांत विक्रीसाठीं पाठविण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

सुरक्षिततेच्या दृष्टीनें अमेरिकेचें जय्यत आरमार असावयास नको काय? साठ वर्षांपूर्वीं जसें जग होते तसें आज उरलेलें नाहीं. त्या काळीं आपली संपत्ति उघड्यावर ठेवूनहि आपण निर्धास्त झोंपूं शकत होतों. दरवाजांना कुलूप लावण्याची तेव्हां आवश्यकता भासत नव्हती. परंतु आतां जग बदललें आहे. या बदलत्या जगाबरोबर संरक्षणाच्या पद्धति बदलणेंहि अपरिहार्य झालें आहे. वर्षांपूर्वीं एखादा सामान्य चांचा डेलवेर नदींतून फिलाडेल्फियांत घुसून तेथील लोकांकडून धाक घालून हवी तेवढी खंडणी वसूल करूं शकला असता. जें फिलाडेल्फियाच्या बाबतींत तेंच इतर शहरांच्या बाबतींत खरें आहे. एखादा धाडशी चांचा या परिस्थितीचा फायदा घेऊन आपल्याला हवें तेव्हां लुटूं शकेल. या परिस्थितीकडे पहातां संरक्षणाच्या दृष्टीनें आरमार उभारणें हें आपलें कर्तव्यच ठरतें.

कांहीं लोक असें म्हणतात कीं, ब्रिटिशांशीं आपण तह केल्यानंतर ब्रिटिशांचें आरमार आपलें संरक्षण करील. परंतु आमच्या बंदरांत आमचें संरक्षण करण्यासाठीं आपलीं जहाजें ठेवण्याइतकें ब्रिटन मूर्ख असेल असें मला वाटत नाहीं. थोडासा विचार केला असतां आपल्याला सहज पटेल कीं जी राजसत्ता आपल्याला दडपून टाकण्यासाठीं पराकाष्ठा करीत आहे ती आपल्या संरक्षणासाठीं कधींहि उभी रहाणार नाहीं. स्नेहसंबंधाच्या नांवाखालीं ब्रिटन आमच्यावर गुलामगिरी लादण्याचा प्रयत्न करील; आणि शेवटीं युद्धाचा एवढा खटाटोप केल्यानंतरहि आपण ब्रिटनचे गुलामच आहोंत असें आपल्याला आढळून येईल. मग ब्रिटिश आरमाराला जर आपल्या बंदरांत येऊं द्यावयाचें नसेल तर ब्रिटन आपलें संरक्षण कसें करणार हा येथें प्रश्न आहे. तीनचार हजार मैल दूर असलेलें ब्रिटनचें आरमार आणीबाणीच्या काळांत आपल्या थोडेंच उपयोगी पडणार आहे! मग जर आपलें संरक्षण करावयाचें असेल तर तें आपणच करणें शहाणपणाचें नाहीं काय? इंग्लिश

युद्धनौकांची एक लांबलचक यादी आपण नेहमीं पाहातों. परंतु या नांवांपैकीं एक दशांश जहाजेंसुद्धां आयत्या वेळीं हजर असतील कीं नाहीं ही शंका आहे. यांपैकीं वरीचशीं जहाजें फक्त कागदावर नांवापुरतीच अस्तित्वांत आहेत. उरलेल्यांपैकीं बऱ्याच जहाजांचीं नांवें मोठीं परंतु प्रत्यक्षांत मात्र एखादा मोडका फळकुटांचा सांगाडा अशीच स्थिति आहे. ईस्ट आणि वेस्ट इंडिज, भूमध्य समुद्र, आफ्रिका आणि इतर ठिकाणीं ब्रिटनचे हितसंबंध असल्यामुळें त्यांना जरूर लागेल तेव्हां तेथें जहाजें पाठविणें अपरिहार्य आहे. निव्वळ खोट्या समजुती मनाशीं बाळगल्यामुळें ब्रिटनच्या आरमारी सामर्थ्याविषयीं आपण निष्कारण दबदबा बाळगीत आहांत. इंग्लंडला शह द्यायचा असला तर त्यांच्या एवढें मोठें आरमार आपल्याला तात्रडतोब बांधावें लागेल असेंहि बोललें जातें. परंतु या विधानांत सत्याचा अंशहि नाहीं हें मीं आपल्या डोळ्यापुढें आणूं इच्छितों. कारण ब्रिटिशांच्या आरमाराच्या एकविशांश आरमार जरी आपण उभारलें तरी तें आपल्याला पुरेसें होईल. कोणत्याहि परकी देशावर अमेरिकेनें ब्रिटिशांप्रमाणें आपलें वर्चस्व लादलेलें नसल्यामुळें आपलें आरमार आपल्याला दहा ठिकाणीं पाठवावें लागणार नाहीं: आपल्या बंदराभोंवतींच सर्व आरमारी शक्ति एकवटतां येईल. ब्रिटन आपल्या आरमाराच्या जोरावर आमचा युरोपखंडाशीं असलेला व्यापार रोखूं शकतें. परंतु याहि बाबतींत शह द्यायचाच म्हटलें तर ब्रिटनचा वेस्ट इंडिजशीं असलेला व्यापारहि आपण त्याचप्रमाणें थांबवूं शकूं.

शांततेच्या काळांत प्रत्यक्ष सुसज्ज आरमार न ठेवतांहि त्याची उणीव भरून काढण्याचा कांहीं मार्ग शोधून काढतां येईल. व्यापाऱ्यांना आर्थिक सहाय्य देऊन त्यांच्याकडून वीस ते पन्नास तोफांचीं जहाजें बांधून घ्यावींत. ज्या प्रमाणांत या तोफांनीं त्यांच्या जहाजावरील जागा मोजली जाईल—कारण तेवढा माल कमी राहाणार—त्याप्रमाणांत सरकारनें या व्यापारांना आर्थिक सहाय्य द्यावें. अशातऱ्हेच्या पन्नाससाठ जहाजांपैकीं कांहीं किनाऱ्यावर पाहाऱ्याच्या कामासाठीं सतत ठेवावीं लागतील. या व्यवस्थेमुळें इंग्लंडप्रमाणें शांततेच्या काळांत आपलें आरमार गंजत पडण्याची धास्ती रहाणार नाहीं. युद्धसामर्थ्य आणि संपत्ति राष्ट्रकल्याणाच्या दृष्टीनें एकवटणें हेंच हितप्रद धोरण होय. आमचें सामर्थ्य आणि संपत्ति जर हातांत हात घालून चालूं लागलीं तर आपल्या कोणत्याहि शत्रूला अमेरिकेकडे डोळा वर करून पहाण्याची हिंमत होणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

युद्ध साहित्यासाठीं लागणारा कच्चा माल अमेरिकेंत विपुल होतो. आपल्या कडे काथ्या इतका आहे कीं दोरखंडाच्या बाबतींत कधींच कमतरता भासणार नाहीं. आपल्या देशांतील लोखंड जगांतील कोठल्याहि राष्ट्रापेक्षां उत्तम प्रतीचें आहे. शस्त्रांच्या बाबतींत आपण कोठल्याहि राष्ट्राला हार जाणार नाहीं. तोफा, दारूगोळा यांच्या उत्पादनांत या देशांत अधिकाधिक भर पडत चाललेली आहे हें आपण पाहात आहोंच. ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रांत आपलें पाऊल सारखें पुढें पडत आहे. करारी बाणा हा आपल्या राष्ट्रीय चारित्र्याचा अविभाज्य धर्म आहे. संकटाच्या राशी कोसळल्या तरी आपल्या राष्ट्राचें धैर्य यत्किंचितहि ढळत नाहीं. हें सारें असतांना आपल्याला कसली उणीव भासते आहे? आपलें पाऊल कां डगमगतें आहे? ब्रिटन पासून विनाशाखेरीज दुसरी कसलीहि अपेक्षा आपण बाळगणें चूक ठरेल. ब्रिटनचें अधिराज्य जर अमेरिकेवर कायमचें स्थापन झालें तर या भूमीवर सुखानें जगणें अशक्य होईल. पावलोपावलीं द्वेषाचे वणवे पेटतील, बंड माजेल, आणि ही आग मग कोण विझवील? परकीय सत्तेच्या जोखडाखालीं आपल्या भावी पिढ्या वांकाव्या यासाठीं धडपडणारा महाभाग कोणी आहे काहे काय? ब्रिटनचें वर्चस्व जाऊन स्वातंत्र्य येईपर्यंत आमचे कोणतेहि प्रश्न सुटणार नाहींत याविषयीं शंका नको.

स्वातंत्र्याची चळवळ करण्यासाठीं हीच वेळ विशेष अनुकूल आहे असें मी म्हणतों. याला आणखी एक कारण आहे. आज आपली लोकसंख्या मर्यादित आहे आणि बरीचशी सुपीक जमीन अजून शेतीखालीं यावयाची आहे. एखाद्या मग्रूर राजानें आणि त्याच्या नादान वंशजानें ही संपत्ति लुटण्यापूर्वी आपण आपल्या राष्ट्रासाठीं तिचा उपयोग करणें शहाणपणाचें नव्हे काय? या संपत्तीच्या बळावर स्वातंत्र्ययुद्धासाठीं उभारलेलें कर्ज आपण फेडूं शकूं एवढेंच नव्हे तर आपलें स्वतंत्र सरकारहि मजबूत पायावर आपण उभें करूं शकूं. खरेंच, जगांतील कोणत्याहि राष्ट्रासमोर अशी सोन्याची संधि चालून आलेली नाहीं.

कांहीं लोक असें म्हणतात कीं अमेरिकन वसाहती अजून बाल्यावस्थेंत आहेत. माझ्या मतें स्वातंत्र्याची चळवळ करण्यास ही गोष्ट विरोधी ठरण्याऐवजीं पोषकच ठरते. कारण राष्ट्राची वाढ होऊन लोकसंख्या अमर्याद वाढूं लागली कीं ऐक्याची भावना निर्माण होणें कठिण होऊन बसतें. दुसरी गोष्ट अशी कीं लोकसंख्या जेवढी मोठी तेवढें सैन्यबळ कमकुवत असा इतिहासाचा दाखला आहे.

आजच्या जगाहून जुन्या काळीं राष्ट्रांचें सैन्यबळ संख्येच्या दृष्टीनें कितीतरी मोठें होतें हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. याला एक कारण आहे : लोकसंख्या जसजशी वाढते तसतसा व्यापारहि अपरिहार्यपणें वाढतो. व्यापार वाढला कीं लोकांचे हितसंबंध अधिक गुंतागुंतीचे होतात आणि परिणामीं राष्ट्रीय बाणा आणि सैन्यबळ या दोन्ही गोष्टी बऱ्याच प्रमाणांत क्षीण होतात. व्यापाराच्या दृष्टीनें बाल्यावस्थेंत असलेल्या जुन्या काळांतील राष्ट्रांचें सैन्यबळ आजच्या मानानें खूप मोठें होतें अशी इतिहासाची साक्ष आहे. व्यापाराच्या अभिवृद्धीबरोबर इंग्लंडचें युद्धकर्तृत्व दुबळें झालेलें आहे. लोकसंख्या अफाट असून देखील लंडनमधील जनता भेकडांप्रमाणें कसलेहि अपमान मुकाट्यानें गिळून टाकते हें आपण पाहातच आहोंत. नुकसान होण्याचा संभव जेवढा अधिक तेवढी माणसामधील धडाडी कमी हें सत्य आहे. आणि म्हणूनच गब्बर झालेले श्रीमंत लोक राजसत्तेपुढें लाचार होऊन पदोपदीं मान वाकवितांना दिसतात.

व्यक्तीप्रमाणेंच राष्ट्राच्याहि जीवनांत तारुण्य हाच खरा कर्तृत्वाचा काल असतो. पन्नास वर्षांनंतर अमेरिकन वसाहतींची एकजूट करून मध्यवर्ती शासनसंस्था स्थापन करणें जरी अशक्य नसलें तरी कठीण होईल. व्यापार आणि लोकसंख्या यांच्या वाढीमुळें हितसंबंध गुंतागुंतीचे होतील आणि त्यामुळें नाहीं म्हटलें तरी थोडासा गोंधळ निर्माण होईल. एक वसाहत दुसऱ्या वसाहतीच्या विरुद्ध उभी राहील. प्रत्येक वसाहत समर्थ झाल्यामुळें एकमेकांची मदत तुच्छतेनें झिडकारील आणि आपल्या क्षुद्र वर्तुळांत सत्तेवर आरूढ झालेलीं मूर्ख माणसें जेव्हां हंसत असतील तेव्हां योग्य वेळीं वसाहतींची एकजूट न केल्याबद्दल शहाणीं माणसें पश्चात्तापाचे अश्रु ढाळतांना दिसतील. म्हणूनच मी म्हणतों कीं ऐक्य स्थापन करण्याची हीच वेळ आहे. संकटाच्या काळांत आणि बाळपणीं जी मैत्री निर्माण होते ती पुढें टिकून रहाते असा अनुभव आहे; आज आपल्या वसाहती बाल्यावस्थेंत आहेत आणि संकटग्रस्त आहेत; परंतु एकमेकांविषयीं वाटणाऱ्या स्नेहाच्या भावनेमुळें सर्व अडचणी ओलांडून आपण एकत्र आलों आहों. यामुळें भविष्यकाळांत पुढच्या पिढीसाठीं आपण वैभवाचा रस्ताच आपण आंखून देत आहों असें म्हणावयास हरकत नाहीं.

असा काळ राष्ट्राच्या जीवनांत एकदांच येतो. म्हणूनच मी म्हणतों कीं ही संधि साधून स्वातंत्र्याचा पाया घाला. ज्या ज्या राष्ट्रांनीं ही संधि हातची घालविली

त्यांना परकीय सत्तेच्या जोखडाखालीं पिचत राहाणें भाग पडलें. त्या राष्ट्रांत राजा प्रथम आला आणि नंतर आपल्या इच्छेनुसार त्यानें कायदे केले. वास्तविक, कायदे प्रथम झाले पाहिजेत आणि त्या कायद्यांची अंमलबजावणी करणारे अधिकारी जनतेनें नंतर निवडून दिले पाहिजेत. इतर राष्ट्रांना लागलेली ही ठेंच पाहून आपण वेळींच शहाणें होऊं या आणि योग्य वेळींच स्वातंत्र्याचा पाया घालूं या.

विल्यमनें इंग्लंड जिंकलें तेव्हां आपल्याला हवे असलेले कायदे तरवारीच्या धाकानें लोकांवर लादले; आणि म्हणूनच अमेरिकेनें जर योग्य वेळीं खबरदारी घेऊन लोकस्वातंत्र्यावर अधिष्ठित अशी शासनसंस्था स्थापन केली नाहीं तर एखादा अरेरावी मग्रुरशहा जनतेच्या मानगुटीवर बसल्याशिवाय रहाणार नाहीं; मग कुठलें लोकस्वातंत्र्य आणि लोकसमृद्धि!

धर्मांच्या बाबतींत सर्व मतांच्या लोकांना संरक्षण देणें आणि समतेनें वागविणें हें प्रत्येक सुजाण शासनसंस्थेचें अटळ कर्तव्य आहे असें मी मानतों. मनाचा सगळा क्षुद्रपणा झुगारून देऊन आपण ही वैचारिक उदारता स्वीकारली पाहिजे. परमताविषयींची असहिष्णुता हें क्षुद्रमनस्कांचें लक्षण आहे; आणि यांत सुसंस्कृत समाजाचें अधःपतन आहे. माझ्यापुरतें बोलावयाचें झाल्यास, धर्मविचाराच्या बाबतींत मतभिन्नता असावी अशी ईश्वराची इच्छा आहे असें मी मानतों. या मतभिन्नतेमुळें ख्रिश्चन धर्माच्या कक्षा अधिक विशाल व उदार होतात असें माझें मत आहे. आपली सर्वांचींच धर्ममतें जर एका साच्याचीं असतीं तर विचार आणि चर्चा या गोष्टीच मुळीं फार खुंटून गेल्या असत्या. या उदार तत्त्वाला अनुसरूनच मी असें मानतों कीं, एकाद्या कुटुंबांतलीं माणसें त्यांचीं नांवें वेगवेगळीं असल्यामुळें ज्याप्रमाणें एकामेकांपासून दुरावत नाहींत त्याप्रमाणें धर्ममतांच्या बाबतींत भिन्नता असली तरीहि राष्ट्राच्या कुटुंबांतील माणसांनीं एकमेकांपासून दुरावतां कामा नये.

अमेरिकन जनतेच्या हक्कांच्या मसुद्याविषयीं पूर्वीं मीं थोडेंसें विवेचन केलेलें आहे. येथेंहि त्याच गोष्टीचा पुनरुल्लेख करणार. हक्कांचा मसुदा हा सर्व प्रांतांना एकत्र आणणारा एक पवित्र दुवा आहे असें मानलें पाहिजे. सर्व अमेरिकन राष्ट्र प्रत्येक प्रांताचे धर्म, व्यक्तित्व आणि मालमत्ता या बाबतींतील हक्कांचें संरक्षण करण्यासाठीं या मसुद्याच्या स्वरूपांत उभें आहे. चोख व्यवहार आणि समंजसपणा यांच्या पायावर उभी असलेली मैत्री दीर्घकाल टिकते.

पूर्वी मीं सर्व प्रांतांना प्रतिनिधित्व असावें आणि हें प्रतिनिधित्व समतेच्या तत्त्वावर देण्यांत यावें असें म्हटलें होतें. राजकीय समस्या म्हणून ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे असें मला वाटतें. सर्व प्रांतांना जर सारखें प्रतिनिधित्व मिळालें नाहीं तर राष्ट्राचें राजकीय जीवन धोक्यांत येईल. या माझ्या सिद्धांताचें उदाहरण म्हणून मी पुढील गोष्टीचा उल्लेख करतों. पेनसिल्व्हानिया येतील विधानसभेपुढें एक अर्ज विचारार्थ आला होता. या वेळीं सभागृहांत फक्त अठ्ठावीस प्रतिनिधी हजर होते. बस्क्स परगण्यांतील आठ सभासदांनीं ह्या अर्जाच्या विरुद्ध मत दिलें. समजा, चेस्टर परगण्यांतील सात सभासदांनीं जर असेंच विरुद्ध मत नोंदविलें असतें तर सर्व प्रांताच्या वतीनें फक्त या दोन परगण्यांनींच निर्णय घेतला असा त्याचा अर्थ झाला. याचाच अर्थ असा कीं लोकसत्ताक मूल्यें धोक्यांत आलीं. याच सभागृहांत गेल्या बैठकींत घडलेल्या एका प्रकाराचा मला येथें मुद्दाम उल्लेख केला पाहिजे; कारण त्यापासून जनतेनें खूप मोठा धडा शिकण्यासारखा आहे. या सभागृहांत हजर असलेल्या कांहीं प्रतिनिधींनीं अगोदरच कांहीं प्रश्नांवरचे निर्णय ठरवून ठेवले होते. आपल्या मताचा प्रचार करणारीं पत्रकें त्यांनीं बैठक भरण्यापूर्वी सभागृहाच्या बाहेर कांहीं प्रतिनिधींना वाटलीं. खरोखरीच शाळकरी पोराच्या बुद्धीचाहि उपमर्द व्हावा असा हा एकूण प्रकार होता. बरें, जे प्रतिनिधी हजर होते ते संख्येनें इतके कमी होते कीं प्रांताच्या जीवनाशीं निगडित असलेल्या कोणत्याहि महत्त्वाच्या प्रश्नावर इतर प्रतिनिधी गैरहजर असतांना सभागृहांत निर्णय घेणें अयोग्य होतें. परंतु या मंडळींनीं मात्र अशा तऱ्हेचें खलब्रत करून तो निर्णय घेतला—सर्व प्रांतांच्या वतीनें तो निर्णय घेतला. म्हणजे हा सर्व प्रकार जनतेला कळला असता तर या प्रतिनिधींवर डोळे मिटून कधींहि विश्वास टाकला नसता.

तात्पुरत्या सोईसाठीं म्हणून पुष्कळ वेळां आपण कांहीं गोष्टी करतों; परंतु ही सोईसाठीं केलेली व्यवस्था जर आपण पुढें तशीच रेटूं लागलों तर ती अन्यायाला कारणीभूत होते. तात्पुरती सोय आणि योग्य निर्णय या दोन गोष्टी साफ वेगळ्या आहेत. ज्या वेळीं अमेरिका संकटांत सांपडली त्यावेळीं या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं तात्पुरती सोय म्हणून प्रत्येक प्रांतांतील सभागृहानें आपआपसांतील प्रतिनिधी निवडून त्यांची एक समिति नेमली आणि तिच्या हातीं कांहीं अधिकार दिले. या समितीनें आपलें काम उत्तम रीतीनें केलें आणि अमेरिकेला बिनाशा-

पासून वांचविलें यांत शंका नाहीं. परंतु अशा तऱ्हेची समिति निवडतांना ती कोणत्या पद्धतीनें निवडावी या प्रश्नाचा आपल्याला विचार हा करावाच लागेल— तात्पुरत्या सोईसाठीं केलेली व्यवस्था तशीच पुढें ढकलून भागत नाहीं, आज ना उद्यां अमेरिकन कॉंग्रेसची स्थापना अपरिहार्यपणें करावी लागणारच ही गोष्ट ध्यानांत घेऊन समिति निवडण्याच्या ह्या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. प्रतिनिधित्वाचे आणि निवडणुका करण्याचें दोन्ही अधिकार कांहीं ठराविक माणसांच्या हातीं देणें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें धोक्याचें ठरणार नाहीं काय? पुढच्या पिढ्यांचें कल्याण व्हावें या दृष्टीनें जेव्हां आपण कांहीं योजना आंखीत असतों तेव्हां एक गोष्ट कटाक्षानें ध्यानांत ठेवली पाहिजे ती अशी कीं सद्‌गुण हे आनुवंशिक असतात असें नाहीं. पुष्कळ वेळां आपल्या शत्रूपासूनहि आपण चांगला धडा शिकूं शकतों. न्यूयॉर्क असेंब्लीच्या अर्जाचा विचार करतांना कॉर्नवॉल तिरस्कारानें असें म्हणाला कीं हा अर्ज फक्त सव्वीस सभासदांनींच पाठविलेला आहे. इतक्या किरकोळ संख्येला बहुमताचे प्रतिनिधि मानणें बरोबर होणार नाहीं. कॉर्नवॉलनें आमच्या कल्याणाचा हेतु मनांत बाळगून हें केलें नसलें तरी अप्रत्यक्ष रीत्या त्यानें आमच्या हिताचीच गोष्ट केलेली आहे. त्याच्या ह्या आगंतुक प्रामाणिकतेबद्दल आभार मानले पाहिजेत!

तात्पर्य, कोणासहि आवडो वा न आवडो, कोणासहि चमत्कारिक वाटो, परंतु अमेरिकेनें ताबडतोब आपल्या स्वातंत्र्याची घोषणा केल्याखेरीज तरणोपाय नाहीं हेंच सत्य आहे. माझ्या ह्या म्हणण्याला मी पुढील कारणें देतों:—(१) युरोपियन देशांत असा एक प्रघात आहे कीं दोन राष्ट्रांत जर युद्ध सुरू झालें तर इतर राष्ट्रें मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करतात परंतु अमेरिका स्वतःला ब्रिटनची प्रजाजन म्हणवत असल्यामुळें इतर राष्ट्रें आमच्या ह्या कलहांत मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करणार नाहींत. याचाच अर्थ असा कीं हा संघर्ष असाच चालू रहाणार. (२) आपण आणि ब्रिटन यांत सलोखा निर्माण व्हावा म्हणून फ्रान्स आणि स्पेन यांच्याकडून मदतीची अपेक्षा करणें चुकीचें होईल. कारण अमेरिका व ब्रिटन यांचा सलोखा घडवून आणण्यांत या राष्ट्रांचें नुकसान आहे. (३) आपण स्वतःला ब्रिटनचे प्रजाजन म्हणवत असल्यामुळें जगांतील इतर राष्ट्रें आपल्या या स्वातंत्र्ययुद्धाला प्रजेनें राजाविरुद्ध केलेलें बंड म्हणूनच ओळखणार. त्यांच्या दृष्टीनें अशा तऱ्हेच्या बंडाचा पायंडा पडणें केव्हांहि सोईस्कर नाहीं. प्रजाजन असूनसुद्धां

आपण ब्रिटनविरुद्ध उलटलों आहोंत या बाह्यतः भासणाऱ्या विसंगतीमागील खरा अर्थ आपणालाच ठाऊक आहे. सर्वसामान्य बुद्धीला या गोष्टीचा अर्थ कळणें कठीण आहे. (४) अर्जांच्या मेंडोळीं घेऊन ब्रिटनकडे धांवण्यापेक्षां इतर राष्ट्रांच्या दरबारांत आपण कांहीं विनंतिपत्रकें पाठवावीं या विनंती-पत्रकांत ब्रिटनच्या वर्चस्वाखालीं अमेरिकन जनतेनें सोसलेल्या असह्य हालअपेष्टांचें वर्णन करून अमेरिकन जनतेला स्वातंत्र्यासाठीं उठाव करणें भाग पडलें असें लिहावें. याच विनंतीपत्रकांत अमेरिका या राष्ट्रांशीं व्यापारी संबंध वाढविण्यास उत्सुक आहे असाहि आवर्जून उल्लेख करावा.

जोपर्यंत आपण ब्रिटिशांच्या जोखडाखालीं आहोंत तोंपर्यंत आपला आवाज जगांतील कोणत्याहि राष्ट्राच्या कानांपर्यंत जाणार नाहीं. आपण स्वातंत्र्य मिळवून इतर राष्ट्रांच्या पंक्तीला प्रतिष्ठापूर्वक बसल्याशिवाय आपलें म्हणणें कोणीहि ऐकून घेणार नाहीं.

मी सुचविलेला हा मार्ग प्रथमदर्शनीं अनुसरण्यास कठीण वाटेल. परंतु आतांपर्यंत जशीं आपण धडाडीनें नवीं पाऊलें टाकली त्याप्रमाणें हेंहि पाऊल टाकल्यास कालान्तरानें मी सांगतों त्या गोष्टी कठीण वाटणार नाहींत. अमेरिकेनें आधीं स्वातंत्र्य मिळविलेंच पाहिजे. नाहींतर जो मनुष्य एकादें कार्य करण्याचा संकल्प करतो, परंतु तें कार्य करण्यास प्रत्यक्ष मात्र सुरवात करीत नाहीं, त्या कार्याचे विचार मात्र सारखे त्याच्या मनांत थैमान घालीत असतात, तशा माणसाप्रमाणें अमेरिकेची केविलवाणी स्थिति होईल.

## परिशिष्ट

ज्या दिवशीं माझ्या ह्या पुस्तिकेची पहिली आवृत्ति प्रसिद्ध झाली त्याच दिवशीं नेमकें राजाचें भाषणहि प्रसिद्ध झालें. हा योग पाहातां माझी ही पुस्तिका प्रसिद्ध होण्याचा योग्य काल प्रत्यक्ष विधीच्या चातुर्याला ही ठरवतां आला नसता असें मला वाटलें. राजाच्या भाषणांतील खुनशीपणा पाहातां माझ्या लेखांतील तत्त्वांचा पुरस्कार किती अपरिहार्य व आवश्यक आहे हें ध्यानांत येतें. राजाचें भाषण वाचतांना अमेरिकन जनतेचा संताप शिगेला पोंहचला. राजाच्या

ह्या भाषणामुळें अमेरिकन जनतेंत घबराटीचें वातावरण पसरणें तर दूरच राहिलें; उलट स्वातंत्र्याच्या अदम्य आकांक्षेनें तिच्या मनांत उसळी घेतली.

समारंभपूर्वक असो किंवा विशेष गाजावाजा न करतां केलेले असो, दुष्टतेचा पुरस्कार करणारें भाषण, हेतु कोणताहि असला तरी विघातकच ठरतें. हा सिद्धान्त जर खरा असेल तर दुष्टतेनें भरलेल्या इंग्लंडच्या राजाच्या भाषणाचा तीव्र निषेध करण्याची इच्छा अमेरिकन जनतेला व काँग्रेसला व्हावी हें स्वाभाविक आहे. परंतु राष्ट्रांतील अंतर्गत शांतता, राष्ट्राचें चरित्र्य आणि चाल-चालणूक यांवर अवलंबून असते; आणि म्हणूनच आपल्या मनांतील तिरस्काराची तीव्र भावना आपल्या ह्या राष्ट्रीय चारित्र्याला व शांततेला ढका लागणार नाहीं अशा संयमानें आपण व्यक्त करणें हेंच शहाणपणाचें होय. मला वाटतें याच कारणामुळें अजून-पर्यंत राजाच्या भाषणाच्या प्रतींची अजून जाहीर होळीं झालेली नाहीं. राजाचें हें भाषण म्हणजे सत्याशीं केलेला द्रोह आहे. माणुसकीच्या अस्तित्वाच्या, समाजकल्याणाच्या भावनेचा, ह्या भाषणानें राजरोस खून पाडलेला आहे. जुलमाच्या वेदीवर माणुसकीचा बळीं घेण्याची ही पद्धत कांहीं नवी नाहीं. राजा या संस्थेचा अपरिहार्य परिणाम माणुसकीचा बळीं जाण्यांतच होणार : कारण राजा ही संस्थाच निसर्गाला धरून नाहीं. त्याचप्रमाणें राजेलोकहि नैसर्गिक तत्त्वाला जुमानीत नाहींत. ज्या प्रजेनें त्यांना या पदावर बसविलें त्याच प्रजेच्या डोक्यावर चढून हे राजे बसले आहेत. नाहीं म्हणावयास राजाच्या ह्या भाषणांत एक गुण आहे आणि तो म्हणजे त्यांत आम्हांला फसविण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. आम्ही तशा प्रयत्नानें फसणार नाहीं ही गोष्ट वेगळीं. पशुता आणि जुलूम यांचें कसलीहि छपवाछपव न करतां या भाषणांतून उघड प्रदर्शन केलेलें आहे. हें भाषण वाचलें असतां राजाच्या हेतूविषयीं कसलाहि संशय मनांत उरत नाहीं. रानावनांतून शिकार करीत फिरणाऱ्या अशिक्षित आणि क्रूर रेड इंडियन लोकांपेक्षांहि ब्रिटनचा राजा अधिक क्रूर आणि जुलमी आहे ह्याची साक्ष ह्या भाषणानें पटते.

सर जॉन डॅल्रिम्पल या जेसुइट पंथाच्या माणसानें, 'इंग्लिश जनतेचें अमेरिकेच्या जनतेला आवाहन' या नांवाची एक पुस्तिका लिहिली आहे. या पुस्तिकेंत अमेरिकन जनतेंत दबदबा निर्माण व्हावा ह्या हेतूनें राजाचें भडक वर्णन केलेलें आहे. हें वर्णन (खरें म्हणजे लेखकाला शोभत नाहीं) सध्यांच्या राजाला

अगदीं तंतोतंत लागू पडणारें आहे. प्रस्तुत पुस्तिकेचा लेखक आपल्या ह्या लेखांत असें म्हणतो कीं, "स्टॅंप ॲक्ट रद्द करणाऱ्या रॉकिंगहॅमची कारकीर्द चांगली होती असें तुम्ही म्हणतां. खरें म्हणजे राजाच्या संमतीशिवाय त्याला हा कायदा रद्द करणें अशक्य झालें असतें. म्हणून त्याच्याप्रमाणेंच तुम्ही राजाचीहि स्तुति केली पाहिजे. कारण सर्व चांगल्या गोष्टींना अंतिम अर्थानें राजाच जबाबदार असतो." पदोपदीं राजाची तरफदारी करण्याचा विडा उचललेल्या टोरी पक्षाच्या मताचें हें उघडें प्रदर्शन पाहाण्यासारखें आहे. येथें राजपूजेचा कसलाहि आडपडदा न ठेवतां पुरस्कार केलेला आहे. अशा तऱ्हेचीं मतें जो शांतपणें ऐकून घेतो आणि ज्याला हीं मतें पटतात अशा माणसाचा बुद्धिभ्रंश झालेला आहे, त्याच्या माणुसकीचा तोल ढळलेला आहे, आणि तो एखाद्या पशूच्याच पायरीला जाऊन पोंहचलेला आहे—नव्हे, या जगांत किड्याप्रमाणें वळवळतो आहे असेंच म्हटलें पाहिजे.

इंग्लंडचा राजा काय म्हणतो किंवा काय करतो याला आतां आमच्या दृष्टीनें फारसा अर्थ उरलेला नाहीं. नैतिकतेचे आणि माणुसकीचे सगळे नियम त्यानें दुष्टपणानें मोडले आहेत. निसर्ग आणि विवेकबुद्धि यांना त्यानें पायाखालीं तुडविलें आहे, आणि आपल्या क्रूरतेमुळें तो सर्व जगाच्या द्वेषाचा विषय होऊन बसला आहे. अमेरिकेनें आपल्या पायावर उभें राहाण्याची वेळ आतां आली आहे. सर्व ख्रिश्चन जगताला ज्याचें नांव उच्चारतांच शरमेनें मान खालीं घालावी लागेल अशा ब्रिटनच्या राजाला पाठिंबा देण्यासाठीं अमेरिकेनें आपल्या सत्ता-संपत्तीचा उपयोग न करतां आपल्या विशाल राष्ट्रीय कुटुंबाची आतां प्रथम काळजी वाहिली पाहिजे. राष्ट्राच्या चारित्र्यसंवर्धनाकडे ज्यांचें लक्ष आहे, लोकस्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठीं जे सदैव जागरूक आहेत, युरोपिअन राष्ट्रांतल्या अनाचारांनीं आपलें राष्ट्र पोखरलें जाऊं नये असें ज्या ज्या अमेरिकन माणसास वाटतें तो तो मनुष्य आपल्या मनांत स्वातंत्र्याची आस गुप्तपणें बाळगीत असलाच पाहिजे. यांतील नैतिकतेचा भाग वैयक्तिक आहे. त्यामुळें मी माझें या विषयाचें विवेचन पुढील मुद्यांपुरतेंच मर्यादित ठेवणार आहे: (१) ब्रिटनचें जोखड झुगारून देऊन स्वतंत्र होण्यांतच अमेरिकेचें खरें कल्याण आहे. (२) सगळ्यांत सोपा आणि व्यवहार्य मार्ग कोणता—स्वतंत्र होणें कीं ब्रिटनशीं तह करणें? या दोन मुद्यांच्या अनुषंगानें मला कांहीं विचार मांडावयाचे आहेत.

अमेरिकेनें स्वतंत्र होण्यांतच तिचें कल्याण आहे असें मत असणारे परंतु ज्यांनीं आपलें हें मत अजून जाहीर केलेलें नाहीं अशा अनेक कर्तृत्ववान् आणि अनुभवी माणसांचीं नांवें मी माझ्या विधानाच्या पुष्ट्यर्थ देऊं शकेन. खरें म्हणजे यासाठीं मतें गोळा करण्याची जरूर पडूं नये इतकी ही गोष्ट उघड आहे. कारण असें कीं परकीय सत्तेखालीं असलेलें कोणतेंहि राष्ट्र आपली प्रगति करून घेऊं शकत नाहीं. खरी खरी समृद्धि म्हणजे काय हें अमेरिकेनें अजून पाहिलेलें नाहीं. आज दिसणारी समृद्धि ही इतर राष्ट्रांच्या मानानें कितीतरी पटीनें मोठी असली तरी आपल्या राष्ट्राच्या वैभवाची ती केवळ बाल्यदशाच आहे. अमेरिकेंतील कायदे करण्याचें स्वातंत्र्य अमेरिकन जनतेस मिळेल त्यावेळीं आपल्या वैभवाला सीमा रहाणार नाहीं. अमेरिकेवर राज्य करण्यांत वास्तविक इंग्लंडला अखेरीस कांहीं फायदा नाहीं; परंतु लोभामुळें इंग्लंड आपलें वर्चस्व टिकवून धरण्यासाठीं धडपडत आहे. आणि स्वातंत्र्य मिळविणें क्रमप्राप्त असूनहि अमेरिकन जनता चालढकल करीत आहे. इंग्लंडचें कल्याण अमेरिकेवर राज्य करण्यांत नसून अमेरिकेशी व्यापार करण्यांत आहे. फ्रान्स आणि स्पेनप्रमाणें अमेरिका आणि इंग्लंड हीं दोनहि जरी स्वतंत्र राष्ट्रें झालीं तरी हा व्यापारसंबंध अधिकच दृढ होत जाणार. कारण अशा अनेक वस्तु या दोन्ही राष्ट्रांत होतात कीं ज्यांच्या विक्रीसाठीं एकमेकांच्या देशाखेरीज अन्य व्यापारी पेठ ह्या जगांत शोधूनहि सांपडणार नाहीं. असो, अमेरिकेचें स्वातंत्र्य हेंच आपल्या विचाराचें उद्दिष्ट आहे. आणि आवश्यकतेमुळें अपरिहार्यपणें आढळणाऱ्या इतर अनेक सत्यांप्रमाणें हेंहि सत्य दिवसेंदिवस अधिकाधिक सुस्पष्ट आणि अपरिहार्य होत जाणार आहे. याचीं कारणें दोन आहेत. एक म्हणजे आपलें स्वातंत्र्य आज ना उद्यां येणारच आहे. आणि दुसरें म्हणजे स्वातंत्र्य मिळविण्याच्या बाबतींत जितकी चालढकल करावी तितकें तें मिळविणें कठीण होऊन बसणार आहे.

स्वातंत्र्याचा विषय जेव्हां चर्चेसाठीं निघतो तेव्हां त्यावर जाहीर किंवा खाजगी रीत्या व्यक्त होणाऱ्या कांहीं विचारशून्य मतांनीं माझी खूपच करमणूक होते. अशा मतांपैकीं बहुशः कानांवर येणारें मत म्हणजे स्वातंत्र्याचा लढा पन्नास वर्षांनीं पुढें ढकलला असतां तो अधिक सुलभ होईल हें होय. या मताला माझें उत्तर असें आहे कीं, गेल्या युद्धाच्या अनुभवामुळें आपण कमावलेलें युद्धकौशल्य जर आपण आणखीं पन्नास वर्षें थांबलों तर पार घालवून बसूं. पन्नास वर्षांनीं

चांगले सैन्याधिकारी तयार होणें मुष्कील होईल आणि युद्धकौशल्याच्या बाबतींत पूर्णपणें मागसलेल्या पूर्वीच्या रेड इंडियन लोकांप्रमाणें आपलीं अवस्था होईल. ही एकच गोष्ट स्वातंत्र्ययुद्धाला आतांचा काळ पूर्णपणें अनुकूल आहे हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. माझें म्हणणें मी अधिक विशद करून सांगतों :— गेल्या युद्धाच्या अखेरीस आपल्याला असें आढळून आलें कीं आपला अनुभव खूप होता परंतु आपली संख्या त्या वेळीं मर्यादित होती. पन्नास वर्षांनीं नेमकें याच्या उलट होईल. आपली संख्या वाढलेली असेल पण अनुभवाच्या दृष्टीनें मात्र आपण शून्यच ठरूं. तेव्हां हीं दोन्ही टोकें टाळून आपण स्वातंत्र्ययुद्धाचा काळ कोणता हें ठरविलें पाहिजे. युद्धविषयक अनुभव आणि सैन्यसंख्या यांचा समसमासंयोग मला फक्त सध्यांच्या काळांत झालेला दिसतो. आणि म्हणूनच स्वातंत्र्ययुद्धाला इतका अनुकूल दुसरा काळ नाहीं असें मला वाटतें.

येथें मी थोडें विषयांतर केलें याची मला जाणीव आहे. परंतु वाचक मला याबद्दल क्षमा करतील अशी आशा आहे. मी पुनः माझ्या मूळ मुद्यावर येतों. ब्रिटनशीं आपण जर तह केला आणि ब्रिटनचें राज्य आपल्यावर असेंच चालू दिलें तर ( हें आतां शक्यच नाहीं म्हणा) आपण युद्धासाठीं उभारलेल्या कर्जातून कधींहि मुक्त होऊं शकणार नाहीं. इंग्लंडनें अन्याय्य कायदा करून कॅनडाची सरहद्द वाढविली त्यामुळें आपल्या अनेक प्रांतांचें नुकसान झालें. या वाढलेल्या सरहद्दीमुळें जी जमीन हातची गेली तिची किंमत शंभर एकरांमागें पांच पौंड या दरानें वीस दशलक्ष पौंडांच्या आसपास होईल. (पेन्‌सिल्व्हानियाच्या चलनांत) आणि एका एकरामागें एक पेनी असा जरी हिशोब केला तरी या जमिनीचा दोन दशलक्ष पौंड वार्षिक सारा अमेरिकन सरकारला मिळूं शकेल. या जमिनी जर विकल्या तर युद्धासाठीं उभारलेलें कर्ज सहज फेडून टाकतां येईल. आणि या जमिनीचा जो वार्षिक सारा येईल त्याच्या बळावर राष्ट्रीय सरकारचा पाया निश्चित भरतां येईल. हें कर्ज अमुक वेळेच्या आंतच फेडलें पाहिजे असें बंधन नसल्यामुळें जमिनीची विक्री झाल्यावर हें कर्ज फेडून टाकतां येईल. जमीन विक्रीनंतर पैसे घेऊन कर्जफेडीची व्यवस्था करण्यासाठीं अमेरिकन कॉंग्रेसनें विश्वस्त म्हणून काम करावें असें मला वाटतें.

आतां मी स्वातंत्र्य आणि तह यांपैकीं व्यवहार्य मार्ग कोणता या माझ्या दुसऱ्या मुद्याकडे वळणार आहें.

जो मनुष्य आपले विचार नैसर्गिक तत्त्वांवर आधारतो त्याचें म्हणणें खोडून काढणें सहसा शक्य होत नाहीं. या भूमिकेवरून मी असें म्हणतों कीं स्वातंत्र्य-संपादन ही सरळ साधी गोष्ट आहे; तिच्या प्राप्तीसाठीं अमेरिकन जनतेखेरीज कोणत्याहि बाह्य शक्तीवर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाहीं. उलट, तह करावयाचा म्हणजे आपल्याला ब्रिटिशांवर अवलंबून राहावें लागेल; आणि ती दुष्ट राजवट आपल्याशीं कोणतें सहकार्य करील हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं! म्हणूनच तह हा अत्यंत गुंतागुंतीचा व गोंधळ निर्माण करणारा आहे.

कोणत्याहि विचारी माणसाला भांबावून सोडील अशीच अमेरिकेची सध्यांची स्थिति आहे. येथें कायदा नाहीं; सुव्यवस्थित शासनसंस्था नाहीं. अमेरिकन जनतेला कसलीहि सत्ता नाहीं—आहेत फक्त ब्रिटिशांनीं मेहेरबानी म्हणून फेकलेले चार अधिकार. स्वातंत्र्यकारणासाठीं अभूतपूर्व अशा ऐक्य भावनेनें आज आपण एकत्र आलों आहों; परंतु हें ऐक्य आहे तसें नेहमींच राहील असा भरंवसा नाहीं. आपले शत्रू तर या ऐक्यावर बिब्बा घालण्याचा सारखा प्रयत्न करीत आहेत. आजची अमेरिकेची स्थिति म्हणजे कायद्याचा आधार नसलेली स्थूल संघटना, योजनेचा अभाव असलेला शहाणपणा, कसलेंहि निश्चित स्वरूप नसलेली राज्यघटना, आणि सगळ्यांत आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे पारतंत्र्याची इच्छा बाळगणारें स्वातंत्र्य अशी आहे. खरेंच, जगाच्या इतिहासांत अशी परि-स्थिति केव्हां असेल असें आठवत नाहीं. सध्यांच्या काळांत कोणालाहि आपली मालमत्ता सुरक्षित आहे असें म्हणतां येणार नाहीं. सर्वसामान्य जनतेच्या डोळ्या-समोर निश्चित असा कार्यक्रम नसल्यामुळें ती मनमानेल तशी वागत आहे आणि वाऱ्याबरोबर वाहात जात आहे. राष्ट्राशीं द्रोह करणें हा आज अमेरिकेंत गुन्हा ठरत नाहीं. त्यामुळें कोणाचाच पायपोस कोणाच्याच पायांत नाहीं. अशीच स्थिति सर्वत्र दिसत आहे. आपल्या देशांतील टोरी पक्षानें स्वातंत्र्यकारणाला सतत विरोध केला आहे. स्वातंत्र्ययुद्धाला विरोध करणें म्हणजे पर्यायानें देशद्रोही म्हणून फांसावर लटकणें असा जर कायदा असता तर या टोरीपक्षीयांची विरोध करण्याची काय हिंम्मत होती? ब्रिटिश सैनिक आणि अमेरिकेचे जनता-सैनिक या दोहोंतील फरक ध्यानांत घेतला पाहिजे. इंग्लंडचे एखाद्या राष्ट्राशीं युद्ध चाललें असतां पकडले गेलेले ब्रिटिश सैनिक फक्त युद्ध कैदीच ठरतात. म्हणजे त्यांना त्यांचें स्वातंत्र्य गमवावें लागतें. परंतु शस्त्रधारण करणारे अमे-

रिकन सैनिक जर पकडले गेले तर राजद्रोहाच्या आरोपाखालीं त्यांची कत्तल करण्यांत येते.

आपलें सर्व शहाणपण गृहीत धरून सुद्धां मला असें म्हणावेंसें वाटतें कीं आपल्या कार्यपद्धतींत कांहीं ढोबळ दोष आहेत; आणि त्यामुळें मतामताच्या गलबल्याला उत्तेजन मिळतें. वसाहतींचें ऐक्य असावें तेवढें मजबूत पायावर उभारलेलें नाहीं. आणि म्हणूनच आपण आजचें काम आजच केलें नाहीं तर ना धड स्वातंत्र ना धड तह अशा विचित्र परिस्थितींत आपण जाऊन पडूं. राजा आणि त्याचे हस्तक अमेरिकन जनतेंत दुफळी निर्माण करण्याचा कसोशीनें प्रयत्न करीत आहेत; आणि आपलीं कांहीं वर्तमानपत्रें खोट्यानाट्या बातम्या छापून या प्रयत्नांना साथ देत आहेत. कांहीं महिन्यांपूर्वी न्यूयॉर्क येथील दोन वृत्तपत्रांत एक दांभिक आणि असत्यानें भरलेलें बातमीपत्र प्रसिद्ध झालें होतें. अशा तऱ्हेचा मजकूर पाहिला म्हणजे तो प्रसिद्ध करणारीं माणसें म्हणजे एक तर भोळसर तरी आहेत किंवा अप्रामाणिक तरी आहेत असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं.

आपापल्या स्वार्थावरच नजर ठेवून तहाची भाषा बोलणें सोपें आहे; परंतु तहाची भाषा बोलणाऱ्या या लोकांनीं ही गोष्ट किती बिकट आहे, त्याचप्रमाणें या प्रश्नावर अमेरिकन जनतेंत दुफळी माजणें किती धोक्याचें आहे याचा विचार कधीं केला आहे काय? ज्यांनीं स्वातंत्र्यासाठीं, आपल्या देशासाठीं सर्वस्व पणाला लावलें अशा शेंकडों सैनिकांच्या भूमिकेंत हीं माणसें कधीं गेलीं आहेत काय? जर तह करण्याचें हें मवाळ धोरण स्वार्थैकवृत्तींतूनच निर्माण झालें असेल तर या माणसांना आज ना उद्यां आपण घोडचूक केलेली आहे याची जाणीव झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

कांहींजण असें म्हणतात कीं सतराशें त्रेसष्ट सालीं ब्रिटिशांनीं वसाहतींना जे अधिकार दिले होते तसे आतां पुनः द्यावे. याला माझें उत्तर असें आहे कीं ते अधिकार आतां आम्हांला देणें ब्रिटिशांच्या आटोक्यांतलें नाहीं—आणि ब्रिटिश तसे देणारहि नाहींत. परंतु ब्रिटिशांनीं हे अधिकार आपल्याला दिले असें जरी आपण वादापुरतें गृहीत धरून चाललों तरी प्रश्न उत्पन्न होतो तो असा कीं विश्वासास संपूर्णपणें अपात्र असें ब्रिटिश सरकार आपला शब्द कायमचा पाळील अशी हमी कोण देऊं शकेल? उद्यां नवें पार्लमेंट आलें कीं हे अधिकार देणें

चुकीचें होतें असा ठराव पास करून पुन्हां सर्व अधिकार काढून घेईल! अशा परिस्थितींत अमेरिकन जनतेला सुटकेचा मार्ग उरेल काय? जगांतील इतर राष्ट्रं आपलीं गाऱ्हाणीं ऐकून घेणार नाहींत. राजा आपली बाजू फक्त तोफांनींच मांडील; न्यायाच्या तलवारीनें नव्हे. दडपशाहीच्या तलवारीनें तो आपलें तोंड बंद करील. आणि आज केवळ त्रेसष्ट सालांतील अधिकार मिळून भागणार नाहीं. त्या अधिकारांबरोबरच ब्रिटिशांनीं तेव्हांपासून आतांपर्यंत अन्यायानें बेचिराग केलेलीं आमचीं घरेंदारें पुन्हां उभारून द्यावीं लागतील; हजारों लोकांना नुकसानभरपाई द्यावी लागेल; आणि स्वसंरक्षणासाठीं आम्हीं उभारलेल्या कर्जाची फेड करावी लागेल. हें कांहींहि न करतां जर नुसतेंच त्रेसष्ट सालांतील अधिकार आमच्या हातांत आले तर त्यांचा उपयोग काय? तेव्हां होती त्याच्यापेक्षां आपली स्थिति सहस्रपटींनीं खालावली आहे असेंच तुम्हांला आढळून येईल. अशा तऱ्हेची विनंति आम्हांला जर एक वर्षापूर्वी करण्यांत आली असती तर कदाचित् जनमनावर तिचा परिणाम झाला असता. परंतु ती परिस्थिति आतां नष्ट झालेली आहे. तीर सुटला आहे—आणि तो परत मागें घेणें शक्य नाहीं.

एकादा कायदा रद्द करून घेण्यासाठीं युद्ध पुकारणें हें ईश्वरी कायद्याला धरून नाहीं. त्याचप्रमाणें शस्त्राच्या बळावर एकाद्याला आपलें म्हणणें मान्य करायला लावणें हेंहि माणुसकीच्या नियमांना सोडून आहे. या दोनहि गोष्टींसाठीं युद्ध पुकारणें सर्वथैव चुकीचें आहे—क्षुद्र कारणासाठीं रक्तपात करणें हा मानवी जीवनाचा क्रूर अपव्यय आहे. ब्रिटिशांनीं आमचीं घरेंदारें पेटवलीं आहेत, आमची संपत्ति त्यांनीं लुटली आहे; आमच्या देशांत त्यांनीं यादवी निर्माण केलेली आहे,—यासाठीं तुम्ही ब्रिटिशांच्या विरुद्ध शस्त्रधारण करीत असाल तर तें विवेक—नीतीच्या दृष्टीनें सर्वथा समर्थनीय ठरेल. खरें म्हणजे या कारणासाठीं ज्या क्षणीं तुम्ही ब्रिटिशांविरुद्ध शस्त्र उपसलें त्याच क्षणीं तुम्हीं ब्रिटिशांचें वर्चस्व झुगारून दिलें. आणि जेव्हां स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकण्यासाठीं ब्रिटिशांनीं तुमच्यावर पहिली गोळी झाडली त्याच वेळीं अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाची नांदी झडली. या विचारांत कसलीहि विसंगति नाहीं. व्यक्तिगत स्वार्थ किंवा आकांक्षा यांतून हा विचार उद्भवलेला नाहीं. गेल्या कांहीं दिवसांत अशा कांहीं घटना घडल्या कीं अपरिहार्यपणें असा विचार करणें भाग पडतें. अमेरिकन जनता या घटनांना मुळींच जबाबदार नव्हती.

हाच मुद्दा मी आणखी कांहीं सूचना मांडून पुरा करणार आहें. आपलें स्वातंत्र्य आपल्याला तीन मार्गांनीं मिळूं शकेल. या तीन मार्गांपैकीं कोणता तरी एक मार्ग अमेरिकेला अपरिहार्यपणें स्वीकारावाच लागेल. हे तीन मार्ग म्हणजे अमेरिकन कॉंग्रेसमध्यें सनदशीर ठराव किंवा सैन्याचें बंड किंवा लोकांचा क्षुद्ध उठाव. यांपैकीं सैन्याच्या बंडाबाबत असें म्हणतां येईल कीं सगळेच सैनिक अमेरिकेचे नागरिक असतीलच असें नाहीं. तसेंच, प्रक्षुब्ध झाल्यामुळें लोकहि सुजाण आणि विवेकी असतीलच असें म्हणतां यावयाचें नाहीं. आणि म्हणूनच अमेरिकन कॉंग्रेसच्या सनदशीर प्रयत्नांतूनच स्वातंत्र्य मिळविणें योग्य होय. या मार्गानें स्वातंत्र्य मिळविल्यावर जगांतील अत्यंत शुद्ध आणि उदात्त राज्य-घटना निर्माण करतां येईल. अमेरिकन जनता एक नवें जग विर्माण करूं शकेल. मानवजातीच्या आरंभापासून तों आतांपर्यंत अशी सुवर्ण–संधि कधीं चालून आलेली नाहीं. नव्या जगाचा जन्मकाळ अगदीं जवळ येऊन ठेपलेला मला दिसत आहे. लवकरच सर्व युरोपखंडाइतकी लोकसंख्या असलेली अमेरिका पारतंत्र्याच्या शृंखला तोडून स्वतंत्र्य होणार आहे. हा विचार केवढा भव्योदात्त आहे! अशा क्षणीं स्वार्थापोटीं स्वातंत्र्याला विरोध करणाऱ्या कांहीं क्षुद्र लोकांची बटबट किती हास्यास्पद व तिरस्करणीय वाटते!!

ही सोन्यासारखी संधि जर आपण हातची दवडली आणि आपल्याला नको असलेल्या मार्गानें जर स्वातंत्र्य आलें तर त्याचा दोष आपल्याकडे किंवा स्वातंत्र्याला विरोध करणाऱ्या विचारशून्य लोकांकडे जाईल. स्वातंत्र्य कां पाहिजे याचीं कारणें जाहीर-रीत्या सांगितलीं जाण्यापेक्षां प्रत्येक व्यक्तीनें स्वतःच विचार करून तीं शोधून काढणें हेंच श्रेयस्कर होय. आपण स्वतंत्र होऊं किंवा नाहीं या विषयींची चर्चा आतां पुरे झाली. स्वातंत्र्य मिळवावयाचें हें ठरलेंच. हें स्वातंत्र्य योग्य मार्गानें कसें मिळवितां येईल, त्याचा पाया कसा मजबूत करतां येईल या गोष्टीकडेच आपण लक्ष दिलें पाहिजे. अशा तऱ्हेच्या प्रयत्नांना अजून नीटशी सुरवात झालेली नाहीं म्हणून आपल्याला अस्वस्थता वाटली पाहिजे. दर दिवशीं स्वातंत्र्याची आवश्यकता आपल्याला तीव्रतेनें भासत आहे. टोरी पक्षाच्या लोकांनीं सुद्धां (असे लोक आपल्यांत शिल्लक असलेच तर!) स्वातंत्र्ययुद्धाला सर्वतोपरी मदत केली पाहिजे. स्वातंत्र्यकारणासाठीं तात्पुरती कॉंग्रेस नेमली गेल्यामुळें लोकांचा क्षोभ बराचसा शांत झाला. नाहींतर या लोकक्षोभाला स्वातंत्र्य–द्वेष्टे टोरी खात्रीनें

वळीं पडले असते. टोरी पक्षाच्या लोकांना आपली ही सुरक्षितता कायम टिकवायची असेल तर सुव्यवस्थेवर आधारलेले अमेरिकन जनतेचें स्वतंत्र सरकार स्थापण्यास त्यांनीं मदत केली पाहिजे. व्हिग् पक्षाला येऊन मिळण्याइतकें शहाणपण जरी त्यांच्यांत नसलें तरी स्वातंत्र्याची इच्छा बाळगण्याइतकी दूरदृष्टि तरी त्यांच्यापाशीं असावयास हरकत नाहीं.

तात्पर्य, स्वातंत्र्याची इच्छा हा अमेरिकन जनतेला एकत्र बांधणारा एकमेव दुवा आहे. स्वातंत्र्य आलें म्हणजे ब्रिटिश सरकारच्या दुष्ट आणि लबाड कारवायांना कायद्यानेंच पायबंद बसेल. स्वातंत्र्य प्राप्त झालें कीं एक राष्ट्र म्हणून आपण ब्रिटनच्या दर्जाला जाऊन पोहचूं. एकदां ब्रिटनच्या वर्चस्वाखालीं असलेले बंडखोर प्रजाजन या नात्यानें आपण केलेल्या वाटाघाटींनीं ब्रिटिशांचा अहंकार दुखावला जाईल परंतु समानदर्जाच्या भूमिकेवरून आपण केलेल्या वाटाघाटी मात्र ब्रिटिश सरकार तत्परतेनें ऐकून घेईल. स्वातंत्र्य प्राप्तीच्या बाबतींत आपण चालविलेल्या चालढकलीमुळें अमेरिका बळकावून बसण्याची ब्रिटिशांची आशा दृढ होत आहे; आणि आपल्या कचखाऊपणामुळें युद्धाचें वातावरण निष्कारण पसरत चाललें आहे. ब्रिटिशांनीं आपलीं गाऱ्हाणीं दूर करावीं म्हणून आपण त्यांच्याशीं असलेला आपला व्यापार बंद केला परंतु त्यामुळें कांहींच फायदा झाला नाहीं. आतां आपण दुसऱ्या बाजूनें प्रयत्न केला पाहिजे. आपण आपलीं गाऱ्हाणीं स्वपराक्रमानें कायमचीं दूर करूं; आणि त्यानंतर ब्रिटिशांशीं खुला व्यापार करूं. ब्रिटनमधील व्यापारी आणि समंजस लोक नेहमींच आपल्याला पाठिंबा देतील. कारण व्यापाराचा संपूर्ण अभाव आणि त्यांत पुनः युद्धाची भर अशा वातावरणापेक्षां कोणत्याहि माणसास शांततेचा आणि व्यापारी भरभराटीचा काळ हवा असणें स्वाभाविकच आहे. आपली ही शर्त जर ब्रिटनला मान्य नसेल तर आपण इतर राष्ट्रांना आवाहन करूं.

माझें म्हणणें मीं याप्रमाणें मांडलें आहे. या पुस्तिकेची पहिली आवृत्ति प्रसिद्ध झाली तेव्हां माझीं हीं मतें खोडून टाकण्याचा कोणीच प्रयत्न केला नाहीं. याचा अर्थ असा कीं एकतर माझीं मतें खोडून टाकणें तरी शक्य नाहीं किंवा माझ्या मतांच्या मागें बहुसंख्य जनता उभी असल्यामुळें हीं मतें खोडून टाकण्याची विरोधकांना हिंमत होत नाहीं. म्हणूनच मी असें म्हणतों कीं एकमेकांकडे संशयी नजरेनें पाहण्यापेक्षां आपण सगळे एकत्र येऊं या आणि

स्नेहानें एकमेकांचें हात हातांत धरून दुफळीचीं आणि मतभेदांचीं भुतें गाडून टाकूं या. व्हिग् आणि टोरी हे दोन्ही पक्ष नकोत. स्वतंत्र अमेरिकेंतील सज्जन नागरिकांचा, मोकळ्या मनाच्या आणि निश्चयी मित्रांचा, मानवजातीच्या हक्कांसाठीं लढण्यास सदैव सिद्ध असलेल्या वीरांचा आवाज तेवढाच ऐकूं येऊं द्या. बाकी सर्व भेद आतां लयाला गेले पाहिजेत.

# अमेरिकेंतील आणीबाणीचा काळ

सध्यांचा काळ माणसांच्या मोठ्या कसोटीचा काळ आहे. हवा प्रसन्न असतांना, सर्व परिस्थिति अनुकूल असतांना, देशासाठीं लढावयास तयार असलेले सैनिक भिऊन आपला पाय मागें घेतील अशी सध्यां परिस्थिति आहे. परंतु अशा आणीबाणीच्या वेळीं जो सैनिक तग धरून राहील तोच हजारों स्त्री-पुरुषांचा दुवा घेईल. सैतानाप्रमाणेंच जुलमी राजवटही जाईल. तिचा सहजा सहजीं निःपात करता येत नाहीं. परंतु संघर्ष जेवढा बिकट तेवढेंच यशहि अधिक उज्ज्वल हेंहि खरें आहे. एकादी गोष्ट विशेष प्रयत्नावांचून आपल्याला मिळाली म्हणजे तिचें मोल आपल्याला कळत नाहीं. एखादी गोष्ट जेवढी दुर्मिळ तेवढें तिचें मूल्य माणसाला अधिक वाटतें. ईश्वराला माणसाची ही वृत्ति ठाऊक आहे. म्हणूनच कोणत्या गोष्टीचें मोल कसें करावें हें ईश्वराला नेमकें ठाऊक असतें. प्रयत्नांची पराकाष्ठा केल्याशिवाय ईश्वर माणसाला स्वातंत्र्याची प्राप्ति होऊं देत नाहीं याचें कारण हेंच आहे. आज ब्रिटिश सरकार सैन्यबळावर अमेरिकन जनतेला तुडवीत आहे. तुम्हांला हवें तसें वेठीस धरण्याचा आम्हांस अधिकार आहे असें ब्रिटिश सरकार अमेरिकन जनतेला मुजोरीनें सांगत आहे. याला जर गुलामगिरी म्हणत नसाल तर मग ह्या पृथ्वीतलावर गुलामगिरी नांवाची गोष्टच नाहीं असें म्हणावें लागेल. माणसानें दुसऱ्या माणसावर अशा तऱ्हेची सत्ता आहे असें म्हणणें हेंच पापमूल आहे. कारण अशा तऱ्हेच्या सार्वभौम सत्तेचा मान फक्त ईश्वराचाच आहे.

स्वातंत्र्याची घोषणा अमेरिकेनें जरूरीपेक्षां अधिक लवकर केली किंवा काय हा मुद्दा चर्चिण्याची मला आवश्यकता नाहीं. आजच्या अगोदरच आठ महिने जरी ही घोषणा केली गेली असती तरी बरें झालें असतें असें माझें मत आहे. गेल्या हिंवाळ्याचा आपण हवा तसा उपयोग करून घेतला नाहीं— पारतंत्र्यामुळें तसा उपयोग करून घेणें शक्य नव्हतें हा सगळा दोष आपलाच आहे तो दुसऱ्याच्या अंगावर ढकलण्यांत हंशील नाहीं. सध्यां जनरल होवेनें

आपल्या सैन्यानिशीं धूमाकूळ घालण्यास प्रारंभ केला आहे हें खरें. जर्सी येथील लोकांनीं ज्या हिंमतीनें उठाव केला होता तसा उठाव आपण केला असता तर होवेला आपण तत्काळ मागें हटवूं शकलों असतों. तरीहि लवकरच थोड्याशा निश्चयानें ती हिम्मत प्राप्त होईल.

इतर माणसें असतात तसा मीहि थोड्या प्रमाणांत अंधश्रद्धाळु आहे. परंतु माझ्या मनांत गुप्तपणें अशी श्रद्धा वास करीत आहे कीं समंजसपणाचे सर्व मार्ग अवलंबून, युद्ध आणि संहार टाळण्याचा मनःपूर्वक प्रयत्न केलेल्या अमेरिकन जनतेला सर्वशक्तिमान परमेश्वर विनाशाच्या खाईंत कधींहि लोटणार नाहीं. या भूतलावरचें आपलें राज्य परमेश्वरानें सैतानाच्या हातीं सोपविलेलें आहे असें मानण्याइतका मी अश्रद्ध मुळींच नाहीं. एकाद्या खुनी, वाटमाऱ्या करणाऱ्या दरवडेखोराची योग्यता असलेला ब्रिटनचा राजा कोणत्या बळावर परमेश्वराकडे मदतीची याचना करूं शकेल तेंच मला समजत नाहीं.

एकाद्या देशांमध्यें घबराटीचें वादळ केव्हां कसें घुमेल हें सांगतां येत नाहीं. प्रत्येक कालखंडांत अनेक राष्ट्रांनीं ही गोष्ट अनुभवली आहे. फ्रेंचांचें आरमार आक्रमण करून येत असल्याचें दिसतांच हिंवताप भरलेल्या माणसाप्रमाणें ब्रिटिश थरथर कांपू लागले; आणि पंधराव्या शतकांत इंग्लिश सैन्यानें फ्रेंच सैन्याला लोळवलें असतांहि जेव्हां जोन ऑफ आर्क ह्या बाईपासून प्रेरणा देऊन मरतां मरतां वांचलेले फरेंच सैन्य पुन्हां शौर्यशालीपणानें उभें राहिलें तेव्हां ब्रिटिशांना पळतां भुई थोडी झाली. जोन ऑफ आर्क प्रमाणेंच जर्सी येथील एकादी वीरकन्या दुःख आणि अन्याय भोगणाऱ्या आपल्या असंख्य बांधवांना स्वातंत्र्याची प्रेरणा देईल आणि आपला प्रदेश उध्वस्त करणाऱ्यांना मागें हटवील तर आमच्यावर परमेश्वराचे केवढे उपकार होतील! परंतु राष्ट्रावर अशा तऱ्हेचा आणीबाणीचा प्रसंग कोसळल्यावर जसें त्या राष्ट्राचें नुकसान होतें तसे त्याचे कांहीं फायदेहि होतात. जनतेचें मत थोड्याशा सवयीनंतर अशा दुर्धर प्रसंगास टक्कर देण्यास तयार होतें. पण याहूनहि विशेष म्हणजे अशा प्रसंगीं दांभिक कोण आहेत आणि देशहिताची खरी कळकळ कोणाला आहे हें उघड होतें. ज्याप्रमाणें एकादा खुनी मनुष्य खून झालेल्या माणसाचें भूत दिसतांच चळचळा कांपूं लागतो तशीच या लुच्या राष्ट्रद्रोह्यांची गत होते.

फोर्टली येथील सैन्याबरोबर मी कांहीं काळ होतों. या सैन्याबरोबरच मी

पेन्‌सिल्व्हानियाच्या हद्दीपर्यंत कूच करीत गेलों होतों. त्यामुळें युद्धाची प्रत्यक्ष परिस्थिति काय असते हें युद्धभूमीपासून दूर राहाणाऱ्या माणसांपेक्षां मला चांगलेंच माहीत आहे. हडसन् नदी आणि हॅकन्सॅक यांच्या मधील निरुंद प्रदेशांत आम्ही अडकलों होतों. आमचें सैन्यबळ अगदीं अपुरें होतें. होवेच्या सैन्याच्या एकचतुर्थांश सैन्यहि अमच्यापाशीं नव्हतें. संरक्षणासाठीं आम्ही जर किल्ल्याचा आश्रय घेतला असता तर आमच्या मदतीला कोठूनहि सैन्याची मदत येण्याची आशा नव्हती. आमचा दारूगोळा व शस्त्रास्त्रें यांचा सांठा होवे जर्सीवर हल्ला करणार आहे अशा समजुतीमुळें आम्हीं हलविला होता. कारण त्या परिस्थितींत ली या किल्ल्याचा आम्हाला कांहींच उपयोग होण्यासारखा नव्हता. अशा तऱ्हेच्या किल्ल्यांचा उपयोग ज्या स्थळाचें शत्रूपासून आपल्याला रक्षण करावयाचें असेल त्या स्थळाची टेहळणी करण्यासाठीं म्हणून होतो. अर्थातच हा उपयोग तात्पुरता असतो. वीस नोव्हेंबरच्या सकाळीं ली या किल्ल्यांत आमची परिस्थिति ही अशी होती. इतक्यांत एका सैन्याधिकाऱ्यानें अशी बातमी आणली कीं दोनशें नौकांमधून शत्रूचें सैन्य सात मैलांवर येऊन थडकलें आहे. मेजर जनरल ग्रीन हा ली किल्ल्याचा मुख्य होता. त्यानें सर्व सैनिकांना सुसज्ज राहाण्याचा हुकुम दिला. आणि हॅकनसॅक येथें (पाण्यामधून हें अंतर सहा मैलांचें आहे) जनरल वॉशिंगटनला तांतडीचा निरोप पाठविला. आम्ही आणि शत्रू यांच्यामधें असलेल्या नदीच्या पुलावर ताबा मिळविणें हा आमचा मुख्य उद्देश होता. जनरल वॉशिंग्टन पाऊण तासाच्या अवधींत येऊन पोंहचला; आणि सैन्याचे नेतृत्व पत्करून तो पुलाच्या दिशेनें निघाला. या जागीं चकमक घडेल अशी अपेक्षा होती. परंतु तसें कांहीं झालें नाहीं. आमचें बरेचसें सैन्य पुलावरून गेलें. कांहीं बोटीनें गेलें आणि उरलेलें दलदलीच्या जागेतून मजल दर मजल करीत हॅकनसॅक येथें पोंहचलें व तेथें त्यानें नदी ओलांडली. या धांदलींत गाड्यांतून जितकें सामान भरून घेणें शक्य होतें तितकें घेतलें बाकीचें टाकून द्यावें लागलें. जर्सी किंवा पेनसिल्वानिया येथून सैन्याची कुमक येईपर्यंत शत्रूला कसेंबसें थोपवून धरावयाचें असें आमचें धोरण होतें. नेवार्क येथें आम्ही चार दिवस राहिलों. इथें जर्सीहून सैन्याची कुमक मिळाली. शत्रू आमच्यावर चाल करून येत आहे अशी आम्हांला बातमी कळली तेव्हां आम्ही दोन वेळां पुढें जाऊन आमचें सैन्यबळ कमी असूनहि हल्ला चढविला. माझ्या मतें होवे यानें एक फार

मोठी चूक केली. स्टेटन बेटावरून ॲम्बॉयमधून त्यानें आमच्यावर हल्ला केला असता तर ब्रन्स्विक् येथील आमच्या युद्ध साहित्याचा सांठा त्याला सहज हस्तगत करतां आला असता आणि आम्हांला पेन्सिल्व्हनियांत प्रवेश करून देणें शक्य झालें असतें. सैतानाच्या सामर्थ्याला मर्यादा असते हेंच खरें.

डेलवेअर येथें जी आम्ही माघार घेतली तिचा सर्व तपशील येथें मी देत बसत नाहीं. एवढेंच सांगतों की आमच्या सैनिकांनीं आणि अधिकाऱ्यांनीं या वेळच्या हालअपेष्टा अत्यंत धीरोदात्तपणें सहन केल्या. त्यांच्या मनांत एकच आशा होती. ती ही कीं संतापानें खवळलेली अमेरिकन जनता उठाव करून आपल्या मदतीस येईल आणि आपण शत्रूच्या सैन्यास पाणी पाजूं. वॉल्टेअरनें एके ठिकाणी असें म्हटलें आहे कीं विल्यम राजाची सर्व शक्ति आणि कर्तृत्व संकटांचीं परिसीमा झाल्यावरच झळाळून दिसत असे. जनरल वॉशिंग्टनच्या बाबतींतहि असें दिसत असे. किरकोळ अडचणींचा, संकटांचा, अशा माणसांच्या मनाला स्पर्शच होत नसे; परंतु जेव्हां तो स्पर्श होतो तेव्हां हे वीर पुरुष धैर्याचे मेरु बनतात. परमेश्वराच्या कृपेनें अशा माणसांना कितीहि चिंता असल्या तरी सदैव प्रसन्न रहाणारें मन व आरोग्य लाभलेलें असतें.

अमेरिकेंतील सद्यःपरिस्थितीविषयीं आतां मला कांहीं विचार मांडावयाचे आहेत. पहिला प्रश्न निर्माण होतो तो असा कीं शत्रुसैन्यानें न्यू इंग्लंडचा प्रदेश सोडून मध्य प्रदेशांतच आपला तळ कां ठोकला? याचें उत्तर सोपें आहे. न्यू इंग्लंड मध्यप्रदेशासारखा टोरी प्रक्षाच्या लोकानीं गजबजलेला नाहीं हेंच याचें कारण होय. टोरी लोक किती धोकेबाज आहेत हें मीं अनेक वेळां दाखवून दिलेलें आहे. या लोकांच्या मूर्खपणाच्या किंवा दुष्टपणाच्या वेदीवर राष्ट्रहिताचा बळी देणें चुकीचें होईल. आतां काळच असा आला आहे कीं त्यांनीं किंवा आम्ही एकमेकांचीं मतें तरी बदलली पाहिजेत किंवा कोणी तरी एकानें हार खाल्ली पाहिजे. टोरी पक्षाची व्यक्ति कशी असते? परमेश्वरा! टोरी पक्षाचा माणूस कसा असतो हें काय सांगावें बरें! माझ्याबरोबर व्हिग् पक्षाचे. शंभर लोक असले तरी मी टोरींच्या एक हजारांच्या सैन्यावर बेधडक चाल करून जाईन. गुलामी वृत्ति हाच टोरीमताचा पाया असल्यामुळें स्वार्थानें झपाटलेला प्रत्येक टोरी नामर्द असतो. टोरी पक्षीय क्रौर्य दाखवील परंतु शौर्य दाखविणें त्याला शक्य होणार नाहीं.

मतभेदाच्या दुर्लंध्य तट आम्ही आणि टोरी यांच्यांत निर्माण होण्यापूर्वी आम्हीं

एकत्र येऊन विचार करणें सोईचें ठरेल. टोरी आपल्या वागणुकीमुळें शत्रूला घरांत येण्यास आमंत्रण देत आहेत. परंतु ह्या हजारों टोरींपैकीं एकाचीहि उघडपणें शत्रूला मिळण्याची हिम्मत नाहीं. हे टोरी लोक अमेरिकेशीं द्रोह करीत आहेत आणि होवेची फसवणूक करीत आहेत. खांद्यावर बंदुका घेऊन टोरी पक्षीयांनीं आपल्याला येऊन मिळावें अशीच होवेची अपेक्षा आहे. परंतु हे टोरी लोक मात्र नुसतीच बाष्कळ बडबड करीत आहेत. होवेला बडबड्या टोरींची भरती नको आहे : त्याला हवे आहे प्रत्यक्ष लढणारे सैनिक.

क्षुद्र वृत्तीच्या माणसाबद्दल जेवढा म्हणून तिटकारा मनांत निर्माण होणें शक्य आहे तेवढा तिटकारा एका टोरी माणसाबद्दल माझ्या मनांत एकदां निर्माण झाला होता. त्याचें असें झालें कीं एकदां प्रसिद्ध नागरिक असलेला एक टोरी मला भेटला. या माणसाची ॲम्बॉय येथे एक खाणावळ आहे. मला तो भेटला तेव्हां खाणावळीच्या दाराशीं आठनऊ वर्षांच्या एका देखण्या मुलाचा हात धरून तो उभा होता. त्याची माझी बातचीत झाली. बोलतां बोलतां मोकळेपणानें तो मला म्हणाला, "मी जिवंत असे पर्यंत तरी देशांत शांतता असली पाहिजे—मग पुढचें पुढें." कोणत्याहि बापाला न शोभणारे असे ते नामर्द उद्गार होते. अमेरिकेंत राहाणारा कोणताहि वृत्तीनें उदार असलेला आणि स्वातंत्र्ययुद्ध अपरिहार्य आहे असें मानणारा अमेरिकन मनुष्य असेंच म्हणाला असता कीं, "संघर्ष अटळ आहे ना? मग तो मी जीवंत असेपर्यंतच होऊन जाऊं द्या. म्हणजे माझ्या मुलबाळांच्या काळांत तरी शांतता नांदेल." हा एकच विचार प्रत्येक अमेरिकन माणसाला कर्तव्यतत्पर करण्यास पुरेसा आहे. या जगांत अमेरिकेसारखें दुसरें कोणतेंहि राष्ट्र भाग्यवान असेल असें मला वाटत नाहीं. कलहव्याप्त अशा इतर जगापासून अमेरिका दूर आहे; आणि व्यापाराशिवाय तिचा या कलहशील राष्ट्रांशीं फारसा संबंधच नाहीं. तत्त्वनिष्ठा कोणती आणि भावनाविवश विचार कोणता हें मी नेमकें जाणतों आणि म्हणूनच मी विश्वासपूर्वक तुम्हांला सांगतों कीं ईश्वराच्या अस्तित्वावर माझी जेवढी श्रद्धा आहे तेवढीच श्रद्धा अमेरिकेचें स्वातंत्र्य अटळ आहे ह्या गोष्टीवरहि आहे. परकीय सत्तेचें जोखड झुगारल्याशिवाय अमेरिका सुखी होणार नाहीं ही दगडावरची रेघ आहे. अमेरिका स्वतंत्र होईपर्यंत ठिकठिकाणीं सारखीं युद्धें पेटत राहातील. यांत अंतिम विजय अमेरिकेचाच होईल. कारण स्वातंत्र्याची मशाल जरी कांहीं काळ मंदाव-

अनुक्रम.... २२५३८ .......... दि: १०८१
७०८०

 नों: दि: ३७/८

लेली दिसली तरी तिच्या मागील आकांक्षांचे निखारे कधींहि विझत नसतात.

सामर्थ्याच्या बाबतींत अमेरिका कधींहि मागें नव्हती. खरा प्रश्न होता तो हें सामर्थ्य कसें उपयोगांत आणावें हाच. कोणतेंहि राष्ट्र शहाणपण चुटकीसरसें शिकत नसतें. तेव्हां एखाद्या कार्यास आरंभ करतांना आपल्या कांहीं चुका होणें स्वाभाविक आहे. कोमल भावनांच्या अतिरेकामुळें सैन्य उभें करण्याची आवश्यकता अजूनपर्यंत आपल्याला भासलीच नाहीं. तात्पुरत्या उभ्या केलेल्या नागरिक सैन्यावरच आपण आपली गरज भागविली. गेल्या उन्हाळ्यांतील अनुभवापासून आपण खूप शिकलों आहों. आपल्या नागरिक सैन्यानें पराक्रम गाजवून शत्रूच्या हल्ल्याला पायबंद घातला हें विशेष होय. ईश्वराच्या कृपेनें आपलें सर्व सैन्य एकत्र होत आहे. किरकोळ लढायांना तोंड देण्यास आपलें नागरिक—सैन्य अप्रतिम आहे याविषयीं मला कधींच शंका नव्हती. परंतु या बरोबरच मोठ्या युद्धाच्या दृष्टीनें हें सैन्य तोकडें आहे ही गोष्टहि ध्यानांत घेतली पाहिजे. होवे बहुधा या शहरावर हल्ला करील असें वाटतें. डेलावेअरच्या या भागांत जर त्यानें हार खाल्ली तर तो पुनः डोकें वर काढीत नाहीं. समजा त्याला जय आला तरीहि आपल्या उद्दिष्टाला मुळींच बाध येत नाहीं. तो हरला तर त्याचें सर्वस्व जाईल. आपण हरलों तर आपलें मात्र मर्यादित नुकसान होईल. बरें, होवेची सरशी होतेच आहे असें दिसले तर वसाहतींतून आपल्या लढणाऱ्या सैन्याच्या मदतीला चोहोंकडून कुमक होईल. या चौफेर हल्ल्याला तो पुरा पडूं शकणार नाहीं. होवे हा टोरी लोकांचा सर्वांत मोठा शत्रू आहे असें माझें प्रामाणिक मत आहे. त्याच्या-मुळेंच टोरींच्या या देशांत युद्धाचा वणवा पेटला आहे. तो नसता तर स्वातंत्र्य युद्धाला विरोध करणाऱ्या टोरींनीं आपण होऊन युद्धाची कधींच तयारी केली नसती. होवे यास त्याच्या सैन्यानिशीं जर आपल्या भूमीवरून हाकलून दिलें तर आपल्या देशांत व्हिग आणि टोरी हा संघर्षच शिल्लक रहाणार नाहीं. परंतु होवे यास टोरी पक्षीयांनीं आज जर उत्तेजन दिलें किंवा त्याला मदत केली तर कदाचित् होवेच्या सैन्याचें एखादें पाऊल पुढें पडेल. परंतु लवकरच होवेच्या सैन्याची अमेरि-केच्या भूमीवरून हाकालपट्टी झाल्याशिवाय राहाणार नाहीं. आणि मग अमेरिकन कॉंग्रेस राष्ट्रद्रोही टोरी लोकांची सर्व मालमत्ता जप्त करून युद्धांत ज्या स्वातंत्र्य-सैनिकांचें नुकसान झालें आहे त्यांची भरपाई करून देईल. या टोरींची मालमत्ता जप्त केली तर अमेरिका दोन वर्षेपर्यंत सहज युद्ध लढवूं शकेल. टोरींची

हाकालपट्टी झाल्यास अमेरिका सुटकेचा निःश्वास टाकील. हा टोरी लोकांवर सूड उगविला आहे असें कोणीहि म्हणूं नये. कारण वास्तविक अमेरिकन जनतेनें त्यांच्या बाबतींतला आपला तीव्र तिरस्कार अत्यंत संयमानें व्यक्त केला आहे हेंच सत्य आहे. हा तिरस्कार व्यक्त करणाऱ्या लोकांच्या मनांत असें करण्यांत राष्ट्रहिताखेरीज दुसरी कसलीहि भावना नाहीं आणि या राष्ट्रहितासाठीं स्वातंत्र्यप्राप्ति अनिश्चित असूनहि त्यांनीं आपलें सर्वस्व पणाला लावलें आहे. दुःखपूर्ण शब्द ऐकलें कीं स्वाभाविकच माणसाचे डोळे ओलावतात ही गोष्ट खरी. परंतु ज्यांनीं पूर्वग्रहांनीं आपलें हृदय लोखंडासारखें बनविलें आहे अशांना वादविवादानें स्वातंत्र्याची महती पटवून देणें कधीं शक्य आहे काय? त्यांच्या पाषाणहृदयावर या शब्दांचा काडीमात्रहि परिणाम होणें शक्य नाहीं.

या टोरी लोकांना सोडून देऊन मी आतां जे अमेरिकेच्या स्वातंत्र्यासाठीं ठामपणें उभे राहिले अशा लोकांकडे वळतों. त्यांच्याविषयीं माझ्या मनांत उदंड स्नेहभावना आहे. या सर्व सैनिकांना, या प्रांतांतल्या किंवा त्या प्रांतांतल्याच सैनिकांना नव्हे तर देशांतल्या सर्व सैनिकांना माझें आवाहन आहेः वीर हो, उठा आणि खडे व्हा. प्रगतीच्या चक्राला तुमच्या खांद्यांचें बळ द्या. आपल्याला जें मिळवावयाचें आहे तें इतकें महान् आहे कीं त्याच्यासाठीं जरी सर्वस्वाचें बलिदान केलें तरी तें थोडेंच आहे. सर्व जगाला हें कळूं द्या कीं जेव्हां चहूंकडून विपदांचे पर्वत कोसळत होते, साऱ्या आशा खुरटल्या होत्या तेव्हां आपण सगळे एकत्र आलों आणि न डगमगतां अडचणींना तोंड दिलें; शत्रूला मागें हटविलें. हे वीरांनो, जे हजारो लोक धारातीर्थी पडले त्यांच्या नांवानें अश्रु ढाळीत न बसतां पुन्हा हजारोंच्या संख्येनें समरांगणांत खडे व्हा. परमेश्वरावर भोळसरपणानें हवाला टाकून कर्तव्यमूढ होऊन बसूं नका संकटाला तोंड देण्यासाठीं जो मनुष्य आपली कंबर कसतो त्याच्याच मदतीला ईश्वर धावून येतो हें लक्षांत ठेवा. तुम्ही कोठें राहातां, काय करतां, समाजांत तुम्हांला किती प्रतिष्ठा आहे हे सारे स्थूल भेदांचे फापटपसारे काय करावयाचे आहेत? तुम्ही एक आहांत आणि सुख किंवा दुःख जें कांहीं भोगावयाचें असेल तें तुम्ही एकत्रच भोगणार आहांत. जवळच्या आणि दूरच्या, या प्रदेशांतला आणि त्या प्रदेशांतला, गरीब आणि श्रीमंत या सर्वांचें नशीब आज एकाच धाग्यानें बांधलें गेलें आहे. हा दिव्य क्षण पाहून ज्याच्या भावना उचंबळून येत नाहींत त्याचें हृदय मुर्दाड बनलें आहे. पुढल्या पिढ्या

अशा व्यक्तींचा नामर्दपणा पाहून शरमेनें माना खालीं घालतील : कारण आज जर थोडेंसें धैर्य दाखविलें तर भावी पिढ्यांचें जीवन सुखमय होणार आहे. जो मनुष्य संकटें कोसळत असतांही हसूं शकतो, या अडचणीच्या परिस्थितींतूनहि जो नवें सामर्थ्य मिळवितो त्याला माझे शतशः प्रणाम. आणीबाणीच्या वेळीं जे भेकड आहेत त्यांचेंच पाऊल मागें पडतें; परंतु ज्याचा निश्चय पक्का आहे, ज्याच्या कृतीला विवेकाचा खडा आधार आहे त्याचें पाऊल प्रत्यक्ष जरी मरण सामोरें आलें तरी डगमगणार नाहीं; त्याच्या तत्वनिष्ठेला तडा जात नाहीं. माझे विचार माझ्यापुरते तरी सूर्यप्रकाशासारखे अगदीं स्वच्छ आणि सरळ आहेत. युद्धापोटीं मानवतेचा संहार होतो याची मला जाणीव आहे आणि म्हणूनच जगांतील सारी संपत्ति जरी कोणी माझ्या पायाशीं आणून ओतली तरी मी युद्धाला कधींहि पाठिंबा देणार नाहीं. परंतु माझें घर फोडून एखादा लुटारू जर आंत घुसला, माझी मालमत्ता माझ्या डोळ्यांदेखत त्यानें उध्वस्त करण्यास सुरुवात केली आणि माझ्या घरांतल्या मंडळींना ठार मारण्याचें भय घालून त्यांना आपले गुलाम म्हणून जर तो नेऊं लागला तर उघड्या डोळ्यांनीं हें मीं सहन करावें काय? मला असें म्हणावयाचें आहे कीं असा लुटारूपणा एकादी सामान्य व्यक्ति करो किंवा एकादा राजा करो; माझा देशबंधु करो किंवा परदेशस्थ इसम करो, एकटा मनुष्य करो किंवा एकादी टोळी करो—या सर्वांचें मूळ तत्त्वदृष्ट्या एकच आहे. अशा बाब-तींत एकाला क्षमा करावयाची व दुसऱ्याला शिक्षा करावयाची अशी भूमिका स्वीकारणें शक्य नाहीं. मी असें बोललों असतां ब्रिटिश सत्ता मला बंडखोर ठरवील एवढेंच ना? मला त्याची फिकिर नाहीं. परंतु हे सारे अत्याचार डोळयांना दिसत असतां सुद्धां जर मी स्वार्थामुळें ब्रिटिश सत्तेशीं हातमिळवणी केली तर तनुविक्रय करणाऱ्या वेश्येप्रमाणें मीं माझ्या आत्म्याचा विक्रय केला असाच त्याचा अर्थ होईल! माझ्या हातून हें कदापिहि घडणार नाहीं. ब्रिटिशांकडे मी दयेची याचना करूं? अनेक पोरक्या मुलांचे, निराश्रित विधवांचे, कत्तल झालेल्या निरपराध्यांचे अघोर शाप भोगीत, आपलें तोंड लपवीत, दऱ्याखोऱ्यांतून असहाय-पणें हिंडणारा ब्रिटनचा जुलमी राजा माझ्या मनःचक्षूंना दिसत आहे. अशा क्षुद्र जीवाकडून दयेची अपेक्षा करण्याची कल्पनाहि माझ्या मनाला सहन होत नाहीं.

कांहीं गोष्टी स्वयंसिद्ध असतात; वादविवादानें त्या पटवून देण्याची आवश्य-कताच नसते. अमेरिकेचें स्वातंत्र्य ही अशांपैकीच एक गोष्ट आहे. कांहीं लोक

अजूनहि ब्रिटिश आपल्या बाबतींत दयाशील धोरण ठेवतील अशी भाबडी आशा बाळगून आहेत. त्यांच्या डोक्यावर टांगलेल्या अशुभाची या लोकांना पुरेशी कल्पनाच यावयाची आहे असाच त्याचा अर्थ. जो आपल्याला साधा न्याय देऊं शकला नाहीं तो दयेचा मेघ होऊन आपल्यावर वर्षेल अशी आशा बाळगणें शुद्ध वेडेपणाचें आहे. ब्रिटिशांसारखे धूर्त लोक कांहीं वेळां दया दाखविण्याचें सोंग करतात; परंतु ही दया म्हणजे राजकारणांतील एक कुटिल डावच असतो. कोल्ह्याचा धूर्तपणा, लांडग्याच्या हिंस्रपणापेक्षा कमी खुनशी असतो असें समजणें चूक आहे. कधीं धाक दाखवून, कधीं आश्वासनांची साखरपेरणी करून, कधीं दयेची बतावणी करून होवे अमेरिकन जनतेचा तेजोभंग करण्याचा प्रयत्न करीत आहे. ब्रिटिश मंत्रिमंडळानें अशाच तऱ्हेच्या कामावर कमांडर थॉमस गेज् याचीहि नेमणूक केलेली होती. राजकारणांतील या कुटिल बतावणीला हे टोरी लोक शांतता शांतता म्हणून गौरवीत आहेत. अहाहा! काय पण शांतता ही! अमेरिकेच्या उद्यांच्या विनाशाचीं सारीं दुश्चिन्हें ह्या फसव्या शांततेच्या ठायीं एकवटलेलीं आहेत. पेनसिल्व्हानियांतील नागरिकहो, मी सांगतों त्या गोष्टीचा नीट विचार करा. सरहद्दीवरच्या लोकांनीं जर शस्त्रें टाकलीं तर ब्रिटिशांनीं चिथावणी दिलेले रेड् इंडियन लोक त्यांच्यावर झडप टाकतील. टोरींना त्याचें कांहींच वाटणार नाहीं. मध्यप्रदेशांतील लोकांनीं जर आपलीं शस्त्रें टाकलीं तर ते सरहद्दीवरील आपल्या बांधवांच्या तिरस्कारास पात्र होतील. आणि कोणत्याहि एका राज्यानें जर शस्त्रें खाली ठेवलीं तरी होवेच्या आणि त्यानें आणलेल्या भाडोत्री जर्मन सैन्याच्या आश्रयाला राहून आपल्या राष्ट्रबांधवांच्या क्रोधापासून स्वतःचा बचाव करण्याची केंविलवाणी धडपड त्याला करावी लागेल. दयेचें आमिष दाखवून होवे तुम्हांला विनाशाच्या खाईकडे नेत आहे. या नाटकामागची कुटिलता ज्यांना दिसत नाहीं ते लुच्चे खलपुरुष तरी आहेत किंवा मूर्ख तरी आहेत. येथें मी नुसतेच कल्पनेचे वाफारे उडवीत आहे असा गैरसमज करून घेऊं नका. जें तर्काला पटेल तेंच मी तुम्हांला सांगत आहें. माझी भाषा रोखठोक सत्याखेरीज दुसरें कांहींहि सांगत नाहीं. माझ्या मनाला भीतीचा स्पर्श झालेला नाहीं याबद्दल मी परमेश्वराचे आभार मानतों. खरेंच, भय वाटावें असें कांहींच मला दिसत नाहीं. परिस्थितीचा अचूक समज मला आलेला आहे आणि तिच्यांतून पलीकडे जाण्याची वाटहि मला अगदीं स्वच्छ दिसत आहे. जेव्हां आमचें सैन्य व्हाईट प्लेनस् ह्या विभा

गांत खडें टाकलें तेव्हां जनरल होवे नामर्दाप्रमाणें तेथून पळून गेला, आणि जर्सी येथील निःशस्त्र लोकांवर त्यांनें धाड घातली. जर्सी येथें सैन्यबळ इतकें कमी होतें तरीहि आम्ही धैर्यानें शत्रूला तोंड दिलें. नाईलाजामुळें आम्हांला माघार घ्यावी लागली खरी; परंतु जास्तींत जास्त युद्ध साहित्य आम्हीं वांचविलें आणि चार नद्या ओलांडून परत आलों. आम्हीं घेतलेली माघार आकस्मिक होती असें कुणीही म्हणूं शकणार नाहीं. कारण माघार घेणें अटळ आहे हें कळल्यावरहि कुमक येईल या आशेवर आम्हीं तीन आठवडे शत्रूला थोपवून धरलें होतें. आमच्या सैन्यांत जराहि भीतीचें वातावरण दिसलें नाहीं. पुनः आपण एकत्र जमलों आहों व जमत आहों. आपल्या नव्या सैन्यांत ठिकठिकाणाहून सारखी भरती होतच आहे. साठ हजार सैनिकांचें सुसज्ज दळ आपण लवकरच उभारूं शकूं. सध्यां आपली ही परिस्थिति अशी आहे. ज्याला इच्छा असेल त्याला तिची माहिती होईल. संयम आणि चिकाटी आपण दाखविली तर आपल्यासमोर उज्ज्वल भविष्यकाळ आहे. आपण जर नामर्दाप्रमानें वागलों तर मात्र उध्वस्त झालेली भूमि, दीनवाणे देशबांधव, बेचिराग शहरें, असंरक्षित खेडीं आणि जिच्यांतून सहसा सुटका होणार नाहीं अशी गुलामगिरी यांचें ताट आपल्यासमोर वाढून ठेवलेलें असेल; आपला देश म्हणजे पाशवी वासनांच्या भाडोत्री जर्मन सैनिकांची नाटकशाळा होऊन बसेल. आणि नव्या पिढींत कोणाचा बाप कोण हेंहि छातीठोकपणें सांगतां येणार नाहीं. माझ्या बांधवांनो, या भेसूर चित्रावर नजर टाका आणि जागे व्हा, आणि इतकें सांगूनहि यावर विश्वास न टाकणारा जर कोणी नादान असेल तर त्याला तसाच मरूं द्या.

# शांततेचे प्रश्न व फायदे

आमची कसोटी घेणारी आणीबाणीची वेळ आतां संपली आहे. या जगांतील सर्वांत महान् अशी क्रांति सफल झाली आहे.

धोक्याच्या काळांतून सुरक्षिततेकडे, किंवा युद्धाच्या धुमश्चक्रींतून शांततेच्या काळांत पदार्पण करतांना आधींच भांबावलेलें माणसाचें मन सुस्थिर झाल्याखेरीज त्याला या नव्या परिस्थितीचें सुख उपभोगितां येत नाहीं. शांतता जेव्हां अचानक पदार्पण करते तेव्हां त्या अचानकपणामुळेंच मन गडबडून जातें.

आपण आपलें ध्येय साध्य केलें आहे. हें ध्येय भव्योदात्त होतें. तें साधण्यासाठीं आपण अनेक हालअपेष्टांना तोंड दिलें. या सर्व गोष्टींचा विचार करतां ध्येयसाफल्याच्या या क्षणीं आपण अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे असें मला वाटतें.

अमेरिकन जनतेला आपल्याला सुखी करावयाचें आहे. आणि सर्व जगास सुखी होण्याची कला शिकवावयाची आहे. या जगाला ठाऊक नसलेला चारित्र्याचा एक नवा आदर्श आपल्याला निर्माण करावयाचा आहे. नवनिर्मितीचें हें महान् कार्य आपल्या हातीं आलें आहे यांतच आपला बहुमान आहे. यासाठीं आपण कितीहि किंमत दिली तरी थोडीच आहे. वादळ थांबलेलें आहे आणि शांतता हळुहळु प्रस्थापित होत आहे. अशा या क्षणीं गतेतिहासाचें सिंहावलोकन करून आपण नवीन धडे शिकून भविष्यकाळाची योजना आतांपासून आंखण्यास सुरवात केली पाहिजे.

अमेरिकेवर चहूं दिशांनीं सुखाचा वर्षाव होत आहे. असें भाग्य जगांतील कोणत्याहि देशाला लाभलेलें नाहीं. एखाद्या स्वच्छ आणि आशादायक पहाटेप्रमाणें तिनें नव्या जीवनाच्या क्षितिजावर पदार्पण केलें आहे. ज्या ध्येयासाठीं अमेरिका लढली तें ध्येय उदात्त होतें. अमेरिकेचीं तत्वें न्याय्य आणि उदार आहेत. तिचा स्वभाव गंभीर आणि दृढनिश्चयी आहे! तिच्या कृतींनीं तिच्या चारित्र्याला उजाळा मिळाला आहे. तिच्यासमोर सारे मानसन्मान मुजरा करून उभे आहेत. अमेरिकेप्रमाणें आपल्या कुळाविषयीं अभिमान जगांतील फारच थोड्या राष्ट्रांना

वाळगतां येईल. अमेरिकेंतील पहिली वसाहतच आजच्या क्रांतीच्या तत्त्वांशीं मिळती जुळती होती. या जगाची सम्राज्ञी असलेली रोमची राजधानी म्हणजे मुळांत डाकू लोकांची एक संघटनाच होती. लुटालूट, जाळपोळ आणि लक्षावधि लोकांचे शोषण या मार्गानें रोमनें वैभव प्राप्त करून घेतलें. परंतु अमेरिकेचें असें नाहीं. आपल्या जन्माचा इतिहास सांगतांना किंवा कोणकोणत्या क्रमानें अमेरिकेनें आपलें राज्य मिळविलें हें सांगतांना आपल्याला कधींहि लाज वाटण्याचें कारण नाहीं. आपला इतिहासच असा भव्य-दिव्य आहे.

या दिव्य भूतकाळाचें स्मरण केल्यानें अमेरिकन जनतेच्या आकांक्षा प्रज्वलित झाल्या पाहिजेत आणि अमेरिकेला आपण वैभवाच्या शिखरावर बसवूं अशी हिंमत त्यांच्या मनांत निर्माण झाली पाहिजे. जगानें अमेरिकेला अनंत हाल-अपेष्टांतून न डगमगतां झगडत जातांना पाहिलें आहे. चारित्र्याला धैर्याची जोड मिळाल्यामुळेंच अमेरिकेला हें शक्य झालें आहे. युद्धाच्या काळांत जशी अमेरिकेची गुणवत्ता प्रकट झाली तशीच ती शांततेच्या काळांतहि प्रकट होते हें या पुढें जगाला कळलें पाहिजे. अमेरिकेनें आतां आपला स्वतंत्र संसार थाटण्यास सुरुवात केली आहे. हे सुखाचे दिवस म्हणजे तिच्याच प्रयत्नांचें फळ आहे. नव्या संसारांत पदार्पण करतांना स्वातंत्र्याइतकीच राष्ट्रीय प्रतिष्ठा महत्त्वाची आहे. हें अमेरिकन जनतेनें ध्यानांत ठेवलें पाहिजे शत्रूंनाहि सभ्याचार शिकविण्याची विद्या आपल्याजवळ आहे हें अमेरिकेनें विसरून चालणार नाहीं. जेथें सामर्थ्य आणि वैभवाचा झगमगाट हार खातो तेथेंच चारित्र्याचा आणि स्वाभिमानाचा अंमल होतो. या राष्ट्रीय चारित्र्यावर कसलाहि डाग पडणार नाहीं याची खबरदारी अमेरिकेनें घेतली पाहिजे. कारण अमेरिकन क्रांति ही या युगाचें भूषण ठरली पाहिजे. या क्रांतीनें जगाला प्रकाश दिला आहे आणि मानव जातीच्या मनांत स्वातंत्र्याची आकांक्षा जागृत केली आहे. या महान् क्रांतीवर ठपका येईल असें वर्तन आपल्या हातून घडतां नये.

बराच काळ युद्ध चालू असलें म्हणजे मनाचा सांधा कांहीं काळ निखळल्या-सारखा होतो. दुःख आणि संहार यांच्या दर्शनामुळें माणसांचीं मनें निबर बनतात आणि कालांतरानें हा निबरपणा त्यांचा स्वभावधर्मच होऊन बसतो. सर्वसाधारणतः जें वर्तन नीतिबाह्य ठरावें तें वर्तन अशा काळांत अपरिहार्यतेची सबब सांगून माणसें निर्ढावल्यासारखीं करीत राहातात आणि म्हणूनच एखाद्या राष्ट्रानें अंतर्मुख

होऊन आपल्या चारित्र्याच्या आदर्शाचें चिंतन केल्याशिवाय त्याचें संरक्षण त्यास करतां येणार नाहीं. कोणत्याहि देशाला प्रारंभ काळांत अमेरिकेसारख्या श्रेष्ठ चारित्र्याचा लाभ झालेला नाहीं; आणि म्हणूनच या चारित्र्याचें जतन आणि संवर्धन करणें आपलें कर्तव्य आहे.

स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळीं अमेरिकेला कर्ज काढावें लागलें ही गोष्ट खरी. परंतु अमेरिकेनें जें मिळविलें आहे त्याचा विचार करतां हें कर्ज ही क्षुल्लक बाब आहे. अमेरिका स्वतंत्र झाली आहे. आपण कसें जगावें हें आतां तिचे ती स्वतः ठरवणार आहे. कुठलीहि परकीय सत्ता यापुढें अमेरिकेच्या व्यापार, कायदे आणि संपत्ति यांवर वर्चस्व गाजवूं शकणार नाहीं. स्वातंत्र्याचा संघर्ष आतां संपला आहे. आज ना उद्यां तो संपणारच होता. परंतु योग्य काळीं तो संपला हें विशेष आहे. ब्रिटन हें आतां आपल्या बरोबरीचें राष्ट्र झालें आहे. ज्यांच्या उदारमतवादाविषयीं सारें जग स्तुतीचे उद्‌गार काढतें अशा ब्रिटनसारख्या राष्ट्राच्या पंक्तीला आपल्या बसावयाला मिळालें हें आनंदाचें आहे. शांतता, स्वातंत्र्य, भरभराटलेला व्यापार यांमुळें अमेरिकेला आतां आपल्या देशांतील व्यवस्था उत्तम पायावर उभारण्यास संधि व वेळ मिळेल. हें सारें करीत असतांना आपल्या राष्ट्रीय प्रतिष्ठेवर शिंतोडे उडणार नाहींत याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. चारित्र्य ही गोष्टच अशी आहे कीं जी गेल्यावर पुनः मिळविणें कठीण होतें आणि म्हणूनच डोळ्यांत तेल घालून तिला जपणें हेंच शहाणपणाचें. एकदां चारित्र्याला तडा गेला कीं तो पुनः सांधणें अशक्यप्राय होतें. आपण पुढच्या पिढीच्या हातीं एक महान् वारसा देत आहों. स्वातंत्र्य, राष्ट्रीय चारित्र्य या गोष्टीच अशा आहेत कीं त्यासाठीं केवढीहि किंमत द्यावी लागली तरी ती थोडीच ठरणार आहे.

आज कोणत्याहि विचारी माणसासमोर एकच प्रश्न उभा राहिला पाहिजे आणि तो म्हणजे अमेरिकेंतील सर्व वसाहतींच्या ऐक्याचा आपलें राष्ट्रीय चारित्र्य या ऐक्यावरच अवलंबून आहे. या राष्ट्रांत शांतता नांदणें आणि जगांत अमेरिकेला प्रतिष्ठा मिळणें या गोष्टी देखील ऐक्यावरच अवलंबून आहेत. आपलीं जहाजें सुरक्षितपणें इतर राष्ट्रांच्या बंदरांना लागूं शकतात, त्यांच्याशीं व्यापार करूं शकतात याचें कारण त्यांच्यामागें अमेरिकेचा ध्वज उभा आहे हेंच होय. भूमध्य समुद्रांतून देखील आपल्या जहाजांना ज्या सवलती मिळतील त्या

अमेरिकेच्या नांवामुळेंच मिळाल्या पाहिजेत; आपले सारे तह, सारा व्यापार हा अमेरिकेच्या सार्वभौमत्वाखालींच होतो आणि युरोपखंड आपल्याला अमेरिका या एकाच नांवानें ओळखते.

अमेरिकेंत छोट्या छोट्या अनेक वसाहती आहेत ही गोष्ट खरी. परंतु ही विभागणी आम्ही आमच्या अंतर्गत सोईसाठीं केलेली आहे. भेदांचें लोण घेऊन आपण कधींहि बाहेरच्या जगांत जातां कामा नये.

अमेरिकेंतील प्रत्येक राज्य आपापला कारभार पाहात असतें. दुसऱ्या राज्याच्या कारभारांत ढवळाढवळ करीत नाहीं. अमेरिकेंतल्या सर्वांत धनाढ्य राज्याचें सगळें उत्पन्न एकत्र केलें तरी तें अमेरिकेचें परचक्रापासून संरक्षण करण्यास पुरेसें होणार नाहीं. तात्पर्य हीं सर्व राज्यें अमेरिकेचें सार्वभौमत्व मानतात. कोणतेंही एक राज्य जर वेगळें झालें तर त्याचा जगाला मुळींच वचक वाटणार नाहीं. कोणत्याहि सार्वभौम राज्यांत आपल्या सर्व घटकांचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य हवें. अमेरिकेचें संघराज्य अभंग राहिल्यास त्याच्या ठिकाणीं ही पात्रता निश्चित आहे. हें संघराज्य बळकट ठेवणें हाच देशाची भरभराट करण्याचा, शासनसंस्थेचा एक नवा आदर्श जगापुढें ठेवण्याचा एकमेव मार्ग आहे. प्रत्येक राज्य जर वेगळें काढलें तर तें दुबळें ठरतें; परंतु संघराज्याच्या ध्वजाखालीं सगळीं राज्यें एकत्र आलीं तर अपार सामर्थ्य निर्माण होतें. प्रत्येक राज्य जर आपला सवता सुभा स्थापन करूं लागलें तर राष्ट्र मोकळीस येतें. हॉलंड हें याचें उत्तम उदाहरण आहे. या दुफळीच्या वातावरणामुळें हॉलंडमध्यें कसलाहि एक निर्णय घेतां येत नाहीं. आणि निर्णय घेतलाच तर प्रत्यक्षांत आणतां येत नाहीं. अमेरिकेंत जर अशी परिस्थिति निर्माण झाली तर आपलें दुर्दैवच ओढवलें असें समजावें.

समाज बळकट होण्यासाठीं ज्याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीनें कांहीं त्याग करणें आवश्यक असतें त्याप्रमाणें संघराज्य बळकट होण्यासाठीं घटक राज्यांनीं त्याग करणें आवश्यक आहे. या जाणिवेनें जो त्याग करावा त्याच्या कितीतरी पटींनीं अधिक फायदा या घटकास होत असतो. स्वातंत्र्य आणि सुरक्षितता यांचें प्रतीक असलेल्या आपल्या संघराज्याविषयीं जर कोणी उथळपणानें वक्तव्य करूं लागला तर तें मला सहन होत नाहीं. अमेरिकेच्या राज्यघटनेंतील संघराज्य ही एक पवित्रतम कल्पना आहे; आणि प्रत्येक नागरिकास त्याचा अभिमान वाटला पाहिजे. या महान् संघराज्याचा मी एक नागरिक आहें ही जाणीव राष्ट्रीय चारित्र्याचाच एक भाग

आहे. अमुक एका राज्याचा मी नागरिक आहें ही खाजगी सोईची गोष्ट झाली. त्या राज्याचा नागरिक म्हणून मी एका विशिष्ट विभागांत मी ओळखला गेलों तरी जगांत संघराज्याचाच नागरिक म्हणून ओळखला जाणार. प्रदेशा-प्रदेशाप्रमाणें अनेक गौण भेद निर्माण होत असले तरी आपण सर्व अमेरिकन आहोंत, अमेरिकन या नांवानें ओळखले जातों हीच खरी महत्त्वाची गोष्ट आहे. आतांपर्यंत मी माझी सर्व शक्ति स्वातंत्र्ययुद्धाच्या मदतीसाटीं आणि या देशांत ऐक्य निर्माण करण्यासाटीं वेंचिलेली आहे, आजवर मी अधिकाराची आणि फायद्याची कोणतीहि जागा स्वीकारलेली नाहीं. सर्व पक्ष आणि त्यांचे हितसंबंध यांपासून मी कटाक्षानें दूर राहिलों आहें. माझ्या वैयक्तिक स्वार्थाकडे मीं लक्ष दिलेलें नाहीं. परंतु आपण मिळविलेलें स्वातंत्र्य ही गोष्टच मुळीं इतकी महान् आहे कीं तिच्यापुढें वैयक्तिक देण्याघेण्याचा हिशोब मांडीत बसणें हें आपल्या चारित्र्याला शोभणार नाहीं; तसेंच त्यापासून आपल्या शांततेला धोका आहे.

अमेरिकेच्या स्वातंत्र्यकारणासाटींच मी लेखक बनलों. ब्रिटिशांशीं तह करणें म्हणजे विनाश ओढवून घेणें आहे; आणि स्वातंत्र्यसंपादनाखेरीज अमेरिकेला भविष्यकाळच नाहीं याविषयीं माझी पक्की खात्री पटली होती. या विचाराच्या प्रचारासाटीं मीं लेखणी उचलली आणि गेल्या सात वर्षांत मी माझ्या मायदेशाप्रमाणें वाङ्मयाचीहि सेवा केली आहे. मानवतेच्या कल्याणासाटीं लेखणी झिजवून मी प्रतिभा ही स्वार्थाची रखेली न बनतां राहूं शकते हें सिद्ध करून दाखविलें आहे. या देशांतील सर्व जनता जर स्वातंत्र्याच्या आकांक्षेनें भारली गेली तर स्वातंत्र्य अगदीं सहज मिळवितां येईल अशी माझी पहिल्यापासून श्रद्धा होती. जगाच्या इतिहासांत इतक्या विविध तऱ्हेच्या, वेगवेगळ्या परिस्थितींतल्या लोकांनीं एकत्र येऊन आपलें स्वातंत्र्य हस्तगत केल्याचें दुसरें उदाहरण नाहीं.

परंतु युद्ध केव्हांच थांबलें आहे आणि प्रत्येक माणूस सुखशान्ति निर्माण करण्याच्या प्रयत्नांत आहे आणि म्हणून मी हा विषय येथेंच थांबवितों. जगांत मी जरी कोठेंहि गेलों तरी माणसाच्या कल्याणासाटीं लढल्या गेलेल्या अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाला मी थोडाफार हातभार लावला या जाणिवेनें माझा ऊर अभिमानानें भरून येईल.

# मानवी हक्क—भाग पहिला

## घटनाकायद्याच्या मर्यादा

एकाद्या व्यक्तीला किंवा राष्ट्राला निष्कारण चिडविण्याचे असभ्य वागणुकीचे जे प्रकार असतात त्याचें एक विलक्षण उदाहरण म्हणून बर्क याच्या फ्रेंच राज्य-क्रांतीवरील पुस्तिकेकडे बोट दाखवितां येईल. फ्रेंच जनतेनें किंवा राष्ट्रीय सभेनें इंग्लंडच्या जनतेच्या किंवा पार्लमेंटच्या व्यवहारांत नाक खुपसण्याचा कधींहि प्रयत्न केलेला नाहीं. असें असतांना बर्कनें फ्रेंच राज्यक्रांतीवर अत्यंत असभ्य स्वरूपाची जाहीर टीका पार्लमेंटच्या सभागृहांत आणि लोकांसमोर बोलतांना करावी हें अगदीं अक्षम्य आहे. फ्रेंच राष्ट्रावर आणि राष्ट्रीय सभेवर बोलतांना बर्कनें इंग्रजी भाषें-तील प्रत्येक शिवी वापरण्याची खबरदारी घेतली आहे! अज्ञान, पूर्वग्रह आणि मत्सर यांचें गरळ बर्कनें या आपल्या चारशें पानांच्या पुस्तकांत ओकलें आहे. अशा तऱ्हेनें चारशेंच काय पण चार हजार पानेंहि बर्क लिहूं शकला असता. अशा रीतीनें आपली लेखणी किंवा वाणी एकदां निकारवश होऊं दिली कीं माणूस थकेल पण विषय कधींच संपणार नाहीं!!

अजूनपर्यंत बर्कनें फ्रेंच राजकारणाविषयीं जी माहिती मिळविली तीमध्यें त्याला चूक दिसली नाहीं किंवा तो हताश झाला नाहीं. परंतु असें असूनहि या माण-साची आशा इतकी जबर किंवा निराशा इतकी तीव्र कीं प्रत्येक वेळीं आपल्याच मताचें घोडें त्यानें सारखें पुढें दामटलें आहे. एक काळ असा होता कीं फ्रान्स-मध्यें राज्यक्रांति होईल या गोष्टीवर बर्कचा विश्वासच नव्हता. फ्रेंच लोकांमध्यें राज्यक्रांति करण्याची हिम्मतच नाहीं असें तेव्हां बर्कचें मत होतें. परंतु आतां फ्रान्समध्यें प्रत्यक्ष राज्यक्रांति झाली तेव्हां मात्र बर्क निंदेची राळ उडवून सोईस्कर पळवाट शोधीत आहे.

फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेला शिव्या देऊन समाधान झालें नाहीं म्हणूनच कीं काय डॉ. प्राईससारख्या थोर माणसाला शिव्या देण्यास त्यानें सुरवात केली

आहे. १६२८ मध्यें झालेल्या राज्यक्रांतीचा वार्षिक दिन ४ नोव्हेंबर १७९० रोजीं साजरा झाला. या प्रसंगीं डॉ. प्राईस यांनीं विषयानुरूप व्याख्यान दिलें. या व्याख्यानावर टीका करतांना बर्क म्हणतो : डॉ. प्राईसनें असें विधान केलें आहे कीं राज्यक्रांतीच्या द्वारें इंग्लंडच्या जनतेनें तीन मूलभूत हक्क मिळविले. (१) स्वतःचे राज्यकर्ते निवडण्याचे अधिकार (२) हे राज्यकर्ते जर अन्याय्य वर्तन करूं लागले तर त्यांस पदच्युत करण्याचा अधिकार व (३) आपल्या मनाजोगती शासन-संस्था स्थापण्याचा अधिकार.

डॉ. प्राईस यांचें म्हणणें असें आहे कीं हे अधिकार कोणत्याहि एका व्यक्तीची मक्तेदारी नसून सर्व राष्ट्रांच्या हातीं हे अधिकार असतात. डॉ. प्राईस याच्या मताला बर्कचा सक्त विरोध आहे. बर्कचें म्हणणें असें की अशा तऱ्हेचा अधिकार व्यक्तीलाहि नसतो व राष्ट्रालाही नसतो. बर्क म्हणतो, "इंग्लंडच्या जनतेचा अशा तऱ्हेच्या अधिकाराला संपूर्ण विरोध आहे. आणि जर कोणी हा अधिकार प्रत्यक्षांत आणण्याचा प्रयत्न करूं लागला तर इंग्लंडची जनता त्यास प्राणपणानें विरोध करील.

एखादा समाज आपले हक्क मिळविण्यासाटीं नव्हे तर आपल्याला हक्क नाहींत हें सिद्ध करण्यासाठीं आपलें सर्वस्व पणाला लावील हा बर्कचा शोध खरोखरीच अद्‌भुत आहे. हा सिद्धान्त बर्कच्या बुद्धिभ्रंशाला शोभेसा आहे यांत शंका नाहीं.

इंग्लंडमध्यें जनतेला अशा तऱ्हेचा अधिकार नव्हता, आणि सध्यांहि तो अस्तित्वांत नाहीं हें आपलें मत बर्क ज्या पद्धतीनें सिद्ध करूं पाहातो ती पद्धत त्याच्या मताइतकीच भयानक आहे. बर्कचें म्हणणें असें कीं एकाद्या पिढीला अशा तऱ्हेचा अधिकार असलाच तर त्या पिढीबरोबरच तो मृत झाला आहे.

आपलें म्हणणें सिद्ध करण्याकरितां बर्क शंभर वर्षांपूर्वीं इंग्लंडच्या पार्लमेंटनें विल्यम आणि मेरी यांस सादर केलेल्या जाहिरनाम्यांतील एक अवतरण देतो. हें अवतरण असें : "इंग्लंडची सरदारसभा आणि लोकसभा जनतेच्या वतीनें असें लिहून देते कीं आमच्यावर आणि सर्व भावी पिढ्यांवर राज्य करण्याचा अबाधित अधिकार आम्ही इंग्लंडच्या राजाला देत आहोंत." या अवतरणामुळें आपला मुद्दा सिद्ध होतो असें बर्कचें म्हणणें आहे. कारण त्याच्या मतें इंग्लंडच्या जनतेनें वरील अवतरणानुसार आपणास कायमचें बांधून घेतलें आहे. बर्क पुढें म्हणतो,

"राज्यक्रान्तीनंतर इंग्लिश जनतेनें आपल्या सर्व भावी पिढ्यांच्या वतीनें या अधिकाराचा कायमचा त्याग केल्याचें वचन राजास दिलें आहे."

आपल्या ह्या भयानक तत्त्वांचा विपारी प्रयोग बर्क केवळ इंग्लंडवरच नव्हे तर फ्रेंच राज्यक्रांतीवर व फ्रेंच राष्ट्रीय सभेवर करूं लागतो, आणि जनतेच्या अधिकारांची घोषणा करणाऱ्या त्या महात्म्यांना देशद्रोही तोतये म्हणून संबोधितो. अशा परिस्थितींत बर्कच्या मताचें संपूर्ण खंडन करणारे कांहीं विचार मांडणें मला अपरिहार्य वाटतें.

सोळाशें अठ्ठयायशीं सालीं इंग्लिश पार्लमेंटानें आपल्या राष्ट्राच्या वतीनें एक विशिष्ट निर्णय घेतला. तसा निर्णय घेण्याचा पार्लमेंटाला अधिकार होता आणि योग्य तेंच त्यानें केलें. परंतु जनतेचे प्रतिनिधि म्हणून मिळालेल्या अधिकार क्षेत्राचें अतिक्रमण करून इंग्लंडच्या पार्लमेंटानें केवळ शिरजोरीनें आपल्या भावी पिढ्यांना शाश्वत कालपर्यंत बांधून ठेवण्याचा अधिकार आपल्या हातांत घेतला. म्हणजे जनतेचे प्रतिनिधि म्हणून पार्लमेंटाला मिळालेला अधिकार आणि पार्लमेंटानें आपण होऊन बळकावलेला अधिकार अशा या दोन गोष्टी आपल्याला विचारांत घ्याव्या लागतील. यांपैकीं पहिला अधिकार पार्लमेंटाला आहे हें मान्य. परंतु त्यांनीं बळकावलेल्या दुसऱ्या अधिकाराबाबत मला येथें कांहीं विचार मांडावयाचे आहेत.

पुढच्या पिढींतल्या लोकांना कायमचे बांधणारे, त्यांच्यावर अनंत कालपर्यंत ताबा चालविणारें पार्लमेंट पूर्वी कधींहि नव्हते; आणि तसें कधीं असूंहि शकणार नाहीं. पुढच्या अनेक पिढ्यांनंतर जग अमुकच पद्धतीनें चाललें पाहिजे असें म्हणण्याचा अधिकार पार्लमेंटाला असणेंच शक्य नाहीं. आणि म्हणूनच भावी पिढ्यांवर अनंत कालपर्यंत आपलें वर्चस्व चालेल असा एखादा कायदा किंवा एखादी घोषणा जर कोणत्या पार्लमेंटानें केली असेल तर ती मूलतः रद्द समजली पाहिजे. प्रत्येक पिढीला स्वतंत्रपणें आपले निर्णय घेण्याचा अधिकार आहे. कोणत्याहि पिढीनें आपण मेल्यानंतरहि भावी पिढ्यांवर अधिकार गाजविण्याची इच्छा बाळगणें हें हास्यास्पद आहे, जुलमीपणाचें आहे. एक माणूस हा दुसऱ्या माणसाची किंवा एक पिढी ही दुसऱ्या पिढीची मालमत्ता होऊं शकत नाहीं. सोळाशें अठ्ठयायशीं सालच्या पार्लमेंटाला ज्याप्रमाणें आजच्या पिढीला बांधून ठेवण्याचा अधिकार नाहीं त्याचप्रमाणें आजच्या पार्लमेंटालाही शंभर किंवा हजार

वर्षांनंतर येणाऱ्या पुढच्या पिढीला कोणत्याहि प्रकारें बांधण्याचा अधिकार पोंहोचत नाहीं.

कोणतीहि पिढी ज्या कालखंडांत अस्तित्वांत असते त्या परिस्थितीला तोंड देण्याची शक्ति असावी लागते. त्या काळांत जीं माणसें जिवंत असतील—मृत झालेलीं नव्हे—त्यांना अपरिहार्यपणें आपल्या काळांतील परिस्थितीशीं मिळतें-जुळतें घ्यावें लागते. परंतु मनुष्य मृत झाला कीं त्याच्याबरोबर त्याचे अधिकार व त्याच्या गरजा यांना पूर्णविराम मिळतो आणि नंतर या जगांतला राज्यकारभार कसा चालवावा, या जगाचे शास्ते कोण असावे, शासनसंस्थेचें स्वरूप काय असावें या विषयींचा कसलाहि कायदा पुढच्या पिढीवर लादण्याचा अधिकार त्याला उरत नाहीं.

कोणत्याहि शासनसंस्थेच्या एकाद्या प्रकाराची किंवा एकाद्या पक्षाची तळी उचलून धरण्याचा वा ह्यांना विरोध करण्याचा येथें माझा हेतु नाहीं. कोणतीहि गोष्ट करण्याचा एकाद्या राष्ट्रानें निर्णय घेतला कीं तो अमलांत आणला जावा हें स्वाभाविक, परंतु बर्कचा या गोष्टीला विरोध दिसतो. मग अशा तऱ्हेचा अधिकार असतो तरी कुणाला? येथें जीं माणसें जिवंत आहेत त्यांच्या हक्कांविषयीं मी बोलतों. कोणते तरी जुने कागदपत्र काढून त्यांच्या आधारें मृत झालेल्या पिढीचा भावी पिढ्यांवर अबाधित अधिकार आहे हें सिद्ध करण्याच्या प्रयत्नाला आम्हांला विरोध करावयाचा आहे. बर्कची सारी धडपड गत पिढीचा अधिकार गृहीत धरून भावी पिढ्यांच्या स्वातंत्र्यावर आणि हक्कांवर कायमची गदा आणण्याचा आहे.

एक काळ असा होता कीं ज्यावेळीं राजे मृत्युशय्येवरून आपल्या इच्छेला येईल त्या माणसाला आपला मुकुट बहाल करीत; आणि निर्बुद्ध पशूप्रमाणें त्या काळची प्रजाहि त्यांच्यावर लादलेल्या या नव्या राजाचा निमूटपणें स्वीकार करीत. तो जमाना आतां गेला आहे. ही मूर्खपणाची राक्षसी पद्धत एके काळीं रूढ होती या गोष्टीवर आज कोणाचा विश्वासहि बसणें कठीण आहे. परंतु सोळाशें अठ्याऐशीं सालच्या पार्लमेंटानें केलेल्या ज्या ठरावावर बर्क आपल्या राजकीय सिद्धान्ताचें मंदिर उभारूं पाहातो आहे तो ठरावहि असाच मूर्खपणाचा व राक्षसी आहे.

कोणत्याहि देशांतील कायदे कोणत्या तरी तत्त्वावर अधिष्ठित असावे लागतात. इंग्लंडमधें असा कायदा आहे कीं कोणतीहि व्यक्ति एकवीस वर्षांची म्हणजे सज्ञान झाली कीं ती आपल्या जीवनाविषयींचे निर्णय घ्यायला मुखत्यार ठरते. व्यक्तीच्या

या स्वातंत्र्यावर शिक्षक व आईबाप तर सोडाच पण पार्लमेंटहि बंधन लादूं शकत नाहीं. असें जर आहे तर १६८८ मधील पार्लमेंट भावी पिढ्यांवर कायमची आपली सत्ता गाजविण्याचा अभिलाष कोणत्या जोरावर बाळगणार ?

जे हें जग सोडून गेले आहेत आणि ज्यांचा ह्या जगांत अजून प्रवेश व्हायचा आहे अशा दोन माणसांतलें अंतर कल्पनातीत दूरचें आहे. मग जी भावी पिढी आपल्याला कदापि दिसणें शक्य नाहीं, जिची आपली भेट होणें कालत्रयीं अशक्य तिच्यावर आपण मेल्यानंतरहि सत्ता गाजवूं अशी हांव बाळगणें हास्यास्पद नव्हे काय ?

इंग्लंडमधें कोणत्याहि माणसाच्या खिशांतील पैसे त्याच्या संमतीशिवाय हिसकावून घेणें हा गुन्हा आहे. मग सोळाशें अठ्ठयायशींच्या पार्लमेंटानें भावी पिढ्यांच्या संमतीशिवाय त्यांच्यावर कोणतेहि निर्बंध लादणें कसें समर्थनीय ठरतें ? तें समर्थनीय ठरविणाऱ्या बर्कच्या विचारांइतकें हास्यास्पद विचार वाचकाला शोधूनहि सांपडावयाचे नाहींत. बर्कचें म्हणणें असें कीं शंभर वर्षांपूर्वी माणसांच्या एका विशिष्ट गटानें कायदे केले ते रद्द करण्याचा अधिकार त्या वेळीं कोणास नव्हता, आज नाहीं, आणि उद्यां असणार नाहीं. राजसत्ता दैवी आहे असें सांगून तिची अनिर्बंध सत्ता जनतेच्या मनावर लादण्याचे प्रयत्न किती विसंगतिपूर्ण झालेले आहे हें पाहाण्यासारखें आहे! बर्कनें अशाच प्रयत्नांचा एक नवा प्रकार शोधून काढून रोमन दडपशाही अमलांत आणण्याचा सोपा मार्ग चोखाळला आहे! हा मार्ग म्हणजे सोळाशेंअठ्ठयायशी सालच्या पार्लमेंटचा कौल घेऊन त्याच्या कायद्यांचा साखळदंड भावी पिढ्यांच्या पायांना बांधण्याचा आणि हे कायदे रद्द करणें मानवी शक्तीच्या बाहेरचे आहेत असें बर्कचें म्हणणें! म्हणजे बर्कच्या ह्या मताप्रमाणें सोळाशें अठ्ठयायशिं सालचें पार्लमेंट अमानुष वा ईश्वरी असलें पाहिजे असा निष्कर्ष निघतो.

बर्कनें ज्या पद्धतीनें सर्व विचार मांडला आहे त्यामुळें त्याचें मत जरी तिळाएवढेंहि पुढें सरकत नसलें तरी हें मत मांडून त्यानें फार मोठी लोकसेवा केली आहे असें मला वाटतें. कारण बर्कच्या मताचा विचार करतां करतां अनिर्बंध सत्ता आपल्या स्वातंत्र्यावर कसें आक्रमण करते, आणि अशा तऱ्हेच्या अनिर्बंध सत्तेला कसा पायबंद घालावा हें लोकांच्या चांगलेंच लक्षांत येईल.

लोकमत धाब्यावर बसवून आपल्याला मन मानेल ते अधिकार हातीं घेतल्या-

बद्दल इंग्लंडच्या जनतेनें दुसऱ्या जेम्सला सिंहासनावरून उलथून टाकलें. ज्या कारणासाठीं हें केलें तोच प्रकार इंग्लंडच्या पार्लमेंटानेंहि करावा याचें खरोखरीच आश्चर्य वाटतें. याचा अर्थच असा कीं इंग्लंडमध्यें जरी राज्यक्रान्ति झाली तरी देखील जनतेच्या हक्कांच्या स्वरूपाचें व्हावें तसें आकलन इंग्लंडला झालें नाहीं. जेम्स राजाची दडपशाही आणि जेम्सला पदच्युत करणाऱ्या इंग्लंडच्या पार्लमेंटाचा सर्व भावी पिढ्यावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न यांच्यांत तत्त्वतः कांहींहि फरक नाहीं. थोडासा फरक आहे तो तपशिलाचा : जेम्स राजानें त्याच्या काळांत जे लोक जिवन्त होते त्यांचें स्वातंत्र्य आणि अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न केला; आणि पार्लमेंटनें अजून जन्मावयाच्या आहेत अशा भावी पिढ्यांचें स्वातंत्र्य हिरावण्याचा प्रयत्न केला. जेम्स आणि पार्लमेंट या दोघांनींहि आपल्या अधिकाराचें अतिक्रमण केलें---आणि ह्या दोघांचेंहि प्रयत्न तत्त्वतःच चुकीचे आहेत हें सिद्ध झालें.

कोणत्याहि नव्या पिढीला भावी पिढ्यांना बांधून ठेवण्याचा अधिकार असतो हें आपलें म्हणणें बर्कनें कसें सिद्ध केलें आहे? आपल्या मताच्या समर्थनार्थ बर्क पार्लमेंटाचा ठराव पुढें करतो; परंतु हें एवढें पुरेसें नाहीं. अशा तऱ्हेचा ठराव करण्याचा अधिकार पार्लमेंटला कसा आला, म्हणजे तो पूर्वीपासून तसा चालत आला आहे किंवा काय ह्या बद्दलचा निश्चित ऐतिहासिक पुरावा सादर करणें आवश्यक आहे. कारण आरंभापासूनच हा अधिकार जर माणसाला असेल तर तो आजहि तसा असला पाहिजे. कारण जें अपरिहार्य आहे तें नष्ट करणें मानवी शक्तीच्या पलीकडचें आहे. मृत्यु हा माणसाला अटळ आहे, आणि जोपर्यंत जन्म आहे तोपर्यंत मृत्यु आहे. परंतु बर्कनें असा एक राजकीय पुराणपुरुष निर्माण केला कीं ज्याच्या इच्छेनें भावी पिढ्या कायमच्या बांधल्या गेल्या आणि म्हणूनच या आदि पुरुषाला भावी पिढ्यांवर कायमचे निर्बंध घालण्याचा अधिकार होता हें सिद्ध करणें बर्कला क्रमप्राप्त होतें. एखादा दोरा जितका नाजूक तितका तो ताणणें धोक्याचें---अर्थात् तो तोडावयाचा असल्यास प्रश्न वेगळा. एखाद्या व्यक्तीस बर्कचा मुद्दा खोडून टाकावयाचा असेल तर त्याचाच युक्तिवाद वापरून तसें करणें अगदीं सहज शक्य आहे. पार्लमेंटाला हा अधिकार मुळांत दिलाच कोणी असा प्रश्न तो निर्माण करील. हा प्रश्न निर्माण करण्याची खोटी कीं पार्लमेंटाचें अधिष्ठानच कोसळलें म्हणून समजावें! एका

पिढीनें केलेले कायदे तसेच अनेकदां पुढील पिढ्यांतहि चालू असलेले आपण पाहातों. पण याचें कारण जीं माणसें जिवंत आहेत त्यांची कायद्यांना संमत्ति असते हें होय. एकादा कायदा जोंपर्यंत रद्द झालेला नाहीं तोंपर्यंत तो तसाच अस्तित्वांत असतो. या कायद्याचें अधिराज्य चालू असतें तें तो कायदा लोकांनीं रद्द केलेला नाहीं म्हणून; लोकांना रद्द करणें अशक्य आहे म्हणून नव्हे. परंतु बर्कच्या विधानाला लोकसंम्मतीचा आधारहि असा कोठें नाहीं. अरेरावीनें अमर होण्याच्या प्रयत्नांतच या कायद्याचें मरण आहे. नसलेला अधिकार बळकावण्याच्या प्रयत्नामुळें येथें अधिकार मिळण्याची शक्यताहि नष्ट केलेली आहे. अमर, अनिर्बंध सत्ता ही गोष्टच मुळीं मानवी नाहीं आणि जें विहिरींतच नाहीं तें पार्लमेंटच्या पोहऱ्यांत येणार कुठून ? सोळाशें अठ्ठ्यायशींच्या पार्लमेंटनें आपल्याला अनंत काळपर्यंत जिवन्त रहाण्याचा अधिकार आहे असाहि कायदा पास करून घेतला असता परंतु या गोष्टींकडे वरवरच पाहिलें पाहिजे. तो एक शाब्दिक उपचार असतो एवढाच त्याचा अर्थ. पार्लमेंट चिरायु होवो असें म्हणण्याचा जुन्या काळापासून अधिकार आहे. परंतु असें म्हटलें म्हणून पार्लमेंटचे सभासद अमर थोडेच बनतात !

जगांतील परिस्थिति क्षणोक्षणीं बदलत आहे. जसजशी परिस्थिति बदलते तसतसे माणसांचे जीवनविषयक दृष्टिकोन आणि मतेंहि बदलतात. कोणतीहि शासनसंस्था ही त्या काळांत जीं माणसें जिवन्त आहेत त्यांच्यासाठीं असते आणि म्हणून तिचें स्वरूप कसें असावें हें ठरविण्याचा अधिकार त्या माणसांचा आहे. एखाद्या कालखंडांत लोकांना जी गोष्ट योग्य व सोईस्कर वाटेल ती कदाचित् त्यांच्या पुढच्या पिढींतील लोकांना वाटणारहि नाहीं. आणि म्हणूनच एखाद्या कालखंडांतील लोकांना काय हवें आहे हें ठरवावयाचें कोणी ? त्या काळांत जिवंत असलेल्या लोकांनीं कीं पूर्वी मरून गेलेल्या लोकांनीं ?

बर्कच्या पुस्तकाचीं सुमारें शंभर पानें अशा तऱ्हेच्या विधानांनीं भरलेलीं आहेत. परंतु जोंपर्यंत भावी पिढ्यांवर त्यांच्या संमतीशिवाय वर्चस्व गाजविण्याचा अभिलाष अशा विचारसरणींत अंतर्भूत आहे तोंपर्यंत निसर्गतःच ही विचारसरणी चुकीची ठरल्याशिवाय राहाणार नाहीं. आणि म्हणूनच या पुस्तकांत दिसणारा बर्कचा सर्व वक्तृत्वपूर्ण युक्तिवाद पर्यायानें असाच अर्थशून्य आणि निराधार ठरतो. म्हणून त्याचा हा मुद्दा मी येथेंच सोडून देतों.

## मानवाच्या नैसर्गिक हक्कांविषयीं

कसलाहि पुरावा सादर न करतां किंवा बुद्धीला पटेल असा कोणताहि युक्तिवाद न मांडतां बर्कनें शासनसंस्थेच्या स्वरूपाविषयीं जे बेजबाबदार प्रलाप काढले आहेत त्यांचा मला आतां समाचार घ्यावयाचा आहे. कसलाहि निष्कर्ष काढण्यापूर्वी आधीं कांहीं पुरावे, वस्तुस्थिति, युक्तिवाद यांचा आधार सादर करावा लागतो. हे सर्व पुरावे सादर करीत असतांना तर्कशुद्ध विचारसरणीचा त्याग करून भागत नाहीं. बर्कनें फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेला आणि तिनें जाहीर केलेल्या जनतेच्या हक्कांच्या मसुद्याला सडकून शिव्या दिलेल्या आहेत. जनतेच्या या हक्काच्या तत्त्वांवर फ्रान्सची राज्यघटना उभी आहे हें येथें ध्यानांत घेतलें पाहिजे. जनतेच्या या हक्कांना बर्क कागदाचीं अर्थशून्य आणि क्षुल्लक चिटोरीं म्हणून संबोधितो. माणसाला कांहीं अधिकार असतात ही गोष्ट बर्कला मुळांतच अमान्य आहे किंवा काय? तसें असेल तर जगांत कोणत्याहि माणसाला कसलेच अधिकार नाहींत म्हणजे पर्यायानें बर्कला कांहीं अधिकार नाहींत हें त्याला मान्य करावें लागेल. कारण या जगांत माणसाशिवाय आहे कोण? परंतु माणसाला कांहीं अधिकार आहेत ही गोष्ट बर्कला मान्य असेल तर प्रश्न उद्‌भवतो तो हा कीं ते अधिकार कोणते आणि माणसाला मुळांत हे अधिकार मिळाले कसे? जीं माणसें आपल्या विधानाच्या समर्थनार्थ जुन्या काळाचा हवाला देतात तीं माणसें बहुधा जुन्या काळाचा घ्यावा तसा मागोवा घेत नाहींत. सर्व प्रवास करण्याचें तीं टाळतात. शंभर किंवा हजार वर्षांच्या मधल्याच एका टप्प्यावर तीं थांबतात आणि त्या काळची परिस्थिति व नियम आजतागायत चालू राहिलीं पाहिजेत असा हट्ट धरतात. याला कांहींच अर्थ नाहीं. अशा तऱ्हेनें मानवतेच्या उगमापर्यंतचा पूर्ण प्रवास करण्याचें टाळून अधल्या मधल्या टप्प्यावरच आपण थांबूं लागलों तर त्या काळांत वेगवेगळ्या मानव समुदायांत परस्पराशीं संपूर्ण विरोध असलेले अनेक नियम काढून दाखवितां येतील. अशा तऱ्हेच्या जुन्या काळाला जर प्रमाण मानावयाचें तर परस्पर विसंगत अशीं हजारों प्रमाणें सादर करतां येतील. परंतु आपली वाटचाल खंडित न करतां आपण जर प्रवास चालू ठेवला तर योग्य ठिकाणीं पोंहोचणें सहज शक्य होईल. ईश्वरानें जेव्हां प्रथमच माणूस निर्माण केला त्या काळांत आपण जाऊं. त्यावेळीं माणूस हा कोण होता? माणूस हा तेव्हां फक्त माणूस होता. माणूस हीच त्याची एकमेव पदवी होती. त्याहून अधिक मोठें भूषण अथवा पदवी त्यावेळीं अस्तित्वांतच

नव्हती. माणसामाणसांत भेद निर्माण करणारीं अधिकार, विरुदें आणि किताब नंतर निर्माण झाले. त्यांच्याविषयीं मी पुढें सविस्तर बोलणारच आहे.

आतां आपण माणसाचें आणि त्याच्या जन्मजात हक्काचें जें मूळ तेथपर्यंत येऊन पोंहोचलों आहोंत. या मूळारंभापासून या जगाचा कारभार आजपर्यन्त कसा चालला त्याचें अवलोकन करून, पूर्वी झालेल्या चुकांपासून शहाणपणा शिकून आपण पुढें जाणें एवढेंच आपण करूं शकतो. शंभर किंवा हजार वर्षांपूर्वीचीं माणसें त्यांच्या काळांत आपण आज आहोंत तशीं आधुनिक होतीं. त्यांना त्यांचे पूर्वज होते. त्यांच्या पूर्वजांना त्यांचे पूर्वज होते—आणि आज हयात असलेलीं आपण माणसेंसुद्धां कालांतरानें भावी पिढ्यांचे पूर्वज होऊन बसणार आहोंत. केवळ जुन्या काळाचा हवाला देऊन जर आपण त्याप्रमाणें राज्य करूं लागलों तर आपल्यानंतर हजार वर्षांनीं येणारी पिढी आपला हवाला देऊं लागेल. तात्पर्य, जुन्या काळांतले आपल्याला सोईस्कर होतील ते टप्पे निवडून भागणार नाहीं. त्यांतून काय निष्पन्न होणार? एका प्रमाणाविरुद्ध दुसरें प्रमाण असाच गोंधळ चालू रहाणार. हें जर थांबवावयाचें असेल तर माणसाच्या आणि त्याच्या जन्मजात अधिकारांच्या दैवी उगमापर्यंत आपणाला जावें लागेल. आपला अविरत चाललेला शोध या ठिकाणींच कृतार्थ होईल आणि आपल्या बुद्धीला येथेंच खरें समाधान लाभेल. मानवजातीच्या निर्मितीनंतर शंभर वर्षांच्या समाजाच्या नंतरच्या समाजांत, समजा, व्यक्तिमात्राचे मूलभूत अधिकार कोणते हा मुद्दा जर विवाद्य झाला असता तर त्या समाजानें मानवजातीच्या आरंभकालाचा हवाला प्रमाण मानला असता. आजहि आपण नेमका हाच आधार प्रमाण म्हणून मानला पाहिजे. मला येथें कोणत्याहि विशिष्ट धर्ममताचा पुरस्कार करावयाचा नाहीं. तरीहि ख्रिस्ताच्या पूर्वजांचा मागोवा घेत आपल्याला जावयाचें असेल तर आदि पुरुष जो ॲडम त्याच्यापर्यन्त आपल्याला जावें लागेल हें मला सांगावेंसें वाटतें. मग माणसाच्या मूलभूत अधिकारांचा शोध ॲडमपासूनच कां करूं नये. जे असा शोध करूं नये असें म्हणतात त्यांच्या पोटांत कोणता हेतु दडलेला असतो तें मी सांगतों. मग्रूर राजे आणि शासनसंस्था यांना माणसाचें मूलभूत स्वातंत्र्य हिरावून घेऊन त्यांच्यावर आपली सत्ता लादावयाची असल्यानें अशा तऱ्हेचा शोध त्यांना नको असतो.

भावी पिढ्यांवर सत्ता गाजविण्याचा अधिकार पूर्वींच्या पिढ्यांना होता अशी

जर कल्पना केली, तर त्या अधिकाराची सुरुवात कोठल्या तरी एका विशिष्ट पिढीपासून झाली असली पाहिजे. परंतु त्या विशिष्ट पिढीनें जर अशा तऱ्हेचे अधिकार आपल्या हातीं कधींच घेतले नसतील, तर तिच्या पुढच्या पिढ्यांना अशा तऱ्हेच्या अधिकाराच्या परंपरेचा हवाला देतां येणार नाहीं; किंवा तसा पायंडाहि पाडतां येणार नाहीं. समानाधिकाराचें उज्ज्वल तत्त्व (त्याचें मूळ ईश्वराच्या इच्छेंतच आहे.) केवळ एकाद्या कालखंडांत जगणाऱ्या व्यक्तींनाच लागू आहे असें नव्हें, तर पुढील सर्व पिढ्या त्या तत्त्वाला जागणें हें कर्तव्य आहे.

मानवजातीच्या निर्मितीचा इतिहास पहा किंवा त्याविषयीं वेगवेगळ्या थरांतील समाजांत प्रचलित असलेली माहिती तपासून पहा. त्यांच्या तपशिलांत फरक पडेल; परंतु त्या सर्वांतून एकच सूत्र अनुस्यूत असलेलें आढळेल आणि तें म्हणजे, सारीं माणसें समान आहेत हें होय. याचाच अर्थ असा कीं प्रत्येक माणूस जन्माला येतो तो निसर्गतःच कांहीं अधिकार घेऊन येतो. पिढ्यापिढ्यांप्रमाणें यांत बदल होत नसून, हें सूत्र मानवजातीच्या आरंभापासून अव्याहत चालू असतें; आणि प्रत्येक पिढी ही जणूं काय या तत्त्वाचें वाहनच असते. म्हणूनच, जन्माला येणारें प्रत्येक मूल ईश्वराचाच अंश आहे असें समजलें पाहिजे. या जगांत जन्मलेल्या पहिल्या माणसाला हें जग जसें नवें होतें तसेंच, तें या नवीन जन्मलेल्या मुलाला असतें; आणि पहिल्या मानवाला जे जन्मजात हक्क होते तेच या नवजात बालकाला असतात.

मोझायकप्रणीत मानवजातीचा इतिहास, पाहिजे तर तो धार्मिकतेनें श्रद्धेय माना किंवा शुद्ध ऐतिहासिक दृष्टिकोनांतून त्याच्याकडे पाहा. त्यांत मानवाच्या समान हक्कांचेंच तत्त्व उद्घोषिलेलें आढळेल. या मुद्याविषयीं वाद होण्याचें कारण नाहीं. मोझायक् लिहितो : "देव म्हणाला : माणसाच्या रूपानें मी माझी प्रतिमा निर्माण करतों. मग ईश्वरानें आपली मानवरूपी प्रतिमा निर्माण केली; त्यानें स्त्री आणि पुरुष निर्माण केले" येथें स्त्री आणि पुरुष या एकाच भेदाचा उल्लेख केला आहे; दुसरा कसलाहि भेद उल्लेखिलेला नाहीं. मोझायक्च्या ग्रंथाला तुम्हीं दैवी ग्रंथ मानलें नाहीं तरी हरकत नाहीं; त्याचें ऐतिहासिक मूल्य अबाधितच राहातें. त्यावरून असा निष्कर्ष निघतो कीं, समान हक्कांचें हें तत्त्व म्हणजे आधुनिकांना लागलेला शोध नसून त्याचें अस्तित्व अगदीं मानव जातीच्या आरंभापासूनचें आहे.

या जगांतील सर्व धर्मांना मानव समान आहे हेंच तत्त्व संमत आहे असें दिसतें. माणूस स्वर्गांत असो, नरकांत असो वा मरणोत्तर कोणत्याहि स्थितींत असो सत् आणि असत् हे दोनच भेद धर्माला अभिप्रेत असतात. शासनसंस्थांनीं आंखलेल्या कायद्यांत देखील हेंच तत्त्व गृहीत धरलेलें असतें; न्यायालयांचा निकाल हा गुन्ह्याचें स्वरूप काय आहे यावर अवलंबून असतो, माणसामाणसांतली कमी-अधिक प्रतिष्ठा हा न्यायाचा निकष होऊं शकत नाहीं.

समानता हें एक महान् सत्य आहे; आणि त्याच्या विकासांतच माणसाचें कल्याण आहे. या तत्त्वाच्या प्रकाशांतच मानवीसंबंधांचा विचार केला पाहिजे, तसा विचार करावयास माणसांना शिकविलें पाहिजे. तरच माणसाला ईश्वर आणि समाज यांच्यासंबंधींच्या आपल्या कर्तव्याचा खरा बोध होऊं शकेल. परंतु माणसाला जेव्हां आपल्या या थोर उगमाचा विसर पडतो—किंवा सध्यांच्या लोकप्रिय परिभाषेंत म्हणायचें म्हणजे, त्याला जेव्हां आपल्या कुळाचा आणि कुटुंबाचा विसर पडतो तेव्हांच तो निर्घृण बनतो.

युरोपखंडांतील सर्व सरकारें आज माणसामाणसांत आणि माणूस आणि परमेश्वर यांत भेद निर्माण करीत आहेत. माणूस आणि परमेश्वर यांच्यांत जकातीच्यां कृत्रिम नाकीं निर्माण करणें हें घोर पातक आहे असें मला वाटतें. बर्कचें एक वाक्य मी येथें उद्धृत करतों. या वाक्यावरून ईश्वर आणि माणूस यांच्यांत बर्क किती प्रकारचे भेद निर्माण करतो हें सहज लक्षांत येईल. आपण ईश्वराचे कोणी दूतच आहोंत अशा थाटांत बर्क म्हणतो, "आपण ईश्वराला भितो; राजासमोर आपण दबून वागतों, पार्लमेंटाविषयीं आपल्याला आपुलकी वाटते. धर्मगुरु आणि न्यायाधीश यांच्याकडे आपण कर्तव्याच्या आणि आदराच्या भावनेनें पाहातों; तसेंच सरदारांविषयीं आपल्याला अभिमान वाटतो." या नामावळींत बर्क पोप–पिटर यांचीं नांवें घालायला येथें विसरलेला दिसतो !!

कर भरल्याशिवाय जेथून जातां येत नाहीं अशीं जकात नाक्यांचीं जाळीं निर्माण करणें यांत माणसाच्या कर्तव्याची कृतार्थता नाहीं. माणसाचें कर्तव्य अगदीं साधें-सुधें आहे. या कर्तव्याच्या बाबतींत दोन मुद्यांवर आपण विशेष भर दिला पाहिजे. त्यापैकीं एक म्हणजे ईश्वरशरणता आणि दुसरा म्हणजे शेजाऱ्यानें आपल्याशीं जसें वागावें अशी आपली अपेक्षा असेल तसेंच त्याच्याशीं आपण वागणें हा होय. ज्यांच्या हातांत जनतेनें आपले प्रतिनिधि म्हणून सत्ता दिलेली आहे त्यांनीं या

अधिकाराचा सदुपयोग केला तरच ते लोकादरास पात्र होतील आणि जे लोकांनीं अधिकार दिले नसतांहि कांहीं अधिकार बळकावून असतात त्यांच्याविषयीं विचारी माणसांना तिटकाराच वाटेल.

येथपर्यन्त आपण माणसाच्या नैसर्गिक हक्कांचा विचार केला. आतां आपण त्याच्या सामाजिक हक्कांचा विचार करूं; आणि असा विचार करीत असतांना नैसर्गिक हक्कांतूनच सामाजिक हक्क कसे निर्माण झाले आहेत तें पाहूं. माणसानें समाज ही संस्था निर्माण केली ती कांहीं सुखांतला जीव दुःखांत घालण्यासाटीं किंवा आपले आधीं असलेले हक्क गमावून बसण्यासाटीं नव्हे. आपलें सुखस्वास्थ्य, तसेच अधिकार अधिक सुरक्षित रहावे म्हणूनच त्यानें समाज निर्माण केला. नैसर्गिक हक्क आणि सामाजिक हक्क यांच्यांतील फरक निश्चित समजावून घेण्यासाटीं आपण त्या दोघांच्या स्वरुपाविषयीं विचार करूं. अगदीं थोडक्या शब्दांत हें विवेचन करतां येईल. नैसर्गिक हक्क माणसाला जन्मतःच प्राप्त झालेले असतात. सर्व बौद्धिक हक्क, त्याचप्रमाणें हक्कांना धक्का न लावतां स्वतःला सुखस्वास्थ्य मिळविण्याचा हक्क, हे नैसर्गिक आहेत. माणूस समाजाचा एक घटक म्हणून वावरूं लागल्यानें त्याला जे प्राप्त होतात ते सामाजिक हक्क. प्रत्येक सामाजिक हक्काला अपरिहार्यपणें नैसर्गिक हक्काची बैठक असते. परंतु हे नैसर्गिक हक्क स्वतः उपभोगण्यासाटीं आवश्यक ती ताकद दर एका व्यक्तीकडे नसते. अशा हक्कांपैकीं सुरक्षितता आणि संरक्षण या दोघांचा उल्लेख मला येथें करावासा वाटतो.

वरील विवेचनावरून मनुष्य समाजपरायण झाल्यावरहि जे टिकवून ठेवतो ते नैसर्गिक हक्क आणि जे तो समाजाला देऊन टाकतो ते हक्क यांतील फरक स्पष्ट व्हावा. जे हक्क तो स्वतःकडे ठेवतो ते हक्क बजावण्याचें सामर्थ्य जन्मतःच त्याच्याकडे असतें. धर्ममतासारखे बौद्धिक क्षेत्रांतील हक्क या कक्षेंत येतात. परंतु ज्या नैसर्गिक हक्कांची बजावणी तो एक व्यक्ति या नात्यानें करूं शकत नाहीं ते हक्क आपल्याजवळ ठेवून त्याला फायदा काय? न्याय देण्याची शक्ति प्रत्येक व्यक्तींतच असते; तो त्याचा नैसर्गिक हक्कहि आहे. परंतु एक व्यक्ति या नात्यानें तो न्यायाची अंमलबजावणी करूं शकत नाहीं आणि म्हणूनच ज्या समाजाचा तो एक घटक असतो, ज्या समाजाचा तो आधार घेतो त्या समाजाला हा अधिकार तो देऊन टाकतो. परंतु नैसर्गिक हक्क म्हणून मिळालेली न्यायबुद्धि तो कायम ठेवतो. याचा मोबदला म्हणून समाज त्याला कांहीं देत नाहीं. प्रत्येक मनुष्य

हा सामाजिक हक्कांचा मालक असतो आणि हे हक्क उपभोगण्याचे त्याला सर्व अधिकार असतात. या प्रमेयावरून पुढील तीन निष्कर्ष निघतात. (१) प्रत्येक सामाजिक हक्क हा नैसर्गिक हक्कांतूनच निर्माण होतो...किंवा त्याच्या बदल्यांत मिळतो. (२) नैसर्गिक हक्क माणसाला व्यक्ति म्हणून उपभोगितां येत नाहींत आणि त्यामुळें फुकट जातात परंतु समष्टीच्या स्वरूपांत मात्र या हक्कांची अंमलबजावणी करणें मात्र शक्य होतें असे हक्क सामाजिक हक्कांच्या स्वरूपांत अवतीर्ण होतात. (३) हे सामाजिक हक्क व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कावर आक्रमण करूं शकत नाहींत. सामाजिक हक्कांचें अस्तित्व गृहीत धरूनहि माणसाचे नैसर्गिक हक्क सुरक्षित असतात—आणि हे हक्क उपभोगिण्याचें सामर्थ्य त्याच्यांत निसर्गतच असतें.

येथवर आपण निसर्गनिर्मित व्यक्ति या टप्प्यापासून तों समाजाचा एक घटक या टप्प्यापर्यंतचा माणसाचा प्रवास पाहिला. त्याचप्रमाणें कोणते नैसर्गिक हक्क तो आपल्याकडे ठेवतो आणि कोणत्या हक्कांचा सामाजिक हक्क मिळविण्यासाठीं त्याग करतो हें आपण पाहिलें. हींच तत्त्वें आतां आपण शासनसंस्थेला लावून पाहूं.

## सरकार या संस्थेचें स्वरूप

जगांतल्या व्यवहारावर नजर टाकली असतां सामाजिक सहकारांतून कोणत्या शासनसंस्था निर्माण होतात आणि कोणत्या होत नाहींत हें सहज कळून येण्यासारखें आहे. परंतु असें करण्यापूर्वी आपण शासनसंस्थांचें कोणकोणते प्रकार होऊं शकतात तें पाहूं. मला वाटतें तीन प्रकारच्या शासनसंस्था असतात. पहिली अंधश्रद्धेतून निर्माण होणारी, दुसरी तलवारीच्या जोरावर जनतेवर लादलेली आणि तिसरी माणसाचें सामाजिक हित व हक्क यांच्या पायावर उभी असलेली. यांपैकी पहिली शासनसंस्था म्हणजे धर्मगुरूंची, दुसरी विजेत्यांची आणि तिसरी विवेकावर आधारलेली.

जेव्हां समाजांतील कांहीं धूर्त लोकांनीं बुवाबाजी करून ईश्वराची इच्छा आपणासच कळते असें सांगण्यास सुरवात केली आणि जनतेनें तें मान्य केलें तेव्हां समाजावर या धर्मगुरूंचें राज्य सुरू होतें. या धर्मगुरूंनीं मागच्या दारानें युरोपीअन राष्ट्रांतील सर्व दरबारांत प्रवेश मिळविला होता. हे बुवाबाजी करणारे धर्मगुरू म्हणतील तें प्रमाण, ते म्हणतील तो कायदा असा जवळ जवळ प्रकार झाला होता.

आणि जोंपर्यंत समाजांत भोंगळ अंधश्रद्धा टिकून होती तोंपर्यंत हें धर्मगुरुंची मक्तेदारी बनलेलं सरकारहि टिकून होतें.

यानंतर खड्गधारी विजेत्यांचें युग सुरू झालें. इंग्लंड जिंकणाऱ्या विल्यम-प्रमाणें या विजेत्यांनीं तलवारीच्या बळावर लोकांवर आपलें राज्य लादलें. अशा तऱ्हेचें सरकार, जोंपर्यंत हे विजेते जनतेला दडपून ठेवूं शकतात तोंपर्यंतच, टिकूं शकते. आपलें अधिराज्य अधिक काळपर्यंत टिकून राहावें या हेतूनें या जुलमी राजांनीं आपल्या दडपशाहीला धूर्ततेचा आधार दिला. ख्रिस्ती धर्माच्या तत्त्वांशीं द्रोह पत्करून धार्मिक क्षेत्रांत आपला अधिकार सार्वभौम आहे असें सांगणाऱ्या पोपच्या पावलांवर पाऊल टाकून या राजांनीं तुमच्यावर राज्य करण्याचा आम्हांस दैवी अधिकार आहे असेंच सांगण्यास सुरुवात केली. चर्च आणि शासनसंस्था यांनीं हातमिळवणी केली आणि हजारों लोकांनीं फसून भाबडेपणानें या नव्या शोधाला मान्यता दिली. जेव्हां मी माणसाच्या नैसर्गिक प्रतिष्ठेचा विचार करतों (कारण अजूनही निसर्गानें माझ्या भावना बोंथट केलेल्या नाहींत) तेव्हां लबाडी आणि धाकदपटशा यांच्या जोरावर सगळी मानवजात मूर्ख आहे असें समजून त्यांच्यावर राज्य करणाऱ्या जुलमशहांच्या आठवणीनें मला त्यांचा अतिशय तिटकारा येतो.

आतां सामाजिक सहकार्यांतून निर्माण होणाऱ्या शासनसंस्थेचें स्वरूप कसें असतें तें पाहूं... शासनसंस्था हा राज्यकर्ते आणि जनता यांच्यांतील करार आहे. या तत्त्वाचा प्रसार करणें हें सध्यां प्रागतिक विचाराचें मानलें जातें. या विचारामुळें स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें अधिक ठसलीं जातात ही कल्पना. परंतु हें बरोबर नाहीं. कारण येथें कार्यकारण यांचा विपर्यास होतो. कोणतीहि शासनसंस्था अस्तित्वांत येण्यापूर्वी माणसांचें अस्तित्व होतें हें गृहीत धरावें लागतें. परंतु एक काळ असा असलाच पाहिजे कीं जेव्हां शासनसंस्था अस्तित्वांतच नव्हती. याचाच अर्थ असा कीं त्या वेळीं शासक आणि जनता यांच्यांत कोणत्याहि स्वरूपाचा करार होणें अशक्यच होतें. म्हणून प्रत्येक व्यक्तीनें आपल्या नैसर्गिक अधिकारानुसार दुसऱ्या व्यक्तीशीं शासनसंस्था निर्माण करण्याच्या दृष्टीनें करार केला असणार. या तत्त्वावर जी शासनसंस्था उभी असेल तिलाच न्याय्य आणि समर्थनीय ठरवितां येईल. शासन-संस्थेचें स्वरूप समजावून घेण्यासाठीं आपल्याला तिच्या उगमापर्यंत जाणें भाग आहे. असें करीत असतांना व्यक्तीव्यक्तींच्या सहकार्यांतून निर्माण झालेली शासन-

संस्था कोणती आणि जनतेवर लादलेली शासनसंस्था कोणती यांच्यांतील भेद उघड होतो. परंतु अशा तऱ्हेचा भेद करण्यास बर्क मात्र तयार होत नाहीं. उगमापर्यंत जावयाची त्याची तयारी नसल्यानें त्याच्या शासनसंस्थाविषयक विचारांत गोंधळ दिसून येतो. परंतु बर्कनें पुढेंमागें कधीं संधि मिळतांच फ्रान्स आणि इंग्लंड यांच्या राज्यघटनांची तुलना करण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. विवाद्य मुद्या-वरची ही चर्चा आधीं बर्कनेंच सुरू केली. जें सत्य आहे त्याला प्रकट होण्याचा अधिकार आहे; आणि या ठिकाणी सत्य प्रकट करणें माझ्या तत्त्वांच्या दृष्टीनें मला आवश्यक वाटत असल्यामुळें मी सामाजिक सहकार्यांतून निर्माण होणाऱ्या शासन-संस्थांविषयीं अधिक खोलांत जाऊन विचार करणार आहें. परंतु त्यापूर्वी राज्यघटना म्हणजे काय, तिची निश्चित व्याख्या कोणती याचा आपल्याला विचार करावा लागेल. कारण नुसताच शब्द वापरून आपलें भागणार नाहीं, तर त्या शब्दाची अर्थनिश्चिति करावी लागेल. राज्यघटना ही काल्पनिक गोष्ट नसून ती वस्तुस्थिति आहे. राज्य-घटना हें अमूर्त ध्येय नव्हे, तिला प्रत्यक्षांत अस्तित्व आहे. आणि म्हणूनच जेथें राज्यघटनेवर बोट ठेवतां येत नाहीं तेथें राज्यघटना अस्तित्वांतच नसते. शासन-संस्थेच्या अगोदर राज्यघटना जन्मावी लागते. ही राज्यघटना शासनसंस्थेला निर्माण करते. शासनसंस्था राज्यघटना निर्माण करीत नसून शासनसंस्था स्थापन करणारी जनता ती निर्माण करीत असते. शासनसंस्थेचें प्रत्येक कलम तुम्ही उद्धृत करूं शकतां. या सर्व कलमांत कोणत्या तत्त्वावर सरकार स्थापावें, त्याचें संघटन कसें करावें, त्याचें अधिकारक्षेत्र कोणतें, निवडणुका कशा व्याव्या, पार्लमेंटची अधिकारमर्यादा किती काल असावी, इत्यादि सर्व गोष्टी अनुस्यूत असतात आणि म्हणूनच सरकारनें केलेल्या कायद्यांचें न्यायालयांना जसें महत्त्व असतें तसेंच शासनसंस्थेला राज्यघटनेचें महत्त्व असतें. न्यायालय कायदे करूं शकत नाहीं किंवा बदलूंही शकत नाहीं. शासनसंस्थेनें घालून दिलेल्या कायद्या-नुसारच त्यास चालावें लागतें. त्याचप्रमाणें राज्यघटनेंतील सूत्रानुसार शासनसंस्थेला चालणें भाग पडतें.

## अमीरउमरावांविषयीं

फ्रान्सच्या राज्यघटनेनें किताब देण्याचा प्रकार बंद केला. त्यामुळें कांहीं देशांत अमीरकी, उमरावकी इत्यादि नांवांनी ओळखली जाणारी किताबशाही फ्रान्समधून

नष्ट होऊन सगळे लोक माणूस या एका समान भूमिकेवर आले.

हे किताब म्हणजे टोपण नांवाचाच एक प्रकार आहे आणि प्रत्येक टोपण नांव हाच एक किताब आहे असें म्हणावयास हरकत नसावी. तसें पाहिलें तर हा टोपण नांवाचा किंवा किताबांचा प्रकार अगदींच निरुपद्रवी आहे. परंतु दुर्दैवानें या निरुपद्रवी भासणाऱ्या गोष्टीनें माणसाच्या चारित्र्याचा अधःपात करावयास सुरुवात केली आहे. या किताबशाहीमुळें जीवनांतील महान् गोष्टींपुढें मनुष्याचें क्षुद्रत्व प्रकट होतें; आणि जीवनांतील अतिशय क्षुल्लक गोष्टींच्या बाबत बायकी नखरेबाजपणा त्यांच्यांत निर्माण होतो. हे किताबधारी एखाद्या शाळकरी पोरीनें आपल्या बरोबरीच्या मुलीला आपली नवी रिबिन् किंवा नवे गार्टर अति उत्साहानें दाखवावे त्याप्रमाणें आपले किताब पोरकटपणें मिरवीत असतात. जुन्या काळांतल्या एका लेखकानें म्हटलें आहे, "बालपणीं मी लहान मुलासारखा विचार करीत होतो; परंतु मी प्रौढ झालों तेव्हां सारा पोरकटपणा मीं टाकून दिला." विकसित झालेल्या फ्रान्सच्या मनानें किताबांच्या प्रथेचा त्याग करणें अगदीं स्वाभाविक आहे. सरदार आणि उमराव हे पोरवयांतले कपडे फ्रान्सनें टाकून देऊन आतां प्रौढावस्थेंत प्रवेश केला आहे. फ्रान्सनें आपली उंची वाढवली आहे. माणसांतल्या माणुसकीची वाढ व्हावी म्हणून फ्रान्सनें आपल्यांतील क्षुद्र वृत्तीचा त्याग केला आहे. सरदार, अमीर, उमराव हे अर्थशून्य किताब आतां फ्रान्सच्या प्रौढ मनाची खुषमस्करी करूं शकत नाहींत. ज्यांच्याजवळ हे किताब होते त्यांनीं सुद्धां या मूर्खपणाचा त्याग केला असून ते या विषमतेचा तिटकारा करूं लागले आहेत. त्यांच्यांत आणि समाजांत तटबंदी निर्माण करणाऱ्या सर्व गोष्टींचा त्याला तिटकारा येतो. एखाद्या दुष्ट जादुगारानें आपल्या हातांतील जादूच्या काठीनें एखाद्या माणसाभोवतीं वर्तुळ काढावें व हें जादूचें दुष्ट वर्तुळ ओलांडतां न आल्यामुळें त्या माणसाला त्याच्या आवतीभोंवतीच्या प्रसन्न सुंदर जीवनाशीं समरस होतां येऊं नये—किताबांत अडकलेल्या माणसाची अशीच केविलवाणी अवस्था होते.

फ्रान्सनें किताबशाहीचा त्याग केला यांत आश्चर्य तें काय? जगांतील इतर राष्ट्रें अजून किताबशाहीचा त्याग करीत नाहींत हेंच खरें आश्चर्य नव्हे काय? हे किताब म्हणजे काय? त्यांची योग्यता काय, त्यांचें मोल किती? जेव्हां आपण न्यायाधीश किंवा सेनापति हे दोन शब्द उच्चारतो तेव्हां कांहीं कर्तव्यें आणि कांहीं

चारित्र्याची मूल्यें आपण या दोन शब्दांशीं निगडित करतों. न्यायाधीशाकडून निःपक्षपातीपणाची आणि सेनापतीकडून शौर्याची आपण अपेक्षा करीत असतों. परंतु किताबांच्या बाबतींत मात्र आपल्या अशा कांहींच कल्पना वा अपेक्षा नसतात. ॲडमपासून आतांपर्यंत मानवजातीच्या शब्दकोशांत सरदार किंवा उमराव या नांवाचा एकहि प्राणी आढळत नाहीं. या शब्दांशीं कसलाहि विचार वा कल्पना निगडित नाहीं. या शब्दांनीं नेमकें काय व्यक्त होतें—सामर्थ्य कीं दुबळेपणा, शहाणपणा कीं मूर्खपणा, मूल कीं प्रौढ मनुष्य, घोडा कीं घोडेस्वार—याचाच पत्ताच लागत नाहीं. मग जे किताबदर्शक शब्द नेमका कांहींच अर्थ सांगूं शकत नाहींत त्यांच्याविषयीं आदर कसा बरें निर्माण व्हावा !

परंतु एवढेंच पुरेसें नाहीं. जर सर्व राष्ट्र या किताबांकडे तुच्छतेनें पाहूं लागलें तर आपोआपच किताबांचा सर्व भाव कोसळेल आणि कोणीहि ते धारण करणार नाहीं. एकदां समाज किताबांचा तिटकारा करूं लागला कीं हे किताब काढून घेण्याचा किंवा नष्ट करण्याचा प्रश्नच उरणार नाहीं—कारण ते आपोआपच गळून पडतील. युरोपांतील सर्व राष्ट्रांत या किताबांचे काल्पनिक प्रस्थ हळूहळू ओसरूं लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत; आणि या जगांत जसजसे विचार-विवेकाचें प्राबल्य वाढत आहे तसतशी ही किताबशाही आपलें पाऊल द्रुतगतीनें मागें घेऊं लागली आहे. एक काळ असा होता कीं सर्वांत कमी दर्जाच्या सरदाराला देखील आज सर्वांत उच्च दर्जाच्या सरदाराला आहे त्यापेक्षां अधिक मान होता. आज एकादा सरदार जाऊं लागला तर लोकांना विशेष त्याचें कांहीं वाटत नाहीं. परंतु जुन्या काळीं खिश्चन राष्ट्रांतून नव्या साहसाच्या शोधार्थ घोडदौड करीत जाणाऱ्या सरदाराचें दर्शन हा अपूर्व योग आहे असें लोक समजत. आज माणसांनीं हा मूर्खपणा ओळखून त्याचा त्याग केला आहे. हास्यास्पद झालेली किताबशाही याच मार्गावर आहे.

सामाजिक प्रतिष्ठेची पुनर्रचना नव्या मूल्यांवर केली पाहिजे हें फ्रान्समधील देशभक्तांनीं योग्य वेळीं ओळखलें. जुनी समाजव्यवस्था कोसळली आहे; आतां नवी समाजरचना किताबशाहीसारख्या भंपक गोष्टीवर न आधारितां चारित्र्याच्या पायावर आधारिली पाहिजे. फ्रान्सच्या लोकांनीं विवेकाच्या पवित्र वेदीवर किताब-शाहीची आहुति दिली आहे.

फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेनें असें जाहीर केलें आहे कीं या किताबशाहीमुळें

समाजाचा अधःपात होतो. यामुळें अमीरशाहीच्या स्वरुपाचा अधिक खोलांत जाऊन विचार करणें भाग पडतें.

तरवारीच्या जोरावर जीं राज्यें जनतेवर लादलीं गेलीं त्या राज्यांतूनच ही उमरावशाहीची कल्पना जन्मली. मुळांत ही एक सैनिकी व्यवस्था होती. लादलेलें सरकार मजबूत सैन्यव्यवस्था असल्याशिवाय टिकूं शकत नाहीं हें उघड आहे. ही व्यवस्था बळकट होण्यासाठीं कांहीं लोकांना विशेष अधिकार देणें प्राप्त होतें. या व्यवस्थेचें सातत्य टिकविण्यासाठीं हे अधिकार वंशपरंपरेनें देण्यांत आले. कुटुंबांतल्या सर्वांत मोठ्या मुलाकडे या किताबांचा वारसा जाई. बाकीच्यांना कांहींच मिळत नसे.

मोठ्या मुलालाच फक्त वारसा देण्याचा हा कायदा विचारांत घेतला असतां उमरावशाहीचें खरें स्वरुप उघड होतें. हा कायदा निसर्गाच्या नियमांविरुद्ध आहे आणि तो नष्ट व्हावा अशी निसर्गाची इच्छा आहे. कौटुंबिक न्यायाची प्रस्थापना करा आणि मग पाहा उमरावशाही कोसळते कीं नाहीं तें. मोठ्या मुलासच वारसा देण्याच्या या उमरावशाही कायद्यामुळें सहा मुलांच्या कुटुंबांतली पांच मुलें उघड्यावर पडतात. उमरावशाही फक्त मोठ्या मुलालाच मानते—बाकीचीं मुलें जशीं कांहीं टाकून देण्यासाठीं जन्माला येतात.

ज्याप्रमाणें माणसाच्या जीवनांतील निसर्गनियमांच्या विरुद्ध असलेली प्रत्येक गोष्ट सामाजिक हिताच्या दृष्टीनें घातक ठरते त्याप्रमाणें हीही गोष्ट घातक ठरते. उमरावशाहीनें न स्वीकारलेलीं मुलें समाजाच्या खर्चानें अनाथालयांत वाढणाऱ्या मुलांप्रमाणें जणुं काय वाढतात; यांच्या बाबतींत समाजाला जरा अधिक खर्च करावा लागतो—कारण त्यांना देण्यासाठीं सरकार, आवश्यकता नसून सुद्धां हुद्यांच्या नोकऱ्या निर्माण करतें व त्याचा खर्च समाजाच्या डोक्यावर निष्कारण बसतो. उमराव घराण्यांतील आईबाप आपल्या इतर मुलांविषयीं कोणती भावना बाळगीत असतील बरें ! खरें म्हणजे सगळींच त्यांचीं मुलें असल्यामुळें सगळ्यांना बापाच्या सत्तासंपत्तीवर समान अधिकार हवा. परंतु उमरावशाहीचा कायदा मात्र मोटा मुलगा सोडून बाकीच्या मुलांना अनाथ करून टाकतो. एकाच दृष्टीनें पाहिलें तर हीं मुलें समान आईबापाच्या रक्तामासांचीं असतात; कायद्याच्या दृष्टीनें मात्र त्यांच्याशीं आईबापांचा संबंध शून्य असतो. आईबाप आणि त्यांचीं मुलें, व्यक्ति आणि समाज यांच्यांतील नैसर्गिक संबंध पुनः प्रस्थापित व्हावेत आणि दुष्ट उमरावशाहीचें

मूळच उखडलें जावें यासाठीं फ्रान्सच्या राज्यघटनेनें मोठ्या मुलाला वारसा देण्याचा कायदाच नष्ट करून टाकला. या राक्षसी कायद्याचें प्रेत पडलेलें आहे. बर्कनें पाहिजे तर त्याच्या थडग्यावर चार ओळी लिहाव्या.

आतांपर्यंत आपण उमरावशाहीचा एकाच दृष्टीनें विचार केला. आतां तिच्या इतर बाजूंचा विचार करूं. उमरावशाहीकडे तुम्ही बाजूनें पाहा, समोरून पाहा, किंवा कसेंहि पाहा. ती प्रथाच मुळीं राक्षसी आहे ही गोष्ट निर्विवादच राहाणार. इतर देशांत असलेल्या उमरावशाहीहून फ्रान्समधील उमरावशाहींत एक गोष्ट कमी होती. फ्रान्समधल्या उमरावशाहीला कायदे करण्याचा वंशपरंपरागत अधिकार नव्हता. फ्रान्सच्या राज्यघटनेनें अशा सरदार सभेचें अस्तित्व उखडून टाकतांना जी भूमिका घेतली तिचें स्वरूप आपण पाहूं. फ्रान्सच्या राज्यघटनेनें पुढील कारणांसाठीं उमरावशाहीला मान्यता देण्याचें नाकारलें. (१) उमरावशाही ही कौटुंबिक अन्याय आणि जुलूम यांवर उभी असते. (२) न्याय सर्वांना समान मिळाला पाहिजे. हें फ्रान्सच्या राज्यघटनेंतील मूलतत्त्व आहे. आणि उमरावशाही तर याच तत्त्वाच्या गळ्याला नख लावीत असते. उमरावशाहींतील सर्वांत मोठा मुलगा आपल्या धाकट्या भावंडांचे न्याय्य हक्क तुडविल्याशिवाय अधिकारारूढ होऊंच शकत नाहीं—तसेंच त्याला शिकवलें जातें. जी व्यक्ति आपल्या कुटुंबांतील लोकांचे सर्व हक्क शिरजोरपणें बळकावून बसते तिला राष्ट्राच्या कायदेमंडळांत बसून कायदा करण्याचा अधिकार कसा देणार ? (३) कायदा करण्याचा अधिकार वंशपरंपरेनें देणें ही गोष्टच मुळीं वंशपरंपरेनें न्यायाधीश नेमणें, वंशपरंपरेनें गणितज्ञ किंवा राजकवि नेमणें या सारखीच हास्यास्पद आहे. (४) जे सरदार आपल्या कृतीबद्दल कोणालाहि जबाबदार नसतात त्यांच्यावर विश्वास टाकणें चुकीचें आहे. (५) उमरावशाहीमुळें तलवारीच्या जोरावर आपलें राज्य लोकांवर लादणाऱ्या राजांचा रानटीपणा तसाच चालू राहातो आणि एक माणूस दुसऱ्या माणसाची मालमत्ता होऊं शकतो ही दुष्ट कल्पना रूढ होते. (६) उमरावशाहीमुळें माणसाच्या वंशाचा अधःपात होतो. ज्यू लोकांच्या उदाहरणावरून ही गोष्ट सिद्ध झालेली आहे कीं आपापसांत होणाऱ्या लग्नांमुळें पुढच्या पिढ्या निकोप निपजत नाहींत. उमरावशाहींत प्रतिष्ठेच्या भ्रामक कल्पनांमुळें आपापसांतील हीं लग्नें अपरिहार्य होऊन बसतात.

ज्या कारणांसाठीं उमरावशाहीची कल्पना रूढ झाली तें इच्छित ध्येयहि तिला

साधतां येत नाहीं. माणसांतल्या उदात्ततेला ती मारक ठरते. बर्कनें उदात्त चारित्र्याच्या गप्पा मारल्या आहेत. उदात्त चारित्र्य म्हणजे काय हें त्याला दाखवून तर देऊं द्या! जगांतील सर्व थोर माणसें लोकशाही समाजांतूनच निर्माण झालीं आहेत. विकासाच्या बाबतींत, मानवतेच्या कल्याणाच्या बाबतींत, उमरावशाही लोकशाहीबरोबर कधींहि चालूं शकणार नाहीं. खोटी प्रतिष्ठा माथ्यावर लादलेला सरदार आणि ज्याला निसर्गानेंच उदात्त चारित्र्याचें वरदान दिलेलें आहे अशा माणसासमोर क्षुद्र भासावा हें अगदीं स्वाभाविक आहे. ज्या माणसाला निसर्गानें हें वरदान दिलेलें असतें तो माणूस उमरावशाहीला तिरस्करणीय मानतो.

## धार्मिक स्वातंत्र्याविषयीं

फ्रान्सच्या राज्यघटनेनें तथाकथित धार्मिक आणि अधार्मिक सहिष्णुता वगळून प्रत्येक माणसाचा धर्मस्वातंत्र्याचा नैसर्गिक अधिकार प्रस्थापित केला आहे.

पुष्कळ वेळां असहिष्णुता हीच सहिष्णुतेचें सोंग घेते. परंतु हे दोन्ही जुलमशाहीचे पर्याय आहेत. धार्मिक असहिष्णुतेचें तत्त्वज्ञान दुसऱ्या कोठल्याहि माणसाचें धर्मस्वातंत्र्य हिरावून घेण्याचा आपल्याला अधिकार आहे असें मानतें. तर सहिष्णुतेचें तत्त्वज्ञान धर्मस्वातंत्र्याचा अधिकार देण्याचा हक्क आपल्याला आहे असें समजतें. थोडक्यांत म्हणजे असहिष्णुता सैन्यबळ बाळगणारा पोप आहे आणि सहिष्णुता हा स्वर्गप्रवेशाचे परवाने विकणारा पोप आहे. एक म्हणजे चर्च आणि राजसत्ता यांची हातमिळवणी आहे तर दुसरा चर्च आणि धूर्त व्यापारी वृत्ति यांचा मिलाप आहे.

सहिष्णुतेच्या तत्त्वज्ञानाकडे यापेक्षां अधिक चोखंदळपणें पाहाणें शक्य आहे. मनुष्य स्वतःची पूजा करीत नसून आपल्याला निर्माण करणाऱ्या ईश्वराची पूजा करीत असतो. धर्मस्वातंत्र्य त्याला हवें असतें तें स्वतःच्या स्वार्थासाठीं नसून ईश्वराच्या सोईसाठीं होय. या बाबतींत दोन घटक डोळ्यांसमोर ठेवले पाहिजेत: एक म्हणजे ईश्वराची पूजा करणारा मर्त्य माणूस आणि दुसरा या पूजेचा स्वीकार करणारा अमर्त्य परमेश्वर.

म्हणून सहिष्णुता हा एक माणूस आणि दुसरा माणूस, एक चर्च आणि दुसरें चर्च किंवा एक धर्ममत किंवा दुसरें धर्ममत यांच्यांतला संबंध नसून ईश्वर आणि माणूस यांच्यांतला संबंध आहे. असें असतांना सहिष्णुतेचें सोंग आणणारे लोक

पाखंडीपणानें आपल्याला माणसाला धर्मस्वातंत्र्य देण्याचा व ईश्वराला कोणत्याहि धर्मीयानें केलेली पूजा स्वीकारूं देण्याचा अधिकार आहे असें धरून चालतात.

समजा जर पार्लमेंटामध्यें असें बिल मांडण्यांत आलें कीं, "परमेश्वराला एकाद्या ज्यू किंवा तुर्की माणसानें केलेली पूजा स्वीकारण्याचें स्वातंत्र्य या कायद्यान्वयें देण्यांत येत आहे किंवा असें स्वातंत्र्य परमेश्वराला नाहीं." तर लोकांत एकच कल्लोळ माजेल, आणि पार्लमेंटाच्या या कृत्याला तें पाखंड म्हणून संबोधतील. धर्मस्वातंत्र्य देण्याची भूमिका घेणाऱ्याची पितळ अशा तऱ्हेच्या कायद्यानें उघडी पडेल. परंतु ईश्वराच्या ऐवजीं माणसाचें नांव घालून त्याला स्वातंत्र्य देण्याची ऐट मिरविली म्हणून कांहीं या गोष्टीची भयानकता कमी होत नाहीं. कारण माणसाचें नांव घातलें तरी माणूस आणि ईश्वर यांच्यांतल्या संबंधाविषयीं कल्पना कायमच राहाणार.

हे क्षुद्र आणि क्षणभंगुर माणसा! तूं जरी राजा, धर्माध्यक्ष, चर्च किंवा राजसत्ता असें कोणतेंहि नांव धारण केलेंस तरी आपल्या क्षुद्रपणानें माणूस आणि ईश्वर यांच्यांत अंतराय निर्माण करण्याचा तुला काय अधिकार आहे? तूं आपलें घर आधीं सांभाळावें हेंच बरें. ज्या गोष्टीवर तुझी श्रद्धा आहे त्या गोष्टीवर दुसऱ्याची श्रद्धा नाहीं हा दुसऱ्याची श्रद्धा आहे त्यावर तुझी श्रद्धा नाहीं याचाच पुरावा नव्हे काय? असें जर आहे तर कोणतीही ऐहिक शक्ति तुमच्यांत समझोता घडवून आणूं शकणार नाहीं.

कोणी कोणताहि धर्म माना, पण प्रत्येक जणानें आपला स्वतःचा धर्म पारखून घेण्याचा प्रयत्न करावा. प्रत्येकानें असें जर केलें तर त्याला जगांतला दुसरा कोणताहि धर्म चुकीचा आहे असें वाटणार नाहीं. परंतु स्वतःच्या धर्माचें आलो-डण न करतां तो जर दुसऱ्याच्या धर्माच्या उचापती करूं लागला तर त्याला या जगांतला कोणताच धर्म चांगला वाटणार नाहीं. आणि म्हणून एक तर हें सर्व जग योग्य मार्गानें चाललें आहे असें म्हणावें लागेल किंवा ह्या सर्व जगाचें चुकत आहे असें तरी म्हणावें लागेल.

धर्मगुरूला बलुतें म्हणून गव्हाच्या उत्पन्नाच्या दहावा हिस्सा देण्याची पद्धत आहे. ज्याच्याजवळ प्रत्यक्ष गहूं नसतो तो त्याऐवजी डुकरें किंवा गवताचा पेंढा नेऊन देतो आणि धर्माध्यक्ष या सर्व तऱ्हेच्या बलुत्यांचा स्वीकार करतो. गहूं दिला नाहीं म्हणून तो डुकराचें पिलूं नाकारीत नाहीं. सर्व तऱ्हेचीं बलुतीं

स्वीकारण्याचा पोपला अधिकार आहे तर वेगवेगळ्या लोकांनीं केलेल्या पूजा स्वीकारण्याचा अधिकार ईश्वराला नाहीं ? परंतु प्रस्थापित चर्चच्या नांवाखालीं हे धर्मगुरू मात्र माणसांच्या भक्तींच्यीं भिन्न भिन्न वलतीं स्वीकारण्याचा अधिकार ईश्वराला द्यावयास तयार नाहींत.

'चर्च आणि राजसत्ता' हें बर्कच्या पुस्तकांतील ठराविक पालुपद आहे. येथें बर्कला एक विशिष्ट चर्च किंवा विशिष्ट राजसत्ता अभिप्रेत नाहीं. सर्वसामान्य अर्थानें बर्क हा शब्दप्रयोग करीत असतो. जगांतला कोणताहि देश असो तेथें राजसत्ता आणि चर्च यांची हातमिळवणी झाली पाहिजे असा सिद्धांत बर्कला येथें प्रस्थापित करावयाचा आहे. फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेनें नेमकी हीच गोष्ट कटाक्षानें टाळली म्हणून बर्क तिच्यावर आग पाखडीत आहे. या विषयावर आपण थोडा अधिक विचार करूं.

सर्व धर्म स्वभावतःच नम्र, उदात्त आणि नीतिशील असतात. प्रारंभापासूनच हे धर्म जर क्रूर, लोकांचा छळ करणारे असे असते तर या धर्मांत कोणीच आले नसते. जगांतल्या बहुतेक गोष्टींचा आरंभ जसा चांगला असतो तसा यांचाहि होता. चारित्र्याचा आदर्श, मनधरणी आणि तत्त्वप्रचार यांच्या जोरावर हे धर्म लोकांचें मतांतर करण्याचा प्रयत्न करीत, परंतु कालांतरानें या धर्मांतील सौजन्याचा लोप होऊन ते सुतकी आणि असहिष्णु कां बरें बनतात ?

बर्कनें प्रस्थापित केलेला चर्च आणि राजसत्ता यांचा संबंध हेंच याचें उत्तर आहे. चर्च आणि राजसत्ता यांच्या समागमामुळें 'राजसत्तेचा आधार असलेलें चर्च' या नांवाचा एक खेचराच्या जातीसारखा मिश्र आणि मासलेवाईक प्राणी जन्माला येतो. या प्राण्याला वंशवृद्धि करण्याची क्षमता नसते—तो फक्त विनाशालाच कारणीभूत होतो. जिच्यापोटीं तो जन्मतो त्या आईपेक्षां हा प्राणी साफ वेगळा असतो. इतकेंच नव्हे तर जन्मल्यानंतर तो आपल्या जन्मदात्रीला लाथांनीं तुडवून नष्ट करतो.

स्पेनमध्यें पेटलेलें धर्मच्छलाचें सत्र त्या काळच्या विशिष्ट धर्मपंथांतून झालेलें नसून चर्च आणि राजसत्ता यांच्यापासून जन्मलेल्या या कुलांगाराचेंच तें फलित आहे. चर्चला मिळालेला राजसत्तेचा टेकू काढून घ्या आणि मग पहा धर्म मुळांत होता तसा उदात्त होतो कीं नाहीं! अमेरिकेंतील कॅथॉलिक धर्मगुरु हा एक सज्जन नागरिक असतो. त्याचें चारित्र्य स्वच्छ असतें. केवळ एका विशिष्ट धर्मगुरूच्या

बाबतींत हें खरें आहे असें नसून सर्वांच्याच बाबतींत हें खरें आहे. याचें कारण हें कीं अमेरिकेंत राजसत्तेनें चर्चेशीं धूर्त हातमिळवणी केलेली नाहीं.

ऐहिक दृष्टिकोनांतून पाहिलें तरी चर्च आणि राजसत्ता यांच्या युतीचा राष्ट्राच्या वैभवावर वाईटच परिणाम होतो असें आढळून येईल. चर्च आणि राजसत्ता यांच्या युतीमुळेंच स्पेन अंतर्बाह्य पोखरला गेला. ऐडिक ऑफ नान्टे हा हुकुमनामा रद्द केल्यामुळें फ्रान्समधील सर्व रेशमाचे कारखानदार इंग्लंडमधें गेले. आणि आतां इंग्लंडमधील चर्च आणि राजसत्ता यांची युति कापडाच्या कारखानदारांना अमेरिका आणि फ्रान्स येथें घालवीत आहे.

चर्च आणि राजसत्ता यांच्या युतीचा दुष्ट राजकीय सिद्धान्त बर्कला मांडावयाचा असेल, तर मांडूं द्या बिचाऱ्याला! त्याचा कांहीं उपयोग होईल. फ्रान्सची राष्ट्रीय सभा बर्कचा सल्ला कांहीं ऐकणार नाहीं परंतु त्याच्या चुकांकडे पाहून ती आपल्यांत सुधारणा करील. या अमंगळ युतीचे इंग्लंडला सोसावे लागलेले तोटे पाहूनच अमेरिका सावध झाली आहे. आणि फ्रान्सनें आपल्या अनुभवांतून शहाणपणा शिकून अशा युतीच्या मुळावरच घाव घातला आहे; आणि अमेरिकेप्रमाणेंच प्रत्येक माणसाला मतस्वातंत्र्याचा आणि जागतिक नागरिकत्वाचा सार्वभौम हक्क आहे हें तत्त्व प्रस्थापित केलें आहे.

अशा तऱ्हेनें चर्च आणि राजसत्ता यांच्या हातमिळवणीचा कट उधळून लावून इतर राष्ट्रांप्रमाणें नुसत्या शिवराळ घोषणा करीत न बसतां राष्ट्रीय सभेनें मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. या जाहीरनाम्यांतील तत्त्वांवरच राज्यघटनेची उभारणी व्हावयाची होती आणि ती पुढें दिलेली आहे.

## मानवी व नागरिकांच्या हक्कांचा जाहीरनामा (फ्रेंच राष्ट्रीय सभेनें काढलेला)

फ्रेंच जनतेच्या प्रतिनिधींनीं एक राष्ट्रीय सभा स्थापन केली. या राष्ट्रीय सभेस असें आढळून आलें कीं मानवी हक्कांविषयींची बेपर्वाई आणि अज्ञान यांच्यामुळेंच समाज पोखरला जातो, आणि शासनसंस्था लांचखाऊ बनते. यावर उपाययोजना म्हणून फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेनें जे बदलतां येत नाहींत, हिरावून घेतां येत नाहींत आणि जे नैसर्गिक आहेत अशा मानवाच्या मूलभूत हक्कांचा एक पवित्र जाहीरनामा तयार केला. हा जाहीरनामा समाजाच्या डोळ्यांसमोर सतत राहून लोक

आपल्या हक्कांविषयीं आणि कर्तव्याविषयीं सदैव जागरूक राहावेत अशी राष्ट्रीय सभेची इच्छा होती. शासनसंस्थेची कायदे तयार करण्याची आणि त्यांची अंमलबजावणी करण्याची जी पद्धत आहे तीमुळें सर्वच राजकीय सत्तांचें माणसाला व समाजाला सुखी करण्याचें जें ध्येय तें पार पाडलें जात आहे किंवा नाहीं हें नेहमींच पाहिलें जातें. या जाहीरनाम्यामुळें शासनसंस्थेच्या कर्तव्याविषयीं योग्य ती नैतिक जाणीव निर्माण व्हावी असें राष्ट्रीय सभेला वाटत होतें. हा जाहीरनामा तयार करतांना राष्ट्रीय सभेची अशी इच्छा होती कीं भावी पिढीचें जीवन शुद्ध आणि वादातीत अशा तत्त्वांवर अधिष्ठित असावें आणि त्यांच्या हातून समाजसुखाचें आणि या राज्यघटनेचें जतन आणि संरक्षण व्हावें.

उपरिनिर्दिष्ट कारणासाठीं फ्रान्सच्या राष्ट्रीय सभेनें परमेश्वराला साक्ष ठेवून, त्याचा आशीर्वाद आपल्याला लाभेलच असा विश्वास बाळगून मानवाच्या पवित्र आणि मूलभूत हक्कांना मान्यता दिली आणि त्यांची घोषणा केली. जाहीरनाम्यांतील हक्क पुढीलप्रमाणें होते. (१) स्वातंत्र्य आणि समता हे प्रत्येक माणसाचे जन्मसिद्ध हक्क आहेत आणि ते सदैव अबाधित राहातील. सामाजिक भेद हा कांहीं ठिकाणीं समाजकल्याणासाठी अपरिहार्य असेल तरच करावा. (२) माणसाच्या नैसर्गिक आणि स्वयंसिद्ध अशा मूलभूत हक्कांचे संरक्षण करणें हे सर्व राजकीय संस्थाचें ध्येय आहे. स्वातंत्र्य, सुरक्षितता, जुलमाचा प्रतिकार आणि खाजगी मालमत्ता हेच ते हक्क होत. (३) राष्ट्राचा अधिकार हाच सार्वभौम होय. कोणत्याहि व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या गटाला राष्ट्राच्या संमतीशिवाय कसलाहि अधिकार घेतां येणार नाहीं. (४) दुसऱ्याला विघातक होईल अशी कोणतीहि गोष्ट न करणें हेंच राजकीय स्वातंत्र्याचें सार आहे. आपले नैसर्गिक हक्क उपभोगितांना प्रत्येक माणसाला एकच मर्यादा सांभाळली पाहिजे; ती म्हणजे दुसऱ्या माणसाच्या नैसर्गिक हक्काला कसलाहि बाध न आणणें ही होय. या मर्यादेच्या निश्चित रूपरेषा आंखून देण्याचें काम कायद्याचें आहे. (५) समाजाला विघातक होईल अशा कोणत्याही कृतीस कायद्यानें बंदी केलीच पाहिजे. परंतु ज्या गोष्टींना कायद्याची बंदी नसेल त्या गोष्टी करण्यास कसलाहि अडथळा करतां कामा नये. त्याचप्रमाणें ज्याला कायद्याची संमति नाहीं अशी गोष्ट करण्यास कोणत्याहि व्यक्तीस भाग पाडतां कामा नये. (६) कोणत्याहि देशांतील कायदा हा तेथील जनतेच्या आशा-आकांक्षाचा उद्गार असतो आणि म्हणूनच प्रत्येक नागरिकाला

क्रमांक ... नों: दिं:


व्यक्तिशः किंवा आपल्या प्रतिनिधींच्या द्वारें देशांतील कायदे व घटना करण्यांत सहभागी होण्याचा हक्क आहे. संरक्षण असो किंवा शिक्षा असो कायदा सर्वांना सारखाच लागू असला पाहिजे. कायद्यासमोर नोकऱ्या, मानसन्मान, अधिकार यांसाठीं सर्व माणसें सारखींच असलीं पाहिजेत. माणसामाणसांत याबाबतींत फरक होईल तो त्यांच्यांतील गुणवत्तेच्या कमी अधिक प्रमाणामुळें, अन्य कोणत्याहि भेदामुळें नव्हे. (७) कायद्यानें आंखून दिलेली मर्यादा ओलांडून कोणत्याहि माणसाला अटक होतां कामा नये किंवा त्याच्यावर खटला भरतां नये. कायदा धाब्यावर बसवून जे कोणी दंडेली करूं पाहातील त्यांना शिक्षा झाली पाहिजे. प्रत्येक माणसानें कायदा शिरसावंद्य मानलाच पाहिजे आणि जो कोणी कायद्याला विरोध करील तो गुन्हेगार ठरेल. (८) कायद्यानें जी शिक्षा केवळ अपरिहार्य आणि अवश्यमेव आहे तीच द्यावी आणि कोणत्याहि गुन्ह्याबद्दल तो घडण्याआधीं प्रसिद्ध असलेल्या कायद्याचा कसोटीनें अर्थ लावूनच त्यानुसार शिक्षा द्यावी. (९) अपराध शाबीत होऊन शिक्षा होईपर्यंत प्रत्येक मनुष्य निरपराधी आहे असें धरून चाललें पाहिजे. कोणत्याही विशिष्ट बाबतींत एकाद्या व्यक्तीला अटक करणें जर अपरिहार्यच असेल तर त्याला पकडण्यासाठीं जेवढा आवश्यक असेल तेवढा सोडून इतर कसल्याही प्रकारचा शारीरिक त्रास त्याला होणार नाहीं याची हमी कायद्यानें दिली पाहिजे. (१०) जोंपर्यंत एकाद्याच्या मतप्रचारामुळें कायद्यानें आखलेली समाजव्यवस्था उधळली जात नाहीं तोंपर्यंत कोणत्याही व्यक्तीच्या धार्मिक किंवा अन्य क्षेत्रांतील मतांबद्दल तिचा छळ होतां कामा नये. (११) आपले विचार आणि मतें प्रकट करण्याचा प्रत्येक नागरिकाला जन्मसिद्ध अधिकार आहे आणि आपल्या विचारांच्या प्रचारामुळें कायद्यानें आंखून दिलेल्या मर्यादा उल्लंघिल्याची सर्व जबाबदारी घेण्यास जर एकादी व्यक्ति तयार असेल तर आपलें मत बोलून दाखविण्याचा, लिहिण्याचा किंवा प्रसिद्ध करण्याचा तिला अधिकार असलाच पाहिजे. (१२) नागरिकांचे हक्क सुरक्षित राहाण्यासाठीं अधिकारी वर्गाची नेमणूक करणें आवश्यक आहे. परंतु या अधिकारी वर्गानें हे अधिकार समाजकल्याणासाठीं आपल्या हातीं दिलेले आहेत हें ध्यानांत ठेवून त्यांचा उपयोग वैयक्तिक फायद्यासाटी करतां कामा नये. (१३) शासनसंस्था आणि हा अधिकारी वर्ग यांच्या खर्चाची तरतूद होणें आवश्यक आहे. या खर्चाचा वांटा प्रत्येक माणसानें आपापल्या ऐपतीनुसार उचलला पाहिजे. हा वाटा आकारीत असतांना

कसलेंहि अन्याय्य भेद लागूं करून चालणार नाहीं. (१४) हा एकूण खर्च किती असावा, त्याचा उपयोग कसा करावा, त्याची आकारणी कशी करावी हें प्रत्येक नागरिकाला व्यक्तिशः किंवा आपल्या प्रतिनिधींच्या द्वारें ठरविण्याचा अधिकार आहे. (१५) समाजाला अधिकारी वर्गाच्या वर्तणुकीचा जाब विचारण्याचा हक्क आहे. (१६) ज्या ज्या समाजांतील नागरिकांचे हक्क सुरक्षित नाहींत आणि जिथें अधिकारक्षेत्रानुसार वेगवेगळीं खातीं निर्माण केलेलीं नाहींत अशा समाजाला राज्यघटनेची आवश्यकता आहे. खाजगी मालमत्ता असण्याचा हक्क प्रत्येक व्यक्तीला आहे. हा पवित्र हक्क कोणालाहि हिरावून घेतां येणार नाहीं. लोकहिताच्या दृष्टीनें एकाद्याची मालमत्ता ताब्यांत घेणें आवश्यक असेल तर ती गोष्ट कायदेशीर-रीत्या करण्यांत यावी आणि त्या व्यक्तीला योग्य ती नुकसानभरपाई दिली जावी.

वरील जाहीरनाम्याच्या पहिल्या तीन कलमांतच तिचें सर्व सार येऊन जातें. बाकीचीं सर्व कलमें एक तर या पहिल्या तीन कलमांतून तरी निघालीं आहेत किंवा त्यांचें तपशीलवार स्पष्टीकरण करण्यासाठीं आलीं आहेत. चवथ्या, पांचव्या आणि सहाव्या कलमांचा आशय अधिक सुस्पष्ट रीतीनें मांडला आहे.

ज्या तत्त्वांवर कायद्याची उभारणी करावयाची त्या तत्त्वांची घोषणा सात, आठ, नऊ, दहा आणि अकरा या कलमांत केलेली आहे. हे सर्व कायदे जाहीरनाम्यांत निर्दिष्ट केलेल्या मानवी हक्कांशीं सुसंवादी असतील. दहाव्या कलमावर खुद्द फ्रान्समधील तसेंच इतर देशांतीलहि विचारवंतांचा आक्षेप आहे. जो हक्क या कलमान्वयें द्यावयाचा तो येथें नीटपणें दिला जाईल कीं नाहीं याविषयीं त्यांना संशय वाटतो. त्यांना असेंहि वाटतें कीं या कलमांत धर्माला मानवी कायद्यांच्या पातळीवर आणून बसविल्यामुळें धर्माचें पावित्र्य कमी होतें आणि जनमनावर होणारे त्याचे संस्कार क्षीण केले जातात. असें झाल्यावर ज्याप्रमाणें सूर्यकिरण ढगांनीं आच्छादिले जावें त्याप्रमाणें कायद्याच्या ढगांनीं धर्माचा प्रकाश झांकळला जाऊन माणसाला त्याचें व्हावें तसें सुस्पष्ट व तेजस्वी दर्शन होऊं शकत नाहीं.

बारापासून पुढें आलेल्या सर्व कलमांचा आशय आधींच्या कलमांत वास्तविक येऊन गेला. परंतु असें असूनहि पुढील कलमांत तो तपशीलवार देण्याचें कारण फ्रान्समधील त्या काळची विशिष्ट परिस्थिति हें होय. त्यावेळीं फ्रान्सला कांहीं विशिष्ट अन्याय्य गोष्टी उखडून त्यांच्या जागीं न्याय्य गोष्टींची प्रस्थापना करावयाची होती. हा तपशीलाचा खटाटोप त्यामुळेंच समर्थनीय ठरतो.

राष्ट्रीय सभेसमोर मानवी हक्कांचा जाहीरनामा चर्चेसाठीं आला तेव्हां राष्ट्रीय सभेच्या कांहीं सभासदांनीं असे उद्‌गार काढले कीं आपण या हक्कांच्या जाहीर-नाम्याबरोबरच कर्तव्यांचा जाहीरनामा प्रसिद्ध करावा. या टीकेच्या मागें एक विचारी मन दिसतें खरें परंतु येथें पुरेसा विचार केलेला नसल्यामुळें एक चूक घडली आहे. कारण, हक्कांच्या जाहीरनाम्यांतच पर्यायानें कर्तव्यांचा जाहीरनामा गृहीत असतो. जे हक्क मला मिळालेले आहेत तेच हक्क माझ्याप्रमाणेंच दुसऱ्याहि माणसाला मिळालेले आहेत आणि ज्याप्रमाणें हे हक्क मी धारण करतों त्याप्रमाणेंच दुसऱ्याच्या हक्काला बाध न आणण्याची खबरदारी घेणें माझें कर्तव्य ठरतें.

या जाहीरनाम्यांतील पहिलीं तीन कलमें म्हणजे व्यक्ति आणि राष्ट्र यांच्या स्वातंत्र्याचा पायाच आहे. ज्या देशांतील शासनसंस्था या तत्त्वावर उभी नाहीं किंवा या तत्त्वांना शुद्ध राखण्याचा प्रयत्न करीत नाहीं अशा देशाला स्वतंत्र देश म्हणतां येणार नाहीं. जगांतल्या आजपर्यंतच्या प्रसिद्ध झालेल्या सर्व कायद्यांहून, सर्व राज्यघटनांहून हक्कांच्या या जाहीरनाम्यांत मानवजातीचें किती तरी पटींनीं कल्याण करण्याची अधिक शक्ति आहे.

जाहीरनाम्याच्या प्रस्तावनेच्या पहिल्या परिच्छेदांत एक वेगळेंच दृश्य दिसतें. परमेश्वराच्या पवित्र आश्रयाखालीं नव्या तत्त्वावर शासनसंस्था स्थापूं पहाणाऱ्या एका राष्ट्राचा महान् प्रयत्न हा परिच्छेद वाचीत असतांना डोळ्यांसमोर स्वच्छ उभा रहातो. खरेंच, युरोपच्या इतिहासांत या प्रसंगाला तोड नाहीं. या प्रसंगाची बोळवण केवळ क्रान्ति हाच शब्द वापरून करतां येणार नाहीं. कारण या जाहीर-नाम्यानें सर्व मानवजातीचाच उद्धार केला आहे, तिला नवें चैतन्य प्राप्त करून दिलें आहे.

युरोपमधील आजच्या शासनसंस्था जुलूम आणि विषमता यांचें आगरच बनलेल्या नाहींत काय? इंग्लंडमध्यें आज काय चाललें आहे? इंग्लंड हा आज एक बाजार झाला आहे, लोकांच्या भाबडेपणाचा फायदा घेऊन तेथें सर्वत्र पिळवणूक चालली आहे असें खुद्द इंग्लंडचेच रहिवासी म्हणत आहेत. ही परिस्थिति पहातां इंग्लंडनें फ्रेंच राज्यक्रान्तीचा धिक्कार केला याबद्दल मुळींच आश्चर्य वाटत नाहीं.

फ्रान्समधील राज्यक्रान्ति तेथें जनतेचा छळ करणाऱ्या विशिष्ट सत्ताधीशांना

नष्ट करण्यापुरतीच मर्यादित असती तर बर्क किंवा त्याच्याच सारखें मत असलेले इतर कांहीं लोक कांहींच बोलले नसते. परंतु फ्रान्सची राज्यक्रान्ति जनतेला भलतीकडे वाहवून नेत आहे असा ओरडा बर्क आणि मंडळी करीत आहे. फ्रान्सच्या राज्यक्रांतीमुळें सर्व जगालाच धक्का बसून या मंडळींचें आसन डळमळूं लागलें आहे असाच याचा अर्थ आहे. फ्रान्सच्या राज्यक्रांतीनें शोषणाची मानगूटच धरली. त्यामुळें जगांतील बऱ्या वाईट मार्गानें गबर झालेली व्यापाऱ्यांची जमात भयानें कांपूं लागली. या राज्यक्रांतीविरुद्धच्या सर्व घोषणांतून त्यांच्या या घबराटीचें दर्शन होत आहे. त्यांच्या या घोषणा म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून जखमी झालेल्या त्यांच्या स्वार्थ वृत्तीची तडफड आहे. परंतु अशा विरोधामुळें फ्रेंच राज्यक्रांतीचा एक केंसही वांकडा होणार नाहीं, उलट ती अधिकाधिक मजबूत होत जाईल. तिच्यावर जेवढे घणाघाती प्रहार करावेत तेवढ्या तिच्यांतून तेजाच्या अधिक ठिणग्या निघतील. या आघातांनीं ती मुळींहि दबणार नाहीं. फ्रेंच राज्यक्रांति सत्याच्या भक्कम पायावर उभी असल्यामुळें तिला कसल्याही हल्ल्याचें भय वाटण्याचें कारणच नाहीं. काळाच्या पटावर तिचें नांव अमर अक्षरांनीं लिहिलें गेलें.

बॅस्टिल जिंकण्यापासून तो थेट मानवी हक्कांच्या जाहीरनाम्याच्या प्रस्थापनेपर्यंत फ्रेंच राज्यक्रांतीच्या सर्व महत्त्वाच्या पायऱ्यांचा मीं येथें परामर्श घेतला आहे. आतां एम्. डी. लाफायती यांची पुढील तेजस्वी वाक्यें उद्धृत करून मी हा लेख संपवितों. लाफायेती म्हणतो, "मानवी स्वातंत्र्याचें हें महान् प्रतीक जुल्म करणाऱ्यांना धडा शिकविल आणि दलितांच्या डोळ्यासरील आदर्श होऊन राहील."

## वंशसिद्ध सरकार

वंशपरंपरा राज्याधिकाराचें समर्थन करीत असतांना बर्कनें कोणत्याहि राष्ट्राला आपल्या मनाजोगतें सरकार स्थापण्याचा अधिकारच नाहीं इत्यादि अनेक मूर्खपणाचे प्रलाप काढले आहेत. हें वक्तव्य करीत असतांना बर्कनें ओघानें शासनसंस्थेच्या स्वरूपाविषयीं कांहीं विचार व्यक्त केले आहेत. बर्क म्हणतो, "शासनसंस्था हा मानवी प्रज्ञेचा आविष्कार आहे."

ही व्याख्या खरी धरून चाललें तरी वंशपरंपरेनें चालणाऱ्या राजसत्तेला ती मुळींच लागूं पडत नाहीं. कारण प्रज्ञा ही आनुवंशिक असतेंच असें नाहीं. त्याच-

प्रमाणें एखाद्या महामूर्ख माणसाला प्रज्ञावंत समजून त्याच्या हातीं राष्ट्र सोंपविणें हा शहाणपणाचा मार्गही कधीं होऊं शकणार नाहीं. तात्पर्य, बर्कनें घेतलेली भूमिका त्याच्या प्रत्येक विधानाला बाध आणणारी आहे.

आनुवंशिक अधिकारावरून आनुवंशिक प्रज्ञेकडे आतां हा प्रश्न झुकतो. कोणत्या माणसाला प्रज्ञावंत म्हणावें असा प्रश्न येथें उपस्थित होतो. बर्कनें आतां राजवंशांतील प्रत्येक मनुष्य सालोमनप्रमाणें प्रज्ञावन्त होता असें तरी किंवा आयत्या बिळावर नागोबा होऊन बसलेले हे राजे राजा ह्या पदवीस नालायक होते असें तरी कबूल केलें पाहिजे. एकूण बर्कनें आपणा स्वतःला पेंचांत आणलें आहे. राजवंशाच्या नामावळींतील फारच थोडीं नांवें आतां बर्कला कशींबशीं वाचतां येतील; कारण आपल्याच विधानाचा बोळा त्यानें या नामावळींवरून केलेला आहे. बर्कच्या या विधानामुळें सरदारसभेचा तर पायाच कोसळला आहे. परंतु अशी परिस्थिति आपल्यावर ओढवूं नये म्हणून बर्क शासनसंस्था हा मानवी प्रज्ञेचा आविष्कार असतो एवढेंच म्हणून थांबलेला नाहीं तर, प्रज्ञेचा सर्व मक्ता शासनसंस्थेकडेच असतो असा अभिप्राय त्यानें दिला आहे. बर्क म्हणतो, "या शासनसंस्थेकडून माणसांनीं आपल्या गरजा भागवून घ्याव्या हा त्यांचा अधिकारच आहे!! अशी सारवासारव करून झाल्यानंतर बर्क पुढें प्रजेच्या गरजा कोणत्या आणि त्यांचे हक्क कोणते याचें विवेचन करतो.

आपली बाजू सफाईनें मांडण्यांत बर्क चांगलाच यशस्वी झालेला आहे. बर्कचें म्हणणें असें कीं जनतेजवळ प्रज्ञेचा अभाव असतो आणि म्हणून तिला राज्याच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाहीं. उलट प्रज्ञेचा सर्व मक्ता शासनसंस्थेला दिलेला असल्यामुळें अशा सरकारकडून आपल्यावर राज्य करून घ्यावें हाच जनतेचा हक्क आहे. या शासनसंस्थेच्या अद्भूत आणि गूढ सामर्थ्याचें बर्क पुढीलप्रमाणें वर्णन करतो :—

The rights of man in Government are their advantages, and these are often in balances between differences of good; and in Compromises sometimes between good and evil; and sometimes between evil and evil. Political reason is computing principle; adding, subtracting, multiplying and dividing, morally and not metaphysically or mathematically, true moral demonstrations.

बर्कचें भाषण ऐकतांना भारावून गेलेल्या श्रोतृवर्गाला कदाचित् त्याच्या या पांडित्यप्रदर्शनाचा अर्थ कळला नसेल. तो अर्थ लावून दाखविण्याची जबाबदारी मी माझ्यावर घेतों. तो अर्थ असा आहे: शासनसंस्था ही कोणत्याहि तत्त्वाला बांधलेली नसते; ती आपल्या मनाला येईल त्याप्रमाणें खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें करूं शकते. तात्पर्य म्हणजे शासनसंस्था ही अनिर्बंध हुकुमशाही आहे. येथें बर्कला कांहीं गोष्टींचा विसर पडलेला दिसतो. पहिली गोष्ट म्हणजे ही प्रज्ञा प्रथम आली कोठून हें त्यानें सांगितलेलें नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे या प्रज्ञेच्या हातीं शासनसंस्थेचे अधिकार दिले कोणीं या विषयींहि बर्क कांहींच बोलत नाहीं. प्रज्ञेचा मक्ता शासनसंस्थेकडेच असतो या बर्कच्या अभिप्रायांतून असा निष्कर्ष निघतो कीं एक तर शासनसंस्था प्रज्ञेचें सोंग आणीत आहे किंवा प्रज्ञा तरी अधिकार बळकावून बसली आहे. या शासनसंस्थेला मूळच नाहीं. आणि तिच्या हातांतली सत्ता तिनें बळकावली आहे.

परंतु या मुद्याची स्थूल मानानें चर्चा न करतां आनुवंशिक राजसत्तेचे घटक कोणते आहेत हे सुस्पष्टपणें मांडून आपण त्यांचा विचार करूं. तिचे मुख्य घटक दोन आहेत. (१) एका विशिष्ट कुटुंबाचा सिंहासनावर बसण्याचा अधिकार (२) त्या विशिष्ट कुटुंबाला सिंहासनावर बसवण्याचा राष्ट्राचा हक्क.

यांपैकीं आतां पहिला मुद्दा घेऊं. एखाद्या कुटुंबानें राष्ट्राची संमति आहे किंवा नाहीं याची पर्वा न करितां वंशपरंपरेनें सिंहासन बळकावणें हा शुद्ध जुलूम आहे हें कोणत्याहि माणसाला सहज पटेल. ही गोष्ट सिद्ध करायला जाणें हा सर्वसामान्य माणसाच्या बुद्धीचा अपमान होईल.

आतां दुसरा मुद्दा घेऊं. एकाद्या राष्ट्राला विशिष्ट कुटुंबाला वंशपरंपरेनें अधिकार देऊन सिंहासनावर बसवण्याचा अधिकार आहे ही गोष्ट प्रथम दर्शनीं योग्यच वाटते. परंतु पुढील पिढीची सम्मति न विचारतां तिच्यावर एखाद्या विशिष्ट कुटुंबाचें राज्य लादणें हा देखील पहिल्या प्रकारासारखा घोर जुलूम आहे हें थोड्याशा विचारानंतर सहज पटावें.

जेव्हां एखादी व्यक्ति किंवा तिचे वंशज राष्ट्राला बजावतात कीं तुमची पर्वा न करतां आम्ही हा राजमुकुट धारण करीत आहोंत तेव्हां अशा व्यक्तीला हा अधिकार कोठून प्राप्त झाला हें समजण्यास मार्ग नाहीं! आनुवंशिक राजसत्तेला कायद्याचा आधार देतां येणार नाहीं. गुलामगिरींत जीवन कंठणाऱ्या एखाद्या

व्यक्तीला आपल्याला आपल्या पूर्वजांनीं विकलें अशी जाणीव झाली तर त्याचें हृदय शतशः विदीर्ण होईल. खरेंच, एका पिढीनें पुढच्या पिढीचे हक्क विकणें हा गुन्हेगारीचा कळस आहे. तिला कायद्याचा आधार मिळणार कसा ?

या प्रश्नाचें स्वरूप अधिक स्पष्ट होण्यासाठीं जी पिढी पुढच्या पिढीची संमति न घेतां एखाद्या विशिष्ट कुटुंबाला वंशपरंपरेनें राजसत्ता बहाल करते त्या पिढीचा आणि तिचा पुढील पिढीशीं असलेल्या संबंधाचा आपण अधिक विचार करूं. जी पहिली पिढी प्रथमच एखाद्या व्यक्तीला राज्यपद देते ती पिढी हा निर्णय आपल्या स्वतंत्र बुद्धीनें घेत असते. अशा तऱ्हेनें गादीवर बसलेला राजा आनुवंशिक हक्कामुळें तेथें आलेला नसून त्या पिढीनेंच त्या पदावर त्याची निवड आणि नेमणूक केलेली असते आणि म्हणूनच ही पिढी वंशपरंपरेनें राज्यपदाचा हक्क असलेल्या राजाचें अधिराज्य आपल्यावर गाजवून घेते असें म्हणतां येणार नाहीं. ती आपला निर्णय स्वतंत्रपणें घेत असते. आनुवंशिक सत्तेचा प्रश्न राज्यपदावर असलेल्या व्यक्तीचा आणि तिची नेमणूक करणाऱ्या पिढीच्या मृत्युनंतर उद्‌भवतो. आतां आपण स्वतंत्र निर्णय घेऊन राजा नेमणारी ही पिढी आपल्यानंतर येणाऱ्या पिढीच्या बाबतींत नेमकें काय करीत असते तें पाहूं. ही पिढी जो अधिकार घेण्याचा तिला बिलकुल हक्क नाहीं तो अधिकार शिरजोरपणें गृहीत धरून चालते. ही पिढी जणूं काय मृत्युपत्रच तयार करून ठेवीत असते. आणि या मृत्युपत्राच्या द्वारें पुढच्या पिढीवर विशिष्ट प्रकारची शासन-संस्था तसेंच विशिष्ट कुटुंबाचें राज्य लादीत असते. ती स्वतः वंशपरंपरेनें राज्य आलेल्या राजाच्या अंमलाखालीं राहिलेली नसते; राजा निवडण्याचें आपलें स्वातंत्र्य या पिढीनें राखलेलें असतें. मग पुढच्या पिढीचें आणि भविष्यकाळांतील अनेक पिढ्यांचें आपला राजा किंवा शासनसंस्था निवडण्याचें स्वातंत्र्य मात्र या मृत्युपत्राच्या, अनधिकृत कराराच्या द्वारें कां बरें हिरावून घेते ? एखाद्या पिढीला आपलें सामाईक मृत्युपत्र करण्याचा अधिकार आहे असें गृहीत धरून चाललें तरी सुद्धां पुढील पिढीचें स्वातंत्र्य अशातऱ्हेनें हिरावून घेणें हें कोठल्याहि कायद्याच्या, मृत्युपत्राच्या किंवा कराराच्या अधिकारकक्षेबाहेरचें आहे. समाजां-तील व्यक्तींच्या हक्कांचें मृत्युपत्र करतां येत नाहीं. मनुष्यजातीच्या आरंभा-पासून या हक्कांचा वारसा प्रत्येक व्यक्तीला लाभलेला असतो. कोणत्याहि पिढीला हक्काचा वारसा तोडण्याचा अधिकार नाहीं. एकाद्या विशिष्ट पिढीनें आपण गुलाम

राहाण्याचा निर्णय घेतला म्हणून पुढील पिढीचा हक्क आपल्या या निर्णयानें बरबाद करूं शकत नाहीं. तुर्कीच्या गोष्टींना कायद्याचा वारसा मिळूं शकत नाहीं आणि म्हणूनच बर्क जेव्हां असें म्हणतो कीं १६८८ च्या क्रांतीनंतर इंग्लिश राष्ट्रानें आपल्या आणि भावी पिढ्यांच्या सर्व हक्कांचा त्याग करून वंशपरंपरेनें राजसत्तेचा हक्क विशिष्ट कुटुंबाला दिला आहे तेव्हां त्याच्या बाजारू तत्त्वनिष्ठेची किळस येते. खरें म्हणजे अशातऱ्हेच्या वाष्कळ प्रलापांना उत्तर न देणें हीच त्यांची योग्य संभावना होय. बर्कच्या अज्ञानाची कींव करावीशी वाटते.

वंशपरंपरागत राजसत्तेची कल्पना कोणत्याहि कारणासाठीं निघालेली असे ना, ती मूर्खपणाची आहे. अ हा आपलें मृत्युपत्र करून त्याद्वारें ब या तिसऱ्याच माणसाची मालमत्ता क या चवथ्याच माणसाला देऊं शकत नाहीं. एखाद्या पिढीनें राजाला वंशपरंपरेनें सत्ता देणें हा असलाच प्रकार नव्हे काय?

एका पूर्वीच्या पिढीनें आपल्या पुढच्या पिढ्यांचे हक्क काढून घेऊन एका तिसऱ्याच माणसाला देऊन टाकले. हा मनुष्य कालांतरानें पुढें येऊन बर्कच्याच भाषेंत सांगतो कीं गेल्या पिढीच्या मृत्युपत्रान्वयें मला सर्वाधिकार मिळाले आहेत; आतां इंग्लिश जनतेला कसलाहि अधिकार उरलेला नाहीं. त्यांची पर्वा न करतां मी राज्य करीन. हे परमेश्वरा! अशा दुष्ट तत्त्वापासून आणि अशा घोर अज्ञानापासून या जगाला तूंच वांचव!!

मानवजाति एक तर विवेकाच्या मार्गानें तरी जाते किंवा अज्ञानांत तरी बुडालेली असते. या दोहोंपैकीं कोणाचेंहि प्राबल्य असलें तरी शासनसंस्था सुरळीत चालते. विवेकाचें राज्य असेल तर शासनसंस्थेवर त्याचा प्रभाव पडतो आणि अज्ञानाचें राज्य असेल तर लोकांवर जें लादावें त्याचा ते निमुटपणें स्वीकार करतात.

या जगांत दोन प्रकारच्या शासनसंस्था अस्तित्वांत आहेत. एक निवडणुकीच्या द्वारें प्रस्थापित होणारें प्रातिनिधिक सरकार आणि दुसरें परंपरागत अधिकारांनीं रूढ होणारें सरकार. पहिलें लोकसत्ताक म्हणून व दुसरें राजसत्ताक म्हणून ओळखलें जातें.

लोकसत्ताक शासनसंस्था विवेकाच्या पायावर उभी असते. आणि राजसत्ता अज्ञानाच्या पायावर. कोणतीहि शासनसंस्था उत्तम रीतीनें चालण्यास विशिष्ट गुण आणि शक्ति यांची आवश्यकता असते. हे गुण व शक्ति आनुवंशिक असतात असें नाहीं. आणि म्हणूनच वंशपरंपरेच्या अधिकारानें रूढ होणाऱ्या राज-

सत्ताकाला विवेकाशीं द्रोह करणाऱ्या अंधश्रद्धेचा आधार घ्यावा लागतो. एखादा देश जेवढा अज्ञानांत अधिक बुडालेला तेवढें राजसत्ताकाचें अधिक फावतें.

उलट, सुव्यवस्थेवर उभ्या असलेल्या लोकसत्ताकाला विवेक सोडून अज्ञानाची कांस कधींहि धरावी लागत नाहीं. लोकसत्ताकांतील नागरिक राज्यपद्धतींतील विवेक ग्राह्य भाग डोळसपणें पाहातो, तिचा उगम आणि कार्यपद्धति यांना विवेक-पूर्वक पारखतो आणि म्हणूनच लोकसत्ताकांत समजूतदारपणा, धैर्य आणि भव्य पुरुषार्थ यांचा विकास होतो.

विवेकावर उभें असलेलें लोकसत्ताक आणि अज्ञानावर उभें असलेले राजसत्ताक या दोन प्रकारानंतर आतां आपण मिश्र सरकार या तिसऱ्या प्रकाराकडे वळूं. हें मिश्र सरकार कधीं कधीं उपहासानें खिचडी सरकार म्हणून संबोधिलें जातें.

येनकेन प्रकारेण स्वार्थसाधन ही या मिश्र सरकारामागें असलेली सर्वांत महत्त्वाची प्रेरणा. या मिश्र सरकारांत लोकसत्ताक आणि राजसत्ताक यांचें चमत्कारिक मिश्रण असतें. लोकसत्ताक पद्धतीचा कांहीं भाग अशा सरकारांत असल्यामुळें एका विशिष्ट मर्यादेपर्यंत या सरकारांतील निवडणुका कितीही सदोष असल्या तरी त्यावर विवेकाचा प्रभाव पडतच असतो. विवेकाचा प्रभाव पडून स्वार्थ साधण्यांत अडथळा येऊं नये यासाठीं लांचलुचपतीनें माणसांची विवेकशक्ति बधिर करून टाकणें हें अशा सरकारचें उद्दिष्ट होऊन बसतें. मिश्र सरकार ही अनेक घेडगुजरी तत्त्वांची खिचडी असते. स्वार्थाच्या आमिषाच्या जोरावरच अशा सरकाराचे परस्पर विरोधी घटक एकत्र आणले जातात. फ्रान्सनें राज्यक्रांतीनंतर इंग्लंडच्या राज्यघटनेचा स्वीकार केला नाहीं यामुळें बर्क विलक्षण अस्वस्थ झालेला दिसतो. ही अस्वस्थता त्यानें ज्या मार्गानें प्रकट केली आहे ती पाहातां इंग्लंडच्या राज्यघटनेंतील सर्व दोषांना कसेंहि करून नैतिक आधार द्यावयाचा बर्कचा हा खटाटोप असावा असा संशय येतो.

मिश्र सरकारचे सर्व घटक इतके परस्परांशीं विसंवादी असतात कीं कोणाचा पायपोस कुणाच्या पायांत नाहीं अशी तेथें स्थिति असते. त्याचप्रमाणें या यंत्रणेला गति देणारी स्वार्थपरता नेहमींच आपलें शीर सलामत राखीत असते. राजा कधींहि चुकीचें वागूंच शकत नाहीं असा सिद्धांत एकदां मांडल्यावर अशा राजाला मूर्खांच्या पंक्तीला बसविणें हा एकच मार्ग सुबुद्ध माणसासमोर उरतो. अशा राजाला कोणत्याहि गोष्टीला जबाबदार धरण्याचा प्रश्नच निकालांत निघतो.

ही अरेरावी राजानंतर मुख्य मंत्र्याच्या वांट्याला येतें. हा मंत्री पार्लमेंटमध्यें आपलें बहुमत आहे या बळावर आपल्या स्वार्थाचें घोडें सारखें पुढें दामटीत असतो. पार्लमेंटमधील आपलें बहुमत लांचलुचपत देऊन नेहमीं आपल्या पाठीशीं कसें उभें करावें या कलेंत हा मंत्री निष्णात असतो. पार्लमेंटमधील हा बहुमतवाला गट देखील आपलें बहुमत आहे याच बळावर मुख्य मंत्र्याप्रमाणें आपल्या कोणत्याहि कृत्याच्या मागें जबरदस्त समर्थन उभें करतो. तात्पर्य चक्राकार गतीनें फिरणाऱ्या या यंत्रांतील प्रत्येक घटक आपली जबाबदारी झुगारतो आणि स्वार्थ तेवढा साधून घेतो.

राजाच्या हातून कधींच चूक होत नाहीं याचा अर्थच मुळीं असा कीं राजाचा बोलविता धनी कोणी वेगळाच असतो. राजा या बोलवित्या धन्याच्या आदेशा-नुसार वागत बोलत असतो. मिश्र सरकारांत राज्यांतील सर्वसूत्रें राजाच्या नांवा-खालीं त्याचें मंत्रिमंडळच हलवीत असतें. हें मंत्रिमंडळ पार्लमेंटाचाच एक भाग असतें. त्यामुळें हें मंत्रिमंडळ मोठ्या धूर्तपणें दोन दगडावर पाय ठेवून उभें असतें. एकीकडे तें धोरण आखून तें अमलांत आणतें, आणि दुसरीकडे त्या धोरणाचें समर्थन करीत असतें. मंत्रिमंडळ आणि पार्लमेंट यांतील त्यांची धूर्त विविध भूमिका ही अशी. स्वार्थाचें आमिष दाखवून सर्व घटक कसेबसे एकत्र आणणारी मिश्र शासनसंस्था हें राष्ट्राला पडलेलें कोडेंच असतें. यांच्या स्वार्थभ्रष्ट-तेमुळें खर्चाचा सगळा बोजा बिचाऱ्या राष्ट्रावर पडत असतो. हें सरकार स्वतःला समितीचें सरकार म्हणवितें. या समितींतील सल्लागार, कायदा पास करणारे, त्याची अम्मलबजावणी करणारे, समर्थन करणारे, जबाबदार असणारे आणि बेजबाबदार असणारे या सर्व भूमिका वेगवेगळ्या नांवांखालीं एक विशिष्ट गटच करीत असतो.

व्यक्तिशः प्रत्येक घटकास एकट्यानें स्वार्थ साधण्याचें धाडस करवलें नसतें. परंतु वर निर्देशिलेल्या नाटकी देखाव्यामुळें हे सर्व घटक एकत्र येऊन हा स्वार्थ साधीत असतात. एरवीं जरी या घटकांत कितीही मतभेद असलें तरी पैसा उकळण्याच्या वेळीं मात्र आपापसांतील हे मतभेद मिटवून हे घटक परस्पर प्रशंसक पेढी उघडतात. प्रत्येक जण दुसऱ्याची प्रज्ञा, उदारता, निःस्वार्थीपणा यांचे गोडवे गावूं लागतो. अशा रीतीनें अहोरूपं अहोध्वनिःचा हा डाव सुरू होतो. आणि त्याच वेळीं हे सर्व घटक राष्ट्राच्या पाठीवरील अडचणींचा बोजा वाढत असल्याबद्दल दुःखाचे सुस्कारे टाकून दाखवीत असतात.

परंतु सुव्यवस्थेवर उभ्या असलेल्या लोकसत्ताकांत अशी खोटी प्रशंसा, राष्ट्र-प्रेमाचे नाटकी सुस्कारे, आणि विसंवादी घटकांनीं स्वार्थासाठीं केलेली हात-मिळवणी असले निंद्य प्रकार कधींहि आढळणार नाहींत. लोकसत्ताकांत देशांतील सर्व विभागांना समान प्रतिनिधित्व मिळत असल्यामुळें कोणी कायदेमंडळांत जावो किंवा अंमलबजावणी खात्यांत जावो या सर्वांना एक समान पीठिका असते. इंग्लंडच्या राज्यघटनेंत जसे राजा, सरदार सभा आणि लोकसभा हे परस्पर विसं-वादी घटक आढळतात तसे लोकसत्ताकांत आढळावयाचे नाहींत. असे विसंवादी भेद नसल्यामुळेंच स्वार्थापोटीं निर्माण होणारा गोंधळ किंवा आपमतलबी तडजोडी-मुळें निर्माण होणारी कर्तव्यभ्रष्टता लोकसत्ताकांत आढळत नाहीं.

लोकसत्ताकांत एकादा कायदा करावयाचा असल्यास प्रथम तो राष्ट्रापुढें ठेवण्यांत येतो. या कायद्याचें गुणावगुण पाहून राष्ट्र आपला निर्णय घेत असल्या-मुळें कोणी कोणाची खुशामत करण्याचा प्रश्न उद्भवत नाहीं. राष्ट्रावर अन्याय्य करांचा बोजा लादून वर सहानुभूतीचें नाटक करण्याचा राजसत्ताकांतील ढोंगीपणा लोकसत्ताकांतील मूल्यांशी आणि प्रेरणांशीं विसंगत आहे. कर राष्ट्रहितासाठीं आवश्यक असतील तरच लोकसत्ताकांत त्यांना मान्यता मिळते. परंतु या करांसाठीं जर मनधरणी करण्याचा प्रसंग उद्भवला तर त्या कर-आकारणीच्या योग्यायोग्यतेची चौकशी झाली पाहिजे असें मानलें जातें. असें हें लोकसत्ताकाचें वैभव असतांना माणसें आपलें स्वामित्व दुसऱ्यावर लादतांना किंवा हें लादलेलें स्वामित्व निमूट-पणें स्वीकारतांना कां आढळतात हेंच समजत नाहीं.

राजा आणि प्रजा असा भेद जेव्हां मानला जातो किंवा सरदार सभा, लोकसभा आणि राजा अशी जेव्हां शासनसंस्थेची विभागणी केली जाते तेव्हां सुबुद्ध माणसानें या सर्व प्रकाराचा अर्थ तरी काय लावावा? मानवी शक्तीचे जर मूलभूत भिन्न असे दोन प्रकार अस्तित्वांत असतील तर वरील कृत्रिम विभागणीचा अर्थ आपण समजूं शकलों असतों. परंतु माणूस हा येथून येथून एकच आहे. माणसाची शक्ति एकच प्रकारची आहे. तो स्वतःच या शक्तीचें अधिष्ठान आहे. आणि म्हणूनच राजा, सरदारसभा, लोकसभा ही विभागणी काल्पनिक भेदावर उभी आहे असेंच म्हणावें लागतें. असा भेद निर्माण करावयाचा म्हटलें तर तीनच काय पण अशा हजारों कृत्रिम विभागण्या करतां येतील.

अमेरिका आणि फ्रान्स येथें झालेली राज्यक्रांति, तशीच इतर देशांत दिसत

असलेलीं क्रांतीचीं पूर्वचिन्हें लक्षांत घेतां, या जगाच्या शासनसंस्थेच्या स्वरूपा-विषयींच्या कल्पना झपाट्यानें बदलत आहेत याची जाणीव होते. सांकेतिक राजकीय अंदाज बांधून लोकक्रांतीचें मानसिक सामर्थ्य व विचाराची झेप याचें मोजमाप करतां येणार नाहीं. लोकमानसांत आणि विचारांत होणाऱ्या गतिमान बदलांतून निर्माण होणाऱ्या क्रांतीचा जन्मकाल परिस्थितीच्या अंदाजावरून मांडणें केवळ अशक्य होणार आहे. फ्रान्स आणि अमेरिका येथील राज्यक्रांतीमुळें जुन्या जगाला धक्का बसला आहे. आणि सर्व लोक युरोपांत होणाऱ्या क्रांतीपेक्षांहि याच क्रांतीकडे अधिक विस्मयानें पाहात आहेत. वंशपरंपरागत राजसत्ताकांत माणसाची केंविलवाणी अवस्था झालेली आहे. गुलामगिरीचें जोखड मानेवर ठेवून ही सत्ता त्याला निर्दयपणें हांकीत आहे. सर्व बाह्य शत्रूपेक्षांहि स्वदेशांत सतत वाढणाऱ्या करांच्या बोजामुळें त्याचें स्वास्थ्य धुळीला मिळालें आहे. ही सर्व परिस्थिति पहिली असतां जुन्या शासनसंस्थांच्या स्वरूपांत क्रांतिकारक बदल होणें किती अपरिहार्य आहे हें कोणासहि पटेल.

राष्ट्रांतील सर्व व्यवहारांचा गाडा सुरळीत हांकण्यासाठींच शासनसंस्था जन्माला येत नाहीं काय ? ही शासनसंस्था कोणत्याहि व्यक्तीची अथवा कुटुंबाची खाजगी मालमत्ता कदापि होऊं शकत नाहीं. सर्व राष्ट्राच्या आधारानें ती उभी असते आणि सर्व राष्ट्राचाच तिच्यावर अधिकार असतो आणि म्हणूनच या शासन-संस्थेची मालकी एकाद्या व्यक्तीनें वा कुटुंबानें जर वंशपरंपरेनें बळकाविली तर या कृत्याला न्यायाचा आधार कधींहि मिळणार नाहीं. सार्वभौमत्व हा कोणा एका व्यक्तीचा अधिकार नसून सर्व राष्ट्राचा अधिकार आहे. आणि एखाद्या राष्ट्रांतील जनतेला जर शासनसंस्थेचें विशिष्ट स्वरूप नापसंत असेल तर ती शासनसंस्था नष्ट करून राष्ट्राच्या कल्याणासाठीं नव्या तत्त्वांवर आधारलेली शासनसंस्था उभा-रण्याचा या जनतेला हक्क आहे. माणसामाणसांत राजा आणि प्रजा असा कृत्रिम भेद निर्माण केल्यानें राजदरबारांतील मतलबी लोकांचें जरी फावत असलें तरी सर्वसामान्य नागरिकांचा त्यांत घातच आहे. अशा भेदांवर उभ्या असलेल्या शासनसंस्था क्रांतीनंतर साक्षात्काराप्रमाणें प्रकट होणाऱ्या नव्या तत्त्वांच्या दर्शनामुळें हतप्रभ होऊन कोसळूं लागल्या आहेत. सार्वभौम राष्ट्राचा प्रत्येक नागरिक हा सभासद असल्यामुळें कोणत्याहि व्यक्तीची गुलामगिरी तो कधींहि पत्करणार नाहीं. राष्ट्रांतील कायद्यासमोरच तो फक्त नम्र होईल.

जेव्हां लोक शासनसंस्थेच्या स्वरूपासंबंधीं विचार करतात तेव्हां अशा शासन-संस्थेला आपल्या उद्दिष्टांचें आणि तिच्या कक्षेंत येणाऱ्या सर्व प्रश्नांचें ज्ञान असलें पाहिजे ही गोष्ट त्यांनीं नीट लक्षांत ठेवावी. या दृष्टीनें विचार करतां अमेरिका आणि फ्रान्स यांनीं स्थापिलेल्या लोकसत्ताकांत वरील ध्येय साधलें जातें असें म्हणावेंसें वाटतें. ही लोकसत्ताकें सर्व राष्ट्राच्या कल्याणाची धुरा वाहतात त्याचप्रमाणें सर्व विभागांतील प्रतिनिधी एकत्र आल्यामुळें केंद्र सरकारला आपल्या कार्यक्षेत्राचें संपूर्ण ज्ञान असतें. जुन्या पद्धतीच्या शासनसंस्थेंत अशा तऱ्हेच्या ज्ञानाला किंवा लोककल्याणाच्या दृष्टीला फांटा दिलेला असतो. चर्चच्या चार भींतिपलीकडे जगांत काय चाललें आहे याचें ज्ञान नसलेल्या संन्याशाच्या हातांत शासनसंस्था सोपविली असतां ती जशी होईल त्याहून राजसत्ताक राज्य भिन्न असणें शक्य नाहीं.

पूर्वीच्या काळांत ज्या क्रान्त्या होत त्यांचें स्वरूप फारच मर्यादित असे. एकाद्या व्यक्तीला पदच्युत करणें किंवा एका विशिष्ट विभागांत परिस्थिति थोडीशी बदलणें एवढ्यावरच त्या संपत. एका विशिष्ट काळाचा किंवा प्रदेशाचा परिघ ओलांडून त्या आपला परिणाम जागतिक व्यवहारावर करूं शकत नसत. परंतु फ्रान्स आणि अमेरिका येथील राज्यक्रांत्या अशा तऱ्हेच्या नाहींत. या राज्यक्रांत्यामुळें एका नव्या जगाची प्रतिष्ठापना होत आहे. सत्य आणि माणसाचें अस्तित्व यांच्या-इतकीच जगद्व्यापी अशी तत्त्वप्रणाली जगाला लाभली आहे. या क्रांत्यांमुळें वैभव, नैतिकता आणि राजकीय स्वास्थ्य हातांत हात घालून चालूं लागलीं आहेत.

(१) स्वातंत्र्य आणि समता हे प्रत्येक माणसाचे जन्मसिद्ध हक्क आहेत आणि ते सदैव अबाधित राहातील. सामाजिक भेद हा कांहीं ठिकाणीं समाजकल्याणासाठीं अपरिहार्य असेल तरच करावा. (२) माणसाच्या नैसर्गिक आणि स्वयंसिद्ध अशा मूलभूत हक्कांचें संरक्षण करणें हेंच सर्व राजकीय संस्थांचें उद्दिष्ट आहे. स्वातंत्र्य, सुरक्षितता, जुलमाचा प्रतिकार आणि खाजगी मालमत्ता हेच ते अधिकार होत. (३) राष्ट्राच्या अधिकार हाच सार्वभौम होय. कोणत्याहि व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या गटाला राष्ट्राच्या संमतीशिवाय कसलाहि अधिकार धारण करतां येणार नाहीं.

वरील तत्त्वें व्यक्तिगत स्वार्थप्रवृत्तीला चेतवून राष्ट्राला धोक्यांत टाकणारीं नाहींत. माणसांतल्या गुणांना आणि प्रज्ञेला आवाहन करून समाजहिताकरितां या शक्ती राबवल्या जाव्या हेंच या तत्त्वांचें उद्दिष्ट आहे. माणसाच्या शक्ती कोणत्याहि कुटुंबाच्या किंवा व्यक्तीच्या खाजगी स्वार्थाकरितां खर्च होण्यांत त्यांची कृतार्थता

नाहीं. सार्वभौम राजसत्ता ही मानवतेची शत्रु असून तिच्या दुःखाचें ती मूळ आहे. फ्रान्सच्या क्रांतीनें ही जुलमी राजसत्ता नष्ट करून सार्वभौमत्वाची स्थापना योग्य स्थानीं, म्हणजे राष्ट्राच्या ठिकाणीं केली आहे. सर्व युरोप खंडानें जर ही गोष्ट केली असती तर आज युद्धाचें कारणच नष्ट झालें असतें.

फ्रान्सचा चवथा हेन्री या उदार दृष्टिकोनाच्या राजानें, युरोपमधील युद्धखोरी नष्ट व्हावी म्हणून त्यानें सोळाशेंदहामधें एक योजना सादर केली होती. युरोपमधील राष्ट्राराष्ट्रांत जर कलह निर्माण झाला तर मध्यस्थी करण्यासाठीं सर्व राष्ट्रांतील प्रतिनिधींची एक युरोपिअन कॉंग्रेस स्थापावी अशी ही योजना होती. ज्या वेळीं ही योजना सुचविली गेली त्यावेळीं ती अंमलांत आणली असती तर फ्रान्सच्या राज्यक्रांतीपूर्वी इंग्लंड आणि फ्रान्स या राष्ट्रांवर असलेला करांचा बोजा दहालक्ष पौंडांनीं तरी कमी झाला असता. ही योजना कां सफल झाली नाहीं (युद्ध नष्ट करण्याकरितां कॉंग्रेस स्थापण्याऐवजीं अनेक वर्षें निष्कारण थांबून आतां युद्ध थांबवण्यासाठीं कॉंग्रेस स्थापण्यांत आली आहे) याचा विचार करतां असें आढळून येतें कीं शासनसंस्था आणि राष्ट्रांतील जनता यांचे हितसंबंध परस्परविरोधी होते.

कर कोणत्याहि निमित्तानें आकारलेले असोत, ती शासनसंस्थेच्या उत्पन्नाची बाब असते. प्रत्येक युद्ध संपल्यानंतर करांचा बोजा आणखी वाढतो. आणि परिणामीं सरकारच्या उत्पन्नांत वाढ होते. स्वाभाविकच प्रत्येक युद्धाबरोबर सरकारची सत्ता आणि फायद्याच्या बाबी या दोन्ही गोष्टी वाढीस लागतात. युद्धाचें निमित्त करून कर लादतां येतात, आपापल्या पित्त्यांना सोईस्करपणें नोकऱ्या आणि अधिकाराच्या जागा देण्यांत येतात. म्हणून सर्व जुन्या शासनसंस्थांचा भर युद्धें माजवण्यावरच असतो. स्वाभाविकच, युद्धाला पायबंद घालणाऱ्या समाजव्यवस्थेच्या कोणत्याहि नव्या योजनांना या शासनसंस्थांचा सक्त विरोध असतो. कारण युद्ध नाहीं म्हणजे फायद्याची लूट नाहीं. क्षुल्लक कारणावरून युद्ध माजवणाऱ्या या शासनसंस्था समाजकल्याणाच्या ज्या हेतूसाठीं स्थापल्या जातात त्या हेतूशींच द्रोह करीत असतात.

लोकसत्ताक राज्यांत शासनसंस्था आणि जनता यांच्या हितसंबंधांत विरोध नसतो; आणि म्हणूनच युद्धांना आळा बसतो; हॉलंडचें लोकसत्ताक मजबूत पायावर उभें नव्हतें, सर्व जगभर हॉलंड व्यापार करीत होतें. परंतु असें असूनहि

जवळजवळ शंभर वर्षे हॉलंडच्या भूमीवर युद्ध पेटलें नाहीं. ज्या क्षणीं फ्रान्सनें जुन्या पद्धतीच्या शासनसंस्थेचा त्याग केला त्या क्षणापासून शांततापूर्वक लोकसत्ताक मूल्यें व अंतर्गत समृद्धि यांची वाढ सुरू झाली. अशा तऱ्हेचें लोकसत्ताक जगांतील इतर राष्ट्रांनीं जर स्थापिलें तर फ्रान्सप्रमाणें तेथेंही नव्या समृद्धीची प्रस्थापना होईल.

जुन्या पद्धतींच्या शासनसंस्थांचा सर्व भर युद्धखोरीवरच होता. राष्ट्राराष्ट्रांतील पशुतुल्य संबंध अशा या स्वार्थी शासनसंस्थांच्या चिथावणीमुळेंच निर्माण होत. प्रत्येक राष्ट्रांतील सरकार दुसऱ्या राष्ट्रावर युद्धखोरीचे आणि अत्याचारांचे आरोप करून आपल्या राष्ट्रांतील जनतेची सूडबुद्धि चेतवून युद्धाच्या आगींत अधिकच तेल ओतीत असे. खरें म्हणजे एका राष्ट्रांतील माणसाचें दुसऱ्या राष्ट्रांतील माणसाशीं शत्रुत्वाचें संबंध असण्याचें कांहींच कारण नाहीं. परंतु या दुष्ट शासनसंस्था माणसामाणसांत द्वेष आणि कलह पेरीत असत आणि म्हणूनच एखाद्या राजाच्या स्वार्थाविरुद्ध आवाज उठवण्यापेक्षां चुकीच्या मूल्यांवर उभ्या असलेल्या या शासनसंस्थांविरुद्ध आवाज उठविणें हेंच महत्त्वाचें होय. त्याचप्रमाणें एखाद्या व्यक्तीला सुधारण्याचा प्रयत्न न करतां राष्ट्रानें आपलें शक्तिसर्वस्व या जुन्या शासनसंस्थांचें अधिष्ठान मोडून नव्या मूल्यांवर त्यांची पुनर्रचना करण्याकडे खर्च केलें पाहिजे.

आज ज्या शासनसंस्था अस्तित्वांत आहेत. त्या त्यांच्या जन्मकाळच्या परिस्थितीस अनुरूप होत्या किंवा नाहीं हा येथें प्रश्न नाहीं. परंतु ही गोष्ट मात्र खरी कीं या शासनसंस्था काळाच्या ओघाबरोबर जसजशा जुनाट होत जातात तसतशा नव्या परिस्थितीला तोंड देण्यास त्या सर्वथैव असमर्थ बनतात. काळ, परिस्थिति आणि मनें यांच्या परिवर्तनाचा परिणाम होऊन जसा सामाजिक चाली-रीतींत बदल होतो तसा तो शासनसंस्थांच्या स्वरूपांतहि होणें अपरिहार्य आहे. शेती, व्यापार, कारखानदारी आणि अनेक हरहुन्नर यांच्यामुळें राष्ट्रीय समृद्धीचें पाऊल पुढें पडत असतें. या सर्व गोष्टींचा जर पूर्णपणें विकास साधावयाचा असेल तर नव्या पद्धतीचें सरकार आणि तें चालविण्यासाठीं ज्याची जुन्या काळांत कदा-चित् आवश्यकता नव्हती; परंतु आज जें अपरिहार्य आहे असें नवें ज्ञान यांची आवश्यकता आहे.

आज युरोप खंडांत कोठेंहि नजर टाका, परंपरागत सत्तेवर उभ्या असलेल्या

शासनसंस्था मोडकळीला आलेल्या असून राष्ट्राला सर्वभौमत्व देणारीं नवीं स्थित्यंतरें प्रातिनिधिक सरकाराची कल्पना स्वीकारूं लागल्याचें कोणालाहि सहज दिसून येईल आणि म्हणूनच अपरिहार्यपणें येणाऱ्या ह्या क्रान्तीला आकस्ताळी विरोध करण्यापेक्षां विवेक आणि समजूतदारपणा यांचा अवलंब करून या क्रान्तीचा स्वीकार करणें हेंच शहाणपणाचें होय.

जगांतील आजच्या परिस्थितीचा विचार करतां राजकीय यंत्रणेंत कसलीहि नवी सुधारणा घडवून आणणें अशक्य आहे असें कोणालाच वाटण्याचें कारण नाहीं. हें क्रान्तीचें युग आहे आणि येथें नव्या प्रयत्नास, पुरुषार्थास वाव आहे. आजच्या शासनसंस्थांनीं पेटवलेले कलह, त्यांनीं निर्माण केलेलीं युद्धें यांचा कंटाळा येऊन तीं नष्ट करण्यासाठीं एका सार्वराष्ट्रीय समितीची आवश्यकता भासूं लागली आहे. राष्ट्राराष्ट्रांतील प्रगति आणि संस्कृति यांचें पाऊल पुढें पडावें म्हणून युरोप अशा तऱ्हेची एक युरोपीय कॉंग्रेस नजीकच्या भविष्यकाळांत स्थापन होण्याची शक्यता एके काळीं फ्रान्स आणि अमेरिका येथें होणाऱ्या क्रान्तीच्या शक्यतेपेक्षां अधिक प्रमाणांत वाढूं लागली आहे.

# मानवी हक्क–भाग दुसरा

आर्किमेडीस यांत्रिक शक्तीच्या बाबतींत जें म्हणाला होता तें विवेक आणि स्वातंत्र्य यांच्या बाबतींतहि खरें आहे. आर्किमेडीस म्हणाला होता कीं जर कोठें उभें रहाण्यापुरती जागा मिळाली तर हें जग सहज उचलतां येईल. जें विधान यंत्रशक्तीच्या बाबतींत केवळ एक तात्त्विक सिद्धांतरूपानें खरें होतें तें अमेरिकन क्रांतीनें राजकारणाच्या क्षेत्रांत वास्तवतेच्या पातळीवर आणून दाखविलें आहे. जुन्या शासनसंस्था व जुन्या जगाचे जुलूम यांचें माणसाच्या मनावर इतकें जबरदस्त वजन होतें कीं आशिया, आफ्रिका आणि युरोप येथें राजकीय सुधारण्यांचा साधा आरंभहि अशक्य होऊन बसला होता. या जुलूमशहांनीं सर्व जगभर स्वातंत्र्याची पारध सुरू केली होती. या जुन्या जगांत स्वतंत्र रीतीनें विचार करणें देखील बंडाचें लक्षण मानलें जात होतें. भीतीचा पगडा जनमनावर इतका जबरदस्त बसला होता कीं लोकांना विचार करण्याचें भय वाटूं लागलें होतें.

परंतु सत्याचा स्वभावधर्म असा आहे कीं त्याच्या प्रकटीकरणासाठीं स्वातंत्र्य हें अपरिहार्य होऊन बसतें. सूर्य अंधारापासून वेगळा आहे हें सांगण्यासाठीं पुरावे द्यावे लागत नाहींत. ज्या क्षणीं अमेरिकन सरकारांनीं आपली अस्मिता प्रकट करण्यास सुरवात केली त्याच क्षणीं जुलूमशाहीला प्रचंड हादरा बसला; आणि मानवजात आपल्या मुक्ततेसाठीं नव्यानें विचार करूं लागली. इंग्लंडच्या वर्चस्वांतून मुक्त होणें एवढाच जर अमेरिकन स्वातंत्र्याचा अर्थ मर्यादित असतां तर जगाच्या दृष्टीनें त्याला फारशी किंमत राहिली नसती. परंतु अमेरिकन स्वातंत्र्यानें जुन्या मूल्यांत आणि शासनसंस्थांच्या स्वरूपांत मूलभूत क्रांति घडवून आणल्यामुळें तें जगाला मार्गदर्शक होऊं शकलें. अमेरिकेची भूमिका, तिची धडपड केवळ स्वतःपुरती मर्यादित नव्हती. साऱ्या मानवजातीच्या मुक्तीचा ध्यास तिला लागलेला होता आणि म्हणूनच इंग्लंडनें अमेरिकनांविरुद्ध लढण्यास आणलेल्या भाडोत्री जर्मन शिपायांनाहि आपला पराभव झाला याबद्दल खंत वाटली नसेल. त्याचप्रमाणें इंग्लंडमधील समंजस माणसेंहि अमेरिकेला दडपून टाकण्याचा आपल्या सरकारचा

प्रयत्न फसला याबद्दल समाधान मानीत असतील.

राजकीय व्यवहारांत आपल्या सुधारणातत्त्वांमुळें अमेरिकेला जसा अग्रमान प्राप्त झाला, तसाच नैसर्गिक समृद्धीच्या बाबततींतहि मिळाला. तिच्या तत्त्वांना भव्य प्रौढत्व मिळालेंच. कारण तिनें त्यांना नुसता जन्म दिला इतकेंच नव्हे तर कित्येक दुसऱ्या कारणांमुळें त्यांना सामर्थ्यहि प्राप्त झालें.

अमेरिकेंत घडणाऱ्या या नवनव्या परिवर्तनाकडे एखाद्या निरीक्षकानें पाहिलें तर त्याच्या मनांत भव्योदात्त कल्पना निर्माण होतील. निसर्ग येथें आपल्या सर्वांगीण वैभवांनीं प्रकट झालेला दिसेल. या भव्य प्रसंगावर चिंतन करीत असतांना त्याच्या मनाचीं क्षितिजें विशाल होतील आणि ही भव्यता व्यक्तित्वांत भिनून जाईल. अमेरिकेचे पहिले रहिवासी युरोपांतील विविध राष्ट्रांतून आपल्या देशांतील छळाला कंटाळून आसरा घेण्यासाठीं अमेरिकेंत आले. जुन्या जगाची शीव ओलांडून त्यांनीं जणूं काय नव्या जगांत पाऊल टाकलें. त्यांचे व्यवसाय भिन्न होते, धर्म निरनिराळे होते. छळाला कंटाळून आलेले हे सर्व लोक बंधुत्वाच्या भावनेनें आले. जेथें कांहींच नव्हतें तेथें त्यांना स्वर्ग निर्माण करावयाचा होता. या गरजेंतून त्यांच्यांत दृढ अशी सामाजिक भावना निर्माण झाली. ही सामाजिक भावना शोषणावर आधारलेल्या जुनाट शासनसंस्था कधींही वाढूं देत नसत. परंतु अशा नव्या परिस्थितींत मनुष्य योग्य दिशेनेंच पाऊल टाकतो; एका माणसाकडे दुसरा माणूस शत्रुत्वाच्या भावनेनें न पहातां भ्रातृभावानें पाहूं लागतो. हें उदाहरण माणसानें खऱ्या ज्ञानासाठीं निसर्गाकडे वळलें पाहिजे हीच गोष्ट कृत्रिम जगाला सांगत आहे.

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत अमेरिका करीत असलेली प्रगति पाहिली म्हणजे आशिया, आफ्रिका आणि युरोप येथील शासनसंस्था जर क्षुद्र मूल्यांनीं पोखरल्या नसत्या, अमेरिकेप्रमाणेंच नव्या मूल्यांचें अधिष्ठान त्यांनीं प्राप्त करून घेतलें असतें तर त्यांनाहि आज अमेरिकेप्रमाणेंच प्रगति करून घेतां आली असती असें म्हणावेंसें वाटतें. युगानुयुगें हीं राष्ट्रें अधोगतीच्या गर्तेतच पडून आहेत. ज्यानें कधीं पूर्वी जग पाहिलें नाहीं अशा एखाद्या तटस्थ निरीक्षकानें जर या राष्ट्राकडे नजर टाकली तर त्याला असेंच वाटेल कीं हीं राष्ट्रें नुकतींच जन्मलेलीं असून आपला पाया घालण्यासाठीं धडपड करीत आहेत. या देशांत दिसणारें दैन्य आणि दुःख तेथील जनतेला आपल्या कल्याणाची काळजी न घेतां आल्यामुळें झालेलें आहे आणि या गोष्टीला

तेथील शासनसंस्थाच पूर्णपणें जबाबदार आहेत ही गोष्ट त्याला सांगून देखील खरी वाटावयाची नाहीं.

या मागासलेल्या जुनाट राष्ट्रांकडून आपण अधिक प्रगत अशा राष्ट्रांकडे नजर टाकली तरी शासनसंस्थांचा लोभी हात जनतेला नागवून आपली पोतडी भरीत असल्याचेंच दिसेल. नवे नवे कर लादण्यासाठीं या शासनसंस्था आपली बुद्धि पणाला लावीत आहेत. राष्ट्राची समृद्धि हें आपलें भक्ष्यच आहे असें या हिंस्र शासनसंस्था समजतात. आणि खंडणी वसूल केल्याशिवाय कोणालाहि सोडीत नाहींत.

ज्या अर्थीं क्रांतीचें पर्व आतां सुरू झालें आहे (एकाद्या गोष्टीची सुरवात होणें कठीण असतें–एकदां सुरवात झाली कीं ती गोष्ट चालू राहाते) त्याअर्थीं दिव्यानें दिवा पेटावा तसें हें लोण आतां सर्वत्र पोंहोचेल अशी अपेक्षा बाळगण्यास हरकत नाहीं. जुन्या जगांतील शासनसंस्था युद्धें पेटवतात, मानवी संस्कृति धोक्यांत आणतात, व्यापारांत अडथळे निर्माण करतात. स्वास्थ्य आणि समृद्धि यांची विल्हेवाट लावणाऱ्या या शासनसंस्थांच्या जुलुमाला आतां जग विटलें आहे. अशा-परिस्थितींत क्रांति ही एकमेव आशा आहे. फ्रान्स आणि अमेरिका यांनीं उदाहरण घालून दिल्यामुळें तर या आशेनें मूळ धरलें आहे. क्रान्ति हाच आजच्या जगांतील चर्चेचा एकमेव विषय होऊन बसला आहे आणि क्रान्ति हें युगलक्षण मानलें जात आहे.

समाजाच्या सुखाचें वर्धन करणाऱ्या, कमींत कमी खर्चांत चालणाऱ्या शासनसंस्था जर स्थापल्या गेल्या तर कालान्तरानें त्यांच्या प्रगतीला होणारा सर्व विरोध आपो-आपच बंद पडेल. काळाप्रमाणेंच विवेकाचा मार्गहि सुकर होत जाईल आणि मानवी कल्याण व पूर्वग्रह यांच्या झगड्यांत पूर्वग्रहांना हार खावी लागेल. या जगांत माणसाच्या वांट्याला सुख आणि समृद्धि यावी अशी इच्छा असेल तर शासन-संस्थांच्या स्वरूपांत क्रांतिकारक बदल करणें हाच एकमेव मार्ग आहे. राजसत्ताक शासनसंस्था तलवारीच्या बळावरच आपलें अस्तित्व टिकवून असतात. युद्ध, लुटालूट आणि करांचा बोजा लोकांवर लादणें हा त्यांचा नित्याचा धंदा होऊन बसला आहे. जोंपर्यंत अशा शासनसंस्था टिकून आहेत तोंपर्यंत एक दिवस देखील शांतता टिकणें शक्य नाहीं.

राजसत्ताक शासनसंस्थांचा इतिहास पाहिला असतां काय दिसतें? चार दिवस

शांततेचें सोंग आणि बाकीचे दिवस जनतेचें क्रूर शोषण हें चित्र डोळ्यासमोर उभें राहात नाहीं काय? युद्धें पेटवून आणि माणसांची अमानुष कत्तल करून शीण आला म्हणजे या शासनसंस्था थोडासा विसांवा घेतात. नवें युद्ध पेटवण्यापूर्वी घेतलेल्या या विश्रांतीला त्या शांति या नांवानें संबोधितात. माणसानें अशा हलाखीच्या स्थितींत राहावें अशी परमेश्वराची निश्चित इच्छा नव्हती. मानवी दुःख हेंच जर राजसत्ताकांचे पर्यवसान असेल तर ज्यू लोकांच्या पापांच्या यादींत राजसत्ताकाचें नांव घालावयास मुळींच हरकत नाहीं.

पूर्वीच्या काळीं होणारी क्रांति हा सर्व मानवाच्या कल्याणासाठीं केलेला प्रयत्न असें म्हणतां आलें असतें. एका विशिष्ट व्यक्तीला पदच्युत करणें किंवा एखादा कायदा रद्द करून घेणें या पलीकडे त्यांची धांव नव्हती. जीवनाच्या मूल्यांतच परिवर्तन घडवून आणावें हें त्यांचें उद्दिष्ट नसल्यामुळें त्या काळाचें कुंपण ही जुनी क्रांति ओलांडूं शकली नाहीं. परंतु आज आपण क्रांतीचें नवें स्वरूप पाहातां त्याला प्रतिक्रांति असें म्हणणें चूक ठरेल.

जुलमी राजांनीं माणसाचे मूलभूत हक्क हिरावून घेतले होते, आज हे सर्व हक्क पुन्हां मिळविण्यासाठीं माणसाची धडपड सुरू आहे. ज्याप्रमाणें मानवी जीवनातील सर्वच गोष्टींना भरतीबरोबर ओहोटी येते, त्याचे प्रवाह कधीं कधीं परस्पर विरोधी दिशेनें वाहूं लागतात तसें याहि बाबतींत आहे. नैतिक मूल्यें, जागतिक शांतता, मानवाचे मूलभूत आणि अच्छेद्य हक्क यांच्यावर उभ्या असलेल्या शासनसंस्थेची कल्पना आतां पश्चिमेकडून पूर्वेकडे जात आहे. तलवारीच्या जोरावर उभ्या असलेल्या शासनसंस्थेची कल्पना ज्या वेगानें पूर्वेकडून पश्चिमेकडे आली त्याहून हा वेग किती तरी मोठा आहे. ही नवी क्रांतिकारक कल्पना कांहीं विशिष्ट व्यक्तींपुरतीच मर्यादित नसून आपल्या प्रगतीच्या कक्षेत सर्व राष्ट्राला घेणारी आहे. मानवजातीला एका नव्या युगाचें ती आश्वासन देत आहे.

अशा या महान् क्रांतीचीं सर्व मूलतत्वें नीट समजावून घेतल्याशिवाय, तिच्यापासून माणसाचें कसकसें हित होणार आहे याचें आकलन झाल्याशिवाय, अशा तऱ्हेच्या क्रांतीला हात घालणें तिच्या यशाला विघातक ठरणारें आहे. ही धोक्याची जागा नीट लक्षांत घेणें आवश्यक आहे. राष्ट्रांत जें जें कांहीं घडतें तें तें सर्व सरकारमुळेंच घडतें असें भोंगळपणें म्हणण्याची प्रथा आहे. या शासनसंस्था आपण केलेल्या घोडचुकांची आणि दुष्टपणाची जबाबदारी सपशेल टाळून

राष्ट्राच्या समृद्धीचें सर्व श्रेय आपल्याकडे घ्यावयास बघतात. उद्योगधंद्यांची प्रगति आपल्यामुळेंच झाली असें म्हणून या शासनसंस्था या व्यवसायांची सर्व प्रतिष्ठा हिरावून घेतात. त्याचप्रमाणें समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून व्यक्तीला जें श्रेय मिळणें आवश्यक आहे तें सर्व मुजोरपणें बळकावून बसतात.

आणि म्हणूनच क्रान्तीच्या या युगांत या शासनसंस्थांनीं काय साधलें आहे आणि काय नाहीं याचें निश्चित ज्ञान करून घेणें आवश्यक आहे. यासाठीं समाज आणि संस्कृति यांचें सांगोपांग परीक्षण करून त्या उभयतांचे कार्य कोणतें आणि शासनसंस्थाचें कोणतें हें ठरविलें पाहिजे. अशा तऱ्हेनें विचार करण्यास सुरुवात केली असतां ब्ऱ्याचशा चुकांची कारणमीमांसा आपल्याला करतां येईल आणि ज्याचें श्रेय त्यास देणें शक्य होईल.

## समाज व सुधारणा

ज्या एका विशिष्ट व्यवस्थेमुळें सर्व मानवी व्यवहार सुरळीतपणें चालू असतात त्या व्यवस्थेचें श्रेय शासनसंस्थेला देणें साफ चुकीचें आहे. ज्या तत्त्वांवर ही व्यवस्था उभी आहे तीं तत्त्वें माणसाच्या नैसर्गिक घडणींत आहेत. त्या तत्त्वांमुळेंच समाज ही गोष्ट अस्तित्वांत आली आहे. शासनसंस्था निर्माण होण्यापूर्वीं हीं तत्त्वें होतीं; आणि शासनसंस्था हा प्रकार उपचारादाखल उरला नाहीं तरीहि हीं तत्त्वें अस्तित्वांत असतीलच. एक माणूस दुसऱ्या माणसावर या ना त्या कारणासाठीं अवलंबून असतो. माणसामाणसांचे हितसंबंध एकमेकांत अपरिहार्यपणें गुंतलेले असतात. आणि त्यामुळेंच विकसित असा मानवसमुदाय सर्व घटकांना एकत्र बांधणारी अशी परस्पर संबंधांची सांखळी तयार करतो. जमिनीचा मालक, शेतकरी, कारखानदार, व्यापारी आणि दुकानदार तसेंच इतर सर्व व्यवसाय परस्परांच्या सहकार्यानें वाढत असतात. या समान हितसंबंधांमुळेंच त्यांच्या सर्व व्यवहारांचें नियमन होतें आणि त्यांतूनच त्यांचे कायदेहि निर्माण होतात. सामाजिक संबंधांतून निर्माण झालेल्या ह्या कायद्यांचा सरकारी कायद्यांपेक्षां माणसाच्या जीवनावर अधिक प्रभाव असतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जें श्रेय शासनसंस्थांना दिलें जातें, तें वास्तविक समाजाचें आहे.

चांगल्या शासनसंस्थेचें स्वरूप कसें असावें हें ठरविण्यासाठीं माणसाच्या या व्यवहाराचें स्वरुप समजावून घेणें आवश्यक आहे. ज्याप्रमाणें निसर्गानें त्याच्यांत

सामाजिक भावना निर्माण केलेली आहे त्याप्रमाणें त्याची सामाजिक कर्तव्येंहि ठरवून दिलीं आहेत. सर्वच बाबतींत व्यक्तीच्या शक्तीपेक्षां कितीतरी पटीनें त्याच्या गरजा अधिक असाव्या अशीच निसर्गानें योजना केलेली दिसते. समाजाची मदत घेतल्याशिवाय कोणत्याहि व्यक्तीला आपल्या गरजा भागविणें केवळ अशक्य आहे. या कारणामुळेंच, गुरुत्वाकर्षणाच्या नियमानें जशी प्रत्येक वस्तु केंद्राकडे आकर्षिली जाते त्याप्रमाणें व्यक्ति समाजाकडे आकर्षिली जाते.

परंतु निसर्ग केवळ एवढ्यावरच थांबलेला नाहीं; तो याहून देखील पुढें गेलेला आहे. परस्परांच्या गरजांमुळें त्यानें माणसांना एकत्र यावयास भाग पाडलेंच आहे. परंतु त्याच्या मनांत समाजप्रेमाची भावनाहि त्यानें निर्माण केलेली आहे. ही भावना जगण्यासाठीं आवश्यक नसली तरी सुखासाठीं आहे. जन्मापासून तो थेट मृत्यूपर्यंत समाज प्रेमाची ही भावना माणसाच्या मनांत अखंड तेवत असते. हें सर्व पाहिलें असतां शासनसंस्थेचा बराचसा भाग अनावश्यक असूनहि तो माणसावर लादला गेलेला आहे हें कळून चुकतें. कांहीं गोष्टी अशा असतात कीं त्या शासनसंस्थेच्या मदतीशिवाय समाज पार पाडूं शकत नाहीं. परंतु अशा थोड्या बाबी सोडल्यास शासनसंस्था जें जें कांहीं करूं शकते तें आजपर्यंत समाज या संस्थेनें शासनसंस्थेच्या मदतीशिवाय परस्पर सहकार्यानें केलेलें आहे याचीं हवीं तेवढीं उदाहरणें देतां येतील.

अमेरिकेचें स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाल्यापासून अमेरिकेंत रूढ स्वरूपाची शासनसंस्था जवळ जवळ दोन वर्षांहून अधिक काळपर्यंत अस्तित्वांत नव्हती. जुन्या शासनसंस्था नष्ट करण्यांत आल्या होत्या आणि अमेरिकेचें सर्व लक्ष स्वसंरक्षणाकडे केंद्रित झाल्यामुळें नवी शासनसंस्था स्थापण्यास वेळ नव्हता. परंतु अमेरिकेंतील अंतर्गत स्वास्थ्य आणि सुव्यवस्था युरोपांतील कोणत्याहि राष्ट्राइतकीच चांगली होती.

वेगवेगळ्या गरजा असलेलीं माणसें सहकार्याच्या भावनेनें एकत्र आल्यामुळें कोणतीहि परिस्थिति आली तरी तिच्याशीं मिळतें घेण्याची प्रवृत्ति समाजांत निसर्गतःच वास करीत असते. ज्या क्षणीं संस्था नाहींशी होते त्या क्षणीं समाज ही संस्था अधिक वेगानें कार्यतत्पर होते. सगळीं माणसें एकत्र येतात आणि त्यांच्या समान हितसंबंधांतून समाजधारणेस आवश्यक ती सुरक्षितता आपोआप निर्माण होते. शासनसंस्था नसली म्हणजे समाज रसातळाला जाईल असें म्हणणें हा सत्याचा

अनुक्रम 22238 वि: निबंध
क्रमांक 7067 नों: दि: 3/12/1980



केवळ अपलाप आहे. उलट समाजाचा अधःपात होण्याऐवजीं समाज अधिक कार्यतत्पर होतो, अधिक एकसंध होतो. सामाजिक संघटनेचे जे घटक शासनसंस्थेशीं जखडलेले असतात ते आपल्या पायावर उभे राहून स्वतंत्रपणें कार्यतत्पर होतात.

नैसर्गिक प्रेरणांमुळेंच आणि परस्परांच्या हितसंबंधांमुळें समाजांत एकत्र येऊन माणसें सुसंस्कृत जीवन जगत असतात. या सर्व प्रेरणा आणि तत्त्वें कोणत्याहि बदललेल्या परिस्थितींत माणसाला आधार देऊन योग्य दिशा दाखवितात आणि सामाजिक संघटना अधिक दृढ करतात. तात्पर्य, माणूस हा निसर्गतःच सामाजिक प्राणी असल्यामुळें त्याच्या निसर्गसिद्ध अवस्थेपासून त्याला स्थानभ्रष्ट करणें जवळ जवळ अशक्य आहे.

सर्वसामान्य शासनसंस्था माणसाच्या सांस्कृतिक जीवनांत फारच थोडी भर घालीत असतात. माणसानें आपली सर्व प्रज्ञा खर्च करून जरी आपल्याला हव्या तशा शासनसंस्थेचें स्वरूप निश्चित केलें तरी ही शासनसंस्था फक्त कागदावरच राहील. प्रत्यक्षांत कधींहि येणार नाहीं. समाज आणि संस्कृति यांची धारणा ज्या मूलतत्त्वांवर होत असते त्या तत्त्वांवरच व्यक्ति आणि समाज यांची सुरक्षितता आणि उत्कर्ष अवलंबून असतो. हीं तत्त्वें सर्वमान्य असतात; परस्पर सहकार्यानें त्यांचें पालन केलें जातें. या तत्त्वांमुळें परस्पर हितसंबंध अबाधित राहून शेकडो लोकांना कार्यतत्पर करीत असतात. या तत्त्वांमुळें जें साधलें जातें तें कोणत्याहि शासनसंस्थेच्या आटोक्याबाहेरचें आहे.

एकादा समाज जेवढा सुसंस्कृत आणि विकसित तेवढी त्याला शासनसंस्थेची आवश्यकता कमी. कारण असा समाज स्वतःच जबाबदारीनें सर्व व्यवहार पार पाडीत असतो. परंतु जुन्या शासनसंस्था या मात्र नेमक्या याच्या उलट असतात. ज्या प्रमाणांत त्यांचा खर्च वास्तविक कमी व्हावयास हवा त्याच्या उलट प्रमाणांत तो वाढूं लागतो. समाजाचे व्यवहार सुरळीतपणें चालण्यासाठीं कांहीं नियमांची आवश्यकता असते. हे नियम शासनसंस्थेनें आंखून दिले काय किंवा समाजानें स्वतःच्या प्रेरणेनें पाळले काय त्याचा परिणाम एकच होणार. कोणत्या तत्त्वांनुसार माणसें समाजांत एकत्र येतात त्याचप्रमाणें कोणत्या नियमांनुसार त्यांच्या व्यवहाराचें नियमन-नियंत्रण होतें याचा विचार करूं लागलें असतां असें आढळून येतें कीं शासनसंस्था अस्तित्वांत येण्यापूर्वी समाज आपल्या या नैसर्गिक संबंधांतून आपले सर्व व्यवहार उत्तम रीतीनें पार पाडीत असतो.

सामाजिक व्यवहाराच्या बाबतींत मनुष्य नेहमीं निसर्गनियमांना धरूनच चालत असतो. आपण निसर्गनियम पाळीत आहोंत याची त्याला जाणीवहि नसते आणि तशी त्याला जाणीव व्हावी अशी धूर्त शासनसंस्थांची इच्छाहि नसते. सर्व सामाजिक नियम हा निसर्गनियमांचा आविष्कार आहे. व्यापाराचे नियम असोत किंवा व्यक्तिव्यक्तींच्या अथवा राष्ट्राच्या संबंधांचे नियम असोत, परस्पर सहकार्य आणि परस्परांचें हितसंबंध, आणि परस्परांच्या हितसंबंधांचा सांभाळ हींच तत्त्वें या संबंधांच्या मागें असतात. या नियमांचें पालन माणसें कसोशीनें करतात कारण तसें करण्यांतच त्यांचें हित असतें—सरकारानें हे नियम लादलेले आहेत म्हणून नव्हे.

परंतु सामाजिकतेकडचा माणसाचा हा नैसर्गिक कल ढांसळून टाकण्यास बहुधा या शासनसंस्थाच कारणीभूत होत असतात. समाजधारणेच्या तत्त्वांना पायाभूत असलेलीं मूल्यें लाथाडून या शासनसंस्था जुलमानें आणि पक्षपातानें वागूं लागतात. स्वाभाविकच ज्या गोष्टी थांबवण्याकरितां शासनसंस्था जन्माला येतात त्याच गोष्टींचीं वाढ करण्यास त्या मदत करतात.

आजपर्यंत इंग्लंडमधें झालेल्या अंतर्गत यादवींचा इतिहास पाहा. शासनसंस्थेचा अभाव हें या यादवींचें कारण नसून शासनसंस्थेमुळेंच त्या निर्माण झालेल्या आहेत हें सहज लक्षांत येईल. समाजाला एकत्र आणण्याऐवजीं या शासनसंस्थांनीं त्यांच्यांत फूट पाडली आणि समाजांत असंतोष व अव्यवस्था निर्माण केली.

व्यापार किंवा असेच इतर व्यवहार करण्यासाठीं माणसें सहजपणें एकत्र येतात. या एकत्र येण्यांत पद्धतशीर योजना कसलीहि नसते. परंतु शासनसंस्थेचा येथें पूर्ण अभाव असूनहि सामाजिकतेच्या तत्त्वांनुसार हे सर्व व्यवहार चालल्यामुळें कसलाहि संघर्ष तेथें उद्‌भवत नाहीं. या गोष्टीकडे पाहिलें असतां असें दिसून येतें कीं सुव्यवस्था आणि शांतता स्थापण्याऐवजीं शासनसंस्था त्यांच्या नाशासच कारणीभूत होत असतात. १७८० मध्यें झालेल्या दंग्यास त्या शासनसंस्थेनें मुद्दाम रुजवलेले पूर्वग्रह कारणीभूत होते. परंतु इंग्लंडमध्यें होणाऱ्या दंग्यांना मात्र आणखी कांहीं इतर कारणें आहेत. करांचा अन्याय्य बोजा आणि तो लादण्यामधील विषमता जरी लपविण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी त्याचे दुष्परिणाम दिसल्याशिवाय राहणार नाहींत. या अन्याय्य करांमुळें समाजांतील

एक विभाग दारिद्र्यांत खितपत राहातो. या शोषित समाजांत असंतोष धुमसूं लागतो आणि योग्य मार्गदर्शन मिळण्याची संधि नसल्यामुळें अखेर हा समाज भडकून दंगे करूं लागतो. या दंग्याचें तात्कालिक कारण कोणतेंहि असो त्याचें खरें कारण जनतेंतील असंतोष हेंच होय. याचा अर्थच असा कीं शासनसंस्थांच्या स्वरूपांतच कांहींतरी मूलभूत बिघाड आहे आणि समाजाची धारणा होण्यास आवश्यक असलेल्या सामाजिक भावनेसच त्या नख लावीत आहेत.

युक्तिवादापेक्षां वस्तुस्थितीचा प्रत्यक्ष पुरावा अधिक बोलका असतो. या दृष्टीनें पाहातां अमेरिकेंतील सद्यःपरिस्थितीचा माझ्या विधानास पाठिंबा मिळावा. या सर्व जगांत सामाजिक सहकार्य स्थापन करणें जर कोठें अत्यंत कठीण असेल तर तें अमेरिकेंतच होय. भिन्नभिन्न राष्ट्रांतील लोक अमेरिकेंत येऊन स्थाईक झाले आहेत. या लोकांच्या भाषा वेगवेगळ्या, त्यांचीं धर्ममतें निरनिराळीं, त्यांच्या त्यांच्या देशांतील शासनसंस्थांचे प्रकार वेगवेगळे, हें सर्व पाहिलें असतां असें वाटतें कीं इतकी विविधता असलेली माणसें एक अभिन्न राष्ट्र म्हणून एकत्र येणें केवळ अशक्य आहे. परंतु मानवी हक्क आणि सामाजिकतेचीं मूलतत्वें यांच्यावर शासनसंस्थेची उभारणी केल्यावर या सर्व अडचणींचा निरास होऊन लोकांत हार्दिक ऐक्य निर्माण होईल. अमेरिकेंत गरिबांचा छळ होत नाहीं कीं श्रीमंतांना मोकाट सुटण्याइतक्या सवलती दिल्या जात नाहींत. राजाचा उधळेपणा किंवा अंतस्थ कलह यामुळें देशांतील उद्योगधंद्यांची गळचेपी अमेरिकेंत होत नाहीं. अमेरिकेंतील शासनसंस्था न्यायावर उभ्या असल्यामुळें लोकांवर योग्य ते करच आकारले जातात. अशा रीतीनें असंतोषाचीं सर्व कारणें निपटून टाकल्यामुळें अमेरिकेंत दंगे धोपे होण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं.

इतकी विविधता असूनहि त्यांची शासनसंस्था सुव्यस्थित कशी चालते हें शोधून काढण्यासाठीं बर्कसारख्या तत्त्वसंशोधनाची आवड असलेल्या माणसानें प्रयत्न केला तर आपल्या शोधक बुद्धीला त्याला फारच ताण द्यावा लागेल. लांचलुचपत, दंडेली आणि इतर लबाड्या इत्यादि साधनें वापरूनच अमेरिकेंतील राज्य चाललेलें असणार असाच सोईस्कर निष्कर्ष बर्क संशोधनानीं काढील. नाना कुतर्कांच्या जंगलांत बर्क आपली वाट चुकेल, परंतु डोळ्यांपुढचा सरळ मार्ग त्याला कांहीं दिसणार नाहीं.

अमेरिकन क्रांतीमुळें नव्या मूल्यांचा शोध घेण्यास मदत झाली आणि

तिच्यामुळें जुन्या शासनसंस्थांचें पितळ उघडें पडलें. तिच्यापूर्वी झालेल्या क्रांत्या राजदरबाराचें कुंपण ओलांडून कधींच बाहेर आल्या नव्हत्या. अमेरिकन क्रांती-सारखी अखिल राष्ट्रीय पातळी त्यांना कधींहि प्राप्त झाली नव्हती. या संकुचित क्रांतीचे सूत्रधार कांहीं दरबारी लोकच असत आणि कितीहि कडव्या सुधारणा केल्या तरी जनतेचें शोषण करण्याचे सर्व मार्ग ते कायमच ठेवीत असत. त्यांच्या या धंद्याला कधींहि ते बाध आणीत नसत. शासनसंस्था ही एक गूढ वस्तु असून तिचें स्वरूप यांच्या खेरीज कोणालाहि कळणार नाहीं असा गैरसमज जनतेंत पसर-विण्याची ते काळजी घेत. राष्ट्राचा व्यवहार चालविण्यासाठीं सामाजिकतेच्या तत्त्वांवर स्थापन होणारी समिति म्हणजे शासनसंस्था ही साधी सोपी गोष्ट लोकांच्या दृष्टीआड ठेवण्याचा ते हेतुपुरस्सर प्रयत्न करीत.

कोणताहि सुसंस्कृत समाज स्वतःच्या संरक्षणाची आणि शासनाची सर्व जबाबदारी स्वतंत्रपणें पेलूं शकतो हें दाखविण्याचा मीं येथवर प्रयत्न केला. आतां जुन्या शासनसंस्थांचें आचरण व तत्त्वें यांचें परीक्षण करून त्यांत कितपत मेळ असतो हें पाहूं.

## जुन्या व नव्या राज्यपद्धतींविषयीं

जुन्या शासनसंस्था ज्या तत्त्वांवर अधिष्ठित असतात तीं तत्वें समाजकल्या-णाच्या ध्येयाशीं सर्वस्वी विसंगत आहेत. जुन्या शासनसंस्थांना सत्ता हवी असते ती आपला स्वार्थ साधण्यासाठीं. उलट प्रातिनिधिक शासनसंस्थाहि लोककल्याणाच्या दिशेनें आपली वाटचाल करीत असतात. जुन्या शासनसंस्था आपली पोतडी भरण्यासाठीं युद्धें पेटवितात. याच्या उलट राष्ट्राची समृद्धि वाढविण्याचा शान्तता हा एकमेव मार्ग आहे हें जाणून नव्या शासनसंस्था शान्ततेची प्रस्थापना हेंच आपलें उद्दिष्ट मानतात. जुन्या शासनसंस्था राष्ट्राराष्ट्रांतील पूर्वग्रह आणि कलह यांची वाढ कशी होईल आणि हें आपल्या पथ्यावर कसें पडेल हें पाहात असतात. याच्या उलट नव्या शासनसंस्था जागतिक स्नेहसंबंधाचें साधन म्हणून एक विशाल मानवी समाज स्थापन करण्याची धडपड करीत असतात. जुन्या शासनसंस्था लोकांकडून उकळलेला कर ही आपल्या समृद्धीची खूण मानतात. याच्या उलट नव्या शासनसंस्था कमींत कमी कर आकारण्यांतच आपला मोठेपणा आहे असें मानतात.

बर्कनें एके ठिकाणीं व्हिग् पक्षांतील नव्या जुन्याचा उल्लेख केला आहे. अशा

तऱ्हेचीं पोरकट नांवें देऊन, आणि उथळ बाह्य भेद मानून बर्कचें समाधान होत असेल तर होवो बापडें ! हें प्रकरण लिहिण्याचा खटाटोप ॲबेसिएस् याच्या कांहीं मुद्यांना उत्तर देण्यासाठीं म्हणून मी करीत आहे. राजसत्ताक शासनसंस्थेचें नेमकें स्वरूप काय असतें या विषयाची सिएसशीं चर्चा करण्यास मी बांधला गेलों आहे. ही चर्चा करीत असतानां जुन्या आणि नव्या शासनसंस्था यांची तुल्ना अपरिहार्य असल्यामुळें त्या विषयांचें माझें कांहीं विचार सादर करण्याचें मी संधि घेणार आहे. अधून मधून मी बर्कचा उल्लेख करीन.

नवी शासनसंस्था ही अत्यंत मूलभूत आणि आद्य अशा मानवी हक्कांवर उभी असल्यामुळें ती खरें म्हणजे सर्वांत जुनी आहे.

परंतु असें असलें तरी जुल्म आणि दडपशाही यांनीं गेलीं कित्येक शतकें मानवी हक्कांची गळचेपी केली होती. आणि म्हणूनच नवी शासनसंस्था ही खऱ्या अर्थानें सर्वांत जुनी असली तरी ती व जुलुमी शासनसंस्था यांतील फरक कळण्याच्या दृष्टीनें आपण तिला नवी शासनसंस्था असेंच संबोधूं.

या दोन प्रकारच्या शासनसंस्थांतील सर्वांत महत्त्वाचा फरक असा कीं जुनी शासनसंस्था आनुवंशिक राजसत्ता मानते, तर नवी शासनसंस्था मानीत नाहीं. नवी शासनसंस्था आनुवंशिक राजसत्ता दोन कारणांसाठीं मानीत नाहींत. एक म्हणजे अशी सत्ता मानवावर लादली जाते; आणि दुसरें म्हणजे ज्या उद्दिष्टांसाठीं शासनसंस्था तीं उद्दिष्टें आनुवंशिक राजसत्ताक मुळींच साधूं शकत नाहीं.

आतां आपण यांतील पहिल्या कारणाकडे वळूं. आनुवंशिक राजसत्ताक कोणत्या अधिकाराच्या बळावर स्थापन होतें हें सांगणें शक्य नाहीं. कारण कोणत्याहि माणसाला पुढील पिढींतल्या माणसाचें हक्क हिरावून घेण्याचा अधिकार नसल्यानें आनुवंशिक राजसत्ताकाला तो मान्यता देऊं शकत नाहीं आणि म्हणूनच कोणत्याहि मर्त्य मानवाच्या अधिकारकक्षेबाहेरील ही गोष्ट आहे. क्षणभर जरी असें धरून चाललें कीं आपल्या मृत्यूनंतर पुढल्या पिढीऐवजीं आपणच जन्म घेणार आहोंत तरी आपल्याला देखील आपले स्वतःचे हक्क हिरावून घेण्याचा अधिकार नाहीं. मग भावी पिढ्यांचें हक्क कोणत्या बळावर हिरावून घेणार ?

आनुवंशिक राजसत्ताकांत दडपशाही स्वभावतःच असते. अशा शासनसंस्थेला आनुवंशिक सिंहासन म्हणा, आनुवंशिक राजमुकुट म्हणा किंवा दुसरें कसलेंहि गोंडस नांव द्या. या शासन संस्था माणूस ही आपली आवनुंशिक मालमत्ता आहे

असेंच मानीत असतात हें उघड सत्य आहे. आणि म्हणूनच आनुवंशिक आधारानें राज्य मिळणें याचाच अर्थ शेळ्यामेंढ्यांचा कळप जसा आनुवंशिक मालमत्ता म्हणून प्राप्त होतो तसा माणसांचा कळप प्राप्त होणें हाच होय.

आतां दुसऱ्या कारणाकडे वळूं. आनुवंशिक राजसत्ताक शासनसंस्थेचें मूलभूत उद्दिष्ट साधूं शकत नाहीं असा हा मुद्दा होता. या विधानाची सत्यासत्यता ठरविण्यासाठीं शासनसंस्थेचें रास्त स्वरूप कोणतें असावें हें ठरवून आपण आनुवंशिक राजसत्ताकाशीं त्याची तुलना करूं. कोणतीहि शासनसंस्था कार्यकुशल आणि परिपक्व असावी अशी अपेक्षा असते. व्यक्तिजीवनांत अपघातांसारख्या अनेक अनपेक्षित घटना घडत असतात. उत्तम शासनसंस्थेचा पाया अस्थिर असतां कामा नये. परंतु आनुवंशिक राजसत्ताकाचा व्यक्तिजीवनाप्रमाणें अस्थिरता व अनपेक्षितता हा पाया असतो आणि म्हणूनच ही शासनसंस्था अत्यंत सदोष आणि अपूर्ण आहे असें म्हणणें भाग पडतें.

मूलभूत मानवी हक्कांना मान्यता देणें म्हणजे सब घोडे बारा टक्के हा अजब न्याय स्वीकारण्यासारखें आहे अशी टीका आपल्या कानांवरून गेलेली आहे. खरें म्हणजे ही टीका आनुवंशिक राजसत्ताकाला यथार्थतेनें लागू होते. कारण राजा सद्गुणी असो वा दुर्गुणी असो, प्रज्ञावंत असो वा मठ्ठ असो, सज्जन असो वा दुर्जन असो तो वंद्यच आहे असें मानीत असल्यामुळें बरें आणि वाईट एकाच पंक्तीला आणून बसविण्याचा मूर्खपणा होत नाहीं काय? एका राजाच्या मागून दुसरा राजा गादीवर येतो तो सुबुद्ध मनुष्य नव्हे तर एक प्राणी म्हणून. या प्रकारांत त्याच्या व्यक्तित्वाचें स्वरूप समजणेंच शक्य नसतें.

म्हणूनच ज्या देशांत अशा तऱ्हेची सुलतानशाही आहे तेथें माणसांची मनें गुलामी वृत्तीनें वांकलेलीं आढळलीं तर त्यांत आश्चर्य तें कसलें? आनुवंशिक राजसत्ताकाला निश्चित असें कसलेंच स्वरूप नसतें. जी व्यक्ति गादीवर येईल तिच्या लहरीप्रमाणें आणि वृत्तीप्रमाणें राज्य चालवयाचें आणि म्हणूनच अशी शासनसंस्था व्यक्तिजीवनांतील अनपेक्षितता आणि विकारवशता यांनीं ग्रासली गेली असल्यास नवल काय? मनुष्य म्हातारा झाला कीं त्याचें बालपण त्याला पुन्हां भेटतें असें म्हणतात. त्याचे पाय चालतांना लटपट कापूं लागतात, सर्व तऱ्हेचा पोरकटपणा तो करूं लागतो, त्याची काळजी घेण्यासाठीं दुसरा कोणी तरी मनुष्य लागतो, कुबड्यांचा आधार घेतल्याशिवाय तो चालूं शकत नाहीं. म्हणजे

निसर्गाची सर्व व्यवस्थाच येथें उलटीपालटी होत असते. आनुवंशिक राजसत्ताकाची अशीच गत होते. प्रौढ आणि सुजाण माणसावर राज्य करण्यासाठीं कधीं कधीं एखादें शेंबडें पोर येऊन बसतें तर कधीं अनुभव आणि प्रज्ञा यांच्यावर अज्ञानांतून निर्माण होणाऱ्या दांभिकतेची शिरजोरी सुरू होते. तात्पर्य, आनुवंशिक राजसत्ताकासारखी अत्यंत हास्यास्पद शासनसंस्था शोधूनहि सांपडणार नाहीं.

समजा, स्वर्गात देवांनीं असा कायदा केला कीं प्रज्ञा आणि सद्गुण या मानवाला आनुवंशिकतेनें प्राप्त होतील. स्वर्गात केलेला असा एकादा कायदा जर मानवाला कळला तर आनुवंशिक राजसत्ताकाच्या विरुद्ध त्याच्या मनांत एकहि आक्षेप उरणार नाहीं. परंतु निसर्गाचा अशा क्रमाला विरोध असल्याचें माणसाच्या डोळ्यांना ढळढळींत दिसत असतांना तो आनुवंशिक राजसत्ताकाची भलावण कशी करूं शकेल ? जगांतल्या बऱ्याचशा राजांची बुद्धि अति सामान्य असल्याचें माणसांना दिसत आहे. एक राजा अरेरावी असतो; दुसरा मूर्ख असतो, तिसरा शुद्ध वेडा असतो, तर चवथ्यांत तिन्ही गोष्टी एकवटलेल्या दिसतात. खरोखरीच, माणसाचा विवेक जोंवर थाऱ्यावर आहे तोंवर आनुवंशिक राजसत्ताकाला तो कधींहि मान्यता देऊं शकणार नाहीं.

खरें म्हणजे ॲबेसिएस याच्या विधानांना उत्तर देण्यासाठीं म्हणून मला या युक्तिवादाचा आश्रय करण्याची आवश्यकता नाहीं. कारण त्यानें मला जें काय म्हणावयाचें आहे तें आधींच मान्य करून टाकलें आहे. ॲबेसिएस म्हणतो, "मला जर कोणी विचारलें कीं आनुवंशिक मालमत्तेप्रमाणें प्राप्त होणाऱ्या राजसत्तेविषयीं तुमचें मत काय, तर मी तात्काळ उत्तर देईन कीं कोणालाहि अधिकार आनुवंशिक मालमत्तेप्रमाणें प्रदान करणें हें प्रातिनिधित्वाच्या सिद्धान्ताला सोडून आहे. अशा तऱ्हेनें आनुवंशिक हक्क देणें म्हणजे लोकशाहीच्या तत्त्वावर आणि पर्यायानें समाजावर जुलूम आहे. परंतु हें जरी खरें असलें तरी निवडलेला राजा आणि आनुवंशिक परंपरेनें आलेला राजा यांची तुलना करून पाहिली असतां परंपरेनें आलेल्या राजापेक्षां निवडलेला राजा अधिक वाईट नाहीं असें म्हणतां येईल काय? इतिहासाचीच अशी साक्ष आहे." निवडलेला राजा आणि आनुवंशिक हक्क म्हणून सिंहासन प्राप्त झालेला राजा यांच्यांत अधिक वाईट कोण याची चर्चा करणें म्हणजे दोघेही मुळांत वाईट आहेत हें मान्य करून चालणेंच होय. या दोघांत अधिक वाईट कोण याविषयीं

ॲबेसियसनें आपलें मत दिलें आहे. परंतु दोन वाईट गोष्टींमध्यें कोणती स्वीकारणार—एक कोणती तरी स्वीकारावीच लागणार असा युक्तिवाद करणें म्हणजे परमेश्वराचा अपमान करणेंच होय. कारण याचा अर्थच असा होतो कीं लोकशाही मूल्यें आणि समज यांच्यावर जुलूम करणाऱ्या या दोन प्रकारच्या दुष्ट शासनसंस्था स्वीकारण्याखेरीज परमेश्वरानें माणसाला दुसरा मार्गच ठेवलेला नाहीं.

आनुवंशिक राजसत्ताकानें जगांत उडविलेला सर्व कहर जरी डोळ्यांआड केला तरी ही सत्ता आनुवंशिक आहे एवढीच गोष्ट तिचें नागरिकांची शासनसंस्था या नात्यानें वैयर्थ्य सिद्ध करण्यास पुरेशी आहे. कर्तृत्व आणि शहाणपणा यांची जिला अत्यंत आवश्यकता आहे अशी एकादी अधिकाराची जागा तुम्ही कोणत्याहि घराण्याला आनुवंशिकतेनें द्याल काय? आणि एकाद्या जागेसाठीं जर शहाणपणा आणि कर्तृत्व यांची आवश्यकता नसेल तर समाजाच्या दृष्टीनें अशी जागा निर्माण करण्याची आवश्यकता नाहीं हें उघडच होतें.

आनुवंशिक अधिकार हा राजसत्तेला लागलेला डाग आहे. राज्यपदावर या तत्त्वानुसार एखादा मूर्ख मनुष्य बसूं शकतो किंवा एकादें मूलहि बसूं शकतें. साधा यंत्रज्ञ होण्यासाठीं थोडीफार कौशल्याची आवश्यकता असते; परंतु राजा होण्यासाठीं कांहींच नको. नुसती माणसाच्या देहाची, म्हणजे श्वासोश्वास करणाऱ्या यंत्राची येथें आवश्यकता आहे. अशा तऱ्हेची अंधश्रद्धा आणखी कांहीं वर्षें टिकेल. परंतु समाजहिताविषयीं जागरूक झालेल्या माणसाच्या जागृत बुद्धीपुढें या दुष्ट तत्त्वज्ञानाचा अधिक काळ टिकाव लागणें शक्य नाहीं.

बर्कला राजाकडून तनखा मिळत असला तरी त्या पैशासाठीं नव्हे तर एक राजकीय सिद्धांत म्हणून त्यानें राजसत्ताकाला पाठिंबा दिला आहे असें मी मानतों. बर्क राजसत्तेला मान्यता देतांना स्वाभाविकपणेंच जनतेला तुच्छ लेखतो. उलटपक्षीं जनताहि बर्कविषयीं तिरस्काराची भावना बाळगते. बर्कला असें वाटतें कीं माणसें ही जनावरांच्या कळपाप्रमाणें असतात. लबाड्या, कुटिलता आणि सामर्थ्याचें प्रदर्शन यांच्या जोरावर माणसावर सहज राज्य करतां येतें. बर्कच्या मतें राजाच्या ऐवजीं माणसाची आकृति असलेली एखादी रेखीव मूर्ति आणून ठेवली तरी देखील राज्य चालू शकेल. अमेरिकेच्या बाबतींत त्यानें या बाबतींत प्रशंसोद्गार काढले आहेत हें कबूल केलें पाहिजे. बर्क अमेरिकन जनतेविषयीं असें म्हणाला कीं—निदान माझ्या कानावर तसें आलें आहे—अमेरिकें-

तील जनता इंग्लंडमधील प्रजेहून अधिक सुजाण आहे आणि म्हणून सामर्थ्याचें प्रदर्शन करण्याची तेथील शासनसंस्थेला आवश्यकता नाहीं.

निवडलेला राजा आणि आनुवंशिक अधिकारानें राज्य करणारा राजा यांच्यांत ॲबेनें केलेली तुलना आमच्या मतें निरर्थक आहे. कारण प्रातिनिधिक लोकसत्ताक वरील दोन्ही प्रकारच्या शासन संस्था टाकाऊ ठरविते. परंतु मला अशा प्रकारची तुलना करावयाचीच असली तर ॲबेच्या अगदीं विरुद्ध दिशेनें मला ती करावी लागेल.

आनुवंशिक राजसत्ताकांत जेवढ्या अंतर्गत यादव्या आजवर माजल्या तेवढ्या निवडणुकीनें राज्य करणाऱ्या देशांत झालेल्या नाहींत. फ्रान्समध्यें झालेली सर्व अंतर्गत युद्धें आनुवंशिक राजसत्तेच्या पद्धतीमुळेंच झालीं. गादीवर हक्क कोणाचा याच्यावरून तरी या मारामाऱ्या झाल्या किंवा राजा वृद्ध असल्यामुळें अथवा लहान मूल गादीवर बसल्यामुळें, म्हणजेच आनुवंशिक राजसत्ताकाच्या पद्धतींतील या अपरिहार्य दोषांमुळें हे बखेडे माजले.

इंग्लंडचा सर्व इतिहास अशा अंतर्गत यादवीनें भरलेला आहे. गादी मिळविण्यासाठीं यॉर्क आणि लॅनकॅस्टर या घराण्यांत जवळ जवळ शंभर वर्षें तरी कलह चालला होता. अशाच तऱ्हेची यादवी नंतरच्या काळांतहि पुनः पुनः पेटत होतीच. १७१५ आणि १७४५ या सालीं घडलेल्या युद्धांचें मूळहि हेंच आहे. स्पेनच्या गादीसाठीं पेटलेला युद्धाचा वणवा जवळ जवळ अर्ध्या युरोपखंडांत पसरला. हॉलंडमधल्या सर्व मारामाऱ्या जमीनदारीच्या आनुवंशिक हक्कांतूनच निर्माण झाल्या. आनुवंशिक राजसत्ता मानूनहि स्वतःला स्वतंत्र म्हणविणारी शासनसंस्था मसांत रुतलेल्या कांट्यासारखीं असते. या कांट्यामुळें सुजलेला-पिकलेला भागच तो कांटा बाहेर टाकण्याचा सारखा प्रयत्न करीत असतो.

अंतर्गत यादवीच काय परंतु राष्ट्राराष्ट्रांत पेटणारीं युद्धें देखील राज्यपदाच्या या आनुवंशिक हक्कांमुळेंच पेटतात असें मला थोडें पुढें जाऊन म्हणावयाचें आहे. राजसत्तेला आनुवंशिक हक्काची जोड मिळाली म्हणजे एखाद्या विशिष्ट कुटुंबाचें मतलबी हितसंबंध स्थाईक बनतात आणि मग जनतेवर वर्चस्व गाजविणें आणि त्यांच्याकडून शक्य तेवढा पैसा उकळणें हेंच या कुटुंबाचें उद्दिष्ट होऊन बसतें. पोलंडमधें लोकानुमतें राजाची निवड होत असल्यामुळें ज्या देशांत आनुवंशिक राजसत्ता आहे त्या देशांपेक्षां पोलंडमधें युद्धें किती तरी कमी झालीं आहेत.

अशा तऱ्हेनें जुन्या किंवा आनुवंशिक राजसत्ताकाचें थोडेफार दोष पाहिल्या-नंतर आतां आपण त्याची तुलना प्रातिनिधिक लोकसत्ताकाशीं करून पाहूं.

प्रातिनिधिक लोकसत्ताक समाज आणि संस्कृति यांनाच आपला पाया मानते त्याचप्रमाणें निसर्ग, विवेक, आणि अनुभव यांच्या मार्गदर्शनाखालीं ही शासनसंस्था वाटचाल करते.

मानसिक किंवा बौद्धिक शक्ति देण्याच्या बाबतींत निसर्ग समानतेचें तत्त्व पाळीत नाहीं हा माणसाचा अनुभव आहे. प्रज्ञेचें देणें आपल्या लहरीनुसारच निसर्ग देत असतो. कोणत्या नियमानुसार निसर्ग हें दान माणसाला देतो हें एक मानवी बुद्धीला न कळलेलें गूढच आहे. म्हणूनच सौंदर्याच्या बाबतींत आनुवंशिक हक्काचें तत्त्व लावणें जितकें मूर्खपणाचें होईल तितकेंच प्रज्ञेच्या बाबतींत तें होईल. प्रज्ञा ही एकाद्या बिनवियाच्या झाडाप्रमाणें आहे. हें झाड उगवलें म्हणजे त्याचें संगोपन करतां येईल. परंतु आपल्या इच्छेला येईल त्याप्रमाणें तें लावतां येणार नाहीं. समाजाचें सर्व व्यवहार चालण्याच्या दृष्टीनें आवश्यक तेवढी प्रज्ञा समाजांत कोठें ना कोठें असतेच. परंतु ही प्रज्ञा समाजाच्या नेमकी कोणत्या थरांत आढळेल हें सांगणें मात्र कठीण आहे. कारण आपलें निवासस्थान ती नित्य बदलीत असते. आज ती एकाच्या ठायीं उदित झालेली दिसेल तर उद्यां ती तिसऱ्याच ठिकाणीं झळकेल. प्रत्येक कुटुंबाला कधीं ना कधीं तिनें भेट दिलेली असते परंतु कायमची ती मात्र कोठेंहि राहिलेली नाहीं.

असा हा निसर्गाचा नियमच असल्यामुळें तो शासनसंस्थेनें अपरिहार्यपणें पाळलाच पाहिजे. जर या नियमाचें पालन झालें नाहीं तर अज्ञानाच्या गर्तेत शासनसंस्थेचा अधःपात झालाच म्हणून समजावें. म्हणूनच आनुवंशिक राजसत्ता-काची कल्पना मानवी प्रज्ञेशीं आणि हक्काशीं संपूर्णतया विसंवादी आहे. ती जितकी अन्याय्य आहे तितकीच ती मूर्खपणाची आहे.

ज्याप्रमाणें देशांतील विद्वत् सभा प्रातिभावंतांना उत्तेजन आणि विविध संधि देऊन उत्तम वाङ्मय निर्माण करण्यास हातभार लावते त्याप्रमाणें प्रातिनिधिक शासनसंस्था देशांत सर्वत्र विखुरलेलें शहाणपण एकत्र करून उत्तम कायदे निर्माण करते. वाङ्मय आणि विज्ञान यांचीं देणगी आनुवंशिक आहे असें जर धरून चाललें तर त्यांचा कोण अधःपात होईल हा विचार मनांत येतांच मला हसूं येते. आनुवंशिक राजसत्तेविषयीं मला हेंच म्हणावयाचें आहे. आनुवंशिक

लेखनप्रतिभा ही गोष्ट जशी सत्याला सोडून आहे तशीच आनुवंशिक राजसत्ता ही देखील आहे. होमर किंवा युक्लिड यांना मुलगे होते कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. परंतु त्यांना जरी मुलगे असते तरी त्यांचे मुलगे आपल्या बापाचें अपुरें राहिलेलें कार्य पुरें करूं शकले असते असें वाटत नाहीं. जगांतल्या प्रत्येक क्षेत्रांतील प्रसिद्ध पुरुषांची मुलें पाहिलीं म्हणजे आनुवंशिक राजसत्तेची कल्पना हास्यास्पद आहे हें सिद्ध करण्यासाठीं दुसरा कसलाहि पुरावा शोधावयास नको. हिऱ्याच्या पोटीं गारगोटी आली नाहीं असें क्वचितच घडतें. याचा अर्थच असा कीं प्रज्ञेचा प्रवाह एका विशिष्ट व्यक्तित्वाच्या मार्गानें वाहात जातो. परंतु त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर हा प्रवाह आपला मार्ग बदलून भलतीकडेच उगवतो. असें असतांना ज्याच्याकडे प्रज्ञेनें संपूर्णपणें पाठ फिरविली आहे अशा व्यक्तीला केवळ आनुवंशिक हक्क म्हणून राजसत्ता देणें निर्बुद्धपणाचें नाहीं काय? हें तत्त्व आंधळेपणानें मान्य करावयाचें म्हटल्यास माणसांना कायमचा आत्मद्रोह पत्करून ज्या व्यक्तीला साधा शिपाई म्हणून ते नेमणार नाहींत तिला राजाच्या आसनावर बसविणें भाग पडेल.

क्रान्ति प्रतिभावन्तांचा आणि बुद्धिवान् लोकांचा एक वर्गच निर्माण करते असें दिसतें. परंतु सत्य हें आहे कीं क्रान्ति हा प्रज्ञावन्तांचा वर्ग निर्माण करीत नसून त्याला फक्त पुढें आणण्याचें काम करीत असते. माणसांत अनेक गुण आणि सामर्थ्य सुप्तवस्थेंत असतात. हें सामर्थ्य जागृत करून व्यक्त करणारी परिस्थिति जर निर्माण झाली नाहीं तर त्या माणसाबरोबर त्या सुप्त सामर्थ्यांचा शेवट होण्याचा संभव असतो. माणसामधल्या सर्व सुप्तासुप्त शक्ति व्यक्त झाल्या तरच समाज प्रगतिपथावर राहातो आणि म्हणूनच क्रांतिकालांत अपरिहार्यपणें व्यक्त होणारे माणसाचे सुप्त गुण व्यक्त होऊन वाढीला कसे लागतील हें पाहाणें हें शासनसंस्थेचें कर्तव्य ठरतें आणि म्हणून या दृष्टीनेंच शासनसंस्थेचें स्वरूप ठरविलें पाहिजे. आनुवंशिक राजसत्ताकांत या सुप्त गुणांना उत्तेजन देण्याचें सामर्थ्य नाहीं. नव्हे, या गुणांच्या गळ्याला नख कसें लागेल हेंच ही सुलतानशाही पाहात असते आणि म्हणूनच आनुवंशिक राजसत्तेसारख्या राजकीय अंधश्रद्धांनीं जर राष्ट्राचें मन पोखरलें गेलें तर त्याच्या सर्व सुप्त शक्तींचा ऱ्हास हा निश्चित ठरलाच म्हणून समजा.

राजा शहाणा असो वा मूर्ख असो त्याच्या आज्ञेचें पालन लोकांनीं केलेंच

पाहिजे अशी आनुवंशिक राजसत्ताकाची भूमिका. माणसांचीं मनं अशी आंधळी अशरणता पत्करूं लागली तर त्यांच सगळा पुरुषार्थ क्षीण बनेल. माणसाची महत्ता लहान सहान गोष्टींतच खरी उठून दिसते, परंतु साध्या विषयांतला हा मोठेपणा दिसण्यासाठीं लागणारी अंतर्मुख वृत्तीच नाहींशी करून आनुवंशिक राजसत्ता आत्मद्रोह पत्करीत असते.

जुन्या शासनसंस्थांचा हा इतिहास मानवजातीचें असें असहाय्यपणें केविलवाणें चित्र डोळ्यापुढें उभें करतो. परंतु जुन्या काळांतहि जिच्याविषयीं आदर वाटावा अशी एक राज्यव्यवस्था होती आणि ती म्हणजे अथीनिअन लोकांचें लोकराज्य. या राज्यव्यवस्थेंत दोषांपेक्षांही कौतुकास्पद गुणांचाच भाग अधिक होता.

शासन संस्थेच्या घटकतत्वांचें वर्म याचें ज्ञान अत्यंत तुटपुंजें असल्यामुळें नवी प्रातिनिधिक शासनसंस्था आणि प्राचीन लोकराज्यें यांची तो गल्लत करतो. प्रतिनिधित्वाचें तत्त्व प्राचीन लोकराज्यांत राहाणाऱ्या लोकांना ठाऊक नव्हतें. त्या काळीं कांहीं माणसें एकत्र जमत आणि हे कायदे करतों असें म्हणून हा लोकसमुदाय असे कायदे पुकारी. प्राचीनांच्या राज्यव्यवस्थेचें प्रतीक म्हणजे ही प्राथमिक स्वरूपाची लोकशाही. शासनसंस्थेचा घाट कोणता असावा व कोणतीं तत्त्वें तिच्यांत अंतर्भूत असावीं याची सूचना या प्राचीन लोकराज्यांत मिळते. या लोकराज्याची लोकसंख्या जसजशी वाढूं लागली, सरहद्दीच्या कक्षा विस्तार पावूं लागल्या तसतसें लोकव्यवहार चालविण्याच्या दृष्टीनें लोकशाहीचें हें प्राथमिक स्वरूप अपुरें पडूं लागलें आणि त्या काळीं प्रतिनिधित्वाची पद्धति लोकांना ठाऊक नसल्यामुळें परस्परांतील संघर्षांतून राजसत्ताकें निर्माण झालीं किंवा तीं लोकराज्यें त्या काळीं असलेल्या कोणत्या तरी राजसत्ताकांत विलीन झालीं.

आजच्याप्रमाणें प्रतिनिधित्वाचा मार्ग त्या काळीं जर लोकांना सुचला असता तर अमीरशाही आणि राजशाही शासनसंस्था अस्तित्वांत आल्या असत्या असें वाटत नाहीं. लोकसंख्या भरमसाट वाढल्यानंतर प्राथमिक स्वरूपाच्या लोकशाही शासनसंस्थेला कारभार चालवितां येईना आणि या इतक्या सर्व लोकांचें, सर्व थरांचें एकीकरण करण्याचा मार्ग, त्या वेळच्या लोकांना सांपडेना. त्याचप्रमाणें जगाच्या इतर भागांतील मेंढपाळ आणि गुराखी यांचे समुदाय विस्कळित होते, त्यांच्यांत कसलेंहि संघटन नव्हतें—या सर्व कारणांमुळें राजसत्ताकासारखा शासन-संस्थेचा अनैसर्गिक प्रकार स्थापन होण्यास मदत झाली.

शासनसंस्थेच्या स्वरूपाविषयीं अनेक गैरसमज आणि गोंधळ निर्माण झालेले आहेत. ते सर्व नष्ट करणें आवश्यक आहे. आणि म्हणूनच मी याविषयींच्या पुढील मुद्यांकडे वळतों. राजदरबारांतील धूर्त मुत्सद्दी लोकसत्ताक म्हणजे नेमकें काय हें समजून न घेतां त्याविषयीं अपप्रचार करीत फिरत असतात. तेव्हां लोकसत्ताकाच्या स्वरूपाविषयीं थोडें चिंतन करण्याचा आपण येथें प्रयत्न करूं.

शासनसंस्था चार प्रकारच्या असतात. प्राचीन लोकराज्य, सरदारशाही, सुलतानशाही आणि सध्यांची प्रातिनिधिक शासनसंस्था.

जी शासनसंस्था लोकसत्ताक म्हणून ओळखली जाते ती शासनसंस्थेचा एक वेगळाच प्रकार आहे असें म्हणतां येणार नाहीं. ज्या कांहीं कारणांसाठीं, उद्दिष्टांसाठीं शासनसंस्था अस्तित्वांत येते त्या उद्दिष्टांचें सार लोकसत्ताक या शब्दानें सूचित होतें. लोकसत्ताक याचा अर्थ राष्ट्राचा सार्वजनिक कारभार चालविणारी, सार्वजनिक हित पाहाणारी शासनसंस्था. या शब्दानें शासनसंस्थेचें ध्येय व स्वरूप कोणतें असावें हें स्पष्ट होतें. लोकसत्ताक हा शब्द राजसत्ताक या शब्दाच्या पूर्ण विरुद्ध आहे. राजसत्ताकांत एका व्यक्तीच्या हातीं सत्ता केंद्रित झालेली असून ही सत्ता त्या व्यक्तीच्या स्वार्थासाठीं वापरली जाते—सार्वजनिक हितासाठीं नव्हे.

सार्वजनिक हित हें ज्या शासनसंस्थेचें ध्येय नाहीं ती शासनसंस्था चांगली आहे असें म्हणतां येणार नाहीं. लोकसत्ताक शासनसंस्थेंत प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाची लोकहिताच्या ध्येयाशीं सांगड घातली जाते. वेगवेगळ्या राष्ट्रांतील सरकारें स्वतःस लोकसत्ताकच म्हणवून घेत असतात. पोलंड आपल्याला लोकसत्ताक मानतें परंतु तेथें आनुवंशिक सरदारशाही आहे; फक्त तेथें राजाची निवड केली जाते. हॉलंडदेखील आपल्याला लोकसत्ताक म्हणवून घेतें. परंतु तेथें आनुवंशिक जमिनदारी आहे—हा सरदारशाहीचाच प्रकार.

शुद्ध स्वरूपाचें लोकसत्ताक म्हणून अमेरिकेकडेच बोट दाखवावें लागेल. लोकहिताशिवाय आणि सार्वजनिक कारभाराशिवाय अमेरिकेच्या शासनसंस्थेपुढें दुसरें उद्दिष्टच नसल्यामुळें ती खऱ्या अर्थानें लोकसत्ताक ह्या विधानास पात्र होईल. आनुवंशिक हक्क म्हणून सत्ता देणारे शासनसंस्थेचे सर्व प्रकार अमेरिकेनें रद्द ठरविले आहेत आणि प्रातिनिधित्वाच्या तत्त्वावरच सरकार स्थापन केलें आहे.

कांही लोकांचा आक्षेप असा आहे कीं प्रचंड लोकसंख्या असलेल्या मोठमोठ्या देशांना लोकसत्ताक हा शासनसंस्थेचा प्रकार सोईचा नाहीं. हा आक्षेप घेणाऱ्यांनीं

शासनसंस्थेचें कार्य आणि प्रकार यांची गल्लत केलेली आहे. कारण लोकसंख्या कितीहि असो सार्वजनिक हित हें शासनसंस्थेचें उद्दिष्ट बदलूं शकत नाहीं. मोठी लोकसंख्या असलेल्या देशांना लोकसत्ताक हा शासनसंस्थेचा प्रकार म्हणून सोईचा नाहीं असें जर या आक्षेपकांचें म्हणणें असेल तर त्यांच्या डोक्यांत प्रतिनिधित्वाचें तत्त्व नसलेलें प्राचीन लोकराज्य असलें पाहिजे. मोठ्या लोकसंख्येच्या देशांना लोकसत्ताक शासनसंस्था सोईची होणार नाहीं हें म्हणणें बरोबर नाहीं तर प्राथमिक स्वरूपाची लोकशाही मोठ्या लोकसंख्येचा कारभार पाहाण्यास अपुरी आहे हें सत्य आहे. आणि म्हणूनच खरा प्रश्न उपस्थित होतो तो हा कीं मोठी लोकसंख्या असलेल्या देशांत सार्वजनिक हित साधण्याच्या दृष्टीनें कोणत्या प्रकारची शासनसंस्था स्थापन करावी? राजसत्ताक शासन हें या प्रश्नाचे उत्तर होऊं शकत नाहीं कारण प्राथमिक स्वरूपाच्या लोकशाहीप्रमाणें तिच्यावरहि आक्षेप घेतां येतील.

केवढ्याहि मोठ्या विभागाचा कारभार चालविणारी शासनसंस्था एका विशिष्ट तत्त्वावर आधारून एकादी व्यक्ति स्थापन करूं शकेल. ही शासनसंस्था कितीहि चांगली झाली तरी ती एकतंत्रीच राहील. शेतकी, कारखाने, व्यापार इत्यादि राष्ट्रांतील सर्व क्षेत्रांचा व्यवहार चालविण्याच्या दृष्टीनें त्या राष्ट्राच्या सर्व विभागांचें ज्ञान केंद्र सरकारला असणें आवश्यक आहे. अशा तऱ्हेचें ज्ञान राष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागांतून आलेल्या प्रतिनिधींतर्फे मिळूं शकेल. एका व्यक्तीला हें सर्व ज्ञान असणें शक्य नाहीं. म्हणूनच प्रचंड लोकसंख्येच्या देशांत राजसत्ताक आणि प्रतिनिधित्वाचें तत्त्व नसलेली लोकशाही या दोन्ही प्रकारच्या शासनसंस्था निरुपयोगी ठरतात. हे दोन्ही प्रकार सारखेच गैरसोईचे असल्यामुळें एकमेकांचे पर्याय कधींहि होऊं शकत नाहींत.

या राजसत्ताकाला आनुवंशिक हक्काची जोड दिली म्हणजे आधींच उल्हास आणि त्यांत फाल्गुन मास असा प्रकार होतो. लोकशाही तत्त्वांची बूज राखणारी कोणतीहि व्यक्ति एकाद्या मूर्ख माणसाला किंवा अज्ञान पोराला आपल्यावर राज्य करूं कसें देईल? आनुवंशिक राजसत्ताकांत तर हेंच गृहीत असल्यामुळें अशी शासनसंस्था म्हणजे माणसाच्या बुद्धीचा अपमान आहे असेंच म्हणावें लागेल. सरदारशाहींत घरील सुलतानशाहीचे सर्व दोष आहेत. फरक एवढाच कीं सरदारशाहींत राजाची निवड केली जाते. प्राचीन काळांतील प्राथमिक लोकशाहीवरून प्रचंड लोकसंख्येच्या देशांत कोणत्या प्रकारची शासनसंस्था असावी याचा अंदाज बांधतां येतो.

राजसत्ताक आणि सरदारशाही या लोकहिताच्या दृष्टीनें सार्वजनिक कारभार चालविण्यास नालायक असल्यामुळें त्यांचा त्याग करणें अपरिहार्य ठरतें. पूर्वीची प्राथमिक स्वरुपाची लोकशाही प्रतिनिधित्वाची सोय नसल्यामुळें लंगडी पडत होती हें आपण पाहिलें. या शासनसंस्थेला प्रतिनिधित्वाची जोड दिली म्हणजे ती निर्दोष बनते. प्राथमिक लोकशाहींत समाज स्वतःचें नियंत्रण करीत असतो. या लोकशाहीवर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाचें कलम केल्यानें राष्ट्रांतील सर्व विभागांचें हित पहाणारी अशी शासनसंस्था तयार होते. आनुवंशिक हक्कानें निर्माण होणाऱ्या वाङ्मयापेक्षां लोकसत्ताकांतील विद्वत् सभेनें उत्तेजन दिल्यामुळें निर्माण होणारें वाङ्मय जसें अनन्त पटींनीं श्रेष्ठ असतें त्याप्रमाणेंच प्रातिनिधिक लोक-सत्ताक हें आनुवंशिक राजसत्ताकापेक्षां श्रेष्ठ आहे.

याच तत्त्वावर अमेरिकेनें आपली शासनसंस्था उभारली आहे. प्राचीन लोक-शाहीवर अमेरिकेनें प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाचें नवें कलम केलें आहे. ॲथेन्समधें जें बीजरुपानें होतें त्याचा आज अमेरिकेंत महान् वृक्ष झाला आहे. ॲथेन्समधील लोकराज्य हा प्राचीन जगाच्या कौतुकाचा विषय होता; अमेरिकेंतील लोकसत्ताक हा आधुनिक जगाच्या कौतुकाचा आणि आदराचा विषय होऊन बसला आहे. या लोकसत्तातासारखी व्यवहार्य आणि समजावयास सोपी अशी दुसरी शासनसंस्था नाहीं. राजसत्ताकांतर्गत असुरक्षितता आणि अज्ञान आणि प्राचीन लोकशाहींतील गैरसोय या तीनहि गोष्टी टाळून लोकसत्ताक शासनसंस्था समर्थपणें उभी आहे. फ्रान्सचें लोकसत्ताक हा या महान् राज्यपद्धतींतील एक टप्पा आहे. सर्व प्रकारच्या परिस्थितीला अशा तऱ्हेचें लोकसत्ताक तोंड देऊं शकतें. कमी लोकसंख्या असलेल्या प्रदेशांतसुद्धां जुन्या पद्धतीच्या लोकशाहीपेक्षां हें प्रातिनिधिक लोकसत्ताक अधिक सोईचें आहे. ॲथेन्समधल्या जनतेला जर प्रतिनिधित्वाचें तत्त्व अवगत झालें असतें तर त्यांच्या लोकशाहीच्या मर्यादांचें कुंपण त्यांनीं कधींच ओलांडलें असतें.

जिला आपण शासनसंस्था असें म्हणतों किंवा जिला शासनसंस्था म्हटलें पाहिजे ती अशी एक व्यवस्था आहे कीं जेथें समाजांतील सर्व विभाग एकत्र येऊं शकतात. शासनसंस्थेचें उद्दिष्ट साधण्याच्या दृष्टीनें प्रातिनिधिक लोकसत्ताका-सारखी राष्ट्रांतील सर्व विभागांना एकत्र आणणारी व सर्वांचे हितसंबंध सांभाळणारी दुसरी राज्यव्यवस्था नाहीं. राष्ट्राच्या सर्व घटकांचें विभागशः तसेंच सर्व राष्ट्राचें

संपूर्ण ज्ञान मध्यवर्ती केंद्राशीं लोकसत्ताकांत निगडित झालेलें असतें. त्यामुळें लोकसत्ताक शासनसंस्था ही नेहमींच अत्यंत सामर्थ्यशाली राहाते. पोरवयांतील अपरिपक्वता आणि वार्धक्यांतील दुर्बलता या दोन्ही गोष्टी लोकसत्ताकाच्या आसपास फिरकत नाहींत. लोकसत्ताक शासनसंस्था जशी कधीं पाळण्यांतहि नसतें तशी ती कधीं कुबड्या लावूनहि चालत नाहीं. ज्ञान आणि सामर्थ्य यांच्यांत ही अभेद राखते. व्यक्ति जीवनांत घडणाऱ्या सर्व अनपेक्षित घटनांच्या ती अतीत असल्यामुळें तिचा पाया मजबूत असतो. आणि म्हणूनच राजसत्ताकापेक्षां ती श्रेष्ठ ठरते.

राष्ट्र म्हणजे काय याची कल्पना एखाद्या व्यक्तीची आकृति डोळ्यांसमोर आणून करतां येणार नाहीं. राष्ट्र हें एखाद्या वर्तुळाप्रमाणें असतें. वर्तुळाच्या सर्व त्रिज्या मध्यबिंदूलाच येऊन मिळत असतात त्याप्रमाणें राष्ट्रांतील प्रतिनिधित्वाच्या सर्व त्रिज्या मध्यवर्ती सत्तेच्या केंद्रबिंदूला मिळतात. हा मध्यवर्ती केंद्रबिंदु प्रतिनिधित्वाचाच बनलेला असतो. प्रतिनिधित्व आणि राजसत्ता यांची सांगड घालणें अगदीं हास्यास्पद आहे. कारण प्रतिनिधित्व म्हणजेच राष्ट्रीय सार्वभौमत्वाचें प्रतीक आहे. हें सार्वभौमत्व असतांना आणखी एक राजा नेमून त्याची विभागणी करणें कसें शक्य आहे ?

बर्कनें पार्लमेंटमधील आपल्या भाषणांत आणि त्याच्या पुस्तकांत दोन तीन वेळां शासनसंस्थेच्या स्वरूपाविषयीं विचार व्यक्त केले आहेत. हे विचार म्हणजे केवळ अर्थशून्य शब्दांचा गोंधळ आहे. बर्क म्हणतो, "राजसत्ता हा शासनसंस्थेचा पाया असावा आणि लोकसत्ता ही त्याचे नियंत्रण करणारी शक्ति असावी. लोकसत्तेचा पाया आणि राजसत्तेचें नियंत्रण असें स्वरूप शासनसंस्थेला प्राप्त होऊं नये." बर्कच्या ह्या विधानाचा असा अर्थ असेल कीं शहाणपणावर मूर्खपणाचें नियंत्रण असण्यापेक्षां मूर्खपणावर शहाणपणाचें नियंत्रण असावें तर त्याला माझें एकच उत्तर आहे कीं हा सर्व खटाटोप करण्यापेक्षां मूर्खपणाचें मुळांतच उच्चाटण करणें हेंच श्रेयस्कर होय.

राजसत्ताक असें म्हणत असतांना बर्कला काय अभिप्रेत असतें ? राजसत्ताकाची तो व्याख्या करील काय ? प्रातिनिधिक लोकसत्ताक याचा अर्थ सर्वांना कळतो. राष्ट्रांतील सर्वांच्या हितसंबंधांचा आणि गुणांचा अशा लोकसत्ताकांत अंतर्भाव झाला पाहिजे हेंहि लोकांना कळतें, परंतु राजसत्ताकांत असें होईलच याचा भरंवसा काय ? किंवा राज्यपदावर एखादें लहानसें पोर बसलें तर राजसत्ताकाकडून शहाण-

पणाची अपेक्षा कशी करणार? या अपरिपक्व पोराला शासनसंस्थेविषयीं काय माहिती असते अशा परिस्थितींत राजा कोण? कुठलें राजसत्ताक? या अल्पवयी राजाच्या ऐवजीं राजपालक कारभार पहातो; पण तें एक विडंबनच असतें. राजपालकत्व हें लोकसत्ताकाचें विडंबन आहे. खरें म्हणजे राजसत्ताकाचेंहि याहून वेगळें वर्णन करतां येणार नाहीं.

शासनसंस्था या पदास आवश्यक असणारें एकहि लक्षण राजसत्ताकांत आढळत नाहीं. एकादा नवा राजा आला म्हणजे राज्यव्यवस्थेंत क्रान्ति होईल असें वाटतें. परंतु त्याच्या छातीवर ताबडतोब राजपालकरूपी प्रतिक्रान्तीचा धोंडा ठेवण्यांत येतो. राजसत्ताक म्हणजे दरबारी लोकांतील अंतर्गत कलह आणि कुटिल कारवाया यांचें हिडीस चित्र असतें. बर्क स्वतः याचेंच एक उदाहरण आहे. राजसत्ता आणि शासनसंस्था यांच्यांत जर विसंवाद नको असेल तर प्रत्येक राजा जन्मतःच प्रौढ माणूस असेल तसेंच सॉलोमन्‌प्रमाणें प्रज्ञावंतहि असेल अशी कांहींतरी सोय करावी लागेल. परंतु अल्पवयी राजा वयांत येऊन राज्य करूं लागेपर्यंत राष्ट्रानें निमूटपणानें वाट पाहावयाची आणि तोपर्यंत शासनसंस्थेंत सांवळागोंधळ चालावयाचा. हा सर्व प्रकारच हास्यास्पद आहे. राजसत्ता ही अत्यंत मूर्खपणाची आणि तिरस्करणीय गोष्ट आहे असें मला नेहमींच वाटत आलें आहे. राजसत्तेविषयीं विचार करतांना माझ्या डोळ्यापुढें एक गंमतीचा प्रसंग उभा रहातो. एका पडद्याच्या मागें कांहींतरी महत्त्वाची वस्तु ठेवण्यांत आली आहे असें सांगण्यांत येतें. पडद्यासमोर बसलेल्या लोकांत त्यामुळें कुतूहल निर्माण होतें; त्यांच्यांत गांभीर्याचें, उत्सुकतेचें वातावरण पसरतें. इतक्यांत पडदा वर होतो आणि या प्रेक्षक समुदायाला त्या पडद्यामागें कांहींच नाहीं असें आढळून येतें आणि मग एकदम हंशा पिकतो. राजसत्तेविषयीं लोकांना वाटणाऱ्या कुतूहलांचें आणि अपेक्षांचें पर्यवसान असेंच होत नाहीं काय?

प्रातिनिधिक लोकसत्ताकांत असा प्रकार घडत नाहीं. लोकसत्ताक शासनसंस्थेंत सर्व राष्ट्राचें चैतन्य सळाळत असतें. जें काय करावयाचें तें लोकसत्ताक शासन-संस्था जगाच्या उघड्या रंगभूमीवर अत्यंत मोकळेपणानें आणि निर्भयपणें करीत असते. तिचे सर्व गुण किंवा दोष लोकांच्या समोर मांडले जातात. कोणत्याहि कपटच्छलाच्या मार्गानें लोकसत्ताक आपलें आसन स्थिर करण्याचा प्रयत्न करीत नाहीं. लोकसत्ताक शासनसंस्था दांभिक भाषेंत बोलत नाहीं. जी भाषा सर्वांना

समजते, जिचा स्पर्श सर्वांच्या अंतःकरणाला होतो अशा भाषेंतच ती बोलते.

राजसत्ताकाचें स्वरूप डोळ्याआड करावयाचें म्हणजे आपल्यामधील विवेकाचे डोळेच मिटावे लागतील; आणि आपल्यांतील समंजसपणाला अधोगतीच्या पातळी-वर आणून बसवावें लागेल. निसर्गाच्या सर्व कृतींत बहुधा सुसंगति आढळून येते परंतु राजसत्ताक शासनसंस्था मात्र सर्व निसर्गतत्वांना हरताळ फांशीत असते. माणसाच्या प्रगतीला ती पायबंद घालते. सुजाण प्रौढावर शेंबड्या पोराला आणि प्रज्ञेवर मूर्खतेला ती राज्य करावयास लावते. याच्या उलट प्रातिनिधिक लोकसत्ताकांत निसर्गनियमांचा कधींहि भंग झालेला दिसत नाहीं. विवेकाच्या सर्व निकषांवर ती टिकून राहाते. उदाहरणार्थ, अमेरिकन संघराज्यांत कॉंग्रेसच्या कोणत्याहि सभासदा-पेक्षां राष्ट्राध्यक्षांच्या हातांत अधिक अधिकार दिलेले असतात आणि म्हणूनच पस्तीस वर्षांच्या आंतल्या मनुष्याची निवड अध्यक्षाच्या जागेसाठीं केली जात नाहीं. पस्तीस वर्षांचा झाल्यावर सर्वसाधारणतः माणसाची बुद्धि परिपक्व होते. जनतेचें हितअहित कळण्याइतका त्याचा अनुभवहि समृद्ध असतो. परंतु आनु-वंशिक राजसत्ताकांत ज्याला कसलाच अनुभव नाहीं अशा अठरा वर्षांच्या पोरालाहि गादीवर बसविलें जातें. याला तुम्ही शहाणपणाचें कृत्य म्हणाल काय? राष्ट्राच्या चारित्र्याला असें करणें शोभतें? अठरा वर्षांच्या पोराला प्रजेचा पिता असें संबोधणें यांत कसलें औचित्य आहे? बाकीच्या सर्व बाबतींत मनुष्य एकवीस वर्षांचा होईपर्यंत कायद्याच्या दृष्टीनें त्याला अज्ञानच समजण्यांत येते. जमिनीचा एक एकर तुकडा, डुकरांचा किंवा मेंढ्यांचा छोटासा कळप यांच्यावर देखील अशा मनुष्याचा कायद्यानें वयांत येईपर्यंत हक्क नसतो. परंतु अशा अज्ञान मुलाच्या हातीं त्याला राजा असें संबोधून सर्व राष्ट्राची मालकी मात्र सोपविण्यांत येते याला काय म्हणावें!

राजसत्ताक हा एक बुडबुडा आहे. जनतेकडून पैसा उकळण्यासाठीं दरबारी मुत्सद्यांनीं लढविलेली ती एक शक्कल आहे. ही गोष्ट राजसत्ताकाकडे कसेंहि पाहिलें तरी सहज कळण्यासारखी आहे. विवेकावर आधारलेल्या प्रातिनिधिक लोकसत्ताक शासनसंस्थेला जनतेला फसवून असा पैसा उकळणें केवळ अशक्य आहे. सरकार ही तशी फारशी खर्चाची संस्था नसते. लोकसत्ताक मूल्यांवर आधारलेल्या अमेरिकेच्या संघराज्याचा—हें राज्य इंग्लंडपेक्षां दहा पटीनें मोठें आहे—फक्त सहाशें हजार डॉलर्स किंवा एकशेंतीस हजार पौंड इतकाच खर्च आहे.

चारित्र्य आणि कर्तृत्व याच्या बाबतींत जनरल वॉशिंग्टनशीं युरोपमधील कोणत्याहि राजाची तुलना बुद्धि ठिकाणावर असलेला मनुष्य करणार नाहीं असें मला वाटतें. परंतु असें असूनहि फ्रान्स आणि इंग्लंड येथें एका अधिकाऱ्यापायीं येणारा खर्च हा अमेरिकन संघराज्याच्या सर्व शासनसंस्थेला येणाऱ्या खर्चापेक्षां आठ पटीनें अधिक असतो. खरोखरीच या गोष्टीची कारणमीमांसा करणें योग्य आहे. फ्रान्स आणि इंग्लंड येथील सर्वसामान्य गरीब वर्गापेक्षां अमेरिकेंतील गरीब लोकांची कर देण्याची शक्ति अधिक आहे. प्रातिनिधिक लोकसत्ताकांत शासनसंस्थेविषयीं सर्व माहिती देशांतील आम जनतेला दिली जाते. त्यामुळें अज्ञानाचें खंडन होतें आणि कोणतीही अन्याय्य गोष्ट आपल्यावर लादून घेण्यास जनता तयार होत नाहीं. परंतु राजदरबारांतील मुत्सद्यांच्या कारवाया अशी भूमिका घेतली तर चालूंच शकणार नाहींत. लोकसत्ताक शासनसंस्थेच्या भोंवतीं कसलेंहि गूढ, रहस्यमय वातावरण कधींहि नसतें. तिच्या सर्व कारभाराविषयींची इत्थंभूत माहिती निवडून येणाऱ्या प्रतिनिधींइतकीच त्यांना निवडून देणाऱ्या जनतेलाहि असते. राज्यकारभाराविषयींची माहिती रहस्यमयतेच्या पडद्याआड ठेवण्याचा प्रकार अमेरिकेंत त्याज्य मानला जातो. शासनसंस्थेजवळ राष्ट्रापासून लपवून ठेवण्याजोगें कांहींहि असतां कामा नये. जर लपवाछपवी करण्याजोगें शासन-संस्थेपाशीं कांहीं असेल तर तो व्यक्तीप्रमाणेंच तिचा दोष समजला पाहिजे. प्रातिनिधिक लोकसत्ताकांत कोणत्याहि निर्णयामागचीं कारणें जनतेसमोर ठेवलीं गेलीं पाहिजेत. शासनसंस्थेवर प्रत्येक व्यक्तीची मालकी असते आणि म्हणूनच तिच्या कारभाराविषयींची सर्व माहिती मिळविणें हें तिचें कर्तव्य ठरतें. शासनसंस्थेच्या कारभाराचा त्याच्या खाजगी मालमत्तेशीं संबंध असल्यामुळें तो आपल्या हितसंबंधाविषयीं अत्यंत जागरूक राहातो. शासनसंस्थेनें किती खर्च केला, त्या खर्चाच्या प्रमाणांत आपल्याला योग्य तो फायदा मिळाला कीं नाहीं याचें तो स्वतः परीक्षण करीत असतो. इतर शासनसंस्थांत नेते जें कांहीं सांगतील तें जनता खरें धरून चालते. परंतु लोकसत्ताकांतील जागरूक नागरिक आपल्या नेत्यांची बौद्धिक गुलामगिरी कधींहि पत्करीत नाहीं.

लोकांच्या विवेकाचे डोळे बांधून शासनसंस्था ही एक गूढ दैवी शक्ति आहे हें त्यांस पटविलें तरच त्यांच्याकडून हवा तसा पैसा उकळतां येतो. सर्व राज-सत्ताकांचें हेंच ध्येय असतें. राजसत्ता ही शासनसंस्थांतील पोपशाही आहे. जनतेला

अज्ञानांत ठेवून, त्यांना भूलथापा देऊन ती त्यांच्याकडून कर उकळीत असते. स्वतंत्र देशाची शासनसंस्था म्हणजे त्या देशांतील कोणत्याहि व्यक्तीच्या हातांत सार्वभौम अधिकार कधींहि असणार नाहीं. या कायद्यांचें पालन करण्यासाठीं, ते अमलांत आणण्यासाठीं शासनसंस्थेला भरमसाट मुळींच खर्च येत नाहीं. या कायद्यांची योग्य अंमलबजावणी होण्यांतच या शासनसंस्थेची कृतार्थता असते.

## राज्यघटनांविषयीं

शासनसंस्था आणि राज्यघटना या भिन्न गोष्टी आहेत असेंच लोक समजतात हें उघड आहे. नाहींतर त्यांनीं दोन वेगवेगळे शब्द कां वापरले असते ? शासन-संस्था राज्यघटना तयार करीत नाहीं. शासनसंस्था स्थापन करणारी जनता राज्य-घटनेला जन्म देत असते. राज्यघटनेशिवाय शासनसंस्था म्हणजे बेकायदेशिर अधिकारच होय.

जनतेवर राज्य करणाऱ्या सत्तेला कोठेंतरी निश्चित मूळ असलें पाहिजे. ही सत्ता विशिष्ट लोकांच्या हातांत त्यांना आपले प्रतिनिधि समजून दिलेली असते किंवा त्यांनीं तरी ती बळकावलेली असते. सत्तेचे हे दोनच उगम संभवतात. प्रतिनिधित्वामुळें मिळालेली सत्ता ही विश्वस्त निधीसारखी असते. बळकावलेली सत्ता म्हणजे शुद्ध दांडगेपणा. कितीहि काल गेला तरी या दोघांच्या स्वरुपांत फरक पडत नाहीं.

सत्तेचा उगम शोधून काढण्याकरितां खरें म्हणजे आपल्याला शोध घेत घेत अगदीं प्राचीन काळापर्यंत गेलें पाहिजे. परंतु अमेरिकेंतील सध्यांची परिस्थिति पाहातां अमेरिका हा एका नव्या जगाचा आरंभच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं आणि म्हणूनच प्राचीन काळांत न भटकतांहि अमेरिकेच्या सद्यःपरिस्थितीचा अभ्यास केल्यास आपल्याला आपल्या प्रश्नाचें उत्तर मिळूं शकेल. अमेरिकेंत शासनसंस्थेचा जन्म होतांना त्याला साक्षी रहाण्याची जणूं कांहीं संधि आपल्याला मिळाली आहे—जसें कांहीं आपण प्राचीन काळांत जाऊन शासनसंस्थेचाच आरंभ पाहात आहोंत. इतिहासाचा नव्हे तर प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा ग्रंथ आपल्यासमोर उघडा आहे. परंपरेंतील चुका किंवा कोणत्याहि माणसाचा हस्तक्षेप यांचा धक्का अजूनहि या वस्तुस्थितीला लागलेला नाहीं.

अमेरिकेच्या राज्यघटनेच्या जन्माची हकीकत मी येथें थोडक्यांत सांगणार

आहे. ही हकीकत वाचीत असतांना राज्यघटना आणि शासनसंस्था यांच्यांतील फरक स्पष्ट होईल.

अमेरिकेंत एकूण तेरा वेगवेगळी राज्यें आहेत. ४ जुलै १७७६ रोजीं अमेरिकेनें आपण स्वतंत्र झाल्याचें घोषित केलें. या दिवशीं या तेरा राज्यांनीं आपापलीं राज्यसरकारें स्थापन केलीं. अशा रीतीनें जरी तेरा राज्यसरकारें स्थापन झालीं असलीं तरी त्यांचें सर्वांचें तात्त्विक अधिष्ठान एकच आहे ही गोष्ट येथें लक्षांत घेतली पाहिजे. यानंतर हीं राज्यसरकारें अमेरिकेचें संघराज्य स्थापन करण्यास उद्युक्त झालीं. सर्व राज्यांचा कारभार एकसूत्री होण्याच्या दृष्टीनें त्या सर्वांचें हितसंबंध जपण्याच्या दृष्टीनें अशा केंद्रवर्ती सत्तेची आवश्यकता भासणें स्वाभाविक आहे. आतां या संघराज्याकडे वळण्यापूर्वी मी पेन्सिल्वानिया या एका राज्यसरकारच्या जन्माची हकीकत प्रथम सांगतों.

पेन्सिल्वानिया हें राज्य जवळ जवळ इंग्लंड एवढें आहे. त्यावेळीं हें राज्य बारा परगण्यांत विभागलेलें होतें. अमेरिकेच्या स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली तेव्हां या प्रत्येक परगण्यानें निवडणूक करून आपापली एक एक समिति स्थापली होती. फिलाडेल्फिया हा या बारांपैकीं एक परगणा. फिलाडेल्फियाची सुद्धां एक स्वातंत्र्य युद्ध समिति होती. फिलाडेल्फियांत बुद्धिमान लोकांचा विशेष भरणा होता. त्यामुळें स्वाभाविकच तेथील समितीला केंद्रवर्ती स्वरूप प्राप्त झालें. जेव्हां पेन्सिल्वानियाला आपलें राज्यसरकार स्थापन करण्याची आवश्यकता भासूं लागली तेव्हां फिलाडेल्फियांतील समितीनें सर्व परगण्यांतील समित्यांची एक सभा भरवावी असें सुचविलें. ही सभा फिलाडेल्फिया येथें १७७६ सालच्या जुलै महिन्याच्या अखेरीस भरली.

खरें म्हणजे या सर्व समित्यांना लोकांनींच निवडलें होतें. परंतु शासनसंस्था स्थापन करण्याचे किंवा राज्यघटना तयार करण्याचे अधिकार जनतेनें कांहीं त्यांना दिलेले नव्हते. स्वातंत्र्ययुद्ध चालविण्यासाठीं म्हणून ही समिति निवडलेली होती. जनतेनें जे अधिकार दिलेले नाहींत ते आपल्याला आहेतच असें धरून चालणें हें अमेरिकेच्या मानवी हक्कांच्या तत्त्वांविरुद्ध आहे आणि म्हणूनच या समितीच्या बैठकींत फक्त असें ठरविण्यांत आले कीं प्रत्येक परगण्याला आपले सहा प्रतिनिधी निवडण्याची शिफारस समितीनें करावी; प्रत्येक परगण्यानें आपल्या या सहा प्रतिनिधींच्या हातीं राज्यघटना तयार करून संमतीसाठीं ती जनतेसमोर

मांडण्याचा अधिकार सुपुर्द करावा; या सर्व प्रतिनिधींची सभा नंतर फिलाडेल्फिया येथें भरावी.

ठरल्याप्रमाणें या लोकनियुक्त प्रतिनिधींची सभा फिलाडेल्फिया येथें भरली. बेंजामिन फ्रँकलिन् या सभेचा अध्यक्ष होता. या सभेंत चर्चा, वादविवाद होऊन राज्यघटनेचा एक मसुदा तयार करण्यांत आला. मग सभेनें हा मसुदा जनतेच्या संमतीसाठीं प्रसिद्ध करावा असा ठराव केला. जनता या मसुद्याला संमति देईपर्यंत किंवा विरोध करीपर्यंत कांहीं काळ पर्यंत ही सभा स्थगित करावी असें ठरलें.

सभेच्या तहकुबीची वरील मुदत संपल्यानंतर पुनः सर्व प्रतिनिधींची बैठक घेण्यांत आली. जनतेची या राज्यघटनेच्या मसुद्याला संमति आहे हें तोंपर्यंत कळलें होतें. मग या सर्व प्रतिनिधींनीं या मसुद्यावर सह्या करून त्यावर शिक्कामोर्तब केलें आणि जनतेनें कौल दिल्यामुळें ही राज्यघटना आतां कायदेशीर झाली असें जाहीर केलें. प्रतिनिधीनीं सह्या केलेला मूळ मसुदा सार्वजनिक दस्तऐवज म्हणून सुरक्षित ठेवण्यांत आला. या सभेनें मग राज्यकर्त्यांच्या निवडणुकीसाठीं एक दिवस मुक्रर केला. एवढें केल्यानंतर सभा बरखास्त झाली आणि सर्व प्रतिनिधी घरीं परतले व आपापल्या उद्योगाला लागले.

जनतेच्या मान्यतेचा शिक्कामोर्तब झालेल्या वरील राज्यघटनेंत प्रथम मानवी हक्कांची घोषणा केलेली होती. त्यानंतर शासनसंस्था कोणत्या प्रकारची असावी, तिला अधिकार कोणते असावे, न्यायालयें व पंच यांचे अधिकार कोणते, निवडणुकी कोणत्या पद्धतीनें घेण्यांत याव्या, लोकसंख्येच्या मानानें नियुक्त प्रतिनिधींचें कोणतें प्रमाण असावें, विधानसभेची कालमर्यादा किती असावी, अधिकारी वर्ग कसा नेमावा, कर आकारणी कोणात्या पद्धतीनें करावी, राज्याच्या खर्चाचा हिशोब कसा द्यावा, इत्यादि सर्व गोष्टी तपशीलवार ठरविण्यांत आल्या होत्या.

यानंतर स्थापन होणाऱ्या शासनसंस्थेला राज्यघटनेच्या कोणत्याहि कलमांत यत्किंचितहि बदल करण्याचा अधिकार दिलेला नव्हता. राज्यघटना हा शासनसंस्थेला आंखून दिलेला कायदाच होता, या कायद्याचें ती उल्लंघन करूं शकत नव्हती. परंतु अनुभवानें माणसाच्या ज्ञानांत भर पडते. त्या दृष्टीनें राज्यघटनेंत कांहीं सुधारणा होणें शक्यहि असतें. ही शक्यता धरून चालणें शासनसंस्थेला सर्व काळांतील परिस्थितीशीं मिळतें जुळतें घेण्याच्या दृष्टीनें आवश्यक असतें. या दृष्टीनें राज्यघटनेंत अशी तरतूद करण्यांत आली होती कीं दर सात वर्षांनीं

राज्यघटनेंत सुधारणा करण्यासाठीं म्हणून एक समिति नेमण्यांत यावी. या समितीनें आवश्यक तर नवीन कलमांची राज्यघटनेंत भर घालावी किंवा एखादें कलम अनावश्यक वाटल्यास तें काढून टाकावें.

येथें राज्यघटना आणि शासनसंस्था यांच्या वाटचालींतील सर्व टप्पे आपणाला दिसतात. लोक आपला मूलभूत हक्क बजावून राज्यघटना तयार करतात. या राज्यघटनेंतून शासनसंस्था तयार होते. या शासनसंस्थेवर राज्यघटनेचें संपूर्ण नियंत्रण चालत असतें.

ही राज्यघटना जनतेचा राजकीय धर्मग्रंथच होऊन बसली होती. या राज्यघटनेची प्रत नाहीं असें एक कुटुंब देखील सांपडलें नसतें. प्रत्येक सरकारी अधिकाऱ्याजवळ राज्यघटनेची एक प्रत होतीच. कोणत्याहि कायद्यावर अथवा तात्त्विक मुद्यावर मतभेद झाला असतां या राज्यघटनेंतील कलमांचा आधार आपली बाजू सिद्ध करण्यासाठीं घेतला जात असे.

येथवर मी एका राज्याची शासनसंस्था आणि घटना यांचा जन्मेतिहास सांगितला. आतां मी अमेरिकेच्या संघराज्याच्या घटनेकडे वळतों.

अमेरिकन कॉंग्रेसच्या पहिल्या दोन सभा १७७४ आणि १७७५ सालीं भरल्या होत्या. या वेळची ही कॉंग्रेस म्हणजे वेगवेगळ्या राज्यांच्या कायदेमंडळांतील प्रतिनिधींचे शिष्टमंडळच होतें. या प्रतिनिधींच्या हातीं जनतेनें सुपुर्द केलेल्या अधिकारांखेरीज अधिक अधिकार नव्हते. अमेरिकेच्या अंतर्गत कारभाराच्या बाबतींत ही कॉंग्रेस राज्यसभांना आपल्या सूचना कळवीत असे. या सूचना स्वीकारण्याचें किंवा न स्वीकारण्याचें स्वातंत्र्य अर्थातच राज्यसभांना होतें.

कॉंग्रेसच्या या सूचना स्वीकारण्याची सक्ती राज्यसभांवर नसून सुद्धां प्रत्येक राज्य अत्यंत श्रद्धेनें, स्नेहानें व जिव्हाळ्यानें या सूचना सादर करीत असे. युरोपमधील शासनसंस्थांत असें एकहि उदाहरण दाखवितां येणार नाहीं. शासनसंस्थेचें सामर्थ्य लोक तिच्यावर किती विश्वास ठेवतात, त्यांना तिच्याविषयीं कितपत आत्मीयता वाटते यावर अवलंबून आहे. याचें अमेरिका किंवा फ्रान्सची राष्ट्रीय सभा हें चालतें बोलतें उदाहरण आहे. लोकांची ही शासनसंस्थेवरची श्रद्धा उडाली म्हणजे हें सरकार राज्यपदावर आलेल्या एखाद्या अजाण पोरासारखें बनतें. फ्रान्समधील जुन्या राजवटींप्रमाणें अशी शासनसंस्था कांहीं काळपर्यंत लोकांचा छळ करूं शकेल. परंतु त्यामुळें आपला अधःपात ती जवळ आणीत

असते यांत संशय नाहीं.

अमेरिकेनें स्वातंत्र्याची घोषणा केल्यानंतर प्रातिनिधिक लोकसत्ताकाच्या तत्वांनुसार कॉंग्रेसचें स्वरुप कोणतें असावें, तिचें अधिकारक्षेत्र कोणतें इत्यादि गोष्टी ठरविणें आवश्यक झालें. कॉंग्रेसच्या हातीं आधीं असलेली सत्ता कमी करावयाची होती किंवा वाढवावयाची होती असा हा प्रश्न नाहीं. कार्यपद्धति दोषरहित असावी यासाठींच हें सर्व करावयाचें होतें.

कॉंग्रेसचें स्वरूप निश्चित करण्यासाठीं संघराज्याचा कायदा करावा (हा कायदा म्हणजे संघराज्याचा घटनेचा कच्चा मसुदा होता) असें सुचविण्यांत आलें. आणि बऱ्याच ऊहापोहानंतर १७८१ मध्यें हा कायदा करण्यांत आला. हा कायदा कॉंग्रेसनें केलेला नव्हता. कॉंग्रेसनें तसा कायदा करणें म्हणजे आपणच आपल्याला अधिकार देणें होय. तसें करणें प्रातिनिधिक लोकसत्ताकाच्या तत्त्वांना सोडून झालें असतें. आणि म्हणूनच कॉंग्रेसनें आपलें स्वरूप काय असावें, सर्व राज्यांनीं कोणकोणते अधिकार आपल्या हातीं द्यावे या विषयींच्या सूचनांचा मसुदा सर्व राज्यांकडे पाठविला. मग या सर्व राज्यांनीं हे अधिकार कॉंग्रेसला दिले. येथें एक गोष्ट मुद्दाम पाहाण्यासारखी आहे. या दोन्ही ठिकाणीं शासनसंस्था आणि जनता यांच्यांत कसलाहि करार-मदार झालेला नाहीं. जनतेनें शासनसंस्था स्थापण्यासाठीं येथें एकमेकांत करार केले आहेत.

शासनसंस्था जनतेशीं कांहीं करार करते असें मानणें म्हणजे या शासनसंस्थेला स्थापन होण्याचा अधिकार जनतेकडून मिळण्यापूर्वीच ती अस्तित्वांत होती असें धरून चालावें लागतें. शासनसंस्था आणि जनता यांच्यांत एकच करार होऊं शकतो आणि तो म्हणजे शासनसंस्था चालविणाऱ्या अधिकाऱ्यांचा पगार जनतेकडून मिळेल हा होय. शासनसंस्था म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या फायद्यासाठीं चाललेला व्यापार नव्हे. तो एक विश्वस्तनिधि आहे. जे हा निधि अधिकाऱ्यांच्या हातीं सोंपवितात त्यांना त्यांच्या हातून योग्य वाटेल तेव्हां तो काढून घेण्याचाहि अधिकार असतो. शासनसंस्थेला हक्क असे वेगळे नसतातच; तिचीं कर्तव्यें हेच तिचे हक्क होत.

येथवर मीं राज्यघटनेच्या संस्थापनेचीं दोन उदाहरणें दिलीं. आतां मी त्यांच्या स्थापनेनंतर पुढें त्यांच्यांत कांहीं बदल कसे करण्यांत आले तें सांगणार आहें.

संघराज्य सुरू झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं असें अनुभवास आलें कीं राज्य

सरकाराकडे आवश्यकतेहून अधिक अधिकार आहेत आणि संघराज्याकडे असावे त्यांहून कमी आहेत. हा तात्त्विक दोष नव्हता, अधिकाराच्या विभागणींतला हा दोष होता.

संघराज्याची पुनर्रचना केली पाहिजे याविषयीं अनेक लेख आणि पुस्तकें प्रसिद्ध होऊं लागलीं. कांहीं काळानंतर व्हर्जिनिया राज्यानें सर्व राज्यांच्या प्रतिनिधींची एक सभा भरवावी अशी सूचना मांडली. या सूचनेनुसार पांच सहा राज्यांतील विधानसभांच्या प्रतिनिधींच्या शिष्टमंडळांची बैठक १७८६ मध्यें मेरीलँड राज्यांतील ॲनॉपॉलिस या शहरीं भरली.

या शिष्टमंडळाला संघराज्याच्या घटनेंत कसलीहि सुधारणा करण्याचे अधिकार जनतेनें दिलेले नव्हते. या शिष्टमंडळानें फक्त असें ठरविलें कीं घटनेंत सुधारणा होणें आवश्यक असल्यामुळें येत्या वर्षी सर्व राज्यांच्या प्रतिनिधींची एक बैठक घेण्यांत यावी.

शिष्टमंडळानें सुचविल्याप्रमाणें सर्व राज्यप्रतिनिधींची बैठक १७८७ सालीं मे महिन्यांत फिलाडेल्फिया येथें भरली. जनरल वॉशिंग्टनला या सभेचा अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आलें. त्यावेळीं जनरल वॉशिंग्टनचा कोणत्याहि राज्य-सरकारशीं किंवा अमेरिकन कॉंग्रेसशीं कसलाहि संबंध नव्हता. स्वातंत्र्ययुद्धाच्या समाप्तीनंतर सैन्यांतून निवृत्त होऊन सर्वसामान्य नागरिकाचें जीवन तो व्यतीत करीत होता. या सभेनें घटनेच्या सर्व कलमांवर करून विचार केला आणि संघराज्याच्या घटनेचीं वरीचशीं कलमें निश्चित केलीं. आतां यापुढचा प्रश्न ही घटना ठरवून प्रत्यक्ष अमलांत आणण्याचा होता. यासाठीं त्यांनीं ही घटना देशांतील जनतेसमोर ठेवण्याचें ठरविलें. नवी सुधारलेली घटना जनतेच्या संमतीसाठीं त्यांनीं प्रथम प्रसिद्ध केली. यानंतर प्रत्येक राज्यानें या घटनेवर विचार करण्यासाठीं, तिच्यांत कांहीं सुधारणा सुचविण्यासाठीं एक समिति निवडावी असें ठरविण्यांत आलें. अशा तऱ्हेनें कोणत्याहि नऊ राज्यांनीं आपला निर्णय घेतल्यानंतर त्यांनीं नव्या संघराज्यावर आपले प्रतिनिधी पाठविण्याच्या दृष्टीनें निवडणुकीस सुरवात करावी. नव्या संघराज्यास सुरवात झाल्यानंतर जुनें संघराज्य रद्द ठरवावें.

या ठरावाप्रमाणें बऱ्याच राज्यांनीं आपली समिति निवडण्यास सुरवात केली. कांहीं राज्यांच्या समितींत फार मोठ्या बहुमतानें नव्या घटनेला मान्यता देण्यांत

आली. दोन तीन समित्यांनीं तर घटनेला एकमतानें मान्यता दिली. कांहीं समित्यांत चर्चेची खडाजंगी झाली. बोस्टन येथें भरलेल्या मॅसाच्युसेट्स्च्या समितींत एकूण तीनशें प्रतिनिधि होते. या प्रश्नावरचें बहुमत अल्पमतापेक्षां फक्त वीसच मतांनीं अधिक होतें. प्रातिनिधिक लोकसत्ताकाचें स्वरूपच असें असतें. एकाद्या मुद्द्यावर बहुमतानें निर्णय घेण्यांत आल्यावर तो निर्णय शांतपणें पार पाडला जातो.

मॅसाच्युसेट्स्च्या समितींत बहुमतानें आपला निर्णय दिल्यानंतर विरोधी पक्षीयांनीं पुढीलप्रमाणें घोषणा केली. "बहुमतवाल्या पक्षापेक्षां घटनेंतील मुद्याकडे आम्ही वेगळ्या दृष्टीनें पहात होतों. या मतभेदामुळें त्यांच्याविरुद्ध आम्हीं मत दिलें. आतां या प्रश्नाचा निकाल बहुमतानें दिला आहे आणि त्यामुळें घटनेला मान्यता मिळाली आहे तेव्हां चर्चेनंतर जरी आम्हीं विरुद्ध मत दिलें असलें तरी आतां आमचा व्यवहारांत घटनेला संपूर्ण पाठिंबा आहे. कारण बहुमताचा निर्णय हा सभागृहाला निर्णायक असतो असें आम्ही मानतों."

नऊ राज्यांनीं या नव्या घटनेला मान्यता दिल्यानंतर संघराज्याचे नवे प्रतिनिधी निवडण्यांत आले. जनरल वॉशिंग्टनची अध्यक्ष म्हणून निवड करण्यांत आली. जनरल वॉशिंग्टनच्या चारित्र्याविषयीं आणि राष्ट्रभक्तीविषयीं निराळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. युरोप खंडांतील कोठल्याहि राजानें शरमेनें खालीं मान घालावी असें जनरल वॉशिंग्टनचें कर्तृत्व आहे. कसलीहि राष्ट्रसेवा न करतां जनतेनें निढळाच्या घामानें कमावलेले पैसे हे राजे लुटीत आहेत. कर्तृत्वाच्या नांवानें ते शून्य आहेत. परंतु जनरल वॉशिंग्टन आज एकहि पैसा न घेतां अमेरिकेचा अध्यक्ष म्हणून काम करीत आहे. मुख्य सेनापतिपदावर काम करतांना देखील त्यानें एक पैसा घेतला नव्हता.

संघराज्याची घटना अस्तित्वांत आल्यानंतर पेन्सिल्वानिया या राज्याला आपल्या राज्यघटनेंत कांहीं फेरफार करण्याची आवश्यकता भासूं लागली. त्यासाठीं त्या राज्यानें एका समितीची निवड केली. समितीनें ठरविलेले फेरफार प्रथम प्रसिद्ध करण्यांत आले. आणि जनतेची मान्यता मिळाल्यानंतर त्यांनीं या नव्या बदलावर कायद्याचें शिक्कामोर्तब केलें.

ही घटना स्थापन करतांना किंवा तिच्यांत कसलाहि बदल करतांना गोंधळ, गैरसोय मुळींच निर्माण झाली नाहीं. राष्ट्राचे सर्व व्यवहार सुरळीत चालू होते.

घटनेंतील कलमांत योग्य ते फेरफार झाल्यामुळें जनतेचा फायदाच झाला. चुका तशाच राहूं देण्यापेक्षां त्या सुधारण्याचा प्रयत्न करण्यांतच राष्ट्राचें महत्त्व असतें. आणि जेव्हां जनतेला विचारस्वातंत्र्य आणि मतस्वातंत्र्य असतें तेव्हां ती सहसा चुकीचे निर्णय घेत नाहीं—अर्थांत घाईघाईनें तिनें हे निर्णय घेतले तर चूक होण्याचा संभव असतो.

वरील दोन्ही घटनांत बदल होत असतांना त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या सरकारनें त्यांत कसलीहि ढवळाढवळ केली नाहीं हें येथें मुद्दाम लक्षांत घेतलें पाहिजे. घटनेंत बदल करण्याच्या, ती नव्यानें स्थापन करण्याच्या किंवा तिचें स्वरुप ठरविण्याच्या चर्चेंत सरकारला कोणत्याहि स्वरूपाचा हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाहीं. घटनेची संस्थापना सरकारी अधिकाऱ्यांच्या खाजगी फायद्यासाठीं होत नसते. घटना स्थापन करण्याचा अधिकार सरकारचा नसून सरकार जिची नोकरी करते त्या जनतेचा आहे.

राज्यघटना हें राष्ट्रीय धन आहे. ती सरकारी अधिकाऱ्यांची खाजगी मालमत्ता नव्हे. अमेरिकेच्या राज्यघटनेला जनतेच्या संमतीनंतरच कायदेशीर अस्तित्व येतें. फ्रान्समधें जनता हा शब्द न वापरतां राष्ट्र हा शब्द वापरतात. परंतु अमेरिकेंत आणि फ्रान्समधें राज्यघटना शासनसंस्थेपूर्वी अस्तित्वांत येते आणि तेथें शासनसंस्था आणि राज्यघटना या दोन भिन्न गोष्टी आहेत असें मानलें जातें.

## प्रातिनिधिक आणि परंपराप्राप्त राज्यव्यवस्था

कायदेशीर राज्यघटनेच्या अभावामुळें इंग्लंडमधील राज्यसत्ता निरंकुश बनली आहे; आणि बऱ्याचशा कायद्यांना जुलमाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. या कायद्याच्या अंमलबजावणींत अनेक दोष शिरले आहेत.

जर्मनीशीं राजकीय हातमिळवणी केल्यानंतर इंग्लंडच्या सरकारचें सर्व लक्ष परराष्ट्रीय घडामोडींवर खिळलें असून त्याची सर्व शक्ति येनकेनप्रकारेण जनतेकडून कर उकळण्यावर केंद्रित झाली आहे. अंतर्गत कारभारावरचें सरकारचें लक्ष उडालें आहे आणि सध्यां इंग्लंडमध्यें सुव्यवस्थित असा कायदा उरलेला नाहीं.

कोणतीहि नवी गोष्ट करावयाची असल्यास पूर्वीची परंपरा काय आहे हें पाहून त्या प्रथातानुसारच काय तें ठरविलें पाहिजे असें सध्यां इंग्लंडचें सरकार लोकांना सांगत आहे. अधिक खोल विचार केला असतां पूर्वपरंपरेच्या या धोरणा-

मागें राज्यकर्त्यांचा कांहींतरी कुटिल डाव शिजत आहे 'असा संशय आल्याशिवाय रहात नाहीं. फ्रान्स आणि अमेरिका येथें क्रांति झाल्यानंतर इंग्लंडमधल्या परंपराप्रामाण्याच्या या तत्त्वज्ञानाला विशेषच जोर चढलेला दिसतो. सर्वसाधारणतः पूर्वपरंपरेचा हा प्रघात अत्यंत चुकीच्या नांवावर अधिष्ठित असतो. परंपरेच्या बाबतींत जसजसा प्राचीन आधार शोधावा तसतसा हा प्रघात अधिकच संशयास्पद बनतो. ज्याप्रमाणें साधुसंन्यासी कसलेतरी जुनाट अवशेष लोकांना दाखवून ते अत्यंत पवित्र आहेत असें भासवून ते जनतेच्या मनांत त्याविषयीं भक्तिभाव निर्माण करतात त्याप्रमाणें जनतेच्या अंधश्रद्धेची परंपरेच्या जुनाट अवशेषांशीं सांगड घालून हे धूर्त राजे तिला लुबाडीत आहेत. लोक जर स्वतंत्रपणें विचार करूं लागले तर आपलें आसनच डळमळेल असेंच या शासनसंस्थांना वाटूं लागलें आहे. क्रांतीपासून जनतेचें मन शक्यतों परावृत्त व्हावें यासाठीं तें पूर्वपरंपरेच्या खोड्यांत युक्तीनें अडकविण्याचा या शासनसंस्थांचा विलंदर खटाटोप सुरू आहे.

या शासनसंस्थांना नको असूनहि जनता झपाट्यानें शहाणी होऊं लागली आहे. या शासनसंस्थांचें परंपराप्रामाण्याचें धोरण हें त्याचें भयमापनयंत्रच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. राजकीय क्षेत्रांतल्या या जुलमी पोपशाहीचा काळ आतां जवळ आला आहे. जुनाट अवशेष आणि जुनाट परंपरा यांच्याबरोबरच त्यांच्या आधारें जनतेला लुबाडणारे बोके संन्यासी आणि मग्रूर राजे गाडले जाणार आहेत.

परंपरेंत कोणतें तत्त्व अनुस्यूत आहे याचा जरा देखील विचार न करतां तिला शासनसंस्थेनें प्रमाण मानणें यासारखें दुसरें दुष्ट धोरण नाहीं. ही पद्धति शक्य तितक्या लवकर खरें म्हणजे नष्ट केली पाहिजे. परंतु असें करण्याऐवजीं या शासनसंस्था या परंपरांना घटनेच्या आणि कायद्याच्या जागेवर बसवीत आहेत.

परंपराप्रामाण्याचें हें धोरण म्हणजे एक तर जनतेला अज्ञानांत ठेवण्याचा राज्यकर्त्यांचा कुटिल डाव आहे किंवा शासनसंस्था जुनी झाल्यानंतर ती कुचकामी ठरते, परंपरेच्या कुबड्या घेतल्याशिवाय ती चालू शकत नाहीं याची कबुली आहे.

नवी पिढी जुन्या पिढीपेक्षां अधिक शहाणी आहे हें दिसत असतांना सुद्धां ती म्हणजे शहाणपणाचें सर्व चैतन्य जिला सोडून गेले आहे अशी जड कुडी आहे हें मानावें तरी कसें ? प्राचीन काळाचा केवढा विचित्र उपयोग हा ! जेव्हां सोईस्कर असेल तेव्हां प्राचीन काळ हा अंधारमय, अज्ञानमय होता असें सांगण्यांत येतें तर कधीं या बोटावरची थुंकी त्या बोटावर केल्याप्रमाणें प्राचीन काळ

हा जगाला मार्गदर्शन करणारा प्रकाश आहे असें भासविलें जातें.

परंपराप्रामाण्याचें तत्त्व जर प्रमाण मानून चालावयाचें तर सरकारचा खर्च सध्यां आहे तेवढा ठेवण्यांत मुळींच येतां कामा नये. या नव्या सरकाराला जुन्या काळांत जें होऊन गेलें त्याहून वेगळें जर कांहींच करावयाचें नाहीं तर या सरकारसाठीं जनतेनें निष्कारण पैसा कां खर्च करावा? पूर्वपरंपरेपेक्षां नवीन कांहींच घडूं शकणार नाहीं असें म्हटलें म्हणजे नव्यानें कसलेहि कायदे करण्याची आवश्यकता नाहीं ही गोष्ट उघड होते. कोणतीहि अपरिचित घटना निर्माण झाली असतां परंपरेचा शब्दकोश चाळून त्यांत जें म्हटलें असेल तें प्रमाण मानावयाचें म्हणजे झालें! याचा अर्थ असा होतो कीं एक तर वार्धक्यामुळें शासनसंस्था जीर्ण झाली असून तिचें पुनरुज्जीवन केलें पाहिजे किंवा आपलें शहाणपण दाखविण्याचे तिचे सर्व मार्ग आतां संपले आहेत.

सध्यां युरोपमध्यें—विशेष म्हणजे इंग्लंडमध्यें—राष्ट्राचें तोंड एका दिशेला आणि सरकारचें त्याच्या विरुद्ध दिशेला असें विचित्र दृश्य दिसत आहे. राष्ट्र पुढें पाहातें आहे तर सरकारचे डोळे मागें वळलेले आहेत. राष्ट्राची इच्छा नव्या सुधारणा करण्याची आणि सरकारची प्रवृत्ति जुनाट परंपरांना चिकटून राहाण्याची असा हा विसंवाद किती काळ सोसणार? अशा परिस्थितींत जनता आणि सरकार यांची फारखत होणें अत्यंत आवश्यक आहे—हें जितक्या लवकर होईल तेवढें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें अधिक चांगलें.

येथवर आपण राज्यघटना ही शासनसंस्थेपासून कशी भिन्न असते हें पाहिलें. आतां यापुढें राज्यघटना कोणकोणत्या घटकांची बनलेली असते तें आपण पाहूं.

राज्यघटनेचे घटकावयव कोणते असावे या बाबतींत मतभेद होण्याचा संभव बराच आहे. प्रत्येक राष्ट्राला आपली राज्यघटना असली पाहिजे. आणि या राज्यघटनेनुसार शासनसंस्थेनें चाललें पाहिजे. या बाबतींत राजदरबारांतील स्वार्थसाधु लोक सोडल्यास कोणाचाहि मतभेद होणार नाहीं. मतभेदांचा प्रश्न उद्भवतो तो फक्त घटकावयवांच्या बाबतींत. परंतु योग्य दिशेनें विचार केल्यास हे मतभेद आपोआप मिटतील. तेव्हां पहिला महत्त्वाचा मुद्दा हा कीं प्रत्येक राष्ट्राला आपली राज्यघटना निर्माण करण्याचा हक्क आहे. हा हक्क राष्ट्र अचूकपणें बजावतें कीं त्यांत कांहीं घोंटाळे करतें हा प्रश्न साफ वेगळा आहे. प्रत्येक राष्ट्र आपापल्या कुवतीप्रमाणें शक्य तेवढ्या योग्य दिशेनें आपल्या हक्कांची वाटचाल करण्याचा

प्रयत्न करणार हें उघड आहे. असा प्रयत्न करतां करतां अखेरीस सर्व चुका सुधारल्या जातील. राष्ट्राचा आपली राज्यघटना निर्माण करण्याचा हक्क एकदां मान्य केला कीं त्यामुळें राष्ट्र आपलें कांहीं वाईट करून घेईल अशी भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण मुद्दाम चुकीच्या मार्गानें जाण्यांत कोणत्याहि राष्ट्राचा काय बरें फायदा ?

अमेरिकेंतील घटक राज्यांच्या सर्व राज्यघटनांना जरी एकच तात्त्विक अधिष्ठान असलें तरी कोणत्याहि दोन घटना एकसारख्या नाहींत. कोणतीहि राज्यघटना निर्माण करण्यापूर्वी शासनसंस्थेचें उद्दिष्ट कोणतें आणि हें उद्दिष्ट साधण्याचा सर्वांत सोपा आणि कमींत कमी खर्चाचा मार्ग कोणता हें ठरविणें आवश्यक आहे. शासनसंस्था म्हणजे विशिष्ट स्वरूपाची राष्ट्रीय सहकारी संस्थाच नव्हे काय ? व्यक्तीचें तसेंच समुदायाचें हित साधणें हेंच या संघटनेचें उद्दिष्ट आहे. प्रत्येक माणसाला आपापला व्यवसाय करावयाचा असतो. आपल्या श्रमांचें आणि उत्पादनाचें योग्य फळ आपणांस मिळावें आणि त्याचा शांततेनें आणि सुरक्षिततेनें उपभोग घेतां यावा अशीच प्रत्येक माणसाची इच्छा असते. हें इच्छित साध्य करण्यासाठीं जिला कमींत कमी खर्च येईल अशी व्यवस्था त्याला निर्माण करावयाची असते. हें ध्येय साध्य करण्यासाठींच शासनसंस्था अस्तित्वांत येत असते.

शासनसंस्थेचें कायदेमंडळ, अंमलबजावणी खातें, आणि न्याय खातें असे तीन विभाग करण्याचा सर्वसामान्य प्रघात आहे. शब्दांच्या जाळ्यांत निष्कारण गुंतावयाचें नसल्यास कोटल्याहि शासनसंस्थेचें कायदे करणें आणि त्यांची अंमलबजाणी करणें असे दोनच विभाग पडतात ही गोष्ट स्पष्ट होईल. आणि म्हणूनच शासनसंस्थेचा कारभार नेहमी या दोहोंपैकी कोणत्यातरी एका सदरांत मोडत असतो.

न्याय खातें म्हणून ज्याला संबोधिलें जातें तें खरें म्हणजे राष्ट्राच्या अंमलबजावणी खात्याचाच एक भाग असतो. या खात्याकडे प्रत्येक व्यक्ति न्यायाची मागणी करीत असते आणि हें खातें कायद्याच्या अंमलबजावणीस कारणीभूत होत असतें.

राजसत्तेमुळें कायद्याची अंमलबजावणी होत असते असें दरबारी लोक मानतात हें त्यांनींच एकदां स्पष्ट करून सांगितल्यास बरें होईल. खरें म्हणजे सरकारी कायद्यांच्या बाबतींत राजसत्तेचा अगदीं नाममात्र संबंध असतो. राजसत्ता या

नांवाऐवजीं दुसरें कसलेंहि नांव घेतलें तरी कायद्याची अंमलबजावणी होतच राहाणार. कायद्यावर असा राजसत्तेचा नाममात्र शिक्का मारल्यानें त्यांची शक्ति कमी होत नाहीं किंवा वाढत नाहीं. एकादा कायदा हा किती न्याय्य आहे या गोष्टीवरच त्याला मिळणारा लोकांचा पाठिंबा अवलंबून असतो. यापेक्षां वेगळ्या पाठिंब्याची कायद्याला जरूर वाटत असेल तर ही गोष्ट त्या शासनसंस्थेंत कांहीं तरी अपुरेपण असल्याची खूण आहे. ज्या कायद्याची अंमलबजावणी करणें अत्यंत कठिण होऊन बसतें ते कायदे सहसा चांगले नसतात.

कायदेमंडळाच्या वेगवेगळ्या पद्धति देशादेशांतून अवलंबिल्या जातात. अमेरिकेंत कायदेमंडळाची वरिष्ठ आणि कनिष्ठ अशीं दोन सभागृहें असतात. फ्रान्समध्यें एकच सभागृह असतें. या दोन्ही देशांत कायदेमंडळांतील आपले प्रतिनिधी जनता निवडून देते.

जुलमी राजसत्ताकांमुळें शासनसंस्थांच्या वेगवेगळ्या पद्धतींचे प्रयोग करून पाहाणें मानवजातीला जवळ जवळ अशक्य होऊन बसलें होतें. त्यामुळें अलीकडेच लोकांना शासनसंस्था म्हणजे काय हें कळण्यास सुरुवात झाली आहे. स्वाभाविकच उत्तम शासनसंस्था कोणती हें समजण्यास लागणारा अनुभव अजून जनतेच्या जमेस नाहीं.

कायदेमंडळाचीं दोन सभागृहें असण्याच्या पद्धतीवर कांहीं आक्षेप घेतले जातात. हे आक्षेप पुढीलप्रमाणें (१) कोणतेंहि बिल सर्व कायदेमंडळापुढें चर्चिलें गेलें असतां त्या बिलाच्या बाबतींत अनेक नव्या सूचना डोळ्यांपुढें येण्याची शक्यता असते. परंतु या दोन सभागृहांच्या पद्धतींत दुसऱ्या सभागृहापुढें बिल येण्यापूर्वींच एक सभागृह आपलें मत देऊन मोकळें झालेलें असतें. हा एक या पद्धतींतील मोठा दोष आहे. (२) या दोन सभागृहांची वेगवेगळीं मतें घेतल्यामुळें अल्पमताला बहुमत डावलणें शक्य होतें. हा देखील एक फार मोठा दोषच मानला पाहिजे. (३) हीं दोन सभागृहें एकमेकांवर नियंत्रण ठेवतात असें समजणें विसंगत आहे, कारण एका सभागृहापेक्षां दुसरें सभागृह अधिक शहाणें आहे हें प्रतिनिधित्वानें कायदेमंडळ स्थापन होत असल्यानें सिद्ध करतां येणार नाहीं.

एकच सभागृह असण्यावर असा आक्षेप घेतला जातो कीं अशा परिस्थितींत कोणताहि निर्णय उतावीळपणें, एकांगी दृष्टीनें घेतला जाण्याची शक्यता असते.

परंतु हा आक्षेप घेतांना कायदेमंडळावर राज्यघटनेचें संपूर्ण नियंत्रण असतें ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे. उदाहरणार्थ, पहिला जॉर्ज गादीवर आला तेव्हां इंग्लिश पार्लमेंटनें विधानसभेची कालमर्यादा वाढवून घेण्याचा कायदा पास केला; पण अमेरिकेच्या कायदेमंडळासमोर असें बिल आलें असतें तर तें घटनाबाह्यच ठरलें असतें. एका सभागृहाच्या बाबतींतली निर्णयाची घिसाडघाई, तसेंच दोन सभागृहांच्या निर्मितींतून उत्पन्न होणाऱ्या विसंगति या दोन्ही गोष्टी टाळण्यासाठीं पुढील योजना सुचविली आहे : (१) निवडलेल्या प्रतिनिधींचें एकच सभागृह असावें. (२) या प्रतिनिधींचे दोन किंवा तीन भाग पाडण्यांत यावेत. (३) कोणतेंहि नवें बिल आलें असतां वरील प्रतिनिधींच्या प्रत्येक गटानें क्रमाक्रमानें इतरांच्या उपस्थितींत चर्चा करावी. ही चर्चा झाल्यानंतर सर्व सभागृहाचीं मिळून त्यावर मतें घेण्यांत यावींत.

कायदेमंडळाला सांचलेल्या डबक्याचें स्वरूप येऊं नये म्हणून आणखी एक योजना सुचविलेली आहे. ती म्हणजे, दरवर्षी प्रत्येक परगण्याच्या एक तृतीयांश प्रतिनिधींनीं राजिनामा द्यावा व त्यांच्या जागीं नवे प्रतिनिधी निवडून यावेत. या क्रमानें तीन वर्षांनंतर सर्वसाधारण निवडणुका व्हाव्यात.

अशा रीतीनें राज्यघटनेच्या घटकांची कोणत्याहि प्रकारें रचना केली तरी गुलामगिरी व स्वातंत्र्य यांतला फरक दर्शविणारें एक तत्त्व ध्यानांत ठेवलें पाहिजे, आणि तें म्हणजे आनुवंशिक राज्यसत्ताक हें जनतेच्या दृष्टीनें गुलामगिरीचें जोखड आहे. प्रातिनिधिक लोकसत्ताकांतच जनतेला स्वातंत्र्याचा प्रत्यय येतो.

अमेरिकेंतील अध्यक्षपदाची जागा परदेशी इसमाला मिळूं शकत नाहीं. परंतु इंग्लंडमध्यें मात्र याच्या उलट आहे. तिथें परदेशी मनुष्य 'राजा' होऊं शकतो पण पार्लमेंटचा सभासद होऊं शकत नाहीं. या जागेवरच्या माणसाला अनेक प्रकारें जनतेचा विश्वास संपादन करतां येतो. त्यामुळें अशा स्थानावर परदेशी मनुष्य नेमल्यानें राष्ट्र धोक्यांत येण्याचा संभव असतो.

प्रत्येक राष्ट्राला आपली राज्यघटना तयार करीत असतांना राष्ट्रप्रमुखपदाचें अधिकार-क्षेत्र निश्चित करावें लागणारच. या दोन खात्यांपेक्षां भिन्न अशी कायद्यांची अंमलबजावणी करणारी युरोपांतील राजा ही संस्था कोणती हें कांहीं ध्यानांत येत नाहीं. ही संस्था म्हणजे राजकीय बांडगूळ तरी आहे किंवा शुद्ध गोंधळाचें प्रतीक आहे. राष्ट्रांतील व राष्ट्राबाहेरील सर्व अधिकाऱ्यांकडून कामाचा अहवाल घेऊन

तो राष्ट्रीय सभेपुढें सादर करण्यासाठीं एक अधिकारी खातें असणें आवश्यक आहे. परंतु या खात्याला कायद्याची अंमलबजावणी करणारें खातें समजणें चूक आहे. किंबहुना कायदेमंडळाहून कनिष्ठ दर्जाचें असेंच या खात्याचें स्वरूप आहे. देशांतील कायदे करणारी संस्था हीच सार्वभौम असते, इतर सर्व खातीं या तिच्या कचेऱ्या होत.

राज्यघटनेच्या आंखणीनंतर तदनुसार अंमलबजावणी करणाऱ्या अधिकारी—वर्गाच्या वेतनाची तरतूद करण्याचा प्रश्न निर्माण होतो. कोणत्याहि अधिकाऱ्याकडून विनावेतन काम करून घेण्याचा कोणत्याहि राष्ट्राला अधिकार नाहीं. त्याचप्रमाणें एका खात्याच्या खर्चाची तरतूद करावयाची व दुसऱ्या खात्याला त्यापासून वंचित ठेवायचें या गोष्टीचें समर्थन होऊं शकत नाहीं. सरकारी अधिकारी होणें हाच सन्मान समजून विनावेतन काम करावें असा नियम करावयाचा असेल तर तो सर्वांना सारखाच लागू करावा लागेल, मग तो राजा असो किंवा राष्ट्रीय सभेचा सदस्य असो.

अमेरिकेंत सर्व सरकारी अधिकाऱ्यांना पुरेसा पगार दिला जातो, परंतु पैशाची उधळपट्टी कोठेंच केली जात नाहीं. कॅांग्रेसच्या आणि प्रांतीय विधानसभांच्या प्रत्येक सभासदाच्या खर्चाची योग्य तरतूद केली जाते. परंतु इंग्लंडमध्यें शासनसंस्थेच्या एका विभागावर वारेमाप पैसा उधळला जातो व दुसऱ्याला त्यापासून वंचित ठेवण्यांत येतें. परिणामीं एका विभागाच्या हातांत लांचलुचपतीचीं साधनें रहातात आणि दुसरा विभाग लांचलुचपतीला बळी पडण्याची भीति उत्पन्न होते. अमेरिकेनें घालून दिलेल्या उदाहरणाप्रमाणें वरील खर्चाच्या एक चतुर्थांश हिश्श्यांतसुद्धां, योग्य विभागणी केल्यास, लांचलुचपतीला आळा बसूं शकेल.

एकनिष्ठेची शपथ ही कोणत्याहि व्यक्तीच्या नांवानें न घेतां राष्ट्राच्याच नांवानें घेतली पाहिजे ही अमेरिकन राज्यघटनेनें केलेली एक महत्त्वाची सुधारणा होय. कोणत्याहि व्यक्तीला राष्ट्राच्या स्थानीं मानणें सर्वथा अनुचित होय. फ्रान्समधें प्रत्येक नागरिकाला 'राष्ट्र, कायदा आणि राजा' यांच्या नांवानें शपथ घ्यावी लागते. परंतु हें अयोग्य आहे. शपथ घ्यायचीच तर ती अमेरिकेंतल्याप्रमाणें, राष्ट्राच्या नांवानेंच घेतली गेली पाहिजे.

कायदा बरावाईट कसाहि असो, राष्ट्राच्या कल्याणासाठींच त्याची योजना केली असल्यामुळें, राष्ट्र या शब्दांत त्याचा अंतर्भाव आपोआपच होतो. आतां उरली

राजनिष्ठेची शपथ. परंतु तीहि अयोग्य आहे. कारण कोणत्याहि व्यक्तीच्या नांवानें एकनिष्ठेची शपथ घेण्याचा प्रघात बंद केला पाहिजे. राजनिष्ठेची शपथ म्हणजे एका दृष्टीनें जुलूम आणि दुसऱ्या दृष्टीनें गुलामगिरीच होय. आणि या शपथेंत ईश्वराचें नांव घेऊन माणसाचा अधःपात पाहाण्याची पाळी तर त्याच्यावर मुळींच आणतां कामा नये. त्याचप्रमाणें राष्ट्राचें प्रतीक म्हणून सुद्धां येथें ईश्वराचें नांव घेणें अनावश्यक आहे.

शासनसंस्थेच्या स्थापनकाळीं शपथा घेण्याचे हे प्रकार कितीहि क्षम्य मानले, तरी पुढें ते चालू देणें कदापि इष्ट नाहीं. शासनसंस्थेला जर आपलें अस्तित्व टिकवण्यासाठीं शपथांचा आधार लागत असेल, तर ती टिकून राहण्याच्या योग्यतेची नाहीं आणि तिला टिकूंहि देऊं नये. शासनसंस्था जर आपल्या उद्दिष्टाला जागली तर आपोआपच ती आपल्या पायावर उभी राहील.

या विषयाचा समारोप करतांना एक गोष्ट सांगितली पाहिजेः नव्या राज्यघटनांत प्रसंगानुरूप बदल, परिष्करण व सुधारणा करण्याची तरतूद आहे. घटनात्मक स्वातंत्र्याच्या प्रगतीसाठीं आणि सुरक्षिततेसाठीं या राज्यघटनांनीं केलेली ही सर्वांत मोठी सुधारणा होय.

राजसत्तेनें आनुवंशिकतेनें राष्ट्रांतील सर्व पिढ्यांवर शाश्वतकालपर्यंत राज्य करावें या सिद्धान्तावरच बर्कची राजकीय विचारसरणी उभी आहे. या सिद्धान्ताविषयीं लोकांच्या मनांत इतका तिरस्कार आहे कीं त्यावर चर्चा करण्याचें कारणच उरलेलें नाहीं. आणि म्हणून त्याचा उल्लेख करण्यापेक्षां मी त्याची अधिक दखल घेत नाहीं.

शासनसंस्थेच्या स्वरूपाचें लोकांना आतां आकलन होऊं लागलें आहे. पूर्वीची शासनसंस्था हा शुद्ध जुलूम जबरदस्तीचा कारभार असल्यामुळें ती जनतेला आपल्या हक्कांची जाणीवच होऊं देत नसे आणि स्वार्थ हेंच तिचें अधिष्ठान होतें. लोकस्वातंत्र्याचा शत्रु जो राजा तोच शासनसंस्थेचा अधिपति असल्यामुळें, तिच्या तत्त्वांचा विकास खुरटणें स्वाभाविकच होतें.

फ्रान्स आणि अमेरिका यांच्या राज्यघटनेंत एका विशिष्ट कालानंतर तिच्यांत आवश्यक ती सुधारणा घडवून आणण्याची तरतूद केलेली आहे किंवा ही सुधारणा घडवून आणण्याची पद्धति निश्चित करून दिलेली आहे.

कालानुरूप आणि परिस्थितीप्रमाणें सतत बदलत राहाणारे विचार व कार्यपद्धति यांची तत्त्वांशीं सांगड घालून शाश्वत स्वरूपाची व्यवस्था निर्माण करणें सर्वस्वीं

अशक्य आहे. कालमानाप्रमाणें राज्यघटनेंत निर्माण होणारे दोष जर तसेंच राहूं दिले तर त्यामुळें, एक तर सुधारणेला पायबंद बसेल किंवा लोक बंडाला प्रवृत्त होतील. म्हणून असे दोष वेळींच दूर करण्याची तरतूद राज्यघटनेंत असणें आवश्यक आहे.

माणसाचे नैसर्गिक हक्क सार्वकालिक आहेत आणि म्हणूनच कोणतीहि एक व्यक्ति किंवा पिढी त्यांची मक्तेदार बनूं शकत नाहीं. कोणत्याहि गोष्टीची स्वीकारार्हता तिच्या स्वयंसिद्ध मूल्यांवर अवलंबून असते. या गोष्टीचा टिकाऊपणा तिला कोणत्या परिस्थितीशीं तोंड द्यावें लागेल यावर नसून तिच्या स्वयंसिद्ध मूल्यांवरच अवलंबून असतो. कोणताहि मनुष्य आपल्या वारसांना मिळकत ठेवतो तेव्हां त्यांनी ती स्वीकारलीच पाहिजे अशी सक्ती तो करूं शकत नाहीं. मग आपण केलेली राज्यघटना स्वीकारण्याची सक्ती आपण पुढल्या पिढ्यांवर कां करावी ?

आजच्या परिस्थितीला अनुरूप असलेल्या राज्यघटनेंत कालान्तरानें दोष निर्माण होण्याचा संभव आहे. शासनसंस्थेच्या स्वरूपाविषयीं अपूर्व अशी जाणीव माणसांच्या मनांत उगवूं लागली आहे. आजच्या जुनाट रानटी शासनसंस्थांची दडपशाही संपुष्टांत आल्यानंतर राष्ट्राराष्ट्रांतील परस्पर संबंधांत नवा बदल घडून येईल.

भिन्न भिन्न राष्ट्रांत जन्माला येणें हा केवळ योगायोग होय. म्हणून केवळ या कारणामुळें परराष्ट्रांतील आपल्या बांधवांना शत्रु मानण्याच्या रानटी कल्पनेला अतःपर थारा राहाणार नाहीं.

राष्ट्रांतील किंवा परराष्ट्रांतील परिस्थितीचा राज्यघटनेवर प्रभाव पडत असल्यामुळें, त्या त्या कारणानुसार राज्यघटनेंत बदल घडवून आणण्याची तरतूद असणें आवश्यक आहे.

फ्रान्स आणि इंग्लंडचे संबंध आज चांगलेच निवळले आहेत. कांहीं वर्षांपूर्वीचा इतिहास लक्षांत घेतां हा बदल फारच क्रांतिकारक वाटतो. फ्रान्सची राष्ट्रीय सभा हा इंग्लिश जनतेच्या शुभकामनेचा विषय होईल किंवा या दोन्ही राष्ट्रांना आपले परस्पर संबंध सलोख्याचे असावेत असें वाटूं लागेल असें भाकीत जर कोणी कांहीं वर्षांपूर्वी केलें असतें तर त्यावर विश्वास बसणें कठिण झालें असतें.

यावरून असें दिसतें कीं शासनसंस्था जनतेची दिशाभूल करीत असतात. एरवीं माणसें आपापसांत प्रेमानेंच वागलीं असतीं; कारण तीं स्वभावतः दुष्ट

नसतात. जनतेवर कर लादून आपली पोतडी भरतां यावी म्हणून या शासनसंस्था राष्ट्राराष्ट्रांत युद्धें पेटवून कलह माजवितात. परंतु आतां लोक स्वहिताच्या आणि मानवतेच्या दृष्टीनें विचार करूं लागल्यामुळें या प्रवृत्तीला आळा बसत चालला आहे.

राज्यसत्तेच्या हस्तकांचा कावा आतां जनतेनें पुरता ओळखला आहे. राजसत्तेभोंवतीं त्यांनीं निर्माण केलेलें दैवी शक्तींचें वेगडी दैवी वलय आतां क्षीण होत चाललें आहे. तिच्या वर्मी घाव बसलेला आहे आणि जरी कांहीं काळ तिचा प्राण घुटमळला तरी तिचा मृत्यु अटळ आहे.

माणसाच्या जीवनांत इतरत्र जशी सुधारणा होत असते तशी ती शासनसंस्थेंतहि झाली पाहिजे. परंतु असें होण्याऐवजीं गेलीं कित्येक शतकें जगांतल्या अत्यंत मूर्ख आणि दुष्ट माणसांच्या आधिपत्याखालीं ही संस्था पिचत पडली आहे. राष्ट्राराष्ट्रांत पेटलेलीं भांडणें आणि करांच्या ओझ्याखालीं वाकलेली जनता यापेक्षां या शासनसंस्थांच्या कुचकामीपणाचा दुसरा कोणता पुरावा हवा ?

अशा रानटी अवस्थेंतून नुकतीच बाहेर पडलेली शासनसंस्था आतां कोणकोणत्या दिशेनें प्रगति करील तें आतांच सांगणें कठिण होईल. सर्व युरोपचें एक महान् लोकसत्ताक स्थापन झाल्याचें आणि लोकजीवनांत संपूर्ण स्वातंत्र्य नांदूं लागल्याचें दृश्य आज आमच्या दूरदृष्टीला दिसत आहे.

# शासनशास्त्राच्या मूलतत्त्वांचें विवेचन

कोणत्याहि व्यक्तीला शासनसंस्थेइतका जिव्हाळ्याचा विषय नाहीं. ती गरीब असो वा श्रीमंत, तिची सुरक्षितता आणि उत्कर्ष शासनसंस्थेशीं दृढ संबद्ध असतो आणि म्हणूनच शासनसंस्थेचीं तत्त्वें आणि तिची कार्यपद्धति यांची जास्तींत जास्त माहिती मिळविणें हें त्याच्या दृष्टीनें हिताचें आहे.

प्रत्येक शास्त्र आणि कला यांचा एक बाल्यकाल असतो. परंतु अनेक पिढ्यांच्या परिश्रमानंतर त्यांना हळुहळु विकसित स्वरूप येऊं लागतें. जगांतील सर्व शास्त्र–कलांना असें परिपक्व स्वरूप आलेलें आपण पाहातों. परंतु शासनसंस्थेचें शास्त्र मात्र एकाच जागीं खिळून आहे. अमेरिकन् स्वातंत्र्ययुद्ध सुरू होईपर्यंत शासन-संस्थांच्या तत्त्वांत आणि कार्यपद्धतींत कसलाहि बदल झाल्याचें दिसत नाहीं. फ्रान्स सोडून सर्व युरोप खंडांत मानवाच्या अविकसित अवस्थेंत जन्माला आलेल्या शासनसंस्थाच अजून चालू आहेत. या शासनसंस्थांचा उगम कोणता, त्यांना अस्तित्वाचा हक्क दिला कोणी हे प्रश्न विचारण्याची बंदी आहे. याचें कारण या प्रश्नाचें उत्तर एकच आहे आणि तें म्हणजे या शासनसंस्था खोटेपणावर उभ्या आहेत आणि माणसांना हें कळूं नये यासाठीं आपली सर्व शक्ति वापरीत आहेत.

शासनसंस्था म्हणजे सर्व सामान्य माणसाच्या आकलनापलीकडलें गूढ आहे असा धूर्त प्रचार जरी तिच्या हस्तकांनीं केलेला असला तरी शासनसंस्था हा विषय समजण्यास अत्यंत सोपा आहे ही वस्तुस्थिति आहे. अत्यंत सामान्य बुद्धीच्या माणसानें देखील योग्य ठिकाणाहून सुरुवात केल्यास शासनसंस्थेचें शास्त्र त्याला समजूं शकेल. प्रत्येक शास्त्र आणि कला यांच्या अभ्यासाची एक विशिष्ट पद्धति असते; विशिष्ट ठिकाणाहून या अभ्यासाला सुरुवात करावी लागते. असें केलें असतां हें अध्ययन सुकर होतें. शासनसंस्थेच्या शास्त्राच्या बाबतींतहि अध्ययनाची हीच पद्धति अवलंबिली पाहिजे.

शासनसंस्था किती प्रकारच्या असतात ? सुरवातीलाच या प्रकारांचे आणि उप-प्रकारांचें जाळें निर्माण न करतां आपण शासनसंस्थांची दोन प्रकारांत विभागणी

करूं. यानंतर कितीहि उपविभाग पाडले तरी त्यांचा अंतर्भाव या दोघांत करावाच लागेल. तेव्हां शासनसंस्था मुख्यतः दोन प्रकारच्या असतात. (१) प्रातिनिधिक लोकसत्ताक शासनसंस्था (२) आनुवंशिक राजसत्ताक शासनसंस्था. आतां कोणत्याहि प्रकारची शासनसंस्था घेतली तरी ती या दोघांपैकीं एका प्रकारांत मोडणारच. मिश्र सरकार—म्हणजे हॉलंडचें पूर्वीचें सरकार किंवा इंग्लंडचें सध्यांचें सरकार—कोणत्या सदरांत घालावें असा प्रश्न येथें आल्यास त्याला उत्तर असें : मिश्र सरकार हे वर सांगितलेल्या दोन प्रकारास अपवादभूत होणारें नाहीं. मिश्र सरकारचा आनुवंशिक सत्तेला मान्यता देणारा भाग आनुवंशिक राजसत्तेच्या सदराला येईल आणि प्रतिनिधित्वाच्या तत्वाला मान्यता देणारा भाग लोकसत्ताकाच्या सदरांत येईल.

आतां आपण या दोन्ही प्रकारच्या शासनसंस्थांच्या स्वरूपाचा विचार करूं. तात्त्विक दृष्ट्या या दोन्ही शासनसंस्था न्याय्य आहेत असें जर धरून चाललें तर त्यांच्यापैकीं कोणती निवडावी हा प्रश्न आवडीनिवडीवर अवलंबून राहील. एका-पेक्षां दुसरी चांगली आहे असें जर धरून चाललें तर जी अधिक चांगली आहे तिचा स्वीकार करण्याकडे आपल्या मनाचा कल होईल. परंतु या दोघांपैकीं एक जर साफ खोटी आहे, तिला अस्तित्वांत राहाण्याचाहि हक्क नाहीं असें जर असलें तर प्रश्नच निकालांत निघतो. कारण निवड या दोघांतच करावयाची असल्यामुळें उरलेल्या शासनसंस्थेला मत द्यावें लागतें.

सध्यां वेगानें पसरणाऱ्या क्रान्त्या आणि आतां चालू असलेलें युद्ध म्हणजे मानवी हक्कांच्या पायावर उभें असलेलें लोकसत्ताक आणि दडपशाहीवर उभें अस-लेलें राजसत्ताक यांच्यांतील संघर्ष आहे. आनुवंशिक राजसत्ताकाची कल्पना सरदारशाही, अमीरशाही इत्यादि अनेकविध रूपांनीं प्रकट होत असते. परंतु मूले कुठारः या न्यायानें अशा शासनपद्धतीला अस्तित्वाचा हक्क नाहीं हें मान्य केल्यावर हीं सर्व मायावी रूपें आपोआपच कोसळतात. ही पद्धति कोणतेंहि नांव धारण करून जरी राहिली तरी तिचें स्वरूप कायमच राहातें.

या उपोद्घातानंतर आतां मी आनुवंशिक सत्तापद्धतीच्या स्वरूपाकडे वळतों. सध्यांच्या काळाच्या दृष्टीनें या चर्चेला विशेष महत्त्व आहे. प्रातिनिधिक लोकसत्ता-काची पद्धति ही आधुनिक मानवाची निर्मिति आहे. आनुवंशिक सत्तापद्धतीच्या दुष्टत्वाविषयीं माझ्या मनांत जराहि शंका नाहीं आणि म्हणूनच मी निःशंकपणें

असें म्हणूं शकतों कीं युक्लिडच्या पुस्तकांतील प्रमेयें गणितशास्त्रानें जितकीं सिद्ध करतां येतील तितक्याच शास्त्रशुद्धपणें आनुवंशिक राजसत्ताकाला अस्तित्वाचा हक्क नाहीं हें सिद्ध करतां येईल. म्हणूनच जेव्हां एकाद्या माणसाकडून त्याला प्राप्त झालेली आनुवंशिक सत्ता आपण हिरावून घेतों तेव्हां खरें म्हणजे आपण ज्या गोष्टीचा त्याला मुळांतच अधिकार नव्हता आणि जिच्यावर कोणत्याहि परिस्थितींत कायदा मान्यतेचें शिक्कामोर्तब करूं शकणार नाहीं अशी गोष्टच काढून घेत असतों.

आनुवंशिक राजसत्ता विसंगतीच्या पायावर उभी आहे, त्याचप्रमाणें चांगली शासनसंस्था या पात्रतेस पोंहोचण्याची तिच्यांत क्षमता नाहीं याच कारणासाठीं येथवर आपण तिला विरोध केला. एकाद्या राष्ट्राचें सरकार ज्याला कसलाहि अनुभव नाहीं अशा एका अजाण पोराच्या किंवा शुद्ध मूर्खाच्या हातीं सोपविलें आहे यासारखी दुसरी हास्यास्पद गोष्ट आढळणार नाहीं. खरें म्हणजे हा राष्ट्रांतील अनुभवी, बुद्धिमान आणि चारित्र्यसंपन्न माणसांचा अपमान आहे.

आनुवंशिक राजसत्ताकाचे दोष काढण्यासाठीं म्हणून बसलें तर तिच्या चिंध्या करतां येतात. एक दोष डोळ्यांना दिसूं द्या कीं त्याच्या मागोमाग हजारों दोषांची यादी डोळ्यांपुढें उभी राहते. क्षुद्रता, बालिशता, वार्धक्य, कावेबाजी, चारित्र्य-शून्यता हे आणि असे अनेक दोष एकत्र येऊन आनुवंशिक राजसत्ताकाला हास्यास्पदतेचें प्रतीक बनवितात. ही पद्धति किती हास्यास्पद आहे त्याचा शोध घेण्याची जबाबदारी आतां वाचकांवरच सोपवून मी आनुवंशिक राजसत्तेला अस्तित्वाचा हक्क आहे किंवा नाहीं या अधिक महत्त्वाच्या प्रश्नाकडे वळतों.

या पद्धतीला अस्तित्वाचा हक्क आहे असें मानावयाचें म्हणजे तिला प्रारंभीं असा हक्क होता हें धरून चालावें लागतें. कारण असा हक्क प्रारंभीं असल्याखेरीज पुढें चालू रहाण्याचा संभव नाहीं. मग कोणत्या हक्कानें आनुवंशिक राजसत्ताकाचा प्रारंभ झाला? कोणत्याहि माणसानें या गोष्टीचा विचार केला असतां या प्रश्नाचें उत्तर सांपडत नाहीं असेंच त्याला आढळून येईल.

एकाद्या व्यक्तीला किंवा कुटुंबाला आनुवंशिक परंपरेनें राष्ट्रावर राज्य करण्याचा अधिकार आहे अशा तऱ्हेच्या विचारांतूनच रॉबेस्पिअरची दडपशाही फ्रान्समध्यें निर्माण झाली होती. रॉबेस्पिअरला जर आनुवंशिक परंपरेनें राज्य करण्याचा हक्क नव्हता तर इतरानांहि तो असणें शक्य नाहीं. इतरांना जर तो अधिकार असेल तर रॉबेस्पिअरला तो होता असें धरून चालावें लागेल. कोणत्याहि कुटुंबाला

आपण राष्ट्रांतील सर्व कुटुंबांपेक्षा जन्मतःच श्रेष्ठ आहोंत असें म्हणतां येणार नाहीं. कॅपेट, ग्युऐल्फ, रॉबेस्पिअर आणि मॅराट्स् या सर्वांनीं अशा तऱ्हेची सत्ता बळकाविण्याचा प्रयत्न केला. परंतु कोणालाही असा हक्क असूं शकत नाहीं ही गोष्ट निरपवाद आहे.

आनुवंशिक राजसत्ताकाला अस्तित्वाचा हक्कच नाहीं असें मानणें म्हणजे स्वातंत्र्याच्या दिशेनें टाकलेलें एक महत्त्वाचें पाऊल होय. आतां दुसरा मुद्दा अशा तऱ्हेच्या राज्यपद्धतीला एकदां योगायोगानें सुरुवात झाल्यानंतर पुढें काळाच्या ओघाबरोबर तिला अस्तित्वाचा हक्क प्राप्त झाला असेल काय, हा होय.

परंतु असें मानणें चुकीचें ठरेल. कारण त्यामुळें आपण विशिष्ट तत्त्वापेक्षां काळ श्रेष्ठ आहे किंवा काळ म्हणजेच तत्त्व असें आपल्याला मानावें लागतें. वास्तविक सत्यस्थिति अशी आहे कीं काळाचा तत्त्वावर परिणाम होत नसून तत्त्वाचाच परिणाम काळावर होत असतो. एकाद्या चुकीच्या गोष्टीचा आरंभ हजार वर्षांपूर्वी झाला काय किंवा आज झाला काय ती गोष्ट सारखीच चुकीची ठरते आणि जी गोष्ट आज योग्य आहे तिच्यामागें हजारों वर्षांची मान्यता उभी असते. तत्त्व हें शाश्वत असतें. काळाच्या आघातानें त्याच्या स्वरूपांत कधींहि बदल होत नाहीं. पण हा हजारों वर्षांचा हिशोब करून आपला फायदा काय ? आपलें आयुष्य मर्यादित असतें. आपल्याला कळूं लागल्यापासून एकादी गोष्ट चुकीची आहे असें जर आपल्याला आढळून आलें तर ती गोष्ट पूर्वी असो किंवा नसो तिला विरोध करण्याचा आपल्याला हक्क आहे.

कोणत्याहि कुटुंबाला आनुवंशिक परंपरेनें जनतेवर राज्य करण्याचा हक्क निसर्गतः प्राप्त झालेला नव्हता. काळाच्या ओघाबरोबरहि असा अधिकार त्या कुटुंबाला प्राप्त झालेला नव्हता. आणि म्हणूनच एखाद्या कुटुंबाला वंशपरंपरेनें राज्य करण्याचा कायदा पास करण्याचा इंग्लंडला अधिकार आहे काय ? नाहीं असेंच याला माझें उत्तर आहे. एखाद्या राष्ट्रानें जर असा कायदा केला तर तो त्या काळांतील कायद्यानें अजाण असलेल्या सर्व माणसांशीं आणि भावी पिढ्यांशीं केलेला द्रोह होय असेंच म्हटलें पाहिजे.

आतां मी अशा कायद्यामुळें कायद्यानें अजाण असलेल्यांवर व भावी पिढ्यावर कसा अन्याय होतो तें दाखविणार आहे.

राष्ट्र असें म्हणतांना नवजात बालकापासून तो मृत्युपंथाला लागलेल्या म्हाताऱ्या-

पर्यंत सर्व माणसांची त्यांत गणना करावी लागते. या माणसांचें कायद्याप्रमाणें सज्ञान असलेल्यांचा व दुसरा अज्ञान असलेल्यांचा असे दोन भाग करतां येतील. प्रत्येक देशांतील हवामानाप्रमाणें माणसांची आयुर्मर्यादा कमी अधिक असते. परंतु सर्वसामान्यतः कोणत्याहि देशांत कायद्याप्रमाणें अज्ञान असलेल्यांची संख्या सज्ञान असलेल्या लोकांपेक्षा अधिक असते—आणि एकवीस वर्षांपेक्षां कमी वय असलेलीं माणसें एकवीसहून अधिक असलेल्या माणसांपेक्षा संख्येनें अधिक असतात. जें तत्त्व मला मांडावयाचें आहे त्यासाठीं हा कमीअधिक लोकसंख्येचा प्रपंच करण्याची आवश्यकता नाहीं. परंतु या 'अज्ञान' असलेल्यांची बाजू जरा अधिक जोरानें मांडतां यावी एवढ्याचसाठीं संख्येचा आधार घ्यावयाचा. हीं अज्ञान माणसें जरी अल्पसंख्य असतीं तरी तत्त्वाला मुळींच बाध आला नसता.

वयांत आलेल्या माणसाइतकेंच वयांत न आलेल्या माणसाचे हक्क पवित्र असतात. या दोघांत फरक असतो तो वयाचा, हक्काचा नव्हे. दोघांनाहि सारखे हक्क असतात आणि म्हणूनच कायद्याप्रमाणें वयांत न आलेलीं माणसें सज्ञान होईपर्यंत त्यांच्या हक्कांच्या वारशाची अत्यंत काळजीपूर्वक जपणूक केली पाहिजे. या हक्कांची जपणूक करण्याची जबाबदारी कायद्याप्रमाणें जे सज्ञान आहेत त्यांच्यावर येऊन पडते. या वयांत न आलेल्या माणसांचे हक्क ती हिरावून घेऊं शकत नाहीं. वयानें वडील असल्यामुळें त्यांच्या हातांत कायदे करण्याचा अधिकार जरी असला तरी कोणत्याहि व्यक्तीला वा कुटुंबाला आनुवंशिक परंपरेनें राज्य करण्याचा अधिकार ते देऊं शकत नाहींत. कारण असा अधिकार देणें म्हणजे त्यावेळीं कायद्याच्या दृष्टीनें जे अज्ञान असतील त्यांचा हक्क हिरावून घेणें होय. ही पिढी अज्ञान असतांना त्यांच्यावर अशा तऱ्हेनें लादलेल्या शासनसंस्थेला ती मान्यताहि देऊं शकत नाहीं किंवा विरोधहि करूं शकत नाहीं. ही पिढी अशा तऱ्हेचा कायदा होण्याच्या वेळीं जर सज्ञान असती तर या कायद्याला विरोध करण्याचा तिला हक्क असता ही गोष्ट सर्वमान्य व्हावी. मग कोणत्याहि कायद्यानें ही पिढी सज्ञान झाल्यानंतरचा तिचा चर्चाधिकारच जर हिरावून घेतला जात असेल तर तो कायदा मूलभूत मानवी हक्कावर आक्रमण करणारा असला पाहिजे आणि म्हणूनच कोणत्याहि पिढीला असा कायदा करण्याचा हक्क नाहीं.

आतां मी आनुवंशिक राजसत्ताकविषयीं थोडेंसें बोलणार आहे. अशा तऱ्हेच्या राजसत्ताकाला मान्यता देणाऱ्या कायद्यानें वयांत न आलेल्या पिढीवर जसा

अन्याय होतो तसा तो भावी पिढ्यांवरहि होतो. कोणत्याहि राष्ट्राला भावी पिढ्यावर असा जुलूम करण्याचा अधिकार नाहीं हें मला येथें दाखवावयाचें आहे.

प्रत्येक राष्ट्रांत एका पिढीमागून दुसरी पिढी असा सतत क्रम चालत असतो. प्रत्येक दिवशीं नवे जन्म होतात आणि वृद्ध माणसें या जगाच्या रंगभूमीवरून निघून जात असतात. पिढ्यापिढ्यांच्या या प्रवाहांत कोणत्याहि विशिष्ट पिढीला इतरांपेक्षां अधिक हक्क आहेत असें म्हणतां येणार नाहीं. अशा तऱ्हेचे अधिक हक्क जगांत कोणत्या तरी एका शतकांत होते या गोष्टीवर आपण विश्वास ठेवूं शकूं काय ? त्याचें कारण आपण दाखवूं शकूं काय ? तसें सिद्ध करण्याचा पुरावा आणूं शकूं ? ही श्रेष्ठता कोणत्या निकषावर ठरविणार ?

थोड्याशा विचारानंतर आपणाला असें आढळून येईल कीं आपल्या प्रमाणेंच आपल्या पूर्वजांनाहि अधिकार होते. परंतु हे अधिकार कोणत्याहि पिढीची खाजगी मालमत्ता होऊं शकत नाहींत. या हक्कांचा वारसा सार्वकालिक आणि सर्व मानवजातीचा आहे. हें ज्याला पटत नाहीं तो जुलमशहा तरी असला पाहिजे किंवा गुलाम तरी असला पाहिजे. जो गुलाम असेल तो आपल्या पूर्वीच्या पिढीला आपले हक्क हिरावून घेण्याचा अधिकार आहे असें मानणार आणि भावी पिढ्यांचें हक्क बळकावण्याचा आपल्याला अधिकार आहे अशी जुलमशहाची भीति असणार.

येथें विषयप्रतिपादन करीत असतांना पिढी हा शब्द मीं अनेकदां वापरला आहे. तेव्हां पिढी या शब्दाचा नेमका कोणता अर्थ मला अभिप्रेत आहे हें सांगणें विषयाला सोडून होणार नाहीं असें मला वाटतें.

सर्वसामान्यतः पिढी म्हटल्यानंतर बाप, मुलगा, नातू असा क्रम आपल्या डोळ्यांसमोर उभा रहातो. परंतु मी येथें पिढी हा शब्द जे कायद्याप्रमाणें सज्ञान म्हणजे एकवीस वर्षें वयाचे किंवा त्याहून मोठे आहेत त्यांना उद्देशून वापरला आहे. यांच्याशिवाय उरलेले लोक कायद्याप्रमाणें अज्ञान असतात. तात्पर्य, अज्ञान असलेलीं हीं माणसें कायदेशीर रीत्या सज्ञान व बहुसंख्य होईपर्यन्त म्हणजे अंदाजें चौदा ते एकवीस वर्षें ही सज्ञान पिढी अधिकारारूढ असते.

उदाहरणार्थ फ्रान्समध्यें सध्यां बारा दशलक्ष पुरुष आणि बारा दशलक्ष स्त्रिया असे एकूण चौवीस दशलक्ष लोक आहेत असें आपण समजूं. या बारा दशलक्ष पुरुषांपैकीं सहा दशलक्ष पुरुष कायदेशीर दृष्ट्या सज्ञान असतील. ही सहा दशलक्ष सज्ञान माणसें राज्य करतील. पिढीचें हें चक्र असें चालू राहील.

अशा तऱ्हेनें एका पिढीनंतर दुसरी पिढी अधिकारावर येत असते. या दोघां-नाहि समान हक्क असतात. म्हणजेच कोणालाहि आनुवंशिक राजसत्ताक स्थापण्याचा हक्क नसतो. कारण असा हक्क बळकावणारी पिढी अनेक काळपर्यन्त भावी पिढ्यांवर आपणच राज्य करूं अशा दुराग्रहानें पछाडलेली असते. प्रत्येक पिढीला आपापल्या अमदानींत स्वतंत्रपणें जगण्याचा आणि निर्णय घेण्याचा हक्क असलाच पाहिजे. आपण मेल्यानंतरही भावी पिढ्यावर राज्य गाजवूं असें म्हणणें हा जुलुमीपणाचा कळस आहे. एक माणूस दुसऱ्या पिढीची कधींहि खाजगी मालमत्ता होऊं शकत नाहीं. परंतु इंग्लिश पार्लमेंटचा इतिहास मात्र दुर्दैवानें असें घडल्याचें सांगतो. हें उदाहरण म्हणजे कायदेविषयक अज्ञानाचें आणि तत्त्वशून्यतेचें जगांतील चिरस्मरणीय प्रतीक आहे. हा दुष्ट इतिहास असा आहे: १६८८ सालीं इंग्लिश पार्लमेंटानें हॉलंडमधल्या विल्यम आणि त्याची बायको मेरी यांना इंग्लंडच्या गादीवर बसविलें, आणि एका ठरावान्वयें आम्ही तुम्हांला आमच्यावर आणि सर्व भावी पिढ्यांवर वंशपरंपरेनें राज्य करण्याचा अधिकार देतों असें लिहून दिलें.

बर्कनें राजसत्ताकाचें समर्थन करतांना याच ठरावाचा आधार घेतला आहे. येथें अशा तऱ्हेचा कायदा करणाऱ्या लोकांच्या केवळ अज्ञानाची कींव करून भागणार नाहीं; त्यांच्या तत्त्वशून्यतेवर आपल्याला नेमकें बोट ठेवतां आलें पाहिजे. १७८९ सालीं फ्रान्सनें असाच मूर्खपणा केला आणि त्या वर्षी कायदा करून कॅपेट्स् कुटुंबाला आनुवंशिक परंपरेनें राज्य करण्याचा हक्क देऊन टाकला.

प्रत्येक राष्ट्रांतील सज्ञान पिढीला आपल्या अमदानींत स्वतःला योग्य वाटेल त्या प्रकारची शासनसंस्था स्थापण्याचा अधिकार आहे हें निर्विवाद. परंतु आपल्याला हवी असलेली शासनसंस्था भावी पिढ्यांवर लादणें हा न्याय कोठला ? आनुवंशिक राजसत्ताक हा असाच अन्याय्य प्रकार आहे. जे अज्ञान आहेत किंवा जे अजून जन्मलेलेही नाहींत त्यांच्यावर कोठल्याहि प्रकारचें सरकार लादणें हा त्यांच्याशीं द्रोहच करणें नव्हे काय ?

आतां मी आनुवंशिक राजसत्ताकापेक्षां तुलनात्मक दृष्ट्या प्रातिनिधिक लोक-सत्ताक कसें श्रेष्ठ आहे हें सिद्ध करण्याचा प्रयत्न करतों. अकरणात्मक दृष्ट्या विचार करावयाचा असल्यास, आनुवंशिक राजसत्ताकास अस्तित्वाचा हक्क नाहीं असें म्हटल्यानंतर, प्रातिनिधिक लोकसत्ताकाचीच निवड केली पाहिजे हें ओघानेंच येते.

प्रातिनिधिक लोकसत्ताकाचा उगम नेमका कोठें आहे याचें मुळींच कोडें पडत नाहीं. त्याचा उगम डोळ्यांपुढें स्पष्ट दिसतो. स्वतः मनुष्यच त्या हक्काचा उगम आहे आणि तोच त्याचा पुरावा आहे. जन्मतःच तो हक्क त्याला प्राप्त झालेला असतो.

हक्कांची समानता हाच प्रातिनिधिक लोकसत्ताकाचा सच्चा पाया आहे. प्रत्येक माणसाला आपला शासनसंस्थेंतील प्रतिनिधि कोण असावा हें निवडण्याचा हक्क आहे. मतदानाचा हा हक्क श्रीमंत गरीबांपासून किंवा गरीब श्रीमंतापासून हिरावून घेऊं शकत नाहीं. जेव्हां असा प्रयत्न केला जातो तेव्हां तो न्यायाचा प्रकार नसून दडपशाहीचा असतो. एका माणसाला दुसऱ्या माणसाचा हक्क हिरावून घेण्याचा हक्क कसा पोंहोचेल? कारण मग ह्या दुसऱ्या माणसालाहि याचे हक्क हिरावून घेण्याचा अधिकार असलाच पाहिजे.

सध्यांची सरदारशाही हक्कांच्या बाबतींत विषमतेवर उभी आहे. परंतु ही विषमता निर्माण करण्याचा हक्क या लोकांना दिला कोणी? गरीब असो वा श्रीमंत असो, ते एकमेकांना आपले हक्क हिरावून अधिकार देणेंच शक्य नाहीं. असे हक्क देणें म्हणजे दरवडेखोरीला मान्यता देणें होय. प्रत्येक व्यक्तीचे मूलभूत मानवी हक्क ही एक अत्यंत पवित्र वस्तु आहे—आपला प्रतिनिधि निवडणें हाही मूलभूत हक्क आहे. जो मनुष्य आपल्या संपत्तीचा उपयोग दुसऱ्याची संपत्ति किंवा हक्क बळकावण्यासाठीं करतो, तो दरवडेखोर आहे असेंच म्हटलें पाहिजे.

विशिष्ट हितसंबंध असलेला समाजांतील एक वर्ग दुसऱ्या वर्गाला लुबाडण्यासाठीं जेव्हां एकत्र येतो तेव्हां विषमतेचा पाया घातला जातो. ज्यांच्याजवळ विशिष्ट धन आहे, किंवा अमुक एक मालमत्ता आहे अशाच लोकांना मतदानाचा हक्क आहे असा जर कायदा एकाद्या देशांत झाला तर त्या देशांतील हितसंबंधी धनिकांनीं गरिबांना लुबाडण्यासाठीं हातमिळवणी केली आहे असें समजावें.

कोणत्याहि परिस्थितींत मालमत्ता हा मतदानाच्या हक्काचा निकष ठरविणें हें अन्याय्य आणि धोक्याचें आहे. अशा तऱ्हेनें आपल्या मूलभूत हक्कांना वंचित झालेले लक्षावधि लोक बंड करून प्रस्थापित सरकार उलथून टाकल्याशिवाय रहाणार नाहीं. धनिकशाहीचा हा धोका टाळण्यासाठीं थोडीशी मालमत्ता हा मतदानाच्या हक्काचा निकष करावा असें कांहींचें म्हणणें. परंतु हें देखील स्वातंत्र्याला घातक ठरेल. कारण त्यामुळें व्यक्तिजीवनांतील अनेक अनपेक्षित घटना

अनुक्रम क्रमांक ... नों: दि: ...

हाच मानवी हक्कांचा अत्यंत अस्थिर असा पाया होऊन बसेल. असें समजा कीं एका शेतकऱ्याकडे एक खेंचर आहे. मतदानासाठीं कमींत कमी आवश्यक असलेली मालमत्ता एवढी त्या खेचराची किंमत असल्यामुळें शेतकऱ्याला मतदानाचा हक्क प्राप्त होतो किंवा उद्यां जर तें खेंचर मेलें तर त्याचा मतदानाचा अधिकार नष्ट होतो. अशा परिस्थितींत मतदानाच्या हक्काचा उगम कोणांत आहे असें समजावयाचें? त्या शेतकऱ्यांत कीं त्या खेंचरांत? कसलेहि गुण नसतांना एकादा मनुष्य मोठ्या मालमत्तेचा धनी झालेला आपण पाहातों. त्याचप्रमाणें कसलाहि गुन्हा नसतांना एकादा मनुष्य निर्धनहि झालेला आपण पाहातों. आणि म्हणूनच मालमत्ता हा मतदानाच्या हक्काचा निकष ठरविण्याची कल्पना सोडून दिली पाहिजे. सधनता हा जसा चारित्र्याचा पुरावा नाहीं त्याप्रमाणेंच निर्धनता हें चारित्र्यहीनतेचें गमक नव्हे. उलट पुष्कळ वेळां सधनता हा अप्रामाणिकपणाचा आणि निर्धनता हा निष्पापतेचा अप्रत्यक्ष पुरावाच असतो आणि म्हणूनच मालमत्ता हा मतदानाच्या हक्काचा निकष ठरवितांना ती मालमत्ता कोणत्याहि माणसानें कोणत्या मार्गानें मिळविली हीहि अपरिहार्य कसोटी मानावी लागेल.

जो मनुष्य दुसऱ्याचे हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न करतो त्याला शिक्षा म्हणून कांहीं काळ त्याचे हक्क स्थगित करतां येतील. ही एक बाब सोडल्यास कोणालाहि दुसऱ्याचे हक्क हिरावून घेण्याचा अधिकार नाहीं. आपला राज्यकर्ता प्रतिनिधि निवडण्याचा हक्क हा अत्यंत महत्त्वाचा हक्क आहे. कारण या हक्कामुळेंच इतर हक्कांचें संरक्षण होत असतें. हा हक्क हिरावून घेणें म्हणजे माणसावर गुलामगिरी लादणेंच होय. आणि म्हणूच दुसऱ्याची मालमत्ता लुटणें हा जसा गुन्हा आहे तसाच दुसऱ्याचा मतदानाचा हक्क हिरावणें हाहि आहे.

माणसाचे हक्क आणि त्याचीं कर्तव्यें या गोष्टी परस्पर संलग्न असतात. मला कांहीं हक्क आहेत याचाच अर्थ असा कीं दुसऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करणें हें माझें कर्तव्य आहे. या कर्तव्याला मुकणें म्हणजेच आपले हक्क घालवून बसणें होय.

राजकीय दृष्ट्या ज्या शासनसंस्थेवर लोकांचा विश्वास असतो तीच शासनसंस्था बळकट असते. आणि म्हणूनच सर्वांना समान हक्क देऊन शासनसंस्था लोकविश्वासाला पात्र करणें हेंच योग्य धोरण होय. कारण विषमतेच्या पोटीं फार मोठा धोका असतो. माणसांचा मताधिकार हिरावून घेतां येईल. परंतु आपले

हक्क हिरावून घेणाऱ्यांच्या विरुद्ध बंड करण्याचा त्यांचा अधिकार हिरावून घेतां येणार नाहीं. जेवढ्या प्रमाणांत जनतेचे हक्क हिरावून घेतले जातील तेवढ्या प्रमाणांत बंडाची शक्यता अधिकाधिक प्रबळ होत जाते. लोकांवर राज्य करण्याचा शासनसंस्थेला स्वयंभू अधिकार असतो, शासनसंस्थेच्या बाबतींत मत देण्याचा जनतेला कसलाहि अधिकार नाहीं, अशा तऱ्हेच्या समजुती लोकांत प्रचलित होत्या तेव्हां त्यांच्यावर राज्य करणें सोईचें होतें. परंतु आतां काळ बदलला आहे. जनतेच्या पायांतल्या अज्ञान आणि अंधश्रद्धा यांच्या बेड्या तुटल्या आहेत. तिच्यावर होणाऱ्या अन्यायाची तिला जाणीव झाली आहे. आपल्याशिवाय राष्ट्रांत संपत्तीची निर्मिति होणें अशक्य आहे. याचें जनतेला आतां भान आलें आहे. अशा जागरूक झालेल्या जनसमुदायावर पूर्वीसारखें दडपून राज्य करणें आतां शक्य नाहीं. जुलमी राज्यकर्त्यांचा कावा जनतेला आतां पुरेपूर कळल्यामुळें तिच्या डोळ्यांत धूळफेंक करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे आपलें मरणच ओढवून घेणें होय.

कौशल्य, मेहनत करण्याची शक्ति, शिस्त आणि मितव्यय, सुदैवानें मिळणारी योग्य संधि इत्यादि गोष्टींमुळें एखादा मनुष्य श्रीमंत होऊं शकतो. त्यामुळें मालमत्तेच्या बाबतींत विषमता नेहमींच राहाणार हें उघड आहे. कांहीं माणसें धन मिळविणें हेंच डोळ्यांसमोर ठेवतात. कायदेबाह्य मार्गांनीं न जातां जितका म्हणून पैसा मिळवितां येईल तेवढा मिळवावा अशी यांची अपेक्षा असते. याच्या उलट कांहीं माणसें अशीं असतात कीं गरजा भागण्यापुरता पैसा मिळाल्यानंतर अधिक धनसंग्रह करण्याच्या नादाला तीं लागत नाहींत. कायदा न मोडतां प्रामाणिकपणें धन जोडावें हें रास्त आहे. परंतु आपल्या संपत्तीचा उपयोग दुसऱ्याचे हक्क हिरावून घेण्यासाठीं करणें हा मात्र गुन्हा होय.

बँकेसारख्या अर्थव्यवहार करणाऱ्या संस्थेची कार्यकारिणी जेव्हां निवडली जाते तेव्हां मालमत्ता हा एकमेव निकष मानला जातो. जे अधिक पैसा उभारतात त्यांना अधिक हक्क हाच येथें कायदा असतो. परंतु प्रातिनिधिक लोकसत्ताकांत मात्र मालमत्ता ही हक्कांची कसोटी होऊं शकत नाहीं. कारण ही शासनसंस्था राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीचा, तिच्याजवळ मालमत्ता असो वा नसो, मतदानाचा हक्क मान्य करीत असते. मालमत्ता बाळगणें हा व्यक्तीच्या अनेक हक्कांपैकीं एक आहे. परंतु शासनसंस्थेच्या संस्थापनेसाठीं हा हक्क आवश्यक नसतो.

मालमत्तेच्या सुरक्षिततेपेक्षांहि व्यक्तीच्या जीवनाची सुरक्षितता अधिक महत्त्वाची असते. व्यक्तीच्या उदरनिर्वाहाचा व्यवसाय हा त्याच्या मालमत्तेचाच एक भाग असतो. मालमत्तेप्रमाणेंच आपल्या या व्यवसाय करण्याच्या हक्काचें संरक्षण झालें पाहिजे.

समाजांतील सर्व व्यक्तींना समान हक्क देणें हाच संघर्ष टाळण्याचा आणि सर्वांच्या मालमत्तेचें संरक्षण करण्याचा एकमेव मार्ग आहे. सर्वांचे हक्क सुरक्षित असले म्हणजे पर्यायानें सर्वांची मालमत्ता सुरक्षित रहाते. परंतु मालमत्तेचा उपयोग जेव्हां इतरांचें हक्क हिरावून घेण्याकडे केला जातो तेव्हां हें कृत्य मालमत्ता बाळगण्याच्या मूळ हक्कावरच गदा आणणारें ठरतें. हुद्देशाही हा असाच दुसऱ्यांचे हक्क हिरावून घेण्याचा एक प्रकार आहे. निसर्ग कांहीं माणसांना मोठेपणाची देणगी देत असतो. ॲरिस्टॉटल, सॉक्रेटिस, प्लेटो हीं अशीं निसर्गसिद्ध मोठीं माणसें होत. परंतु हुद्देशाही अंगभूत नसलेला मोठेपणा माणसावर लादीत असते. हा सरदार, तो दरकदार असे मोठेपणाचे हुद्दे निर्माण करून शासनसंस्था ही हुद्द्यांचा कारखाना बनते. हा सर्व मोठेपणा एकजात नकली असतो. शहाणीं माणसें निर्माण करण्याचा कारखाना काढण्याइतकेंच हें हास्यास्पद आहे. सरदारशाहीचा जन्म अशा लादलेल्या मोठ्या नकलीपणांतूनच झाला. पोरवयांतला मूर्खपणा म्हणून या गोष्टीकडे पाहिलें तरच तिचा कलंक कमी होण्याची शक्यता आहे. दिखाऊपणा हा अत्यंत उथळ असल्यामुळें आपण त्याला क्षुल्लक समजून त्याच्याकडे कानाडोळा करतो. हुद्देशाहीच्या दिखाऊपणाकडे या दृष्टीनें पाहिलें तरच तिला क्षमा करतां येईल. परंतु या हुद्देशाहीचा उगम दिखाऊपणापेक्षां कितीतरी अधिक भयंकर होता. सरदार-शाही ही तिच्या जन्मकाळीं शुद्ध दरवडेखोरी होती. आजचे सरदार, दरकदार हे राजाचे लाचार खुषमस्करे आहेत. परंतु पूर्वींचे सरदार हे शुद्ध लुटारू होते. इंग्लंडमधल्या (त्याप्रमाणें इतर देशांतीलहि) खाजगी मालकीच्या सर्व जमिनी एके काळीं इंग्लंड जिंकला गेला त्यावेळीं त्यांच्या अगदीं मूळ मालकांकडून हिसकावून घेतल्या आहेत. नाहींतर एवढी मोठी जमिनदारी प्रामाणिक मार्गानें मिळविणें असंभवनीय आहे. लुटारूपणा करूनच ती मिळवितां येईल. ही जमिन-दारी कोणत्याहि कायदेशीर मार्गानें मिळविलेली नाहीं हें उघड सत्य आहे. हे सरदारशाही ! तुझे पूर्वज लुटारू होते हें ऐकून तुझी मान शरमेनें खालीं जावो !!

अशा रीतीनें लुटालूट करून मिळविलेल्या या संपत्तीला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून या लुटारूंनीं मोठमोठे हुद्दे धारण केले. लुटारूंची ही नेहमीं पद्धत आहे. लूट मारून झाल्यानंतर आपलीं खरीं नांवें धारण करून ते कधींच राहात नाहींत.

सन्मार्गानें मिळविलेल्या मालमत्तेचें रक्षण जसें सर्वांना समान हक्क दिल्यामुळें होते त्याप्रमाणें लुटीनें मिळविलेल्या मालमत्तेचे रक्षण दुसऱ्याचे हक्क हिरावून होतें. दुसऱ्याची मालमत्ता लुटून झाल्यानंतर आपल्याजवळ ती सुरक्षित राहाण्यासाठीं त्याचे इतर हक्कहि हिरावून घेणें लुटारूंना आवश्यक वाटूं लागते. लुटारू कायदे करतो तेव्हांच त्याला आपण सुरक्षित आहोंत असें वाटूं लागतें. इंग्लंडच्या शासन-संस्थेचा सरदारसभा हा घटक एके काळीं असाच लुटारूंचा वर्ग होता. या लुटारूंनीं आपल्या लुटीचें संरक्षण करण्यासाठीं सरदारसभा या नांवाची संघटना स्थापन केली.

सरदारशाही गुन्हेगारींतून जन्माला आली आहे हें आपण पाहिलें. समाजाच्या नैतिकतेवर आणि भौतिक सामर्थ्यावरहि या सरदारशाहीचा अत्यंत विघातक परिणाम होत असतो. गुलामगिरीप्रमाणेंच ही सरदारशाही समाजाच्या कर्तृत्वशक्तीचें पंख कापून टाकते. हुद्देशाहींत सुख मानणारीं माणसें थोर असूं शकतील हें केवळ अशक्य आहे. म्हणूनच क्रांतीची प्रगति होत असतांना आणि जोंपर्यंत या नव्या कल्पना समाजात खोलवर रुजल्या नाहींत तोंपर्यंत या नव्या मूल्यांच्या चिंतनानें आपली राष्ट्रभक्ति जिवन्त ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. एखाद्या गोष्टीचें स्वरूप यथार्थतेनें समजण्यासाठीं तिच्या उगमापर्यंत जाणें भाग असतें. हा उगम एकदां ध्यानांत आला म्हणजे त्या गोष्टीचें विस्मरण सहसा पडत नाहीं. मानवी हक्कांच्या उगमाविषयीं विचार केला असतां हे हक्क म्हणजे एका व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्तीला किंवा एका वर्गानें दुसऱ्या वर्गाला दिलेली देणगी नव्हे हें सहज ध्यानांत येतें. कारण अशी देणगी देण्याचा हक्क कोठल्याही व्यक्तीला किंवा वर्गाला आला कोठून? मानवी हक्कांची घोषणा म्हणजे त्यांची निर्मिति किंवा दान नव्हे; ती फक्त ज्या तत्त्वावर हे हक्क अधिष्ठित आहेत त्या तत्त्वांचा जाहीरनामा होय. कारण प्रत्येक नागरिक हक्काला निसर्गसिद्ध हक्काची बैठक असते आणि माणसांनीं परस्परांच्या हक्कांचें संरक्षण केलें पाहिजे हें तत्त्व त्यांत अंतर्भूत असतें. माणसाला त्याचे मूलभूत हक्क त्याच्या अस्तित्वाबरोबरच निसर्गतःच प्राप्त झालेले असतात आणि म्हणूनच सर्वांना समान हक्क असले पाहिजेत. समान हक्कांचें हें तत्त्व असें सरळ

आणि स्वच्छ आहे. प्रत्येक माणसाला हें सहज समजूं शकेल. आपल्या हक्कांविषयीं ज्ञान प्राप्त करून घेतल्यानेंच तो खऱ्या अर्थानें कर्तव्यतत्पर बनूं शकेल. कारण ज्या समाजांत सर्वांना समान हक्क असतात त्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीची आपल्या हक्कांइतकेंच दुसऱ्याच्या हक्कांचें जागरूकतेनें संरक्षण करणें ही जबाबदारी आहे. परंतु राज्यघटना तयार करतांना या मूलभूत तत्त्वांना हरताळ फांसला तर अनंत अडचणींच्या चक्रव्यूहांत आपण अडकले जाऊं आणि त्याच्यांतून आपल्याला कधींही बाहेर पडतां येणार नाहीं. माणसांमाणसांतील भेद कोठवर ताणीत नेणार ? एकाच राष्ट्रांतील कांहीं माणसांनीं स्वतंत्र असावें आणि कांहींनीं गुलाम असावें हें आपण कोणत्या तत्त्वाच्या आधारें निश्चित करणार ? संपत्ति हा जर निकष येथें मानला तर स्वातंत्र्याच्या नैतिक तत्त्वांपासून आपण ढळलों असाच त्याचा अर्थ होईल. कारण असें करणें म्हणजे जड वस्तूला अधिकार देऊन माणूस हा त्या जड वस्तूचें साधन करणें होय. अशानें आपण युद्ध आणि संघर्ष यांचीच पेरणी करूं. आपण संपत्तीचा उपयोग दुसऱ्याचे मूलभूत हक्क हिरावून घेण्यासाठीं करणें म्हणजे त्यांच्यावर सशस्त्र दरवडा घालणेंच होय. निसर्गतः सर्व माणसांना समान हक्क प्राप्त झालेले असले तरी व्यक्तीव्यक्तीच्या सामर्थ्यांत फरक असतो. जे दुर्बळ आहेत ते समर्थांपासून आपलें संरक्षण करूं शकत नाहींत. आणि म्हणूनच हक्कांच्या समानतेनें शक्तींचा समतोल राखून हक्कांच्या समानतेचें संरक्षण करण्यासाठीं समाज ही संस्था जन्माला येत असते. राष्ट्रांतील कायद्यांचेंहि—ते योग्य असतील तर—हेंच उद्दिष्ट आहे.

प्रत्येक मनुष्य संरक्षणासाठीं स्वतःच्या सामर्थ्यापेक्षांही कायद्यावरच अधिक विसंबून असतो आणि म्हणूनच राष्ट्रांतील सर्व व्यक्तींना त्यांच्यावर राज्य करणारी शासनसंस्था आणि कायदे निर्माण करण्याच्या बाबतींत समान हक्क आहेत. फ्रान्स आणि अमेरिका यांच्यासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशांत आपल्या निवडलेल्या प्रतिनिधींच्या व्दारें जनता हे हक्क बजावीत असते. प्रातिनिधिक लोकसत्ताकाचा जन्म यांतूनच होत असतो.

येथवर केलेल्या विवेचनांत मीं तात्त्विक चर्चेवरच सर्व भर दिला होता. आतां मला तत्त्वांकडून मतांकडे वळावयाचें आहे. तत्त्व आणि तपशीलाविषयीं मतें याच्यांतील फरक लक्षांत घेणें आवश्यक आहे. सर्व माणसांना समान हक्क आहेत हा प्रश्न मताचा नसून मूलभूत हक्काचा, तत्त्वाचा आहे. समाज कोणालाहि अशा

हक्कांचें दान करीत नसतो. मनुष्याला निसर्गतःच प्राप्त झालेल्या हक्कांचें तो संरक्षण करतो. मोठी लोकसंख्या असलेल्या देशांत प्राथमिक लोकशाही अपुरी पडत असल्यामुळें आपल्या प्रतिनिधींच्या द्वारें जनतेस आपले हक्क बजावावे लागतात. आणि म्हणूनच तेथें प्रातिनिधिक लोकसत्ताक हीच एकमेव शासनसंस्था ठरते. परंतु प्रत्यक्ष शासनसंस्था स्थापतांना तिच्या वेगवेगळ्या घटकांचें संघटन कोणत्या पद्धतीनें करावें याबाबत मतें आणि मतभेद असूं शकतात. या सर्व घटकांना समान हक्काच्या तत्त्वाचें अधिष्ठान असलें म्हणजे झालें. या तत्त्वाचें धार्मिक वृत्तीनें पालन केलें असतां जेथें मतभेदांचा प्रश्न येतो अशा क्षेत्रांत फारशा चुका होणार नाहींत आणि झाल्याच तर त्या अधिक काळ टिकणार नाहींत.

मतभेदांच्या बाबतींत बहुसंख्याकांचा निर्णय अल्पसंख्याकांनीं मानावयाचा हा एक सामाजिक करारच असतो. हा करार समान हक्कांच्या तत्त्वाशीं सुसंगत आहे. कारण एक म्हणजे येथें प्रत्येक माणसाचा मत देण्याचा हक्क मानला जातो, पण कोणत्याहि एका माणसाचें मत हेंच सर्व समाजाला प्रमाण अशी एकतंत्री दंडेली मात्र मुळींच नसते. दुसरें असें कीं कोणत्याहि प्रश्नाच्या बाबतींत मत देणारी व्यक्ति बहुसंख्याकांच्या गटांत जाईल कीं अल्पसंख्याकांच्या गटांत जाईल हें आधीं सांगणें शक्य नसतें. एकाद्या प्रश्नाच्या बाबतींत ती बहुमत असणाऱ्या गटांत जाऊं शकेल तर दुसऱ्या एका प्रश्नावर मत देतांना तिला अल्प मताच्या गटांत जाणें भाग पडेल. आपण आपलें बहुमत झालें असतांना ज्याप्रमाणें अल्प मताच्या लोकांनीं आपला निर्णय मान्य करावा अशी आपली अपेक्षा असते त्याप्रमाणें आपला गट अल्पमताचा ठरल्यानंतर ज्यांचें बहुमत झालें असेल त्यांचा निर्णय मान्य करणें हें आपण आपलें कर्तव्य मानलें पाहिजे.

फ्रान्समधील संघर्षांचा वणवा समान हक्कांचें तत्त्व पायदळीं तुडवल्यामुळेंच पेटला. अल्पमताच्या गटांनीं शिरजोरी करून तेथें बहुसंख्यांचें मत धाब्यावर बसविलें. या अल्पमताच्या गटांत जसे धनिक होते तसे साधे लोकहि होते. म्हणूनच हा सर्व पूर्वानुभव जमेस धरतां संपत्ति हा जसा चारित्र्याचा निकष मानतां येत नाहीं तसा तो हक्कांचाहि मानतां येणार नाहीं.

कधीं कधीं असेंहि होण्याची शक्यता आहे कीं बहुमताचें म्हणणें चूक असून अल्पमताचेंच म्हणणें न्याय्य असेल. परंतु अल्पमताची न्याय्य बाजू जसजशी जनतेला पटत जाईल तसतसें अल्पमताचें बहुमतांत रुपांतर होत जाईल आणि

मत स्वातंत्र्य, समान हक्क यांच्यामुळें अत्यंत शांततापूर्ण मार्गानें बहुमताच्या गटानें पूर्वी केलेली चूक सुधारली जाईल. म्हणूनच अशा परिस्थितींत बंडाचें समर्थन करतां येत नाहीं. जेथें सर्वांना समान हक्क आहेत, मतस्वातंत्र्य आहे तेथें बंडाची आवश्यकताहि भासत नाहीं.

शासनसंस्थेच्या विविध घटकांची रचना कोणत्या प्रकारें केली जावी याविषयीं अनेक मतें असू शकतील. अशी रचना करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती संभवतात. या पद्धतींपैकीं सर्वांत उत्तम कोणती हें जरी अजून सांगतां आलें नाहीं तरी त्यांतल्या वाईट कोणत्या याविषयीं मला वाटतें बरेचसें निश्चित मत झालेलें आहे. जी शासनसंस्था व्यक्तिजीवनांतील विकार आणि अनपेक्षितता यांच्यावर अधिष्ठित असते ती सर्वांत अयोग्य असेंच म्हटलें पाहिजे. एकाद्या कायदेमंडळांत प्रतिनिधींनीं, विशेष महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार करावयाचा असल्यास, सगळ्यांनीं एकदम चर्चेला न बसतां, गटागटांनीं बसावें, एकमेकांचीं वैगुण्यें दूर करण्याचा प्रयत्न करावा. असें केल्यास तांतडीनें किंवा घाईनें केलेले निर्णय चुकीचे भासण्याचा संभव पुष्कळ कमी होण्यासारखा आहे.

प्रातिनिधिक शासनसंस्था एका विशिष्टच प्रकारची असली पाहिजे असें कांहीं नाहीं. वेगवेगळ्या प्रकारें तिची रचना केली तरी या सर्व प्रकारांच्या मागें तत्त्व एकच असतें. मानवाचे समान हक्क हेंच या शासनसंस्थेचें मूळ आहे. हें मूळ एकदां गृहीत धरलें कीं तिच्या शाखा-उपशाखांची रचना तत्कालीन मताप्रमाणें किंवा भविष्यकालांतील अनुभवाच्या अनुषंगानें करतां येईल. इंग्लंडच्या पार्लमेंटामध्यें सरदारसभा ही लबाडींतून निर्माण झालेली आहे. लोकांनीं प्रतिनिधित्वाच्या द्वारें स्थापन केलेलें कायदेमंडळ आणि अशा तऱ्हेचे हक्क बळकावून बसलेलें सरदारगृह यांच्यांत कसलेंहि साम्य नाहीं.

कायद्याची अंमलबजावणी करणारें खातें हा शासनसंस्थेचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे आणि म्हणूनच अंमलबजावणी खातें या शब्दाचा अर्थ निश्चित करणें आवश्यक आहे.

कोणत्याहि राजसत्तेचे दोन भाग पडतात. एक भाग कायदे करणारा आणि दुसरा भाग या कायद्यांची अंमलबजावणी करणारा. माणसाच्या व्यक्तित्वाचें बुद्धि आणि शरीर हे जसे दोन भाग आहेत तसेच कायदेमंडळ आणि अंमलबजावणी खातें हे राज्यसंस्थेच्या व्यक्तित्वाचे दोन भाग. अंमलबजावणी खात्याची मदत

घेतल्याशिवाय कायदेमंडळ आपणच वाटचाल करणार असें जर म्हणूं लागलें तर तें पूर्ण दुर्बल बनेल आणि अंमलबजावणी खात्याला कायदेमंडळाची जरूर वाटेनाशीं झाली तर ती वेड्याचीच अवस्था समजावी लागेल. तात्पर्य, कायदेमंडळ राज्यसंस्थेंत प्रमुख असून अंमलबजावणी खात्याचें स्थान दुय्यम असतें. कायद्यानें आंखून दिलेल्या मार्गानेंच अंमलबजावणी खात्याला गेलें पाहिजे. या दृष्टिकोनांतून कायदे अंमलांत आणणाऱ्या विविध खात्यांचें मिळून अंमलबजावणी खातें होतें. न्यायालय हा या खात्याचा सर्वांत प्रमुख भाग.

कायद्यांची अंमलबजावणी योग्य तऱ्हेनें होत आहे किंवा नाहीं हें पाहाण्यासाटीं देखरेख करणारे अधिकारी असावें असें माणसांना वाटतें. पुष्कळ वेळां कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि तिच्यावरची देखरेख यांची गल्लत केली जाते. अमेरिकेंतील देखरेख करणाऱ्या या अधिकाऱ्यांचें काम कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीनें होत आहे किंवा नाहीं हें पाहाणें हें होय. या अधिकारी वर्गाचा कायदेमंडळाशीं संबंध येतो तो फक्त कायद्याच्याच स्वरुपांत. देखरेख करणारे हे अधिकारी कोणत्या पद्धतीनें नेमावे हा प्रश्न मतभेदाचा होऊं शकेल. कोणाला एक पद्धत पसंत पडेल तर कोणाला दुसरी. जेथें मतभेदाचा प्रश्न उद्‌भवतो तेथें बहुमताचा निर्णय हाच प्रमाण मानला जातो.

तर्क आणि अनुभव यांच्या सहाय्यानें या बाबतींत कांहीं निष्कर्ष काढतां येतील. एक म्हणजे कोणत्याहि व्यक्तीच्या हातांत भरमसाठ सत्ता कधींहि केंद्रित करूं नये. ही व्यक्ति या सत्तेचा दुरुपयोग करण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें सत्तेच्या हपापामुळें ही जागा आपल्याला मिळावी अशा तऱ्हेची उत्कट स्पर्धेच्छा इतर लोकांत निर्माण होते. दुसरें म्हणजे कोणत्याहि व्यक्तीच्या हातीं फार काळ सत्ता देऊं नये. वारंवार बदलणाऱ्या अधिकाऱ्यांमुळें होणारी गैरसोय पुरवली परंतु एकाच व्यक्तीच्या हातीं फार काळ सत्ता राहिल्यानें निर्माण होणारा धोका मुळींच नको.

आतां मी हें प्रकरण संपवतांना स्वातंत्र्याचें संरक्षण कसें करावें याविषयीं थोडे विचार मांडणार आहें. स्वातंत्र्य एकदां मिळविलें म्हणजे संपलें ही वृत्ति चुकीची आहे. मिळविलेल्या स्वातंत्र्याचें रक्षण करणें हें अत्यंत महत्वाचें आहे.

पहिल्याप्रथम आपण जुलमी सुलतानशहांना उलथून टाकण्यासाठीं वापरलेले मार्ग व साधनें आणि राज्यक्रांति होऊन स्वातंत्र्य मिळाल्यानंतर चोखाळावयाचे

मार्ग व साधनें या दोघांतील फरक नीट लक्षांत घेतला पाहिजे. सुलतानशाहीच्या जुलमामुळें जेव्हां राज्यक्रांति अपरिहार्य होऊन बसते तेव्हां परिस्थितीवशात् आपल्याला कांहीं मार्गांचा अवलंब करावा लागतो. सर्वसाधारणतः बंडाची उठावणी हाच मार्ग जनता स्वीकारते. दुसरा कोणताहि मार्ग हे सुलतानशहा स्वीकारूं देणें शक्य नसतें आणि म्हणूनच या अशा परिस्थितींत बंडाचा उठाव सर्वथा समर्थनीय ठरतो. बंडाचा ठराव केल्यानंतर क्रांतिकारकांचे पुढारी कांहीं अधिकार स्वतःच्या विचारानें हातीं घेतात. त्या परिस्थितींत तसें करणें भाग असतें. परंतु स्वातंत्र्यानंतरहि कसल्याहि तत्त्वाचा आधार नसतां प्रसंगवशात् लाभलेले अधिकार या लोकांनीं आपल्या हातीं तसेंच ठेवायचें ठरविलें तर त्याचें पर्यवसान स्वातंत्र्य गमावण्यांतच होईल.

क्रांतीचा उठाव झाला कीं त्याच क्षणीं सर्व माणसांचें मतांतर होईल असें म्हणणें वस्तुस्थितीला सोडून होईल. कसलाहि मतभेद न होतां जगांतील सर्व माणसें एकत्र आलीं असें कधींच घडलें नाहीं आणि म्हणूनच ज्यांना हीं तत्त्वें पटलीं असतील त्यांनीं ज्यांना तीं पटलेलीं नाहींत त्यांचा छळ करून त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करणें सर्वथैव अयोग्य आहे. लोकशिक्षण हेंच क्रांतीचें मूलतत्त्व आहे. परमताचा छळ क्रांतीला अभिप्रेत नसतो. फ्रांसमध्यें जर दोन वर्षें अगोदर राज्यघटना तयार झाली असती तर तेथें अनिष्ट वातावरण निर्माण झालें नसतें आणि क्रांतीच्या कीर्तीला गालबोट लागलें नसतें. राज्यघटनेमुळें सर्व माणसें स्नेहभावानें एकत्र आली असतीं आणि प्रत्येक व्यक्तीला आपण कोणत्या मार्गानें गेलें पाहिजे याचेंहि भान राहिलें असतें. परंतु असें करण्याऐवजीं क्रांतिकारकांनीं आपलेंच सरकार स्थापन केलें. काळ मोठा विचित्र असतो. जी गोष्ट करणें आज सद्‌गुण असेल तीच गोष्ट करणें हा गुन्हा आहे असें उद्यां समजलें जाण्याची शक्यता असते. आजची देशभक्ति उद्यां द्रोह म्हणून ओळखली जाऊं शकते. या सर्व गोष्टी राज्यघटनेच्या अभावीं घडलेल्या आहेत. कारण कोणत्याहि पक्षाच्या एकतंत्री कारभाराला पायबंद घालणें हेंच राज्यघटनेचें उद्दिष्ट असतें. सर्व पक्षांना राज्यघटना बजावून सांगत असते कीं तुमची मर्यादा येथेंच संपते—या पुढें पाऊल टाकतां येणार नाहीं. परंतु राज्यघटनेच्या अभावीं लोक सर्वस्वीं बलिष्ठ पक्षावरच विसंबून राहातात आणि मग तत्त्वाचें पक्षांवर नियंत्रण चालण्याऐवजीं सर्व तत्त्वांना धाब्यावर बसवून पक्ष चालूं लागतो.

मराठी ...
अनुक्रम 2293

दंडशक्तीचा वापर करण्यांत केलेल्या घिसाडघाईमुळें स्वातंत्र्य धोक्यांत येतें. कारण त्यामुळें माणसांची प्रवृत्ति कायदे ताणण्याकडे, त्यांचा चुकीचा अर्थ लावण्याकडे, आणि त्यांचा दुरुपयोग करण्याकडे होते. ज्याला आपलें स्वातंत्र्य सुरक्षित राहावें असें वाटतें त्यानें आपल्या शत्रूंवर देखील जुलूम होणार नाहीं याची खबरदारी घेतली पाहिजे. कारण तो जर आपल्या कर्तव्याला मुकला आणि अन्यायाचा त्यानें पायंडा घातला तर आज ना उद्यां तो स्वतःच या गोष्टीचा बळी झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. [illegible]
अनुक्रमांक 22938 दि: [illegible]
क्रमांक [illegible] नों: दि: [illegible]

[illegible] क्र. 6204

REFBK-0009277